म. ग्रं. सं. ठाणे
विषय चारित्र
सं. क्र. ८८०
REFBK-0002486

ठाणे
स्थळप्रत
म. ग्रं. सं. ठाणे

चैतन्योत्पादक ग्रंथमाला-पुस्तक १ लें

## स्पॅनिश साम्राज्याच्या जुलमांतून हॉलंड देशाची मुक्तता करणारा वीर व मुत्सद्दी

# वुइल्यम दि सायलेंट.

लेखक


**वासुदेव दामोदर मुंडले**

नेपोलियन, काव्हूर, बिस्मार्क, मॅडम रोलंड, थॉमस पेन

वगैरे पुस्तकांचे कर्ते.



ग्रा. क्र. २४८६



शके १८४६ ] प्रथमावृत्ति [ सन १९२४



REFBK-0002486



चैतन्यो ... लामपूर.


किंमत दोन रुपये.

हें पुस्तक अनंत सखाराम गोखले, यांनीं पुणें शनवार पेठ, घ. नं. ५७० येथें विजय प्रेसमध्यें छापिलें व वासुदेव दामोदर मुंडले मालक "चैतन्योत्पादक ग्रंथमाला" यांनीं मु. इसलामपूर, जि. सातारा येथें प्रसिद्ध केलें.

मराठी ग्रंथ संग्रहालय
सं० क्र० नं. २५५०
ता. २०/७/१२
ठाणे.

माझे प्रेमळ मित्र

कै० जनार्दन विनायक

ऊर्फ

नाना ओक

यांचे आत्म्यास

त्यांच्याच प्रोत्साहनामुळें मीं लिहिलेला ग्रंथ,

अत्यंत आदरानें व स्नेहबुद्धीनें

अर्पण करीत आहें.

मराठी ग्रंथ संग्रहालय
नं.........
ना.
ठाणे.

# प्रस्तावना

स्वदेशभक्तीच्या भावनेनें उद्दीपित झालेल्या आणि स्वराज्य व स्वातंत्र्याची आकांक्षा बाळगणाऱ्या महाराष्ट्रीय तरुणांची विकारवशता व उच्छृंखलपणा कमी करून त्यास बहुश्रुत, साक्षेपि, विचारवंत व कार्यक्षम बनविण्याच्या हेतूनें निरनिराळ्या परदेशांतील लोकांनीं आपापल्या देशोद्धाराचे प्रश्न कशा रीतीनें सोडविले याचें सापेक्ष ज्ञान करून द्यावें असा विचार मनांत आणून कांहीं वर्षांपूर्वी माझे मित्र कै॰ नाना ओक यांच्या सल्ल्याने व सहानुभुतीनें राष्ट्रोद्धाराच्या प्रकाराचे तीन निरनिराळे नमुने महाराष्ट्रीयांपुढें मांडण्यास्तव इटलीचा काऊंट कॅव्हूर, जर्मनीचा प्रिन्स बिस्मार्क व हॉलंडचा वुइल्यम दि सायलेंट * ह्या तीन राष्ट्रोद्धारकांचीं चरित्रें लिहून प्रसिद्ध करण्याचें ठरलें. परंतु इतक्यांत महायुद्ध सुरू होऊन त्याची आंच ह्या देशासही लागली व छपाईचें सामान आणि मजुरी अतिशय महाग झाल्यामुळें हीं तिन्ही चरित्रें संकल्पाप्रमाणें लवकर प्रसिद्ध होऊं शकलीं नाहींत. कै॰ नाना ओक यांनीं कॅव्हूर व बिस्मार्क हीं चरित्रें अनुक्रमें १९१५ व १९१७ सालीं आपल्या राष्ट्रीय शिक्षणमालेंतून प्रसिद्ध केलीं व पुढें लवकरच ते दिवंगत झाल्यामुळें वुइल्यमचें चरित्र तसेंच पडून राहिलें. प्रस्तुत लेखकालाही तें प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें व इतर अडचणींमुळें लवकर छापतां येईना. इतक्यांत कै॰ नाना ओक यांच्या शिष्यत्वाचें नातें पुढें करून खानदेशांतील एका गृहस्थानें ह्या चरित्राची व थॉमस पेनच्या चरित्राची हस्तलिखित प्रत छापण्याचें आश्वासन देऊन नेली; परंतु तें काम बराच काळ गेला तरी जेव्हां त्याचेकडून होईना, तेव्हां त्यास सदर दोन्ही चरित्रांचीं हस्तलिखितें परत पाठविण्याची विनंति केली. एक दोन वेळां परत पाठवितों म्हणून त्याचीं उत्तरें आलीं; पण पुढें सुमारें दोन वर्षे होत आलीं तरी प्रती नाहींत व उत्तरही नाहीं; रजिस्टर पत्रांचेंही उत्तर नाहीं! तेव्हां मोठी विवंचना व तळमळ उत्पन्न झाली. दुसरी प्रत जवळ नसल्यामुळें सदर ग्रंथ छापून काढण्याची आशा विलयास जाऊं लागली! अशा खिन्न व निराश मनःस्थितींत असतांना एके दिवशीं माझे पुण्याचे मित्र रा॰ अच्युत चिंतामण भट यांस

* हीं चरित्रें मुंबईस परचुरे, पुराणिक आणि मंडळीकडे विकत मिळतील.

सहज ओघानें बोलतांना मीं वरील हकीकत सांगितली. तेव्हां त्यांनीं अंमळनेरच्या आपल्या एका माहितीच्या गृहस्थांचें नांव सांगून त्यांचेमार्फत प्रयत्न करण्यास सुचविलें. त्याबद्दल त्यांचे आभार मानून मीं तसा प्रयत्न केला. सुदैवानें दीर्घकालानें तो यशस्वी झाला आणि त्यामुळेंच आज हा ग्रंथ प्रकाशित करणें शक्य झालें. माझा प्रत्यक्ष परिचय नसतांना केवळ ऐकीव माहितीवरून मजबद्दल मनांत वसत असलेल्या सहानुभूतीमुळें या थोर मनाच्या गृहस्थांनीं–श्री॰ दत्तात्रय परशुराम चिंचाळकर, वकील, अंमळनेर यांनीं–मजकरितां अतिशय परिश्रम घेऊन उपरिनिर्दिष्ट दोन्ही चरित्रग्रंथांच्या हस्तलिखित प्रती मला परत मिळवून दिल्या व त्या सुमारें दोन वर्षेंपर्यंत पडून राहण्याचें कारण त्या नेणाराचा केवळ हलगर्जीपणा, त्यांत वाईट अगर दुष्ट हेतु नव्हता असें त्यांनीं मला कळविलें! प्रती परत मिळाल्यामुळें मी नेणाराच्या हेतूचा निष्कारण विचार करीत न बसतां सदर ग्रंथ छापून काढण्याच्या कामास लागलो व आज तो मराठी वाचकांचे हवालीं करून पूर्व संकल्पांतून मी मोकळा होत आहे. याचें सर्व श्रेय श्रीयुत चिंचाळकर यांस आहे व त्यांच्याच प्रयत्नानें या ग्रंथाचा पुनर्जन्म झाला असल्यामुळें त्यांचे येथें जाहीर रीतीनें आभार मानणें हें माझें कर्तव्य आहे. तें बजावून व या चरित्राबरोबरच कॅव्हूर आणि बिस्मार्क यांच्या चरित्रांचें वाचन व मनन सुशिक्षित तरुण महराष्ट्रीयांनीं केल्यास त्यांच्या विचारशक्तीस व कर्तृत्वास योग्य वळण लावण्याचे कामीं ह्या तीन चरित्रांचा चांगला उपयोग होईल, असें राष्ट्रीय शिक्षणाचे तज्ज्ञ व अध्वर्यु कै॰ नाना ओक ( माजी लोकशिक्षण मासिकाचे संपादक ) यांचें मत होतें, हें त्यास कळवून ही प्रस्तावना पुरी करितों.

चैत्र शुद्ध प्रतिपदा<br>
शके १८४६.

वा. दा. मुंडले.

भ. नं. सं. आर्ये.
मराठी ग्रंथ संग्रहालय
ठाणे.

# वुइल्यम दि सायलेंट.

## प्रकरण १ लें.

## नेदर्लंडाची पूर्वपीठिका.

'वुइल्यम दि सायलेंट'चें चरित्र म्हणजे १६ व्या शतकांत नेदर्लंड-(प्रस्तुतचें हॉलंड व बेल्जम) च्या लोकांनीं स्पेनचा एकतंत्री व जुलमी राजकीय अंमल झुगारून देऊन राजकीय स्वातंत्र्य मिळविण्याप्रीत्यर्थ जो कष्टतर झगडा केला त्याचा इतिहास होय. हा इतिहास अत्यंत हृदयभेदक व बोधप्रद असून तो वीर, करुण व भयानक रसांनीं ओथंबलेला आहे. बिस्मार्कचा सहाध्यायी व मित्र आणि प्रख्यात अमेरिकन ग्रंथकार जो मोटले त्यानें ह्या विषयाचा सांगोपांग अभ्यास करून 'दि राइज ऑफ दि डच रिपब्लिक'* या नांवाचा इंग्रजी भाषेंत एक उत्कृष्ट ग्रंथ लिहिला आहे. त्यांत ह्या झगड्याची सविस्तर कथा फार हृदयंगम आणि स्फूर्तिजन्य भाषेंत वर्णिली आहे इंग्रजी भाषाभिज्ञ लोकांनीं हा ग्रंथ एकवार तरी अवश्य वाचावा अशी आमची शिफारस आहे. 'वुइल्यम दि सायलेंट' हा या इतिहासकथचा आत्मा ऊर्फ नायक आहे. अर्थात् त्याचें चरित्र

---

* रा॰ रा॰ बळवंत त्र्यंबक द्रविड यांनीं सुमारें १५।२० वर्षांपूर्वी ह्या ग्रंथाचें मराठी भाषांतर प्रसिद्ध केलें असून त्यास 'नेदर्लंडांतील बंडाचा इतिहास असें नांव दिलें आहे! पण मोटलेच्या ग्रंथाच्या नांवाचें मराठी भाषांतर केल्यास तें 'डच लोकसत्ताक राज्याचा उदय' असें होईल व नेदर्लंडांतील स्वातंत्र्येच्छु देशभक्तांच्या कृतीस 'बंड' म्हणण्यापेक्षां मोटलेनें दिलेलें नांवच अधिक संयुक्तिक दिसतें, हें कोणीही सूज्ञ कबूल करील.

लिहिणारास या इतिहासकथेचें अनुसंधान राखून जागोजागीं त्यांतील ठळक गोष्टींचें वर्णन करणेंही भाग आहे. तें वाचकांच्या नीट लक्षांत येण्यास अडचण पडूं नये म्हणून प्रारंभीं–या प्रकरणांत–नेदर्लंडाची भौगोलिक स्थिति व त्याची थोडीशी पूर्वपीठिका देत आहों.

युरोपखंडाचा नकाशा उघडला असतां फ्रान्स, जर्मनी व जर्मन ऊर्फ उत्तर समुद्र यांच्यामध्यें जो एक छोटासा त्रिकोणाकृति भूप्रदेश दिसतो त्यास नेदर्लंड ऊर्फ लोलँड ( सखल भूप्रदेश ) असें म्हणत असत. सांप्रत याचे दोन भाग झालेले असून, उत्तरेकडील भागास हॉलंड व दक्षिणेकडील भागास बेल्जम अशा संज्ञा आहेत. स्पॅनिश साम्राज्य मोडकळीस येण्यापूर्वी हे दोन्ही भाग एकत्र असून अनेक सम्राटांच्या राजसत्तेखालीं कैक वर्षे होते. प्रारंभीं ते रोमन साम्राज्याच्या अंकित होते. नंतर फ्रँक ऊर्फ गॉलीश लोकांच्या ताब्यांत गेले. पुढें पवित्र रोमन साम्राज्याचे अधिपति जे आस्ट्रो–जर्मन बादशहा त्यांचीही या भूप्रदेशावर सत्ता चालू झाली आणि त्यांच्या वंशांतील बादशहा ५ वा चार्लस याच्या कारकीर्दीच्या शेवटीं व १६ व्या शतकाच्या प्रारंभीं तो स्पेनच्या अधिसत्तेखालीं आला. या वेळीं त्याचे १७ निरनिराळे प्रांत ऊर्फ परगणे होते. ते कसे बनत गेले याची त्रोटक माहिती पुढें देतों.

प्रारंभीं ह्या प्रदेशाचा दक्षिण भाग ज्यूलियस सीझरनें ( रोमन सम्राट् ) जिंकला. त्या वेळीं तेथील लोक जवळजवळ रानटी स्थितींतच होते. तसेच तो भूप्रदेशही मानवी वसाहतीस फारसा अनुकूल नव्हता. ऱ्हाईन, म्यूज व शेल्ड ह्या मोठ्या नद्यांचीं मुखें येथेंच समुद्रास मिळत असल्यामुळें व समुद्राच्या खाड्यांचें पाणीही वारंवार आंत जमिनीवर येत असल्यामुळें तो प्रदेश विशेष दलदलीचा, नापीक व अरण्यांनीं व्यापलेला असा होता; परंतु तेथें वसाहत करून राहिलेल्या लोकांनीं वारंवार निसर्गाशीं झगडून तो मानवी प्राण्यांस राहण्यास योग्य असा बनविला. या कालीं तेथें मुख्यतः जर्मन व केल्टिक ऊर्फ गॉल नामक मानववंशाची वस्ती होती. जर्मन लोक उत्तर भागांत होते व केल्टिक लोक दक्षिणेंत होते. ह्या दोन मानवजातींचे मनोधर्म व आचारविचार यांच्यांत पुष्कळ भेद होता. जर्मन लोक स्वातंत्र्यप्रिय, उद्योगी, काटक, शूर, एकेश्वरवादी व युद्धप्रिय होते. केल्टिक लोक सुंदर, विलासप्रिय, शूर, शेती व व्यापारधंदा करून राहणारे, धर्मभोळे, शांतताप्रिय आणि दुसऱ्याच्या अंकित राहण्यास तयार असे होते. त्यांच्या समाजांत ऐच्छिक

व सक्तीची गुलामगिरी चालूं होती. त्यांच्या राज्यपद्धतींतही मोठा फरक होता. जर्मन लोकांत स्थानिक स्वराज्य व लोकसत्ताक राज्यपद्धति यांची थोडीबहुत वाढ झालेली होती. केल्टिक लोकांत सर्व सत्ता एकमुखी होती. ह्या दोन्ही लोकांस पुढें रोमन सम्राटांनीं जिंकलें, त्या वेळीं त्यांनीं आपलें स्वातंत्र्य राखण्याविषयीं रोमन सेनेटबरोबर अनेक निकराचीं युद्धें केलीं; पण अखेर त्यांचा पराभव होऊन त्यांस रोमन साम्राज्यांत सामील व्हावें लागलें! रोमन साम्राज्यास उतरती कळा लागल्यावर फ्रँक्स, व्हँदाल, अॅलनी, स्यूव्ही, सॅक्सन्स, फ्रिजियन्स, स्कॅल्व्होनियन्स, वगैरे जातींच्या लोकांनीं ह्या भूप्रदेशावर स्वाऱ्या करून तेथें आपलें वर्चस्व स्थापण्याचा यत्न केला; परंतु अखेर फ्रँक्स लोकांचेंच वर्चस्व कायम होऊन तें कांहीं शतकें टिकलें. त्यांच्याच कारकीर्दीत येथें ख्रिस्तीधर्माचा प्रसार झाला व वरील निरनिराळ्या लोकांच्या संसर्गानें तेथें जर्मन व केल्ट लोकांमध्यें अनेक पोटजाती उत्पन्न झाल्या. इ. स.च्या १० व्या शतकांत ह्या देशावर जर्मन सम्राट् हेनरी ( फाउलर ) याची सत्ता स्थापन झाली. त्याच्या कारकीर्दीपासून ह्या घराण्यांतील सम्राटांचें सामर्थ्य कमी होत गेल्यामुळें त्यांना आपल्या साम्राज्याच्या निरनिराळ्या भागांतील स्थानिक सरदारांस सरंजाम अर्थात् जहागिरी व स्वतंत्र अधिकार द्यावा लागला. या कारणानें नेदर्लंडांतही या वेळीं अनेक ड्यूक, अर्ल, काउंट वगैरे पदव्यांनीं युक्त असे पिढीजाद जहागिरदार व मानकरी सरदार उत्पन्न झाले. पुढें कांहीं कालानें सरंजामी पद्धतीस अनुसरून ते आपापल्या अमलांतील मुलुखाचे मालक ऊर्फ संस्थानिक बनले. तेव्हां त्या सर्वांना साम्राज्यसरकारच्या कह्यांत ठेवण्याकरितां ह्या प्रदेशावर साम्राज्य सरकारातर्फे एका स्वतंत्र अधिकाऱ्याची नेमणूक होऊं लागली. त्यास रीजंट अथवा गव्हर्नर जनरल असें म्हणत असत.

मध्ययुगांत ( इ. स. १४०० च्या सुमारास ) युरोपांत ख्रिस्तीधर्माचें फार मोठें प्रस्थ माजलें असल्याकारणानें त्या धर्माच्या संस्था व अधिकारी यांचेंही या देशांत वास्तव्य झालें होतें. फ्रँक व जर्मन साम्राज्यांच्या अमलाखालीं असतांना धर्म, शिक्षण, राज्यसंस्था वगैरे बाबतींत नेदर्लंडच्या लोकांची बरीच प्रगति झाली. राज्यव्यवस्थेच्या दृष्टीनें त्याचे १७ भाग ऊर्फ परगणे करण्यांत आले होते व त्यांवर निरनिराळ्या ड्यूक्स, अर्लस् वगैरे सरदारांची सत्ता चालत होती. सामान्य लोकांनाही स्थानिक स्वराज्याचे व प्रातिनिधिक सत्तेचे कांहीं हक्कमिळ-

झाले होते. शेती व व्यापार या बाबतींतही त्यांची स्थिति चांगली भरभराटीची होती; परंतु या सुमारास युरोपांत प्रॉटेस्टंट मताचा प्रसार होऊन त्याचा ख्रिस्ती धर्मांतील मूळच्या व जुन्या रोमन कॅथोलिक मतांशीं विरोध उत्पन्न झाल्यामुळें धार्मिक बाबतींत सर्वत्र यादवी सुरू झाली. प्रॉटेस्टंट धर्ममताला जर्मनींतील अनेक संस्थानिकांनीं मान्यता दिल्यामुळें कॅथोलिक मताभिमानी राजेलोकांस मोठी भीति उत्पन्न झाली. हे राजे प्रायः एकसूत्री अंमलाचे चहाते होते. प्रॉटेस्टंट मत हें धार्मिक बाबतींत मनुष्यास स्वतंत्र विचारास प्रवृत्त करणारें होतें; आणि ही स्वतंत्र विचाराची सांथ जर लोकांत फैलावली तर एकमुखी राजकीय वर्चस्वासही ती धक्का दिल्यावांचून राहणार नाहीं असें कॅथोलिकपंथीय राजांस वाटल्यामुळें त्यांनीं त्या मतास पाखंडांत काढून त्याचा नायनाट करण्याचा उद्योग सुरू केला. ह्या कामीं प्रथम आस्ट्रो–जर्मन सम्राट पांचवा चार्लस यानें आणि नंतर फ्रान्स व स्पेन ह्या दोन प्रमुख युरोपियन राष्ट्रांच्या अधिपतींनीं पुढाकार घेतला. कॅथोलिक पंथाचा मुख्य धर्मगुरु जो इतालींतील पोप तोही त्यांस सामील झाला. त्यांनीं आपल्या प्रजेपैकीं जे लोक या नवीन पाखंडांत शिरतील त्यांचा उच्छेद व छल करण्याकरितां आपापल्या राज्यांत पोपच्या अनुमतीनें कडक कायदे केले. आस्ट्रो–जर्मन सम्राट् पांचवा चार्लस याच्या कारकीर्दींत नेदर्लंडांत हे कायदे अंमलांत येऊं लागले. त्यामुळें अनेक प्रॉटेस्टंटपंथीय कुटुंबांतील माणसांवर संकटें येऊन त्यांचा नाश होऊं लागला. तेव्हां येथील लोक त्याच्या ह्या जुलमाचा प्रतिकार करण्याकरितां सनदशीर चळवळ करूं लागले. ती दाबून टाकण्यास्तव चार्लसनें मतस्वातंत्र्य व विचारस्वातंत्र्य संपुष्टांत आणणारे दडपशाहीचे कायदे करून लोकांना राज्यकारभारासंबधीं पूर्वी मिळालेले हक्क संकुचित केले. यामुळें नेदर्लंडांतील प्रजेंत मोठा असंतोष उत्पन्न झाला; परंतु इतर बाबतींत चार्लसची राज्यपद्धति जरा बरी असल्याकारणानें हा असंतोष त्याच्या कारकीर्दींत विकोपास गेला नाहीं. मनुष्यप्राणी हा सामान्यतः सुखप्रिय असल्यामुळें शांततेचा भोक्ता आहे. जोंपर्यंत त्याला थोडेसें कां होईना, पण समाधान मानण्यास अवसर मिळेल तोंपर्यंत तो बहुधा आपल्या दुःखावर पांघरूण घालून आयुष्य कंठीत असतो. जेव्हां सर्व बाजूंनीं तो गांजला जाऊन त्याचें जीवनच अशक्य होण्याचा समय येतो तेव्हांच तो वैतागून आपली कष्टमय स्थिति सुधारण्याच्या उद्योगास लागतो. आणि असा आणीबाणीचा प्रसंग येईपर्यंत त्याला किती जरी यातना सोसाव्या लागल्या, तरी त्या तो सहन करीत

असतोच. जी गोष्ट व्यक्तिमात्राची तीच व्यक्तिसमूहानें भरलेल्या राष्ट्रांची: व्यक्तीप्रमाणें राष्ट्रेंही आपल्या दुःखांचा परिहार करण्याचे कामीं अत्यंत मंद गतीनें पाऊल टाकतात आणि त्यामुळेंच जुलमी राजांचीं राज्यें शेंकडों वर्षे टिकतात, असें इतिहासावरून दिसून येतें. ह्या ऐतिहासिक सिद्धान्तास नेदर्लंड कांहीं अपवाद नव्हतें. पूर्वपरंपरागत चालत आलेल्या अनेक राजकीय हक्कांचें व मतस्वातंत्र्याचें उच्चाटण करणारे कायदे जरी पांचव्या चार्लसनें अमलांत आणले असले, तरी भेद-नीतीचा त्यानें अवलंब केल्यामुळें नेदर्लंडांतील पुष्कळ बड्या व विद्वान् लोकांची त्याच्या दरबारीं चहा होऊन त्यांस मोठमोठ्या मानाच्या पदव्या व नोकऱ्या मिळत असत. तसेंच व्यापाराभिवृद्धीसही त्यानें चांगलें उत्तेजन दिल्यामुळें देशांतील व्यापारी म्हणजे मध्यम स्थितींतील लोक यांची स्थितीही भौतिकदृष्ट्या बरीच चांगली होती. शेतकरीवर्गाची स्थितीही विशेष तक्रार करण्याजोगी नव्हती. चार्लस हा युद्धप्रिय असल्यामुळें वारंवार होणाऱ्या युद्धांचा खर्च कराच्या रूपानें ह्या लोकांस भरावा लागे व त्याबद्दल त्यांची कुरकूर चालू असे; परंतु तिचा कांहीं एक उपयोग होण्याचा संभव नव्हता. कारण चार्लसची सत्ता या वेळीं चांगली खंबीर असून त्याची राज्यपद्धतीही अगदीं व्यवस्थित व एकतंत्री असल्यामुळें प्रजेच्या सामान्य कुरकुरीनें त्यावर आघात होण्याचें बिलकुल भय नव्हतें. या लोकांमध्यें तरी एकविचार कोठें होता? मागें सांगितलेल्या दोन प्रमुख (जर्मन व केल्ट) मानववंशांचीं अनेक स्थलांतरें व संकर होऊन या वेळीं नेदर्लंडांतील लोकांत डच, फ्लेमिंग्ज्, वाल्रून्स, जर्मन्स असे चार प्रकार उत्पन्न झालेले होते; पैकीं डच व जर्मन्स यांचा विशेष भरणा उत्तरभागांत असून फ्लेमिंग्ज् व वाल्रून्स यांनीं दक्षिण भाग व्यापला होता. उत्तरभागांत हॉलंड, झीलंड युत्रेक्ट, फ्रीजलंड, गेल्डरलंड, ओव्हरयेसेल, ग्रोनिनगेन, वगैरे प्रांत असून तेथें प्रॉटेस्टंट व कॅलव्हानिस्ट धर्ममतांचें विशेष प्राबल्य वाढत चाललें होतें. ह्या प्रांतांतील लोक मुख्यतः शेतकी व मच्छीमारी यांवर उदरनिर्वाह करीत असत. त्यांपैकीं फक्त हॉलंडमध्यें तेवढ्या अमस्टरडॅम, लेडन, हॉर्लेम वगैरे मोठमोठ्या व्यापाराच्या पेठा होत्या. ह्या भागांतील लोक जास्त स्वातंत्र्यप्रिय व लोकसत्ताक राज्यपद्धतीचे चहाते असल्यामुळें त्यांच्यांत बराच एकोपा होता. परंतु ते फार धिम्या व शांत स्वभावाचे असल्यामुळें त्यांच्याकडून चार्लससारख्या बलाढ्य जुलमी राजास एकाएकीं प्रतिकार होण्याचा संभव नव्हता. नेदर्लंडच्या दक्षिण भागतां

आर्तोइ, हेनॉल्ट, आरास, व्हॅलेन्सिनीज, फ्लॅंडर्स, ब्रॅबंट, नामूर, मेक्लीन, लीज व लक्झेंबर्ग वगैरे परगणे होते. ह्या भागांतील लोकांचें व्यापार हेंच उपजीविकेचें मुख्य साधन होतें. तेथील जमीन सुपीक असून खनिज पदार्थांनीं संपन्न होती. मोठमोठ्या नद्यांचे प्रवाह व अरण्यें यांनीं तेथील भूप्रदेश निसर्गतः रमणीय व शोभायमान असा होता. ह्या प्रदेशांत सुमारें ३५० मोठीं व सहा हजार छोटीं व्यापारी शहरें होतीं. त्यांत घेंट, ब्रुजेस, मॉन्स, मेक्लीन, ब्रुसेल्स व अँटवर्प ह्या फार मोठ्या नामांकित व्यापारी पेठा असून बहुतेक सर्व जगाशीं त्यांचें व्यापारी दळणवळण होतें! इंग्लंड, हिंदुस्थान, आशिया वगैरे देशांशीं यांचा लोकरीचा फारच मोठा व्यापार चालत असे. या भागांतील लोकांत कॅथोलिक पंथाचें विशेष वर्चस्व असून चार्लसच्या येथील राज्यकारभारांचें मुख्य ठाणेंही याच प्रदेशांत ब्रुसेल्स शहरीं होतें. येथील लोक उच्छृंखल, विलासप्रिय व संपन्न असल्यामुळें परस्परांविषयीं बेफिकीर असे होते. ते उत्तर भागांतील लोकांप्रमाणें लोकसत्ताक राज्यपद्धतीचे चहाते नव्हते; किंबहुना एकतंत्री अंमलच त्यांस बरा वाटत असे, असें म्हटलें तरी चालेल. अशा लोकांत एकोप्यानें जुलुमी राजास विरोध करण्याची प्रवृत्ति उत्पन्न होणें मुष्किलीचें असतें. त्यांतून त्यांच्यांतील अनेक मोठमोठ्या लोकांस चार्लसनें अधिकार व मानमान्यता यांचें अमिष दाखवून आपलेंसें केलेलें असल्यामुळें व धर्मदृष्ट्याही चार्लसबरोबर त्यांचा विरोध असण्याचें कारण नसल्यामुळें त्यांच्यापासून त्याच्या सत्तेस अपाय होण्याचा संभव नव्हता. शिवाय चार्लस हा स्वतः फ्लेमिश वंशांतून उत्पन्न झालेला असून त्याचें बरेंचसें आयुष्य नेदर्लंडांतच गेलें असल्यामुळें त्याच्याविषयीं जनतेच्या मनांत व जनतेविषयीं त्याच्या मनांत एकप्रकारें सहानुभूति व आदर हीं वसत होतीं. यामुळें प्रजेला सर्वस्वीं पिळून काढून बेहाय करण्याचें धाडस त्याच्या हातून होत नव्हतें व प्रजेच्या हातूनही त्याच्या अंशतः सह्य अशा जुलमाचा एकदम नेटानें तीव्र प्रतिकार होण्याचा संभव नव्हता. चार्लसनें त्यांचे राजकीय हक्क संकुचित करून युद्धें व राज्यकारभार यांच्या खर्चाकरितां मोठमोठ्या रकमा त्यांचेकडून वसूल करण्याचा क्रम सुरू केला होता; परंतु त्याबरोबरच त्यांच्या उद्योगशीलतेस व व्यापारास उत्तेजन देऊन त्यांना श्रीमान् व सुखी करण्यासही तो तयार असे. शिवाय व्यक्तिस्वातंत्र्य व मतस्वातंत्र्य यांचा जितका त्यानें निरोध केला होता तितका जनतेच्या सामुदायिक हक्कांचा संकोच यानें केलेला नव्हता. या सामुदायिक हक्कासंबंधानें उत्तर व दक्षिण या दोन्ही

भागांतील लोकांत सारखीच जागृति असे व त्यांच्या रक्षणार्थ ते सदोदित तयार असत. हे हक्क प्रत्येक प्रांतांत तेथील परिस्थितीस अनुसरून निरनिराळ्या स्वरूपाचे होते. कोठें स्थानिक राज्यव्यवस्थेचीं सूत्रें सर्वस्वीं लोकनियुक्त संस्थांच्या हातीं होतीं, तर कोठें लोक व सरदार यांच्या मिश्र प्रतिनिधींच्या हातीं होतीं. तसेंच न्याय व अंमलबजावणी खात्यांत स्थानिक लोकांचीच नेमणूक करण्याचा हक्क तेथील सर्व प्रांतांस सारखाच मिळालेला होता तसेंच सर्व प्रांतांतील पिढीजाद सरदार, मानकरी, व्यापारी व शेतकरी यांच्या प्रतिनिधींनीं युक्त असलेली 'इस्टेटस् जनरल' नांवाची एक प्रमुख लोकसभा सर्व नेदर्लंडच्या अंतस्थ कारभारासंबंधीं बादशहास सल्ला देण्याकरितां निर्माण झालेली होती. ह्या संस्थेला नेदर्लंडच्या मुलकी व लष्करी खर्चास मंजुरी अगर नामंजुरी देण्याचा हक्क होता. हा हक्क काढून घेण्याबद्दल चार्लसनें पुष्कळ युक्त्या योजल्या; परंतु लोकांच्या दक्षतेमुळें त्या सफळ झाल्या नाहींत. तेव्हां त्यानें ह्या सभेच्या सभासदांस लालूच दाखवून वश करण्याचा व त्यांच्याद्वारें आपल्या अवाढव्य लष्करी खर्चाची रक्कम नेदर्लंडच्या लोकांवर लादण्याचा क्रम सुरू केला. त्याचें हें धोरण बहुतेक प्रसंगीं यशस्वी होत गेल्यामुळें त्याला ह्या सभेच्या अस्तित्वावर अथवा तिच्या तात्त्विक हक्कांवर शस्त्र उपसण्याचें फारसें कारण पडलें नाहीं. ह्या सभेचें अधिवेशन बादशाही हुकुमावरून वारंवार ब्रुसेल्स व घेंट शहरीं भरत असे. चार्लसच्या ह्या सभेशीं वारंवार चकमकी उडत;परंतु त्या तो फारशा विकोपास जाऊं देत नसे. तो आपले हेतू होतां होईल तोंपर्यंत युक्तिप्रयुक्तीनें साधीत असे. तथापि त्याच्या कारकीर्दीच्या अखेरीस् नेदर्लंड-मध्यें प्रॉटेस्टंट मताची दीक्षा घेणारास तो अत्यंत निष्ठुरतेनें वागवूं लागला होता. ह्या मताच्या प्रसारास आळा घालण्याकरितां त्यानें अनेक कडक कायदे केले व ते अंमलांत आणण्याकरितां झटपट चौकशी व देहांत शासन देणारी न्यायमंडळेंही स्थापन केलीं. परंतु ह्या कडक उपायांनी त्याचा कार्यभाग झाला नाहीं. त्याच्या राज्यांत नुसते प्रॉटेस्टंटच नव्हे, तर कॅलव्हॅनिस्ट व अनबाप्टिस्ट* या दोन जहाल धर्मसुधारक पंथांचाही प्रसार होत चालला. ही स्थिति पाहून चार्लसचें मन फार खिन्न झालें; परंतु त्याचे त्या वेळीं उतारवय होऊन शरीरही रोगग्रस्त झाल्यामुळें राज्यत्याग करून ह्या गोष्टीचा बंदोबस्त करण्याचें काम त्यानें आपल्या पुत्रावर टाकलें.

* रोमन कॅथोलिक, प्रॉटेस्टंट, कॅलव्हानिस्ट व अनबाप्टिस्ट या सर्व मतांची विस्तृत माहिती ब्रिटिश एन्सायक्लोपिडियावरून कळून येईल.

चार्लस हा आस्ट्रो-जर्मन साम्राज्याचा बादशहा होता. त्याच्यामागून त्याचा भाऊ फर्डिनंड हा त्या गादीवर बसला व त्याचा पुत्र फिलिप दि सेकंड हा स्पेन, सिसली, बालेरिक बेटें, अमेरिकेचा कांहीं भाग व नेदर्लंड इतक्या प्रदेशाचा स्वतंत्र राजा अथवा दुय्यम प्रतीचा सम्राट् झाला. ही वांटणी चार्लसनें स्वतः करून दिली होती. फिलिप हा आपल्या बापाप्रमाणें कर्तबगार नव्हता व शहाणाही नव्हता. सामान्य बुद्धिमान् खडेंघाशाचे गुण व अक्कल त्याजपाशीं होती; परंतु मुत्सद्देगिरी अथवा राजकारणपटुत्व हे जे राजे लोकांस आवश्यक असणारे गुण त्यांचा त्याचेपाशीं बहुतेक आभावच होता. असें असूनही त्याची अधिकार-तृष्णा व वैभवलालसा अनिवार्य होती. व्यक्तिशःही तो नेदर्लंडच्या लोकांस आवडत नव्हता; व त्याच्याही मनांत त्यांचेबद्दल आदर अथवा सहानुभूति वसत नव्हती. शिवाय तो कॅथोलिक मताचा अभिमानी किंबहुना दुरभिमानी असून तद्विरुद्ध वर्तन करणारांचा कट्टा शत्रू व द्वेष्टा होता. अर्थात् गादीवर येतांच लवकरच त्याचें व नेदर्लंडांतील धर्मसुधारकांचें द्वंद्व सुरू व्हावें हें अगदीं साहजिक आहे. त्यानें आपल्या वडिलांचें अनुकरण करून भेदनीतीचा आश्रय केला असता, तर कदाचित् चार्लसप्रमाणें त्यालाही नेदर्लंडवर बराच कालपर्यंत निर्वेध सत्ता चालवितां आली असती. परंतु त्याला चार्लसचें राजधोरण पुढें चालवितां आलें नाहीं. त्यानें नेदर्लंडच्या लोकांस सरसकट तुच्छ मानून स्पॅनिश लोकांच्या मदतीनें त्यांच्या राजकीय गुलामगिरीची शृंखला घट्ट करण्याचा प्रयत्न केला व त्याकरितां त्यानें असह्य असा धर्मच्छल सुरू केला. अर्थात् त्याचा अनिष्ट परिणाम होऊन अखेर ह्या प्रांतांतील लोकांनीं आपल्या राजकीय व धार्मिक स्वातंत्र्याच्या संरक्षणार्थ त्याच्या जुलमाचा प्रतिकार करण्यास कंबर कसली! हा झगडा सुमारें वीस वर्षे चालू होता. त्यांत उभयपक्षांची अतोनात हानी होऊन अखेर उत्तर नेदर्लंड हें हॉलंड ह्या नांवानें स्वतंत्र होऊन तेथें 'डच लोकसत्ताक' राज्य निर्माण झालें! व वुइल्यम दि सायलेंट याच्या आकस्मिक मृत्यूमुळें फक्त दक्षिण नेदर्लंड मोठ्या मुष्किलीनें त्याच्या अंमलाखालीं राहिलें. पण त्यांसही त्यांचे जुने राजकीय हक्क देणें त्याला भाग पडलें. ह्या झगड्यांत आरंभापासून तों शेवटपर्यंत म्हणजे मारेकऱ्याच्या हातून गोळी लागून प्राणोत्क्रमण होईपर्यंत वुइल्यम ऑफ ऑरेंज ऊर्फ वुइल्यम दि सायलेंट या संस्थानिकानें प्रमुख भाग घेतला होता. त्याच्याच प्रोत्साहनानें तो सुरू झाला व त्याच्याच कर्तबगारीनें तो शेवटास गेला. तो कसा, हें पुढील प्रकरणांतून क्रमशः वाचकांस कळून येईल.

वाचनालय ... ग्रंथ संग्रहालय नं. ... आ. ...

# प्रकरण २ रें.

## पहिली पंचविशी

ऱ्हाईन नदीच्या आसमंतांतील नासू नामक परगण्यांत डिलेन्बर्ग नांवाचें एक गांव आहे. तें पूर्वी जर्मनींतील नासू परगण्याचें अथवा जहागिरीचें मुख्य ठाणें असून तेथें ह्या जहागिरीच्या अधिपतींनीं एक भव्य व मजबूत किल्ला बांधलेला होता. सध्यां तो किल्ला पडलेला आहे, परंतु तें गांव मात्र चांगल्या भरभराटींत आहे. ३०० वर्षांपूर्वी ह्या प्रदेशांतील सृष्टिसौंदर्य नयनमनोहर असून हवापाणी अतिशय उत्तम होतें. ह्या नासू परगण्याच्या जहागिरदारांचें आडनांवही 'नासू'च होतें. त्यांच्या घराण्यांत व उपरोक्त किल्यांत ता. २५ एप्रिल सन १५३३ रोजीं आमच्या चरित्रनायकाचा जन्म झाला. त्याच्या आईचें नांव 'जुलिआना ऑफ स्टॉलबर्ग' असें असून बापाचें नांव 'वुइल्यम काऊंट ऑफ नासू' असें होतें. बापाचें नांव मुलास ठेवण्याची युरोपियन लोकांत मुभा आहे. त्यास अनुसरून आमच्या चरित्रनायकास लहानपणीं 'तरुण वुइल्यम' या नावानें संबोधिलें जात असे. तो वरील कुटुंबाचा सर्वांत वडील मुलगा होय. त्याच्याशिवाय आणखी १२ मुलें ह्या कुटुंबास झालीं होतीं, आणि मुलांच्या ह्या समृद्धीवरून वडील वुइल्यम यास 'वुइल्यम दि रिच्' (श्रीमान् वुइल्यम्) असें नांव पडलें होतें. नासू घराणें हें युरोपांतील अत्यंत प्रख्यात् व नांवाजलेलें सरदार घराणें होतें. ह्या घराण्यांतील पुरुषांनीं तत्कालीन लहानमोठ्या कुलीन संस्थानिकांच्या व राजघराण्यांतील मुलींशीं विवाह करून देणगी अथवा वारसाहक्क या द्वारानें जर्मनी, फ्रान्स व नेदर्लंड या देशांत अनेक लहानमोठ्या जहागिरी संपादन केल्या होत्या. कांहीं त्यांनीं स्वतः-च्या पराक्रमावरही मिळविल्या होत्या. रोमन, जर्मन, फ्रेंच व स्पॅनिश साम्राज्यांत ह्या घराण्यांतील पुष्कळ पुरुषांनीं लष्करी सेवा करून लौकिक संपादन केला होता व त्याचा विस्तार एवढा मोठा झाला होता कीं, युरोपांतील बहुतेक राजांचा ह्या घराण्याशीं प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष असा वंशिक संबंध जडलेला होता! त्याच-प्रमाणें युरोपियन मध्ययुगांतील बहुतेक नामांकित सरदार व मुत्सद्दी हेही याच

घराण्यांच्या अनेक शाखा-उपशाखांतून जन्म पावलेले होते. हा एवढा मोठा विस्तार मुख्यतः वुइल्यम् दि रिचु व ज्युलिआना स्टॉल्वर्ग ह्या दंपत्यापासून वाढला होता. वुइल्यम् दि रिचू हा स्वभावानें शांत, उदार मनाचा, सुविचारी व दूरदर्शी होता. तो मूळचा कॅथोलिक होता; परंतु पुढें त्यानें लूथरप्रणित प्रॉटेस्टंट पंथ स्वीकारला. तथापि आपल्या जहागिरींतील लोकांवर त्यानें धर्मसंबंधीं जुलूम कधींच केला नाहीं. त्या वेळीं प्रॉटेस्टंट पंथानुयायी लोकांचा सर्वत्र छळ होत होता. मोठमोठे राजेमहाराजे हे या पंथाविरुद्ध होते व कॅथोलिक पंथाचा जबरीनें पुरस्कार करीत होते. अशा स्थितींत मनाचा समतोलपणा कायम ठेवून आपल्या अंमलाखालील लोकांस धार्मिक मतस्वातंत्र्य देणें हें फार अवघड काम होतें; परंतु वुइल्यम् दि रिच् यानें अखेर-पर्यंत तेंच धोरण राखलें व पुढें त्याचा मुलगा वुइल्यम् दि सायलेंट यानेंही या बाबतींत आपल्या बापाचाच कित्ता गिरविला. जुलिआना ही मोठी कर्तबगार स्त्री होती. ती मोठी धार्मिक व धारिष्टवान् असून प्रपंचाविषयीं दक्ष होती. तरुण वुइल्यम् याचें प्राथमिक शिक्षण तिच्या स्वतःच्या देखरेखीखालींच झालें; यामुळें धार्मिकता, अढळ धैर्य, आशावादित्व वगैरे तिच्या अंगचे गुण त्याच्या ठिकाणींही उत्पन्न झाले. तरुण वुइल्यम् हा वयाच्या अकराव्या वर्षापर्यंत तिजपाशीं होता. त्यानंतर एक नवीन स्थित्यंतर झाल्यामुळें त्यास आपल्या आईबापांस सोडून ब्रुसेल्स येथें शिक्षणाप्रीत्यर्थ जावें लागलें. तें स्थित्यंतर असें:-इ. स १५४४ च्या जुलई महिन्यांत तरुण वुइल्यमचा एक चुलतभाऊ-रेने ऑफ ऑरेंज-वारला. त्याला पुत्रसंतान नसल्यामुळें त्यानें आपली सर्व मिळकत, जहागिरी व बहुमानाच्या पदव्या तरुण वुइल्यमच्या नांवें करून ठेवल्या.† ह्या मृत्युपत्रास संमति देतांना तत्कालीन सम्राट् पांचवा चार्लस यानें तरुण वुइल्यमचें शिक्षण आपल्या देखरेखीखालीं झालें पाहिजे अशी अट घातली होती. ही अट पुरी करण्यास्तव त्यास ब्रुसेल्स येथें

---

† यांत ब्रॅबंट, फ्लँडर्स, हॉलंड, लक्झेंबर्ग, ब्रेडा वगैरे नेदर्लंडांतील प्रांतांतल्या जहागिरा, तत्संबंधींच्या अनेक पदव्या व फ्रान्सच्या राजाच्या आधिसत्तेखालचें 'ऑरेंज' नामक छोटें संस्थान यांचा समावेश होता. हें संस्थान रेनेच्या पूर्वजानें स्वपराक्रमानें मिळवून अखेरपर्यंत स्वतंत्र राखलें होतें. यास्तव त्या अभिमानजन्य गोष्टीची स्मृति कायम ठेवण्याकरितां तरुण वुइल्यम यानें 'वुइल्यम् ऑफ ऑरेंज' हा किताबच विशेष ठळकपणें चालू ठेवला.

पाठविणें जरूर होतें; व प्रथमतः जरी—तेथें कॅथोलिक पंथाचें वर्चस्व असल्यामुळें तरुण वुइल्यमचे आईबाप त्यास तेथें पाठविण्यास तयार नव्हते, तरी पुढें लवकरच त्यांनीं ती गोष्ट कबूल केली व त्यास चार्लसच्या सांगण्यावरून त्यांनीं नेदर्लंडची रीजंट मेरी हिच्या स्वाधीन केलें. स्पेनचा सम्राट् पांचवा चार्लस हा या वेळीं ब्रुसेल्स येथें रहात होता; सबब त्यानें तरुण वुइल्यमास स्वतःच्याच हुजरातींत ठेवून घेतलें. तेथें असतांना त्याची बुद्धिमत्ता व एकंदर वागणूक पाहून चार्लस इतका खूष झाला कीं, त्याला तो नेहमीं आपल्या तैनातीस घेऊं लागला. जेवणाचे वेळीं, गुप्त राजकीय खलबतें चालू असतांना, करमणुकीचे वेळीं—म्हणजे सदोदित तरुण वुइल्यम त्याच्या अगदीं नजिक असे. अशा स्थितींत सुमारें आठ वर्षें त्यास घालवावीं लागलीं व तेवढ्या काळांत, दरबारी बोलणीं, त्यांतील डावपेंच, रागरंग, राजकारण, निरनिराळ्या मनुष्यांचे स्वभाव व मनोगत यांची त्यास फार चांगली माहिती झाली. या माहितीचा व येथील अनुभवाचा भावी काळांत त्याला फार मोठा उपयोग झाला. चार्लसनें त्याच्या बौद्धिक शिक्षणाचीही उत्तम तरतूद केली होती. त्याच्याकरितां पेरेनॉट या नांवाचा एक विद्वान् शिक्षक त्यानें ठेवला होता व त्याच्या हाताखालीं त्याचें शिक्षण चालू असतांना जर्मन, फ्लेमिश, फ्रेंच, स्पॅनिश व लॅटिन भाषा यांचें व धर्म, राजकारण, इतिहास इत्यादि विषयांचें सोपपत्तिक ज्ञान त्यानें संपादन केलें. धर्मसंबंधीं वादग्रस्त बाबींविषयीं त्याच्या शिक्षकानें मौनच स्वीकारलें होतें. फक्त खिस्ती धर्माचीं मूलतत्त्वें व तत्संबंधींचें स्थूल तत्त्वज्ञान एवढ्यांचेंच आपल्या शिष्यास त्यानें ज्ञान करून दिलें.

वुइल्यमला अठरावें वर्ष लागल्यावर चार्लसनें ॲन नांवाच्या एका सरदारकन्येबरोबर त्याचा विवाह करून दिला. ( इ. स. १५५१ ) ह्या विवाहास त्याच्या आईबापांचीही संमति मिळाली होती. ही त्याची स्त्री सुशील, प्रेमळ व सद्गुणी होती; परंतु ती फार काल जगली नाहीं. लग्नानंतर सुमारें ६ वर्षांनीं ती मरण पावली. तिजपासून तरुण वुइल्यम यास फिलिप या नांवाचा मुलगा व मेरी या नांवाची मुलगी अशीं दोन अपत्यें झालीं. लग्न झाल्यावर हें जोडपें ब्रुसेल्स येथील नासू नामक आपल्या वडिलार्जित राजवाड्यांत मोठ्या थाटानें नांदू लागलें. वुइल्यमला मिळालेल्या नूतन जहागिरीमुळें तो पुष्कळ श्रीमंत बनला होता व त्यांतच त्याच्या बायकोस मिळालेल्या मोठ्या थोरल्या मिळकतीची भर पडल्यामुळें त्याचें या वेळचें वैभव एखाद्या मोठ्या स्वतंत्र राजास शोभण्या-

सारखें होतें. त्याची स्वारी शहरांतून फिरावयास निघाल्यास त्याच्याबरोबर २४ सरदार, १८ हुजरे, अनेक शिपाईप्यादे व कित्येक घोडेस्वार असावयाचेच. त्याचा परिवारही मोठा व खर्चाचा होता. शिवाय त्याच्याकडे नेहमीं मोठमोठे प्रसिद्ध लोक व परराष्ट्रीय वकील पाहुणे म्हणून येत असत. यामुळें त्यास अवाढव्य खर्च करावा लागे व त्याप्रीत्यर्थ त्यास कर्जही होत असे! त्याच्या राजवाड्यांत नेहमीं मोठमोठ्या मेजवान्या होत असत व त्या मेजवान्यांची—त्यांतील पक्कान्नें व सुरस अन्नें यावद्दल—सर्व युरोपभर मोठी ख्याति असे. त्याच्या मुदपाकखान्यांत इतके उत्कृष्ट आचारी असत कीं, युरोपांतील नामांकित राजांकडून त्याविषयीं त्याजकडे नेहमीं मागण्या येत! लग्नानंतर याप्रमाणें मोठ्या ऐषआरामांत व विलासांत सुमारें १ वर्ष गेल्यावर वुइल्यमला आपला राजवाडा व पत्नी सोडून रणभूमीवर जावें लागलें. लग्न होताच त्यास दहाव्या पायदळ पलटणीवरील मुख्य अधिकाराच्या जागेवर चार्लस यानें नेमिलें होतें. पुढें इ. स. १५५२ मध्यें जर्मन संस्थानिक व फ्रान्सचा बादशहा हेनरी दि सेकंड यांनीं एक होऊन चार्लसच्या नेदर्लंडांतील मुलुखावर स्वारी केली. तिचा प्रतिकार करण्याचे कामीं चार्लसनें ज्या योध्यांची नेमणूक केली होती त्यांत वुइल्यमचेंही नांव होतें. ही मोहीम चार्लस स्वतः चालवीत होता व वुइल्यम हा त्याच्या आज्ञेनुसार कधीं प्रत्यक्ष लढाईचें तर कधीं सैन्याची जुळवाजुवळ व तयारी करण्याचें—दुय्यम प्रतीचें—काम करीत होता. ह्याशिवाय सर्व सैन्यास लागणारें धान्य व दारुगोळा यांची तरतूद करण्याचेंही काम त्याजकडेच होतें. हीं कामें त्यानें चांगल्या रीतीनें बजाविल्यामुळें चार्लसनें इ. स. १५५४ चे अखेरीस त्यास वीस हजार सैन्याचा मुख्य सेनापती नेमिलें. या सुमारास जर्मन संस्थानिकांमध्यें फूट पाडून त्यांना युद्धापासून परावृत्त करण्याचे कामीं चार्लस यानें यश मिळविल्यामुळें फ्रान्सच्या हेनरीलाही कांहीं काळ युद्ध थांबवावें लागलें. युद्ध थांबल्यावर वुइल्यम कांहीं दिवस विश्रांति घेण्याकरितां ब्रुसेल्स येथें आला. याच ठिकाणीं पुढें इ. स. १५५५ च्या आक्टोबर महिन्यांत चार्लसनें प्रकृतीच्या अस्वास्थ्यामुळें आपल्या साम्राज्याचीं राज्यसूत्रें आपला मुलगा फिलिप (दि सेकंड) याचे हवालीं करून आपण राज्यत्याग केला. याप्रीत्यर्थ त्यानें २५ आक्टोबर रोजीं एक वडा दरबार भरविला होता. ह्या दरबारास नेदर्लंडच्या इस्टेटस् जनरल* ऊर्फ लोकसभेचे सर्व सभासद, तेथील

* सरदार, धर्माधिकारी, वडे व्यापारी व सामान्य जनता [ शेतकरी, मजूर,

सर्व सरदार, जहागिरदार, प्रमुख अधिकारी व परराष्ट्रीय वकील यांचा मोठा थोरला समूह जमला होता. या प्रसंगीं चार्लसच्या मुख्य हुजऱ्याचें काम वुइल्यम कडे होतें. त्याच्याच खांद्यावर हात टाकून त्यानें दरबारांत प्रवेश केला व भाषण केलें. ह्या दरबाराचीं अनेक मनोहर वर्णनें युरोपियन इतिहासकारांनीं केलेलीं आहेत. परंतु प्रस्तुत चरित्राच्या विषयाशीं त्याचा फारसा संबंध नसल्यामुळें आम्हीं त्याचा विचार करीत नाहीं. प्रस्तुत चारित्रांतील खऱ्या महत्त्वाच्या कथानकास प्रारंभ फिलिप दि सेकंड याच्या कारकीर्दीपासूनच होत असल्यामुळें चार्लसच्या वरील दरबाराचें येथेंच विसर्जन करून वाचकांस फिलिप दि सेकंडची ओळख करून देतों. ह्या राजपुत्राचा जन्म इ. स. १५२७ च्या मे महिन्यांत झालेला असल्यामुळें राज्यारोहणप्रसंगीं त्याचें वय अवघें २८ वर्षांचें होतें. त्याचा चेहरा जवळ जवळ त्याच्या बापासारखाच होता. त्याची मुद्रा दिसण्यांत उग्र व गर्विष्ठपणाची द्योतक होती. त्यांचे डोळे निळे व पाणीदार होते. त्याचें कपाळ भव्य असून तोंडाचा खालचा भाग निमुळता होता. त्याची शरीरयष्टि किरकोळ व एखाद्या अशक्तासारखी होती. त्याची वागणूक व बोलण्याचालण्याची ढब हीं उर्मटपणाचीं होतीं. तो शिपायाचा बाणा बाळगीत असे, परंतु वस्तुतः शिपाईगिरीचे शौर्यधैर्यादि खरे गुण त्याच्या अंगीं नव्हते. त्याची बुद्धिमत्ताही सामान्य प्रतीचीच होती. त्याचें मन मोठें नव्हतें व त्याच्या अंगीं शहाणपणही बेतावाताचेंच होतें. त्याचा बाप चार्लस धीट, शूर, मोकळ्या मनाचा व कर्तबगार आणि मुत्सद्दी पुरुष होता; पण याची स्थिति त्याच्या उलट होती. हा कुद्या मनाचा, भित्रा, चंचल व अनिश्चित स्वभावाचा, दगदगीला कंटाळणारा व संशयखोरवृत्तीचा होता. त्याचें शिक्षणही जितक्यास तितकेंच होतें. ज्या नेदर्लंडच्या लोकांवर तो राजसत्ता गाजविणार त्यांची भाषाही त्यास अवगत नव्हती; मग त्यांचे अंतस्थ मनोगत व विचार त्यास माहीत नसल्यास आश्चर्य कसलें? सत्ता व वैभव यांचा तो मोठा अभिलाषी होता

करागीर वगैरे] ह्या चार वर्गांपैकीं प्रत्येकास 'इस्टेट' हा शब्द लावण्याचा ह्या देशांत प्रघात होता. नेदर्लंडांतील प्रमुख शहरें व प्रांत यांच्या ज्या स्थानिक लोकसभा असत त्यांत ह्या चारी वर्गांचे प्रतिनिधि असत. ह्या लोकसभांना प्रॉव्हिन्शियल इस्टेट्स असें म्हणत. ह्या प्रांतिक लोकसभांनीं निवडून दिलेल्या प्रतिनिधींची जी मुख्य लोकसभा तिला 'इस्टेट्स जनरल' अथवा 'स्टेट्स जनरल' असें नांव दिलेलें होतें.

च त्याकरितां पाहिजे ती वक्र गोष्ट करण्यास त्याचें मन तयार होतें. त्याचा पोषाख व दरबार स्पॅनिश पद्धतीचा असून नेदर्लंडांतील लोकांच्या चालीरीतींविषयीं त्यास आदर किंवा सहानुभूति वाटत नव्हती.

नेदर्लंडच्या नशिबीं आलेला नवा राजा हा वरील प्रकारचा होता. गादीवर येण्यापूर्वींच नेदर्लंडांत त्यानें एकदोन सफरी केलेल्या असल्यामुळें, तेथील लोकांस त्याचा स्वभाव व शील यांची माहिती झालेली होती आणि स्वदेशाच्या राजाची निवड करण्याची सत्ता जर त्यांचे हातीं असती, तर त्यांनीं ह्या राजास खास पसंत केलें नसतें! परंतु दीर्घकालापासून ह्या वंशांतील सम्राटांच्या जुवाखालीं त्यांची मान अडकली गेल्याकारणानें, त्यांना ह्या राजाची सत्ता मान्य करून त्याची मनधरणी करणें भाग होते! फिलिप हा स्वदेशांतही फारसा लोकप्रिय नव्हता. इंग्लंडची राणी मेरी ट्यूडर हिजबरोबर त्याचा विवाह झालेला असल्यामुळें तो इंग्लंडचाही एका अर्थानें राजा होता; परंतु त्या देशांतील लोकांसही तो बिलकुल प्रिय नव्हता. तेथील पार्लमेंट त्यास केवळ नामधारी राजा मानीत असे व आपल्या राज्यकारभारांत त्यास होतां होईल तोंपर्यंत ढवळाढवळ करूं देत नसे. तथापि राणीच्या आग्रहावरून त्याच्या गरजा भागविण्याकरितां ह्या पार्लमेंटसभेला त्यास पैशाच्या रूपानें बराच भुर्दंड भरावा लागे व त्यामुळें तेथील जनताही त्यास कंटाळून गेली होती. तशांत राणीनें व त्यानें आपणांस पुत्रसंतान झाल्याबद्दल खोटाच बहाणा केल्यावरून तर तो इंग्लिश लोकांच्या तिरस्कारास पात्र झाला होता. असें जरी होतें तरी त्याच्या बापाचा दरारा व इभ्रत हीं फार मोठीं असून परंपरेनें तीं त्यास लाभल्याकारणानें अद्याप त्यास उघडपणें विरोध करण्यास कोणी धजावत नव्हतें. राज्यपदारूढ झाल्यावर आपल्या साम्राज्याची राजधानी जें माद्रिद (स्पेन) शहर तेथें जाणें त्यास जरूर होतें; परंतु नेदर्लंडाच्या सरहद्दीवर फ्रेंचांशीं युद्ध सुरू होण्याचा संभव असल्यामुळें तो तूर्त ब्रुसेल्स शहरींच राहिला होता. तो तरुण व नवशिक्या असल्यामुळें राज्यकारभाराचे कामीं त्यास मदत करण्याकरितां त्याच्या बापानें आपल्या विश्वासांतल्या कांहीं नामांकित राजकारणी पुरुषांचें सल्लागार मंडळ त्याच्या दिमतीस दिलें होतें. त्याच्या साह्यानें तो राज्यकारभाराचें काम चालवीत असे. त्याच्या अंगीं जरी मुत्सद्दीपणा अथवा खोल राजकारणांतील मर्म जाणण्याची अक्कल नव्हती, तरी ती असल्याविषयींचा आविर्भाव आणण्याची त्यास मोठी हौस असे व ती व्यक्त करण्याकरितां तो दहादहा तासपर्यंत कौन्सिलच्या बैठकीत

हजर राहून बारीकसारीक प्रश्नांचीही उगाच चर्चा करीत असे व त्यासंबंधानें मोठ-मोठे लांबलचक खलिते स्वतः लिहीत असे. तो फारसें बोलत नसे; कारण त्याला ती कला साध्य नव्हती. परंतु स्पॅनिश भाषेंत पाल्हाळिक प्रबंध लिहिण्याची त्यास फार हौस असल्याकारणानें जेथें दोनचार ओळींत काम व्हावयाचें तेथें हे राजश्री शेंकडों ओळी लिहून कागदाचे ढिगारे वाढवीत असत! याच्या बापाला नेदर्लंडांत चालणारी फ्लेमिश, डच, व फ्रेंच या भाषा येत असल्याकारणानें आपल्या प्रजाजनांशीं त्यास प्रत्यक्ष संबंध ठेवतां येत असे व त्याच्या अंगीं तारतम्य असल्यामुळें नेदर्लंडांत असतांना त्यानें आपल्या दरबारीं, स्पॅनिश लोकांइतकेच स्थानिक लोक—सरदार, मानकरी, मुत्सद्दी, वीर वगैरे—ठेविले होते. परंतु या अभिनव राजास स्पॅनिश भाषेवांचून दुसरी कोणतीच भाषा धड (फ्रेंच व ल्याटिन अर्धवट येत होत्या) येत नसल्यामुळें आपल्या वडिलांचें वरील तारतम्याचें धोरण त्यास राखतां आलें नाहीं. त्याच्या दरबारच्या दीडशें माणसांपैकीं ९/१० स्पॅनिश होते. त्याचा पोषाख, त्याची राहणी, त्याच्या करमणुकीचीं साधनें व त्याच्या विश्वासांतलीं माणसें हीं सर्व स्पॅनिश असल्यामुळें नेदर्लंडच्या लोकांना साहजिकच त्याबद्दल वैषम्य वाटूं लागलें व त्यामुळें उभय वर्गांमध्यें द्वेषाग्नि धुमसूं लागला! तथापि अजून त्यास मूर्त स्वरूप प्राप्त झालें नव्हतें. असो.

वुइल्यम दि सायलेंट याजवर फिलिपच्या बापाची किती मर्जी होती हें मागें सांगितलेंच आहे. खुद्द नेदर्लंडमध्यें त्याचा दर्जा व वजन हीं फार मोठीं असल्याकारणानें फिलिपनेंही प्रारंभीं त्यास आपल्या मर्जींत घेऊन त्याचें साह्य मिळविलें. त्याच्या साह्याची त्यास या वेळीं फारच जरुरी होती. कारण इतालींतील राजकीय भानगडीचे निमित्तानें फ्रान्सबरोबर पुन्हा त्यास युद्ध सुरू करावें लागलें होतें; व त्या युद्धांत यश मिळविण्याकरितां त्यास नेदर्लंडांतील सरदार व धनिक लोक यांचें सहाय्य पाहिजे असून, तें वुइल्यमच्या द्वारें त्यास मिळण्याजोगें होतें. वुइल्यमच्या मनांत अद्याप फिलिपच्या राजकीय धोरणासंबंधानें किंतु आलेला नव्हता. सबब त्यानें त्यास या युद्धप्रसंगीं मनमुराद साह्य केलें. या युद्धाचा खर्च नेदर्लंडच्या सरकारी तिजोरींतून भागविला जात होता. अर्थात् येथील सरदार व सामान्य लोक यांजवर त्याचा पुष्कळसा भार पडत होता. त्याबद्दल साहजिकच त्यांच्यांत असंतोष उत्पन्न झाला होता. ह्या असंतोषाचें निवारण करून युद्धास लागणारें द्रव्य व सामान पुरविण्याची कामगिरी वुइल्यमनें बजावली.

तो स्वतः रणभूमीवरही कित्येकदां गेला होता; परंतु रणभूमीवरील कामापेक्षां त्याजकडे मुत्सद्दिगिरीचीं कामेंच विशेष सोंपविण्यांत आलीं असल्याकारणानें त्याचें लक्ष मुख्यतः त्या कामांतच गढून गेलें होतें. रणभूमीवरील महत्त्वाची कामगिरी त्याच्या बरोबरीचा नेदर्लंडांतील दुसरा सरदार काऊंट एगमॉंट याजकडे सोपविण्यांत आली होती व त्यानें ती उत्तम प्रकारें बजाविली. सेंट क्विंटिन, ओझे, ग्रॅनव्हिले वगैरे महत्त्वाच्या लढाया जिंकून त्यानें फ्रेंच सेनेचा धुव्वा उडवून दिला. ग्रॅनव्हिलेच्या लढाईंत तर त्यानें खुद्द फ्रेंच राजा हेनरी यास जेरीस आणिलें. तेव्हां फ्रेंचांतर्फे तहाची मागणी सुरू झाली. हा तह घडवून आणण्याची पूर्व तयारी ( Priliminery negotiations ) वुइल्यम दि सायलेंट यानेंच केली व त्याच्या योजनेनुसार अखेर हा तह ता. ३ एप्रिल इ. स. १५५९ रोजी केत्यु-केंब्रेसिस येथें झाला. ह्या तहाच्या शर्ती अंमलांत येईपर्यंत वुइल्यम, एगमॉंट, ड्यूक ऑफ आल्हा व ड्यूक ऑफ अर्शोट यांना फ्रेंच राजाच्या दरबारीं 'ओलीस' म्हणून पाठविण्यांत आलें होतें. तेथें असतांना आकस्मिक रीतीनें एक गुप्त रहस्य वुइल्यमला कळलें व तेंच त्याच्या भावी आयुष्यक्रमास निराळें वळण लावण्यास कारणीभूत झालें. पॉटस पेन नामक एका कॅथोलिक इतिहासकारानें ह्या प्रसंगाचें सुंदर वर्णन केलेलें आहे व पुढें खुद्द वुइल्यमनेंही आपल्या एका महत्त्वाच्या लेखांत त्याचा उल्लेख केलेला आहे. अर्थात् त्याच्या खरेपणाबद्दल आतां कोणासही शंका उरलेली नाहीं. तो प्रसंग असाः—

एके दिवशीं फ्रेंचराजा हेनरी आपल्या परिवारासह शिकारीस गेला असतांना तरुण वुइल्यम त्याजबरोबर होता. शिकार करून थकल्यावर ते दोघेही एका वनांत विश्रांति घेत बसले. त्या वेळीं त्यांच्यापाशीं दुसरें कोणी माणूस नव्हतें. तेथें उभयतांच्या दरम्यान गप्पागोष्टी चालू झाल्यावर साहजिकपणें त्या वेळीं युरोपांत प्रसार पावत असलेल्या प्रॉटेस्टंट पंथासंबंधानें बोलणें निघालें. कॅथोलिक पंथानुयायी लोक ह्या नवीन पंथास पाखंड समजत होते. परंतु त्या पंथांत राजसत्ताधारी असे अनेक जर्मन संस्थानिक व सरदार सामील झाल्यामुळें कॅथोलिक पंथांच्या राजांस व पोपला त्या पंथाचें भय वाटूं लागलें होतें. न जाणों, पुढें मागें हे लोक धर्माचें निमित्त पुढें करून आपली अनियंत्रित राजकीय सत्ता संपुष्टांत आणतील अशी त्यांस भीति वाटूं लागली होती. व त्याकरितां वेळींच त्यांचा बिमोड करण्याचें त्यांनीं योजिलें होतें. युरोपमध्यें त्या वेळीं स्पेन व फ्रान्स

येथील राजांचें महत्त्व फार वाढलेलें होतें; व हे दोन्ही राजे कॅथोलिक पंथाचे असल्यामुळ प्रॉटेस्टंट पंथाचा वाढता प्रसार पाहून ह्या दोघांचींही मनें अस्वस्थ झालीं होतीं. पुढें या नवीन पंथाचा नायनाट करण्यास उभयतांनीं एकविचारानें चालणें जरूर आहे अशी जाणीव त्या उभयतांच्या मनांत एकसमयावच्छेदेंकरून उत्पन्न होऊन, त्यांनी आपापसांत चाललेलें युद्ध मिटविलें व परस्परांमध्यें स्नेहसंवर्धक असा तह केला. या तहाच्या वेळींच ड्यूक ऑफ आल्व्हा याच्यामार्फत फिलिप व हेनरी यांनीं प्रॉटेस्टंटपंथीय लोकांचा आपापल्या राज्यांतून नायनाट करण्याचा व त्या कामीं परस्परांनीं परस्परांस साह्य करण्याचा गुप्त करार केला होता. हा करार तरुण वुइल्यम यास माहीत असेल अशी हेनरीची समजूत असल्यामुळें त्यानें वरील प्रसंगीं सहजच त्याविषयीं त्याच्याजवळ बोलणें काढलें. या पाखंडी लोकांची वाढ आपल्या राज्यांत झपाट्यानें होत असल्याबद्दल हेनरीनें खेद व्यक्त केला व त्यांचा नायनाट केल्यावांचून आपणांस चैन पडणार नाहीं असेंही तो म्हणाला. त्यांनतर ड्यूक ऑफ आल्व्हाच्या मार्फत त्यांच्या नाशाची आपण कोणती योजना केली व ती फिलिपलाही पसंत असून नेदर्लंडांत ती स्पॅनिश लष्कराच्या जोरावर कशी अंमलांत आणली जाणार आहे याचें इत्थंभूत वर्णन हेनरीनें वुइल्यमजवळ केलें. हें वर्णन सुरू होतांच प्रथमतः वुइल्यमला सखेदाश्चर्य वाटलें; कारण त्याला त्या गुप्त कराराची माहिती नव्हती. परंतु त्यानें आपले मनोविकार तसेच दाबून ठेवून जणूं काय तो करार आपणास माहितच आहे असा आविर्भाव आणिला व हेनरीचें बोलणें निमूटपणें ऐकून घेण्याचा मार्ग स्वीकारला.* त्यामुळें हेनरीलाही त्याचा संशय आला नाहीं व त्यानें आपलें गुप्त रहस्य त्यास सविस्तरपणें कळविलें. हा रहस्यस्फोट झाल्यावर वुइल्यमच्या मनांत फिलिपच्या राज्यधोरणा-विषयीं लख्ख उजेड पडला! धार्मिक पाखंडाचा विमोड करण्याचे निमित्तानें आपल्या राष्ट्रांतील लोकांचे राजकीय हक्क नष्ट करून त्यांस सतत गुलामगिरींत लोळत ठेवण्याचा फिलिपचा मनोदय आहे हें त्यानें पूर्णपणें ओळखलें; व यापुढील आपलें सर्व आयुष्य आपल्या देशांतील लोकांचें धार्मिक व राजकीय स्वातंत्र्य राखण्याचें कामीं खर्च करावयाचें असा त्यानें आपल्या मनाशीं निर्धार केला व तो

---

* ह्या महत्त्वाच्या प्रसंगीं त्यानें धारण केलेल्या मौनवृत्तीवरूनच त्यास 'William the Silent' (स्तब्ध वुइल्यम) असें नांव पडलें.

अनुसरण पाळला!. ह्या वेळपर्यंत फिलिपविषयीं त्याच्या मनांत पूज्यभाव होता व त्याच्या राजभावविषयीं त्यास कांहींसा अभिमानही वाटत होता; परंतु त्याचें वरील प्रकारचें कारस्थान पाहिल्यावर त्याचा तो पूज्यभाव व अभिमान पार लयास गेला. त्याची दृष्टि फिलिपच्या सेवेवरून निघून नेदर्लंडच्या स्वातंत्र्यावर जाऊन बसली आणि यापुढें आपल्या मातृभूमीचें स्वातंत्र्य—रक्षण हेंच त्याचें ध्येय बनलें.

वर सांगितल्याप्रमाणे फिलिपच्या गुप्त कारस्थानाची माहिती लागतांच, तो कांहीं महत्त्वाच्या खासगी कामाचें निमित्त करून ब्रुसेल्स शहरीं आला व त्यानें तें वृत्त आपल्या विश्वासांतील कांहीं प्रमुख सरदार लोकांस कळवून लवकरच घेंट येथें भरणाऱ्या लोकसभेच्या बैठकींत नेदर्लंडमधून स्पॅनिश लष्कर काढून नेण्याची मागणी करण्याबद्दल त्यानें त्यांस आग्रहपूर्वक सूचना केली. हें लष्कर काढून नेण्यांत येईल तरच पुढील सालच्या लष्करी खर्चास मंजुरी देऊं; नाहीं तर देणार नाहीं असा लोकसभेनें (इस्टेट्स जनरल) आग्रह धरावा असेंही त्यानें सुचविलें. पुढें थोड्याच दिवसांनीं घेंट येथें नेदर्लंडच्या (इस्टेट्स जनरल) लोकसभेचें अधिवेशन भरलें त्या वेळीं फिलिपनें ३० लक्ष फ्लारिन्सची मागणी केली. तेव्हां लोकसभेनें ती मंजूर करण्यापूर्वी आपल्या देशांतून स्पॅनिश सैन्य काढून नेण्याची अट घातली व तशा अर्थाचा एक अर्ज फिलिपला सादर केला. ह्या अर्जावर वुइल्यम, काऊंट एग्मॉंट व त्यांच्या बरोबरीचे इतर सरदार ह्यांच्याही सह्या होत्या. हा अर्ज पाहून फिलिपला ह्या लोकांचा मोठा राग आला; पण त्याला स्पेनला जाण्याची घाई असल्यामुळें व ह्या सरदार लोकांस आतांच दुखविल्यास नेदर्लंडवर राज्य करणें कठीण जाईल असें त्यास वाटत असल्यामुळें त्यानें आपला राग तसाच दाबून ठेवून सदहू अर्जांत केलेली मागणी शक्य तितक्या लवकर मान्य करण्याचें लोकसभेस आश्वासन दिलें. त्यानंतर सुमारें तीन आठवड्यांनीं (ता. २५ ऑगस्ट १५५९) फिलिप स्पेनला जाण्यास निघाला, तेव्हां त्याला निरोप देण्याकरितां जी मंडळी आगबोटीच्या धक्यावर गेली होती त्यांत वुइल्यमही होता. त्याच्याशीं हस्तांदोलन करतांना फिलिपनें लोकसभेच्या पूर्वोक्त वर्तनाबद्दल खेद प्रदर्शित केला; तेव्हां 'तें त्या सभेच्या सर्व सभासदांचें कृत्य आहे' असें तो म्हणाला. तें ऐकतांच 'नाहीं तो सर्व खेळ तुमचा-तुमचा-तुमचा आहे' असें फिलिप मोठ्या आवेशानें उद्गारला! त्याचे हे चार माणसांदेखत निघालेले रागाचे उद्गार ऐकून वुइल्यमला आपला अपमान झालासें

वाटून संताप आला; परंतु तो व्यक्त करण्याची ती वेळ नसल्यामुळें तो तसाच स्तब्ध राहिला. मात्र राजाच्या आगत्रोटीवर न जातां धक्क्यावरूनच त्यास निरोप देऊन परत आला. कित्येक इतिहासकार त्याच्या ह्या धूर्तपणाच्या वर्तनाबद्दल त्याची मोठी तारीफ करितात; कारण त्यांच्या मतें, जर तो राजाच्या केबिनमध्यें जाता, तर राजानें कदाचित् त्यास आग्रह करून स्पेनला नेलें असतें व तशा स्थितींत राजाचा आग्रह न जुमानणें त्यास शक्य झालें नसतें. तो एकदां स्पेन-मध्यें अडकल्यावर फिरून त्याचे पाय नेदर्लंडला लागले नसते आणि मग नेदर्लंड-च्या स्वातंत्र्याचा ग्रंथ तेथेंच आटोपला असता! इतिहासकारांनीं नमूद केलेलें हें मत अगदींच चुकीचें आहे असें फिलिपच्या भावी वर्तनावरून म्हणतां येत नाहीं. भावी काळांत नेदर्लंडच्या वतीनें स्पेनमध्यें गेलेल्या दोन वकिलांची—प्रति-निधींची—फिलिपनें विश्वासघात करून अमानुषपणें वाट लावली! ती हकीगत पुढें ओघानें येईलच. तूर्त इतकेंच ध्यानांत घ्यावयाचें कीं, राजाची मनःस्थिति ओळ-खून वागण्यांत वुइल्यमनें आपलें व आपल्या देशाचें मोठेंच हित साधलें! फिलीप स्पेनला निघून जाण्यापूर्वींच त्याचा बाप चार्लस व बायको इंग्लंडची राणी मेरी टथूडर हीं त्याचीं अगदीं नजिकचीं आप्त माणसें मरण पावलीं (इ. स. १५५८). तसेंच फ्रान्सचा राजा दुसरा हेनरी हाही केप्यु केंब्रेसिसचा तह झाल्यावर द्वंद्व-युद्धांत जखमी होऊन वारला. अर्थात् प्रॉटेस्टंट ऊर्फ पाखंडी लोकांचा उच्छेद करण्याची कामगिरी तूर्त तरी एकट्या फिलिपवरच येऊन पडली.

# प्रकरण ३ रें.

## सनदशीर प्रतिकार.

फिलिपनें स्वदेशीं जातांना, आपल्यातर्फे मॉर्गरेट, डचेस ऑफ पार्मा नामक आपल्या सावत्र वहिणीस नेदर्लंडच्या 'रीजंट'च्या जागीं नेमलें होतें व तिच्या मदतीस तीन सल्लागार व कार्यकारी मंडळें ऊर्फ कौन्सिल्स देण्यांत आलीं होतीं. एका मंडळाकडे जमाबंदी व वसुली खात्यांचीं सूत्रें देण्यांत आलीं होतीं; एकाकडे न्यायखात्याची व्यवस्था होती व ह्या दोहोंवरही देखरेख ठेऊन सामान्यतः सर्व राज्यकारभाराचीं सूत्रें आपल्या हातीं ठेवणारें तिसरें मुख्य मंडळ 'स्टेट कौन्सिल' या नावांनें अस्तित्वांत आलें होतें. याशिवाय निरनिराळया प्रांतांचे अधिपती ऊर्फ स्टँड होल्डर्स ( गव्हनर्स ) हेही मॉर्गरेटच्या हाताखालीं होते. त्यांत, वुइल्यम ऑफ ऑरेंज, एगमॉट, मॅन्सफील्ड, अरेबर्ग, बर्लेमॉट, वगैरे नेदर्लंडांतील प्रमुख सरदार होते. स्टेट कौन्सिल नामक मुख्य राजमंडळांत, पेरीनॉट, बिशप आरास ( हा पुढें कार्डिनल ग्रॅनव्हिले या नांवानें प्रसिद्धी पावला ), व्हिजालिअस, वुइल्यम ऊर्फ प्रिन्स ऑफ ऑरेंज, ( चरित्रनायक ) काऊंट एगमॉट ( हा आर्तोइव फ्लँडर्स या प्रांताचा गव्हर्नर होता ) काऊंट हॉर्न, ( हा आरमाराचा मुख्य होता ) व ड्यूक ऑफ अर्शाट, बर्लेमॉट वगैरे सभासद असून 'रीजंट' मॉर्गरेट ही त्या मंडळाची अध्यक्ष होती. नेदर्लंडांतील जनतेचीं सर्व सुखदुःखें याच मंडळाचे हातीं असल्यामुळें व पुढील काळांतील घडामोडींत यांतील सभासदांचेंच प्रमुख अंग असल्यामुळें त्यांची वाचकांस अमळ विस्तृत ओळख करून देणें जरूर आहे.

या मंडळाची अध्यक्ष मार्गरेट ही माजी बादशहा चार्लस याची बेकायदेशीर कन्या होती; परंतु ती थोर कुलांतली होती. तिची आई हुगस्ट्रॅटन नामक प्रख्यात सरदार घराण्यांतली असून तिला चार्लसनें आपल्या तारुण्यांत भ्रष्ट केली, त्याचें मॉर्गरेट हें फळ होय ! अर्थात् ह्या कन्येच्या संरक्षणाची सर्व जबाबदारी चार्लसवर येऊन पडली व ती त्यानें चांगल्या रीतीनें पार पाडली. त्यानें तिला राजपुत्राच्या बरोबरीचें शिक्षण दिलें व तिचें दोनदां लग्नही केलें; परंतु तिला वैवाहिक सुख फारसें लाभलें नाहीं. तेव्हां तिनें धर्म व राजकारण या विषयांकडे आपलें लक्ष

लाविलें. ती कॅथोलिक मताची कट्टी अभिमानी असून त्या मताचे सर्व बारिकसारीक आचारही ती मोठ्या दक्षतेनें पाळीत असे. ती दिसण्यांत सुंदर नव्हती, परंतु भव्य व कुर्रेबाज होती. तिचा चेहरा पुरुषासारखा असून तिच्या वरच्या ओंठावर बारीक स्मश्रूही झळकत होती. ती धीट, साहसी व घोड्यावर बसण्यांत पटाईत होती. तिचें पूर्ववय पोपच्या घराण्यांत गेल्यामुळें इतालियन भाषेंत व त्या देशांतील कपटनीतिपटु मॅकेव्हेलीच्या राजनीतींत ती चांगली निष्णात बनली होती आणि यावेळीं फिलिपलाही नेदर्लंडांत याच राजनीतीचा अवलंब करावयाचा असल्यामुळें त्यानें साहजिकच तिची तेथील 'रीजंट' (राजप्रतिनिधी) च्या जागीं नेमणूक केली. यासमयीं तिचें वय सुमारें ४० वर्षांचें होतें. पेरिनॉट बिशप ऑफ आरास हा मनुष्य विद्वान् असून धर्माधिकारी होता. तो कांहींसा गर्विष्ट, महत्त्वाकांक्षी, द्रव्याभिलाषी व व्यवहारचतुर होता. त्याचें शील सामान्यप्रतीचेंच होतें. तथापि तो मोठा गोडबोल्या व कार्यसाधू होता. गोड बोलून मान कापण्याची कला त्यास चांगली साधली होती. त्याचा सख्खा भाऊ हा वुइल्यम दि सायलेंटचा पूर्वी शिक्षक होता; त्यामुळें प्रारंभीं कांहीं दिवस याचें व वुइल्यमचें सख्य होतें. तो अत्यंत श्रीमान असून त्याची राहणी एखाद्या राजास शोभण्याजोगी होती. त्याचा चेहरा भव्य असून त्याची वागण्याची तऱ्हा चित्तवेधक व आनंददायक होती. व्हिजलियस हा नामांकित कायदेपंडित असून मोठा विद्वान् व बहुश्रुत लेखक होता. तो हलक्या कुळांतला असल्यामुळें आपल्या भोंवतालच्या बड्या लोकांची खुषामत करून व त्यांना नमून असे. तो स्वभावतः शांत, सौम्यवृत्तीचा व लोभी होता. पैसा व अधिकार याकरितां सदसद्विवेक बुद्धीस गुंडाळून टवून आपल्या वरिष्ठांची मर्जी संभाळण्यास व त्याप्रीत्यर्थ वाटेल तें करण्यास तो तयार असे. पैशाकरितां त्यानें कांहीं काल धर्मगुरूचीही दीक्षा घेतली होती! हा न्यायखात्याची व्यवस्था पाहणाऱ्या उपरीनिर्दिष्ट कौन्सिलचा अध्यक्ष होता. काऊंट एग्मॉट हा शूर सेनानी असून नुकत्याच झालेल्या फ्रांको-स्पेनच्या युद्धांत विजयश्री मिळवून प्रसिद्धीस आला होता. नेदर्लंडांत पुढें वुइल्यम दि सायलेंटच्या खालोखाल याचें महत्त्व वाढलें. तो स्वरूपानें सुंदर व दिलदार शिपाईगडी होता. लोकांचें चित्त हरण करून त्यांच्यावर आपली छाप बसविण्याची कला त्याला फार नामी साधली होती. त्याचें शौर्य, धाडस व दिलदारपणा हीं वाखाणण्यासारखीं असून त्याच्या हातून मोठमोठाल्या घडामोडी

होतील अशी लोकांची अपेक्षा होती. ह्या त्याच्या गुणांबरोबरच त्याच्या अंगीं कांहीं ठळक दोषही होते व त्यामुळेच पुढें त्याचा नाश झाला. त्याचें मन कोतें व मत्सरग्रस्त होतें. त्याचा स्वभाव उतावळा, अविचारी व अनिश्चित असा असून त्यास सर्व वाहण्याची हौस होती. त्याच्या अंगीं रिकामा डौल व ताठाही पुष्कळ होता. दूरदृष्टि व सावधपणा ह्या गोष्टींचा त्याचे ठायीं अभाव होता. त्याचें सामान्य वर्तन निष्कपटी व उदार असें होते व त्याचें वैभवही मोठें होतें. ॲडमिरल काऊंट हॉर्न हा प्रामाणिक, उद्योगी, धर्माभिमानी व सामान्य बुद्धीचा परंतु बऱ्याच कर्तबगारीचा मनुष्य होता. ड्यूक ऑफ अर्शोट हा मोठा जहागिरदार असून अत्यंत श्रीमान होता. खुद्द ब्रुसेल्स येथें त्याचा स्वतःचा एक सुंदर राजवाडा असून तेथें तो मोठ्या थाटानें रहात असे. तो आपल्याच ऐटींत व वैभवांत गुंग असल्यामुळें आपल्याभोंवतीं काय चाललें आहे याचें त्याला बिलकूल ज्ञान नसे. शिष्टाचाराच्या नांवाखालीं तो सामान्यप्रतीच्या लोकांशीं प्रायः तुट्न व तुसडेपणानें वागत असे; इतकेंच नव्हे, तर त्याचें आपल्या सहाध्यायांशींही कारणावांचून फारसें दळणवळण नसे. त्याचें मन कोतें असून त्याचें ज्ञानही बेतावेताचेंच होतें. 'बडे बापका बेटा' ह्या येवढ्याच गुणावर बहुशः त्याची स्टेट कौन्सिलमध्यें नेमणूक झालेली दिसते ! याचें वर्तन दुटप्पी असे. बर्लेमॉंट हा स्टेट कौन्सिलचा सभासद असून शिवाय जमाबंदीखात्याच्या कौन्सिलचा अध्यक्ष होता. तो द्रव्यलोभी, शूर व धर्मवेडा असून त्याची राजनिष्ठा अढळ होती. याप्रमाणें वुइल्यमखेरीज स्टेट कौन्सिलच्या इतर सर्व सभासदांचें स्थूल स्वरूप होतें. वुइल्यम दि सायलेंट अथवा वुइल्यम ऑफ ऑरेंज यास आतां २६ वें वर्ष लागलें असून तो ऐन उमेदींत होता; परंतु एवढ्या काळांत त्याला जगाचा व विशेषतः राजकारणाचा बराच अनुभव आल्यामुळें आणि त्याचें शिक्षण, वाचन व मनन हीं विस्तृत असल्यामुळें तरुणपणींच त्यास पोक्तपणा आलेला होता. त्याची बुद्धि कुशाग्र असून विवेकसंपन्न होती. करारीपणा, सावधपणा, दूरदर्शित्व, स्वाभिमान, चिकाटी वगैरे गुणांचा एव्हांपासूनच त्याच्या ठिकाणीं प्रादुर्भाव झालेला होता. तो मार्मिक लेखक व मनोहर संभाषणकर्ता असून लोकांवर आपली छाप बसविण्याचें कामीं कुशल होता. त्याचें वर्तन सभ्य, समंजस, सौजन्ययुक्त, गंभीर व दुसऱ्यांच्या मनांत आदर उत्पन्न करण्यासारखें होतें. त्याचें मन उदार व अंतःकरण थोर होतें. त्याची महत्त्वाकांक्षा सात्विक असून

दुसऱ्याचें नाहक नुकसान अथवा अकल्याण करण्याची प्रवृत्ति त्याचे ठायीं बिलकूल नव्हती. तो सामान्यतः ख्रिस्ती धर्माचा चहाता होता; परंतु त्यांतील अमुक एका विशिष्ट पंथाचा अभिमानी नव्हता. धर्म ही ज्याच्या त्याच्या मनाची बाब आहे; त्या बाबतींत कोणी कोणावर अमुकच मत लादूं नये असें त्याचें स्वत:चें मत होतें. तथापि तो लौकिकदृष्ट्या परंपरेनें चालत आलेल्या जुन्या कॅथॉलिक पंथाचे आचार पाळीत होता. फिलिपनें स्वदेशीं जातांना त्यास हॉलंड, झीलंड व युत्रेक्त या प्रांतांवर गव्हर्नर नेमलें होतें. तो ब्रेडा व ब्रुसेल्स येथें (आपल्या राजवाड्यांत) आळीपाळीनें रहात असे. त्याचें वैभव व राहाणी यांचें दिग्दर्शन मागें केलेंच आहे. भावी काळांत नेदर्लंडच्या राजकीय पटावर निरनिराळे राजकारणाचे डाव खेळणाऱ्या प्रमुख व्यक्तीचें स्वरूप याप्रमाणें होतें. आतां तेथील जनतेचा थोडासा परिचय करून देतों. तेथील जनतेंत सरदार ऊर्फ संस्थानिक, श्रीमान व्यापारी, लहानमोठे धर्माधिकारी व कनिष्ठ वर्गांतील—शेतकरी मजूर वगैरे—लोक असे चार प्रमुख भेद होते. पैकीं सरदारांचा वर्ग विलासी व कर्जबाजारी बनलेला होता. पांचव्या चार्लस बादशहानें ह्या लोकांस मोठमोठ्या पदव्या व हुद्दे देऊन त्यांस अनुरूप असा इतमाम ठेवणें भाग पाडलें होतें. परंतु त्यांना करून दिलेल्या नेमणुका त्यांच्या खर्चास पुरेशा नव्हत्या. तथापि राजकृपा व इभ्रत हीं संभाळण्याकरितां ते हा इतमाम पदरमोड करूनही चालवीत होते. त्यामुळें त्यांची सांपत्तिक स्थिति खालावली होती. शिवाय चार्लसनें त्यांना दुर्बळ करून टाकण्याकरितां त्यांच्या समाजांत छानछोकी, विलासप्रियता व व्यसनें यांचाही प्रसार करून ठेविलेला होता. त्यांची वेळीं अवेळीं मिथ्या स्तुति करून त्यानें त्यांच्या गर्विष्ठपणासही उत्तेजन दिलें होतें. शिवाय त्यांच्यांत परस्परांविषयीं मत्सरही वाढलेला होता. दुसरा म्हणजे व्यापारी लोकांचा वर्ग चांगल्या सुस्थितींत होता. तथापि तो असह्य अशा करभारानें गांजलेला होता. कनिष्ठ वर्गही व्यक्तिस्वातंत्र्य व मतस्वातंत्र्य यांचा संकोच झाल्यामुळें त्रस्त झालेला होता. प्रॉटेस्टंट पंथाचा प्रसार याच लोकांत विशेषेंकरून झाला असल्या-कारणानें या पंथाचें निर्मूलन करणाऱ्या कायद्यांची करडी कमान यांजवरच होती; त्यायोगानें त्यांच्या समाजांत तीव्र असंतोष माजत चालला होता. धर्माधिकाऱ्यांचा वर्ग मात्र ख्यालीखुशालींत व लोकांच्या पैशावर चरत होता; आणि राजाश्रयाच्या जोरावर सामान्य जनांना छळीत होता. या कामीं त्यास ख्रिस्ती धर्माचा मुख्य गुरु इटालींतील पोप याचेंही सहाय्य होतें. धार्मिक व राजकीय अशा दुहेरी सत्तेचा

अंकुश हातीं असल्यामुळें वाटेल त्या वर्गांतील लोकांवर त्यास सहज झडप घालतां येत असे. फिलिप स्पेनला निघून गेला तेव्हां सामान्यतः नेदर्लंडची लोकस्थिति याप्रमाणें होती. त्यांना उदारपणानें वागवून संतुष्ट राखण्याची फिलिपची मुळींच इच्छा नव्हती; उलट त्यांचा उच्छेद करण्याचाच त्यानें विडा उचलेला होता. आणि स्पेनमध्यें गेल्यावर पोपच्या साह्यानें हें काम पद्धतशीर रीतीनें चालू करण्याचा त्यानें संकल्प केलेला होता. तसें करण्याची तयारी होईपर्यंत नेदर्लंडच्या बलिष्ठ व वजनदार सरदार लोकांस चुचकारून व तेथील स्टेट्स जनरलच्या मतास मान देण्याचा बहाणा करून कालहरण करण्याचा प्रयोग त्यानें सुरू केला. त्या सभेनें आपल्या देशांतून स्पॅनिश सैन्य काढून नेण्याबद्दल आग्रह धरतांच फिलिपनें लवकरच तसें करण्याचें आश्वासन देऊन वुइल्यम दि सायलेंट व काऊंट एग्मॉंट यांस त्या सैन्याचे मुख्य अधिकारी बनविलें. परंतु खरी सत्ता मात्र त्यांच्या हातीं न देतां ती गुप्तपणें आपल्या विश्वासांतील एका सेनापतीच्या हातीं दिली होती. तसेंच नेदर्लंडच्या मुख्य राजमंडळामध्येंही ( स्टेट कौन्सिल ) त्यानें बाह्यात्कारी लोकांस खूष करण्याकरितां जरी या व दुसऱ्या एकदोन डच व फ्लेमिश सरदारांची नेमणूक केली होती तरी येथेंही खरी सत्ता यांच्या हातीं नव्हती. ती मॉर्गरेट, बिशप ऑफ आरास ऊर्फ कार्डिनल ग्रॅनव्हिले व व्हिज्लियस या त्रिकुटांच्या हातीं असून त्यांच्या गुप्त खलबतानंतर जेवढया गोष्टी इतर सभासदांस कळविण्याजोग्या ठरत तेवढयाच उपरोक्त सरदारांस कळत असत. ही स्थिति स्पृहणीय नाहीं हें वुइल्यम व एग्मॉंट यांस कळत नव्हतें असें नाहीं; परंतु नाइलाज म्हणून त्यांनीं ती पत्करिली होती. फिलिपच्या सामर्थ्याच्या मानानें त्या सरदार लोकांचें सामर्थ्य अगदीं अल्प होतें. त्यांच्या देशांतही अद्याप सामर्थ्य उत्पन्न करण्याचे संघटित प्रयत्न झालेले नव्हते. यामुळें सामान्य जनतेच्या मनांत फिलिपच्या धोरणाविरुद्ध तीव्र प्रतिकार करण्याची जागृति उत्पन्न झालेली नव्हती. सरदारवर्गांतही एकोपा नव्हता आणि इतक्या सर्व गोष्टी जरी झाल्या असत्या, तरी परराष्ट्रांच्या मदतीवांचून फिलिपशीं दोन हात करून त्यांत यश मिळण्याची त्यांस आशा वाटत नव्हती. अशा स्थितींत मिळेल तो तुकडा घेऊन व सांपडेल त्या काडीचा आधार घेऊन सदनशीर पद्धतीनें, म्हणजे राजनिष्ठापूर्वक फिलिपच्या जुलमी धोरणाचा प्रतिकार करण्याचा मार्ग वुइल्यमादि नेदर्लंडच्या सरदारांनीं व लोकसभेनें स्वीकारावा हें अगदीं साहजिक आहे. कोणत्याही कालीं व

कोणत्याही देशांत जेव्हां बलाढ्य जुलमी सत्ता व तिच्या त्रासानें गांजलेली जनता यांच्यामध्यें द्वंद्व सुरू होतें, तेव्हां त्याचा प्रारंभ वरीलप्रमाणेंच सनदशीर प्रतिकाराच्या रूपानें झालेला आढळून येतो. तसेंच त्याचें पर्यवसान अखेर क्रांतींत होतें, हेंही जगाचा इतिहास कंठरवानें सांगत आहे. क्रांतीवांचून ह्या जुलमांतून बहुधा जनतेची केव्हांही सुटका झालेली दिसून येत नाहीं. तेव्हां असा प्रश्न सहजच उद्भवतो कीं, क्रांतीवांचून जर गत्यंतर नाहीं तर मग त्रस्त झालेली जनता सनदशीर प्रतिकाराचें व राजनिष्ठेचें उगाच प्रस्थ कां माजविते? ती एकदम क्रांतीचीच तयारी कां करीत नाही? या प्रश्नाचें उत्तर मनुष्यस्वभावाचें सूक्ष्म निरीक्षण करणारास त्या स्वभावस्थितींतच असल्याचें आढळून येईल. 'क्रांति' हा शब्द दिसण्यांत जरी अगदीं लहान असला, तरी त्याच्या पोटांत इतका मोठा भयंकर अर्थ आहे कीं, तो कळतांच मनुष्याच्या अंगावर शहारे उभे राहातात. मनुष्यप्राणी हा स्वभावतः शांति, स्थैर्य व सुख यांचा अभिलाषी आहे. क्रांतीच्या समयीं ह्या सर्वांची राखरांगोळी होत असते. अर्थात् असा समय होतां होईल तोंपर्यंत न येऊं देण्याकडेच त्याची प्रवृत्ति असावी यांत कांहीं नवल नाहीं. या प्रवृत्तीस अनुसरूनच तो क्रांतीच्या मार्गाकडे दुर्लक्ष करतो व त्याच्यापेक्षां सोप्या व सुलभ उपायांनीं आपला कार्यभाग होईल अशी आपल्या मनाची समजूत करून घेऊन इतिहासानें शिकविलेल्या धड्याकडे कानाडोळा करितो! सहसासहजीं क्रांति होण्यासारखी असल तर ती करण्यास तो प्रवृत्त होतो; परंतु जेथें जुलमी सत्ता बळकट व दुर्भेद्य अशा किल्लेकोटाच्या बंदोबस्तात असेल तेथें–हा मार्ग स्वीकारण्यास त्याचें मन कचरतें व तो आपणांवर जुलूम करणाऱ्याची करुणा भाकून आपल्या दुःखाचा भार हलका करण्याच्या प्रयत्नास लागतो. परंतु जुलमी सत्तेच्या मागें जेव्हां अजिंक्य अशा तरवारीचा जोर असतो, तेव्हां त्या सत्तेच्या सूत्रधारांचीं अंतःकरणें दगडापेक्षांही कठोर बनलेलीं असल्याकारणानें त्यांना कधीं खरा पाझर फुटत नाहीं व त्यांच्या विनवण्या आणि आर्जव करणारांची त्यास कधीं कींव येत नाहीं. अथात् या लोकांचें जीवित दिवसानुदिवस जास्त कष्टमय होत जाऊन अखेर त्यांना क्रांतीचा मार्ग स्वीकारावा लागतो. नेदर्लँडच्या लोकांना अद्याप अशी स्थिति प्राप्त झालेली नव्हती. त्यांना थोडेबहुत स्वराज्याचे हक्क पूर्वीच मिळालेले होते व तदनुसार त्यांच्या देशांतील अंतस्थ राज्यकारभाराचा बराच भाग तेथील सरदार व लोकसभा ह्यांच्या हातीं होता. चार्लस व फिलिप यांनीं

स्पॅनिश लष्कराच्या जोरावर त्यांचे हे हक्क निर्माल्यवत् करण्याचा प्रयोग सुरू केला होता हें खरें; परंतु सनदशीर चळवळीनें तो निष्फळ करून टाकतां येईल, अशी तेथील सरदारांस व लोकसभेच्या सभासदांस उमेद होती. फिलिपच्या जुलमाचा मुख्य आधार तेथें असलेल्या स्पॅनिश लष्करावरच होता. तेव्हां त्या लष्करांचीच उचलबांगडी केली म्हणजे आपलें कार्य झालें असें समजून त्यांनीं तें लष्कर तेथून काढून नेण्याबद्दल सनदशीर पद्धतीनें फिलिपजवळ आग्रहाची मागणी केली. ही मागणी मान्य करण्याची फिलिपची मनीषा नव्हती; परंतु त्याला पैशाची विशेष जरूर असल्यामुळे, ते लोकसभेकडून काढण्याकरितां त्यानें बाह्यतः ती मान्य करण्याचें आश्वासन दिलें. स्पेनला निघून गेल्यावर तें आश्वासन अंमलांत आणण्याचा तो टाळाटाळ करूं लागला; इतकेंच नव्हे तर, नवीन धर्ममतांचें उच्चाटण करण्याच्या मिषानें त्यानें त्याच्यावर अधिकच जुलूम सुरू केला. ह्या मतांच्या प्रसारास प्रतिबंध करण्याकरितां ( माजी बादशाह ) चार्लसनें जें फर्मान काढलें होतें त्याची अंमलबजावणी नुकत्याच झालेल्या फ्रँको-स्पेन युद्धामुळें ढिली झाली होती. ती पुन्हा जारीनें सुरू करण्याचा फिलिपनें हुकूम केला व त्याकरितां तें फर्मान त्यानें आपल्या नांवानें पुन्हा जाहीर केलें. त्याचा मतितार्थ येणेंप्रमाणें होता:—

"मार्टिन लूथर, जॉन कॅलव्हीन वगैरे पाखंडी लोकांनीं लिहिलेले ग्रंथ छापण्याची, वाचण्याची, जवळ बाळगण्याची त्यांची नक्कल करण्याची, ते लपवून ठेवण्याची व त्यांची खरेदी-विक्री करण्याची; तसेंच सार्वजनिक ख्रिस्ती देवळांतील पवित्र व्हर्जिनच्या व संतांच्या मूर्ति हलविण्याची अथवा त्यांचा भंग करण्याची ह्या हुकुमान्वयें मनाइ करण्यांत येत आहे. तसेंच धर्माधिकाऱ्यांशिवाय इतरांना पवित्र धर्मशास्त्रासंबंधीं खासगी, गुप्त अथवा उघड आणि जाहीर रीतीनें चर्चा करण्याची व त्यांतील शंकास्थानांसंबंधानें ऊहापोह अथवा व्याख्यान करण्याची मनाई करण्यांत येत असून जो कोणी ह्या हुकुमाविरुद्ध वर्तन करील त्यास देहांत शासनाची शिक्षा देण्यांत येईल." ××× "अपराधी पुरुषांचा तरवारीनें शिरच्छेद केला जाईल व स्त्रियांना, त्यांना पश्चात्ताप झाल्यास जिवंतपणीं गाडून टाकण्यांत येईल; आणि पश्चात्ताप न झाल्यास त्यांस जाळून टाकलें जाईल व या दोन्ही जातींच्या गुन्हेगारांची सर्व मालमत्ता सरकारजमा करण्यांत येईल. ××× या गुन्हेगारांस आश्रय, अन्नपाणी, कपडालत्ता, देणारास व मदत करणारासही गुन्हेगाराप्रमाणेंच शिक्षा होईल. गुन्हेगार अथवा त्याचा गुन्हा छपविणारासही असेंच शासन केलें जाईल. वरील

नं. ......२७

प्रकारचा गुन्हा केल्याच्या संशयावरून एखाद्यास दंड अथवा कैद झालेली असून त्यासंबंधानें पुन्हा संशय आल्यास त्यास देहांत शिक्षा केली जाईल. या गुन्ह्याचा अगर गुन्हेगाराची माहिती होतांच ती सरकारी धर्माधिकाऱ्यांच्या न्यायसभेस कळविली पाहिजे. जो कोणी तसें न करील त्यासही अशा गुन्हेगाराचा साथीदार समजून वरीलप्रमाणें शासन होईल. उलटपक्षीं जो कोणी या गुन्ह्याची माहिती देऊन गुन्हेगारावर गुन्हा शाबीत करण्यास मदत करील त्यास गुन्हेगाराच्या मालमत्तेंतून, ती शंभर पौंडांपेक्षां जास्त नसल्यास निम्मा हिस्सा व जास्त असल्यास तिचा १/१० भाग बक्षिस म्हणून देण्यांत येईल. हा गुन्हा करणाऱ्या कंपूपैकीं जर एखाद्यानें त्या गुन्ह्याची बातमी सरकारास देऊन गुन्हेगारांचा सुगावा लावून दिला, तर त्याला त्याच्या गुन्ह्यापुरती माफी देण्यांत येईल." याप्रमाणें सदर फर्मानांतील मुख्य कलमें होतीं. त्याची शब्दशः व कडक अंमलबजावणी करण्याकरितां धर्माधिकाऱ्यांचें एक विशिष्ट खातेंच निर्माण करण्यांत आलें. तें 'स्पॅनिश इन्क्विझिशन्' या नांवानें इतिहासांत प्रसिद्ध आहे. नेदर्लंडमध्यें मूळचीं चार प्रमुख धर्मपीठें होतीं व त्यांना स्वतंत्र जहागिरी आणि धर्मसंबंधीं सर्व सत्ताही देण्यांत आली होती; तसेंच यांच्या हाताखालीं दुय्यम, तिय्यम, प्रतीचे धर्माधिकारीही असत; परंतु हीं धर्मपीठें स्पेनच्या सम्राटाच्या इच्छेनुसार लोकांवर जुलूम करण्यास तयार नव्हतीं. तीं धार्मिक बाबतींत कांहींसा जुलूम करीत; पण त्यांत राजकीय हेतू नसे. राजकीय बाबतींत हे धर्माधिकारी फारसें मन घालीत नसत व घालण्याचा प्रसंग आल्यास तेथील सरदारांच्या कलानुसार वागत. त्यांची ही प्रवृत्ति फिलिपला आवडत नव्हती; म्हणून त्यानें पोपच्या सल्ल्यानें नेदर्लंडांतील धर्मसंस्थांची व त्यांतील अधिकाऱ्यांची पुनर्घटना केली. त्याच्या इच्छेस अनुसरून पोपनें (पायस दि फोर्थ) असें आज्ञापत्र काढिलें कीं, "नेदर्लंडांत धार्मिक पाखंड वाढत चालल्यामुळें खऱ्या धर्माचा ऱ्हास होऊन तेथील प्रजेचें अकल्याण व हानि होत आहे, यास्तव त्या पाखंडाचा बीमोड करण्याचें कामीं फिलिप दि सेकंड यास मदत करण्यासाठीं तेथील धर्मसंस्थांची पुनर्घटना करण्याचें आम्ही ठरविलें आहे." अशा अर्थाचा प्रस्ताव करून पोपनें सदर आज्ञापत्रांत त्या पुनर्घटनेची सविस्तर योजना नमूद केली होती. त्या योजनेनुसार मेक्लीन, कॅम्ब्राय व युट्रेक्ट येथें तीन नवीन आर्चबिशपच्या जागा निर्माण करण्यांत येऊन त्यांची नेमणूक करण्याचा अधिकार

स्पेनच्या राजास देण्यांत आला होता. त्यानें अर्थातच स्पॅनिश लोकांची नेमणूक त्या जागेवर केली. ह्या प्रत्येक आर्चबिशपच्या हाताखालीं निरनिराळया ठिकाणीं सहा बिशपस् नांवाचे धर्माधिकारी असून, त्या प्रत्येकास आपल्या हाताखालीं नऊ दुय्यम प्रतीचे धर्माधिकारी नेमण्याचा अधिकार होता. ह्या नऊजणांपैकीं दोघांकडे फक्त पाखंडी लोकांचे गुन्हे उजेडांत आणून त्यांस आपल्या हद्दींतील न्यायकोर्टा-पुढें खेंचण्याचें काम सोंपविलें होतें.

प्रत्येक बिशपला आपल्या अधिकारांत पाखंडी लोकांच्या गुन्ह्याची चौकशी करण्याकरितां एक न्यायमंडळ नेमण्याचा अधिकार असून या न्यायमंडळाचे अध्यक्ष-पद त्या त्या ठिकाणच्या प्रमुख सरकारी न्यायकोर्टांतील एका न्यायाधिशाकडे द्यावयाचें ठरलेलें होतें. अशा प्रकारचीं सुमारें ३० न्यायमंडळें स्थापन करण्यांत येऊन त्या सर्वांवर देखरेख आणि अंमल करण्याकरितां मेक्लीन येथें एक वडें व प्रमुख न्यायमंडळ ( सुप्रीम कोर्ट ऑफ इन्क्विझिशन ) स्थापन करण्यांत आलें होतें. पूर्वोक्त वादशाही फर्मानाची काळजीपूर्वक अंमलबजावणी करण्याचें काम ह्या प्रमुख न्यायमंडळाकडे व त्याच्या हाताखालच्या ३० प्रांतिक मंडळांकडे सोंप-विण्यांत आलें। त्या कामीं नेदर्लंडच्या पुढारी लोकांनीं अडथळा केल्यास त्यांची खोड मोडण्याकरितां नेदर्लंडांत पूर्वींच वस्ती करून राहिलेलें स्पॅनिश सैन्य होतां होईतों-पर्यंत तेथेंच ठेवावयाचें असें फिलिपनें गुप्तपणें मॉर्गरेटला कळविलें होतें. तें सैन्य काढून नेण्याबद्दल नेदर्लंडच्या लोकसभेनें व स्टेट कौन्सिलचे सभासद वुइल्यम, एग्-मॉंट, हॉर्न इत्यादि सरदारांनीं मॉर्गरेटला सारखा तगादा लावला होता; परंतु फिलिपनें नाना तऱ्हेच्या सबबी सांगून तसे करण्याची टाळाटाळ चालविली होती. ही टाळाटाळ चालू असतांना त्यानें वरील प्रकारचें फर्मान काढून त्याची सक्तीनें अंमलबजावणी करण्याची व्यवस्था केल्यामुळें नेदर्लंडांतील लोकमत बरेंच खव-ळलें. सदहू फर्मान व त्याची अंमलबजावणी करण्याकरितां निर्मिलेलें यंत्र ह्या दोन्ही गोष्टी तेथील लोकांच्या सनदशीर* हक्कांची ( हे हक्क गादीवर बसतांना फिलिपनेंही मान्य केले होते ) पायमल्ली करणाऱ्या होत्या. तेव्हां साहजिकच त्याबद्दल सर्वत्र ओरड सुरू होऊन त्यांच्या प्रतिकारार्थ जोराची चळवळ सुरू झाली. या चळवळींत जाहीर रीतीनें वुइल्यम अद्याप सामील झाला नव्हता; कारण तो या वेळीं स्वतःच्या खासगी व पर्यायानें देशकार्यास उपयोगी पडणाऱ्या एका

* ह्या हक्कांचा उल्लेख पहिल्या प्रकरणांत केलेला आहे.

महत्त्वाच्या कारस्थानांत गुंतला होता. तथापि फिलिपच्या जुलमाचें मूळ जें स्पॅनिश सैन्य तें काढून नेण्याबद्दल व उपरोक्त फर्मानाची अंमलबजावणी होईल तितकी सौम्य करण्याबद्दल त्यानें कौन्सिलर या नात्यानें आटोकाट यत्न केला. या कामीं त्यास काउंट एग्मॉटचेंही साहाय्य होतें; परंतु त्यांचे एतद्विषयक प्रयत्न यशस्वी झाले नाहींत तेव्हां त्या दोघांनींही स्पॅनिश सैन्याच्या अधिपतीच्या जागेचे राजिनामे दिले व कौन्सिलमध्येंही बिशप ऑफ आरासबरोबर त्यांचे वरचेवर खटके उडूं लागले. एका प्रसंगीं तर एग्मॉटची व त्याची मारामारी होण्याचा देखील समय आला; परंतु वुइल्यमनें त्यास सांवरून घेतलें! कौन्सिलच्या सर्व सभासदांत बिशप ऑफ आरास हाच फिलिपच्या धर्ममूलक राजकीय धोरणाचा मनःपूर्वक व आवेशानें पुरस्कार करणारा होता. मागें सांगितलेल्या फर्मानाचें पुनरुज्जीवन फिलिपनें याच्याच सूचनेवरून केलें होतें व त्याची अंमलबजावणी करण्याकरितां त्यानें मेक्लीन येथें स्थापन केलेल्या मुख्य न्यायमंडळाचीं सूत्रें याच्याच हातीं दिलीं होतीं तसेंच सर्वांत श्रेष्ठ अशी तेथील आर्चबिशपची जागा त्यास देऊन त्यानें त्याचा गौरव केला होता. थोड्याच काळांत फिलिपनें त्यास एवढ्या मोठ्या योग्यतेस चढविलेलें पाहून फिलिपच्या नूतन धर्ममूलक राजकीय धोरणाचा उगम त्याचेपासून झाला असावा, अशी नेदर्लंडच्या लोकांस सहजच शंका आली व ते उघडपणें तशा प्रकारचा दोषारोप त्याजवर करूं लागले. कित्येकजण त्याला राजानें स्पेनमध्यें परत बोलवावें असेंही म्हणूं लागले; परंतु त्यांच्या या ओरडीकडे अद्याप कोणी लक्ष देत नव्हतें. स्पॅनिश सैन्याच्या ज़ोरावर त्यानें धार्मिक छलाचें काम लोकांच्या तक्रारीस धाब्यावर बसवून चालविलें होतें. उलटपक्षीं लोकही हा छळ सोसण्यास व नवीन धर्ममतांची दीक्षा घेण्यास अधिकाधिक तयार होऊं लागले होते. त्यामुळे कित्येकांचे प्राण जाऊन त्यांच्या मालमत्तेचा नाश होऊं लागला होता; स्पॅनिश सैन्याची संख्या सुमारें चार हजार होती. त्यांचा पगार वक्तशीर मिळत नसे, यामुळें त्यांतील शिपायी पुष्कळ वेळां शहरांत व खेड्यापाड्यांत लुटालूट करून जनतेस निष्कारण त्रास देत असत व त्याबद्दल कोणी तक्रार केल्यास अधिकारी त्याकडे दुर्लक्ष करीत असत. अर्थात् ही ब्याद एकदां केव्हां नाहींशी होईल असें सर्वांस वाटलें असल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. ती काढून टाकण्याबद्दल त्यांनीं आपल्या प्रतिनिधींकडून सरकारास पुष्कळ प्रकारें विनंती-अर्जे वगैरे केले व खुद्द फिलिपची यासंबंधानें मनधरणी करण्याकरितां

त्यांनीं काऊंट एग्मॉंट यास स्पेनलाही पाठविलें; परंतु ह्या सर्व प्रयत्नांचा कांहीं एक उपयोग होण्याचा रंग दिसेना. तेव्हां अखेरीस त्यांनीं हें सैन्य काढून नेल्याशिवाय सरकारास द्यावयाचा पैसा बिलकूल द्यावयाचा नाहीं असें ठरविलें.

ह्या सैन्याचा कांहीं भाग झीलंड परगण्यांतील वॉलचेरेन व ब्रिल या शहरीं ठेवण्यांत आला होता. हीं शहरें समुद्राच्या नजिक व म्यूज नदीच्या मुखाशीं असल्यामुळे पावसाळ्यांत त्यांच्या खाडीचें पाणी आंत येऊं नये, म्हणून त्यांच्या-भोंवतीं बांधलेल्या तटबंदीची दरसाल दुरुस्ती करावी लागत असे. ती करण्याचें तेथील लोकांनीं नाकारलें. परकीय सैन्याचा जुलूम व त्रास सोसण्यापेक्षां खाडीचें पाणी आंत येऊन त्यामुळें मृत्यु आला तरी बेहत्तर असें ते म्हणूं लागले! असा निर्वाणीचा उपाय जेव्हां त्यांनीं योजला व इतर प्रांतांतूनही पैसा मिळण्याची जेव्हां आशा दिसेना, तेव्हां बिशप ऑफ आरास व रीजंट मार्गारेट यांनीं "इतःपर हें सैन्य येथें ठेवणें शक्य नाहीं; ठेवल्यास येथील लोकक्षोभास उग्र स्वरूप प्राप्त होऊन कदाचित् बंड होईल" असें फिलिपला लिहून कळविलें. तेव्हां त्याला मोठा संताप आला; परंतु नेदर्लंडवर आणखी सैन्य पाठवून तेथील लोकांची खोड मोडण्याची अद्याप त्याची तयारी झाली नसल्याकारणानें त्यानें खिन्न मनानें हें सैन्य आपल्या साम्राज्यांतील दुसऱ्या एका भागांत पाठविण्याची आज्ञा दिली व इ. स. १५६० चे अखेरीस तें सैन्य नेदर्लंडांतून निघून गेलें. याप्रमाणें नेदर्लंडच्या लोकांनीं फिलिपशीं सुरू केलेल्या झगड्यांत पहिला विजय मिळविला! स्पॅनिश सैन्य निघून गेलें खरें; परंतु त्यामुळें धर्मच्छल कांहीं मंदावला नाहीं. किंबहुना तो अधिक जोरानें चालून तो उत्तमप्रकारें चालविल्याबद्दल बिशप ऑफ आरास यास पोपकडून 'कार्डिनल' ही उच्च दर्जाची धार्मिक पदवी याच वर्षी मिळाली होती. येथून पुढें 'कार्डिनल ग्रॅनव्हिले' अथवा 'ग्रॅनव्हिले' याच नांवानें त्याचा कागदोपत्रीं उल्लेख होऊं लागला.

मध्यंतरीं वुइल्यमची पहिली बायको (इ. स. १५५८) व त्याचा बाप (इ. स. १५५९) हीं वारलीं! बापाच्या मृत्युमुळें नासू घराण्याचें पुढारीपण—तो वडील मुलगा असल्यामुळें—त्याच्याकडे आलें; त्याचा दुसरा भाऊ जॉन हा या घराण्या-च्या जर्मनींतील जहागिरीचा वारस व मालक झाला; परंतु नासू डिलेनबर्ग, ऑरेंज व नेदर्लंडांतील जहागिरी या सर्वांचा वारसा वुइल्यमकडे आलेला होता. त्याला आणखी दोन भाऊ व चार बहिणी असून त्यांचें नेतृत्वही त्याजकडेच

नं.......

आलें होतें. त्याची आईही अद्याप हयात होती. एवढ्या मोठ्या कुटुंबाचा चालक, बडा जहागिरदार व वयानें तरुण असल्यामुळें तत्कालीन सामाजिक चालीरीती च्या दृष्टीनें वुइल्यमला फार दिवस विधुरावस्थेंत राहणें शक्य नव्हतें; सबब. त्यानें दुसरें लग्न करण्याचा विचार योजिला. त्या वेळीं त्याच्या भावी आयुष्य-क्रमाची दिशा ठरलेली असल्यामुळें त्यास पोषक असा विवाहसंबंध घडवून आण-ण्याचा त्याचा विचार होता. फिलिपचें 'गुप्त रहस्य' त्यास कळून चुकलें होतें व त्याच्या जुलमी अंमलास प्रारंभही झालेला होता. त्याचा प्रतिकार करून स्वदेशाचें स्वातंत्र्य राखण्याचा त्यानें निर्धार केला होता व त्याप्रीत्यर्थ कौन्सिलर-च्या नात्यानें सनदशीर प्रतिकाराचा मार्गही त्यानें अवलंबिला होता; परंतु वर्ष सहा महिन्यांच्या अनुभवानें त्याला या मार्गाचें वैयर्थ्य दिसून आलें होतें व पुढें-मागें लवकरच आपणांस अधिक प्रखर उपाय योजावे लागतील हें त्याच्या लक्षांत येऊन चुकलें होतें.

सनदशीर प्रतिकार यशस्वी होण्यास सुद्धां त्याच्यामागें बलिष्ठ शक्तीचा जोर लागतो; नुसत्या धांगडधिंग्यानें, व्याख्यानानें व शाब्दिक आक्रोशानें ती यशस्वी होत नसते, हें तो पूर्णपणें जाणून होता आणि म्हणूनच त्याचा भाऊ लुई यानें अशा प्रकारची चळवळ करण्यास्तव काढलेल्या एका 'लीग' ऊर्फ संघाचें नेतृत्व त्यानें पत्करिलें नव्हतें. त्याच्या कल्पनेप्रमाणें प्रबल शक्ति उत्पन्न करण्याचे दोन मार्ग त्या वेळीं त्यास दिसत होते. एक नेदर्लंडांतील सर्व सर-दारांना संघटित करून त्यांच्यामध्यें एकोपा उत्पन्न करावयाचा, व दुसरा, जर्मनी, फ्रान्स, इंग्लंड वगैरे देशांतून मदत मिळविण्याचा. याशिवाय तिसराही एक मार्ग होता व तो नेदर्लंडांतील सामान्यजनतेनें सुरू केलेल्या चळवळीस संघटित रूप देऊन आणि तिचें नियंत्रण करून यथाकालीं वरील कार्यास तिचा उपयोग करून घ्यावयाचा, हा होय. या तिन्ही मार्गांचें क्रमशः अवलंबन करण्याचा वुइल्यमनें संकल्प केला होता. याप्रमाणें त्यानें आपल्या भविष्यकालीन आयुष्यक्रमाची रूप-रेषा आंखून टाकल्यामुळें, दुसरें लग्न करण्याच्या वेळीं त्याची दृष्टि साहजिकच जर्मनींतील एका बलिष्ठ संस्थानिकाच्या कन्येकडे वळली. ही कन्या सॅक्सनीचा ड्यूक मॉरिस याची मुलगी असून तिचें नांव 'ॲन' असें होतें. ही मुलगी फारशी रूपवान् अथवा सद्गुणी होती असें नाहीं; तथापि ती अगदीं वाईटही नव्हती. तिच्या गुणावगुणांकडे वुइल्यमचें लक्षच नव्हतें. तिच्याशीं विवाह केल्यास तिचा

बाप व आजा—लँडग्रेव्ह ऑफ हेसे—या जर्मन संस्थानिकांशीं व त्यांच्या बरोबरीच्या अमीरांशीं निकट संबंध जडेल व आपल्या भावी कार्यास त्यांचा उपयोग होईल, याच एका गोष्टीकडे लक्ष देऊन तो हें लग्न जुळवून आणण्याच्या उद्योगास लागला. परंतु त्या कामीं सकृद्दर्शनीं त्यास पुष्कळ अडचणी येणाऱ्या होत्या. वरील दोन्ही जर्मन संस्थानिक प्रॉटेस्टंट पंथाचे उत्कट पुरस्कर्ते असून ड्यूक मॉरिस हा तर फिलिपच्या बापाचा शत्रू होता. त्याच्या मुलीशीं लग्न करण्याची परवानगी वुइल्यमला फिलिपकडून मिळणें मुष्किलीचें होतें. तसेंच वुइल्यमशीं लग्न केल्यास ॲनला कॅथोलिक पंथाची दीक्षा घ्यावी लागेल अशा समजुतीनें व विशेषतः कॅथोलिक पंथाचा विरोध करण्याची प्रवृत्ति अंगीं बाणल्यामुळें, लँडग्रेव्ह ऑफ हेसे यास हा विवाहसंबंध मुळींच पसंत नव्हता. वुइल्यमच्या घराण्यांतील मंडळींसही तो पसंत नव्हता. परंतु अशा परिस्थितींतही तो घडवून आणण्याचें वुइल्यमच्या मनानें घेतलें. सुमारें दोन वर्षेपर्यंत यासंबंधाच्या वाटाघाटी व पत्रव्यवहार करून मोठ्या शिताफीनें त्यानें सर्व अडचणी दूर केल्या व इ. स. १५६१ मध्यें लिप्झिक शहरीं हा विवाह घडवून आणला. त्यानिमित्त एक आठवडाभर मोठ्या थाटाचा समारंभ चालू होता. डेन्मार्क, स्पेन, येथील राजांचे प्रतिनिधी व जर्मनींतील बहुतेक सर्व संस्थानिक आपल्या लव्याजम्यानिशीं ह्या प्रसंगीं हजर राहिले होते. त्यांचा पाहुणचारही उत्तमप्रकारें करण्यांत आला. रीतीप्रमाणें लग्नाचे सर्व विधी व सोहळे आटोपल्यावर लागलेच वधुवरें ब्रुसेल्स येथें येऊन नांदूं लागलीं.

विवाह करून ब्रुसेल्स येथें आल्यावर वुइल्यम आपल्या सार्वजनिक कर्तव्यांकडे विशेष लक्ष देण्यास मोकळा झाला. या वेळेपर्यंत ग्रॅनव्हिल्ले यानें फिलिपच्या राजकीय धोरणास विरुद्ध असणाऱ्या अनेक लोकांचा धर्माच्या नांवावर उच्छेद केला होता. हजारों लोकांस जाळपोळ करून मारण्याचें व त्यांची मालमत्ता सरकारजमा करण्याचें त्यानें एकसारखें सत्र सुरू केलें होतें. त्यायोगानें सामान्य जनतेंत भयंकर असंतोष माजून तो त्यांच्या लेखणींतून व वाणींतून बाहेर पडूं लागला होता. कित्येकांनीं देशभक्तिप्रधान अशा गाण्यांतून व लेखांतून ग्रॅनव्हिलेचा उपहास व त्याच्या धोरणासंबंधीं संताप आणि तिरस्कार व्यक्त करण्यास आरंभ केला होता. वुइल्यमचा भाऊ लुई यानें दुय्यम प्रतीच्या सरदारांचा एक संघ काढून त्याच्यामार्फत रीजंट मॉर्गरेट हिजकडे पद्धतशीर रीतीनें आपल्या गाऱ्हाण्यांची दाद मागण्यास सुरवात केली होती या संघाचें नेतृत्व पत्करण्याबद्दल

त्यानें वुइल्यमला विनंती केली परंतु त्या संघाला अद्याप विशेष महत्त्व नसल्याकारणानें व त्यांतील बहुतेक लोक उच्छृंखल, भावनावश आणि कच्च्या दिलाचे असल्यामुळें त्यानें ही विनंति मान्य केली नाहीं. हे लोक दंगाधोपा करून आपल्याकडे सरकारचें व लोकांचें लक्ष वेधून घेण्यास तयार होते; परंतु दंगाधोप्यानें त्यांच्या दुःखांचें निवारण होणें शक्य आहे, असें वुइल्यमला वाटत नव्हतें. त्याप्रीत्यर्थ धिमेपणानें प्रथम आपलें सामर्थ्य वाढविण्याकरितां योग्य अशी संघटना केली पाहिजे असें त्याचें मत होतें. यास्तव प्रथम नेदर्लंडांतील प्रमुख व वलिष्ठ सरदारांचा संघ बनविण्याचा त्यानें प्रयत्न केला; परंतु एग्मॉटच्या अविचारी व उच्छृंखल स्वभावामुळें प्रथमदर्शनीं त्यास या कमीं यश आलें नाहीं. तथापि त्यानें प्रयत्न चालू ठेविलाच होता इकडे स्टेट कौन्सिलमध्यें रोजच्या रोज त्यास ग्रॅनव्हिले व रीजंट मार्गरेट यांच्या धोरणाचा विरोध करण्याचें काम करावें लागत होतें धर्मच्छलासंबधानें त्यानीं दिलेले हुकूम शक्य तितके सौम्य करण्याचा त्यानें आग्रह धरला होता. व स्वतःच्या ताब्यांतील प्रांतांत त्या हुकमाची अंमलबजावणी करण्याचे कामीं त्यानें अत्यंत ढिलाई चालविली होती. त्याबद्दल ग्रॅनव्हिलेची तक्रार गुप्तपणे फिलिपच्या कानावर गेली होती. ग्रॅनव्हिलेचे व त्याचे परस्पर संबंध बाह्यतः सभ्यपणाचे व सहानुभूतिदर्शक होते, पण आतां त्यांचीं मनें परस्परांविषयीं शुद्ध राहिलीं नव्हतीं. हॉर्न व एग्मॉंट यांच्याबरोबर ग्रॅनव्हिलेचें जसें उघडपणे खडाष्टक सुरू होते तसा प्रकार अद्याप वुइल्यमबरोबर सुरू झालेला नव्हता. तथापि गुप्तपणें—खासगी पत्रांच्या द्वारें—वुइल्यमसंबंधानें फिलिपच्या मनांत द्वेष व तिरस्कार उत्पन्न करण्याचा क्रम ग्रॅनव्हिले यानें सुरू केला होता; व त्याची बातमी वुइल्यमला आपल्या गुप्त हेराकडून वरचेवर कळत होती. अशा स्थितांत त्या दोघांमध्यें वरपांगीं दिसून येणारा सलोखाही फार दिवस टिकण्याचा संभव नव्हता. तथापि वुइल्यम हा मोठा धूर्त, धोरणी व मतलबी असल्यामुळें होता होईल तोंपर्यंत नेमस्तपणानें वागण्याचें धोरण सोडावयाचें नाहीं असा त्याचा बेत होता. पण तो फार दिवस चालूं शकला नाहीं. स्टेट कौन्सिलचीं महत्त्वाचीं कामें ग्रॅनव्हिले, रीजंट व व्हिज़्लियस यांचें त्रिकूट ( यास कन्सल्टा असें नांव होतें ) वुइल्यमादि इतर सभासदांस न विचारतां व न कळवितां गुप्तपणें आपल्या मर्जीनुसार करीत असे. या पद्धतीनें त्यांनीं नेदर्लंडचा बहुतेक सर्व राज्यकारभार आपल्या हातीं आणून ठेवला होता. लहानसहान

स्थानिक अधिकाऱ्यांच्या नेमणुका करण्याचें व त्यांच्यावर हुकमत चालविण्याचें काम त्यांनीं सुरू केल्यामुळे लोकांचे स्थानिक स्वराज्याचे हक्कही संपुष्टांत येत चालले होते. अर्थात् त्याबद्दल तक्रार करणें व त्या गोष्टीस आळा घालणें हें वुइल्यम, एग्मॅांट, ऱ्हॉर्न इत्यादि इतर कौन्सिलरांचे कर्तव्य होतें. हें कर्तव्य बजावीत असतांना एकदां भर कौन्सिलमध्यें ग्रॅनव्हिले यानें या सरदारांचा व विशेषतः वुइल्यमचा उद्धटपणाचे शब्द उच्चारून उपमर्द केला. तेव्हां वुइल्यमनें प्रथम शांतपणानें त्याची समजूत घालण्याचा यत्न केला पण वुइल्यम जों जों शांतपणानें सामोपचाराच्या गोष्टी बोलूं लागला तों तों ग्रॅनव्हिले यास त्याजवर तोंड सोडण्याचें जास्तच स्फुरण चढूं लागलें; तेव्हां अखेरीस वुइल्यमलाही त्याच्या तोंडास तोंड देऊन त्याची निर्भर्त्सना करणें भाग पडलें.* त्यानंतर उभयतांतील सलोखा नष्ट होऊन ते परस्परांशीं तुटकपणानें वागूं लागले. हा प्रसंग घडून आल्यावर लागलींच वुइल्यम व त्याचे इतर सहाध्यायी यांनीं पत्रद्वारें त्याची सविस्तर हकीकत फिलिपच्या कानावर घातली व कौन्सिलचीं महत्त्वाचीं कामें गुप्तपणें ग्रॅनव्हिलेच्या मताप्रमाणें चालून त्याची जबाबदारी मात्र सर्व कौन्सिलवर टाकावयाची असेल तर आपणांस अशा कौन्सिलमध्यें राहतां येणें शक्य नाहीं असें स्पष्ट पण अदबीनें त्यास कळविलें. यासंबंधाची कच्ची हकीकत फिलिपला प्रत्यक्ष सांगून ग्रॅनव्हिले यास परत बोलावण्याविषयीं त्याचें मन वळविण्याकरितां त्यांनीं मॉंतिग्नि नामक सरदारास मॅद्रिदला† पाठविलें. इकडे ग्रॅनव्हिले यानेंही फिलिपला गुप्त पत्रें पाठवून या सरदारांच्या मागणीस उत्तेजन न देण्याविषयीं विनंति केली. त्यांची वेळींच खोड न मोडल्यास तेच नेदर्लंडांत बंड माजवितील असेंही त्यानें त्यास कळवून टाकलें. वुइल्यमचें उपरोक्त पत्र वाचून फिलिपला त्याचा व त्याच्या सहाध्यायांचा मोठा राग आला होता; परंतु तो उघडपणानें व्यक्त करण्याची अद्याप त्यास सोय नव्हती. युद्धें‡ व जुलमी राज्यपद्धति यांचा अवाढव्य

* हा तंटा मुख्यतः अँटवर्प शहरांतील मॅजिस्ट्रेटच्या नेमणुकीवरून उद्भवला. ह्या नेमणुका करण्याचा हक्क वंशपरंपरेनें वुइल्यमच्या घराण्याकडे होता; परंतु त्यास धाब्यावर बसवून ग्रॅनव्हिलेनें त्या नेमणुका आपल्या मर्जीप्रमाणें केल्या व त्या अंमलांत आणण्याची वुइल्यमला आज्ञा केली! हा उपमर्द असह्य झाल्यामुळें वुइल्यमची व त्याची भर कौन्सिलांत खडाजंगी झाली!

† स्पेनची राजधानी. ‡ या वेळीं आफ्रिकेंतील मूर लोकांबरोबर त्याचें युद्ध चाललें होतें. फ्रँको-स्पॅनिश युद्धाची हकिकत मागें आलीच आहे.

ठी ग्रंथ संग्रहा

खर्च चालवावा लागत असल्यामुळें स्पेन व नेदर्लंड या दोन्ही ठिकाणच्या सरकारी तिजोरीची स्थिति असमाधानकारक झाली होती व त्याकरितां हलक्या धातूंचीं नाणीं काढून त्यांचा खऱ्या सोन्यारुप्याच्या नाण्यांऐवजीं उपयोग करण्याची योजना त्यानें आरंभिली होती. ती नेदर्लंडांत अमलांत आणण्याचे कामीं त्यास वुइल्यम, एग्मॉंट, हॉर्न वगैरे सरदारांची मदत घेणें जरूर होतें म्हणून त्यानें आपला राग आवरून धरून वरकरणी त्यांचें अर्धवट समाधान करणारें उत्तर पाठविलें व त्यांत कौन्सिलमध्यें राहण्याचा त्यांस आग्रह करून त्यांच्या तक्रारी मिटविण्याबद्दल आपण मार्गरेटला अलाहिदा आज्ञापत्र पाठविल्याचें कळविलें. पण वस्तुतः ग्रॅनव्हिले व मार्गरेट यांस त्यानें त्यांच्याशीं वरकरणी सख्य राखून त्यांच्या हालचालीवर बारीक नजर ठेवण्याचे गुप्त हुकूम सोडले होते. तसेंच मॉंतिग्नि मॅद्रिदला पोंचल्यावर फिलिपनें त्याचें बाह्यतः सन्मानपूर्वक स्वागत केलें; परंतु ग्रॅन्व्हिलेसंबंधीं बोलणें निघालें असतां तो त्याच्यावर खूप रागावला व "तुमच्या तक्रारीचा अर्थच मला समजत नाहीं, त्या अगदीं मोघम असून त्यांत अमुक एक गोष्ट ग्रॅनव्हिलेनें चुकीची अथवा अन्यायाची केली असें सप्रमाण सिद्ध केलेलें नाहीं; तेव्हां कोणत्या कारणांवरून मीं त्यास परत बोलवावें ? तुम्ही सरदार लोक त्यास योग्य ती मदत करण्याचें सोडून उलट त्याच्याशीं तेढानें वागतां व त्याला त्रास देतां त्यामुळेंच तुमचें त्याचें पटत नाहीं;" वगैरे उद्गार रागाच्या झपाट्यांत त्याच्या तोंडून निघाले. तेव्हां मॉंतिग्नि यास सखेदाश्चर्य वाटून संतापही आला. परंतु जास्त बोलल्यास त्याचा उपयोग न होतां उलट फिलीप अधिकच चिडेल, असें दिसून आल्यावरून तो त्याचे बोलणें ऐकून घेऊन मुकाट्यानें स्तब्ध राहिला व नंतर कांहीं औपचारिक संभाषण झाल्यानंतर फिलिपनें त्यास निरोप दिला. त्यानंतर निराश होऊन लवकरच तो स्वदेशीं परत आला. मॉंतिग्नेच्या रदबदलीचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं असें कळतांच, वुइल्यम, एग्मॉंट व हॉर्न यांनीं ग्रॅनव्हिले, कौन्सिलमध्यें असेपर्यंत कौन्सिलच्या बैठकीस हजर रहावयाचें नाहीं असा ठराव करून तो रीजंट मॉर्गरेट व फिलीप यांजकडे पाठवून दिला. तसेंच तेथील सर्व सरदारांकडून त्याजवर सामाजिक बहिष्कार घालून, त्याच्या पोषाकाची व वागणुकीची उपहासास्पद नक्कल करून आपल्या सामाजिक मेजवान्यांचे प्रसंगीं तो व त्याचा कारभार यांची उपरोधिकपणें टर उडवून त्यास सळो कीं पळो करून टाकण्यासही ते प्रवृत्त झाले.

थोड्याच दिवसांत ग्रॅनव्हिले यास 'आपणांस कोणी कुत्रासुद्धां मान देत नाहीं' असें फिलिपला कळविण्याची पाळी आली. इतका जरी त्याच्यावर लोकांचा रोष झाला होता, तरी त्यानें आपलें अन्यायमूलक दडपशाहीचें व धर्मच्छलाचें धोरण तिळमात्रही ढिलें केलें नव्हतें व त्याकारणानें सामान्य जनतेंत भयंकर असंतोष माजून कोठें कोठें त्यांच्या व अधिकाऱ्यांच्या चकमकीही झडूं लागल्या होत्या. ही स्थिति पाहून रीजंट मार्गारेट हिला मोठी चिंता वाटूं लागली. वुइल्यम-बरोबर इतक्या तुसडेपणानें वागण्याचें ग्रॅनव्हिलेचें धोरण तिला मुळांनच पसंत नव्हतें; परंतु ग्रॅनव्हिले यास फिलिपची आंतून फूस असल्यामुळें त्यास विरोध केल्यास तो आपणांविषयीं फिलिपचें मन कलुषित करील अशी भीति वाटून ती स्वस्थ बसली होती. पण देशांत शांतता राखण्याचें काम जसजसें बिकट होऊं लागलें, तसतसें तिचें चित्त व्यग्र होऊन तिला ग्रॅनव्हिलेच्या कडकपणास आळा घालण्याची जरूरी वाटूं लागली. म्हणून तिनें त्यास सामोपचारानें दोन गोष्टी सांगून अंमळ सौम्यपणानें वागण्याची विनंति केली; परंतु ग्रॅनव्हिलेनें ती ऐकली नाहीं. उलट तो जास्तच बेहोषपणानें वागूं लागला. त्याच्या जुलमामुळें प्रॉटेस्टंट व कॅल्व्हानिस्ट पंथाचा प्रसार कमी न होतां उलट 'कीं तोडिला तरु फुटे आणखी भरानें' या न्यायानें सारखा वाढतच चालला. धर्माकरितां मरण्याची व छल सोसण्याची लोकांमध्यें जणुं काय अहमहमिकाच लागून राहिली! ग्रॅनव्हिलेनें हजारों लोक पाखंडी म्हणून तुरुंगांत टाकावेत व फांसावर चढवावेत तों त्यांच्या जागीं पुन्हा तितकेच किंबहुना जास्तच नवे पाखंडी निर्माण व्हावेत व त्यांनीं चोहोंकडे अस्वस्थता माजवून टाकावी, असा प्रकार सुरू झाला! तेव्हां मॉर्गा-रेटनें, त्यास परत बोलाविल्याशिवाय देशांत शांतता नांदणें शक्य नाहीं, असें फिलिपला कळवून वुइल्यम, एग्मॉट व हॉर्न यांस कौन्सिलच्या बैठकीस हजर राहून लोकमत शांत करण्यास मदत करण्याबद्दल आग्रहाचीं आज्ञापत्रें पाठविण्या-विषयींही तिनें त्यास विनंति केली. तेव्हां फिलिपचा नाइलाज होऊन त्यानें ग्रॅन-व्हिले यास आपल्या मातोश्रीस भेटावयास जाण्याच्या निमित्तानें रजा घेण्याची सूचना केली; तथापि ग्रॅनव्हिलेनें दोनतीन महिने तिजकडे लक्षच दिलें नाहीं. परंतु मार्गारेटच्या आग्रहावरून पुन्हा जेव्हां फिलिपनें त्यास ती सूचना अंमलांत आणण्याचा इषारा दिला, तेव्हां खिन्न होऊन नाइलाजास्तव आपल्या अधिकाराचीं सूत्रें सोडून तो आपल्या मातोश्रीस भेटण्याकरितां बर्गंडे प्रांतांत निघून गेला.

जातेसमयीं त्याचे सन्मानार्थ सरकारतर्फे शिपाई व अधिकारी यांची एक भव्य मिरवणूक ब्रुसेल्स येथील त्याच्या राहत्या राजवाड्यापासून तों नामूर गेटापर्यंत काढण्यांत आली होती. ती मिरवणूक शहराबाहेर गेल्यावर शहरांतील लोकांनींही त्याच्या प्रयाणाबद्दल आनंद व्यक्त करण्याकरितां एक मिरवणूक काढून त्यांत नानाप्रकारें त्याच्या नांवाचा उपहासास्पद उल्लेख करून त्यांनीं आपल्या उच्छृंखलपणाची हौस पुरवून घेतली. एका वेड्यापिरानें त्याच्या राजवाड्याच्या द्वारावर 'for sale' ( विकावयाचा आहे ) अशी पाटी लाविली ! व ब्रेडरोड आणि गस्ट्रॅटेन नामक दुसरे दोन वेडेपीर एकाच घोड्यावर बसून ग्रॅनव्हिलेच्या मिरवणुकींत मधेंच शिरून त्याच्या गाडीपुढें जाऊन त्याची टवाळी करून आले ! याप्रमाणें फिलिपच्या या एकनिष्ठ सेवकाची ब्रुसेल्सच्या सामान्य लोकांनीं अखेर संभावना केली !

# प्रकरण ४ थें.

# राजनिष्ठेची ओढाताण.

ग्रॅनव्हिलेनें इ. स. १५६४ च्या मार्च महिन्यांत [ मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणे ] प्रयाण केल्यावर रीजंट मार्गरेट हिनें वुइल्यम, एग्मॉंट व हॉर्न यांस स्टेट कौन्सलमध्यें हजर न राहण्याचा आपला ठराव परत घेण्याची विनंति केली व ग्रॅनव्हिले पुन्हा आल्यास फिरून तो अंमलांत आणण्याच्या शर्तीवर ती त्यांनीं मान्य केली. खुद्द फिलिपनेंही त्यांस गौरवपर पत्रें लिहून मार्गरेटला मनःपूर्वक मदत करण्याची सूचना केली. ह्या पत्रांतील आदर व गौरव केवळ औपचारिक आहे हें वुइल्यम जाणून होता. परंतु एग्मॉंट व हॉर्न हे त्यानें हुरळून गेले! आपल्या सनदशीर प्रतिकारामुळें फिलीप खरोखर ताळ्यावर आला असें त्यांस क्षणभर वाटलें व स्पॅनिश सैन्य आणि ग्रॅनव्हिले यांस हाकून देण्याचें कामीं त्यांना जें यश आलें त्यानें ते कांहींसे धुंदही झाले! हा आपल्याच सात्त्विक प्रतिकाराच्या सामर्थ्याचा प्रभाव असून, त्या प्रतिकाराच्या जोरावर आपण फिलिपच्या जुलमी वर्तनास वाटेल तसा आळा घालूं असें त्यांस वाटूं लागलें. परंतु वुइल्यमनें असल्या भावनेस आपल्या मनांत बिलकुल थारा दिला नाहीं. फिलिप सध्यां पैशाच्या अडचणींत असल्यामुळें व नेदर्लंडांतील लोकांची खोड मोडण्यास आवश्यक तितकें सैन्य पाठविण्याची त्याची तयारी झालेली नसल्याकारणानेंच तो आपल्या मागण्या तूर्त मान्य करीत आहे, हें त्यास पक्के ठाऊक होतें; व तसें त्यानें आपल्या वरील सहाध्यायांस कळविलें; परंतु त्यांच्या उथळ स्वभावामुळें त्यांना तें पटलें नाहीं. असो; पुढें काय व्हावयाचें तें पहातां येईल, पण सध्यां तरी मिळालेल्या विजयाचा शक्य तितका फायदा करून घ्यावा, असें मनांत आणून वुइल्यमनें आपल्या सहाध्यायांच्या मदतीनें पुढील तीन गोष्टी घडवून आणण्याचें ठरविलें. त्या अशा:—

१ नेदर्लंडांतील इस्टेट्स जनरल ऊर्फ लोकसभेच्या बैठकी रीजंटकडून वक्तशीर भरविणें.

२ नेदर्लंडांतील वरिष्ठ सत्ता एकाच अभियुक्त कौन्सिलच्या हातीं देऊन त्या कौन्सिलची—अर्थात् सध्याच्या स्टेटकौन्सिलची—योग्य ती सुधारणा करून त्याच्या पोटांतलें गुप्त कौन्सिल मोडून टाकणें.

४—राजनिष्ठेची ओढाताण.

३ पाखंडी लोकांचा छल करणाऱ्या कायद्यांची अंमलबजावणी सौम्य-पणानें करणें.

ह्या तीन गोष्टी झाल्यावांचून देशांत शांतता नांदणें शक्य नाहीं, असें त्यानें मार्गारेटच्या नजरेस आणून दिलें. फिलिप नाराज होईल, या भयानें मार्गारेट त्या घडवून आणण्यास तयार नव्हती; परंतु तसें स्पष्टपणें बोलून दाखविण्याची तिची छाती नव्हती; कारण ह्या वेळपर्यंत मिळालेल्या विजयामुळें लोक व सरदार यांची अधिकाऱ्यांस विरोध करण्याची प्रवृत्ति जास्त बळावली होती व प्रॉटेस्टंट मताचा प्रसारही झपाट्यानें वाढत चालला होता. वुइल्यम हा हॉलंड, झीलंड व युत्रेक्ट या प्रांतांचा गव्हर्नर होता व त्या नात्यानें त्या प्रांतांत पाखंडी लोकांचें निर्मूलन करण्याचे बादशाही व रीजंटचे हुकूम पाळणें हें त्याचें कर्तव्य होतें. ते हुकूम अजिबात धाब्यावर बसविल्यास राजाज्ञेचा भंग केल्याबद्दल कायदेशीर रीतीनें त्याजवर राजद्रोहाचा आरोप येण्यासारखा होता व इतक्या थरास गोष्टी नेण्याची अद्याप त्याची तयारी नव्हती. म्हणून त्या हुकुमांची पूर्ण अवहेलना न करितां शक्य तितक्या सौम्य रीतीनें त्यांची अंमलबजावणी करण्यास त्यानें आपल्या हाता-खालच्या लोकांस कळविलें व इकडे कौन्सिलमध्यें ते हुकूम परत घेण्याविषयीं अथवा रद्द करण्याविषयीं त्यानें नेटानें बोलणें सुरू केलें. ह्या अन्यायाच्या हुकुमां-मुळें नेदर्लंडांत या वेळेपर्यंत सुमारें ५० हजार लोक प्राणास मुकले होते व त्या कारणानें लोकांत इतकी अस्वस्थता माजून राहिली होती की, व्यापार व शेतकी यांकडेही कोणाचें लक्ष लागेना! अर्थात् देशांत दुर्भिक्ष वाढण्याचीं चिन्हें दिसूं लागलीं. देहांतशासनासही न जुमानतां प्रॉटेस्टंट व कॅल्व्हानिस्ट यांची संख्या दिवसानुदिवस जास्तच वाढूं लागली. अशा स्थितींत जुलुमजबरदस्तीनें कसा व कोठवर निभाव लागणार? जेथें समाजांतील निम्मे-अर्धे लोक कायद्यांस धाब्यावर बसविण्यास तयार झाले तेथें तुरुंग अथवा गळफास यांच्या जोरावर शांतता राखण्याचा अधिकाऱ्यांचा हट्ट किती दिवस चालणार? या गोष्टीचा गंभीरपणें विचार करण्याची वुइल्यमनें मार्गारेटला व स्टेट कौन्सिलच्या सभासदांना विनंति केली. एग्मॉंट, हॉर्न हुग्स्ट्रॅटेन, (हा नुकताच स्टेट कौन्सिलचा सभासद झाला होता) वगैरे सरदारांनीं त्याच्या विनंतीस दुजोरा दिला; परंतु बर्लेमाँट, व्हिज्लियस, अर्शॉट या सरकारपक्षीय सभासदांनीं त्यास विरोध करून त्याच्या म्हणण्याचा उपहास केला. मॉर्गारेटलाही त्यांचें म्हणणें पसंत पडण्यासारखें नव्हतें. तिला दडपशाहीनें

तेथील लोकांची चळवळ मोडून टाकण्याविषयीं फिलिपकडून वारंवार पत्रें येत होतीं; पण ही दडपशाही चालू ठेवण्यास लागणारें सैन्यबल व द्रव्यबल पुरविण्याची त्याची तयारी अद्याप पूर्ण झाली नसल्याकारणानें तिला वुइल्यमचा उपदेश उघडपणें झुगारून देतां येईना. तेव्हां वुइल्यमनें वर्णिलेली देशस्थिति फिलिपच्या नजरेस आणून त्याची धर्मविषयक फर्मानें व त्यांची अंमलबजावणी हीं सौम्य करून घेण्याकरितां एग्मॉंट यास स्पेनला पाठविण्याचें तिनें—कौन्सिलसच्या संमतीनें-ठरविलें. त्या समयीं वुइल्यमनेंही त्यास फिलिपला पुढील निरोप कळविण्याची विनंति केली—"धर्मच्छलाचा प्रतिकार करण्यास्तव मोठमोठीं सर्व शहरें बंडास प्रवृत्त होत आहेत; अशा स्थितींत तत्संबंधींचे हुकूम येथें अमलांत आणणें अशक्य होऊन बसलें आहे. माझ्याविषयीं म्हणाल तर मी कॅथोलिक पंथाचाच अनुयायी राहीन; परंतु लोकांना तुम्ही अमुकच पंथाची दीक्षा घ्या म्हणून सांगण्याचा आपला जुलमी हक्क बजावणाऱ्या राजाच्या कृत्यास मान डोलविण्यास मी कधींही तयार होणार नाहीं." न्यायखात्यांतील भ्रष्टतेकडेही राजाचें लक्ष वेधून सर्व राज्यकार-भाराची, प्रिव्ही कौन्सिलची, जमावंदीची आणि स्टेट कौन्सिलची, सुधारणा करण्या-विषयींही फिलीपचें मन वळविण्याची त्यानें त्यास सूचना केली.

वरीलप्रमाणें शिष्टाई करण्याकरितां एग्मॉंट इ. स. १५६५ च्या जानेवारींत स्पेनला निघून गेला. तेथें—मॅद्रिद येथें-फिलिपनें त्याचें आदरपूर्वक व थाटाचें स्वागत करून त्याची बरदास्त इतक्या उत्तम रीतीनें ठेवली कीं, त्यायोगानें एग्-मॉंटचा त्याच्याविषयीं असलेला राग निमाअधिक नाहींसा झाला व जो थोडा बाकी राहिला होता तो फिलिपनें त्याच्याशीं मिठास भाषणें करून व त्यास अघळपघळ तोंडीं आश्वासनें देऊन नाहींसा केला! एग्मॉंट, हा स्वभावतः निष्कपटी, शूर व खुल्या दिलाचा परंतु उथळ स्वभावाचा असल्यामुळें फिलिपच्या कपटनीतीस तो सहज बळी पडला! फिलिपच्या गुलजार भाषणा-वरून, तो खरोखरच द्रवला असून आपल्या गाऱ्हाण्यांची दाद लावण्याची त्याची प्रामाणिक इच्छा आहे अशी त्याची सम-जूत झाली व त्याची गोड गोड भाषणें आणि आश्वासनें ऐकून घेऊन तो जसा गेला तसाच हात हालवीत माघारीं आला! फिलिपची पोकळ आश्वासनें व सदिच्छा हीं वुइल्यमादि आपल्या सहाध्यायांस कळवून तीं विश्वासार्ह आहेत असें जेव्हां त्यानें सांगितलें तेव्हां त्यांनीं त्याच्या भोळेपणाबद्दल त्याची

कींव करून त्याचा उपहासही केला. पुढें एक दोन महिने लोटले तरी फिलिपच्या आश्वासनांपैकीं एकही खरें होण्याचें चिन्ह दिसेना तेव्हां तो खिन्न आणि लज्जित होऊन कांहीं काल आपल्या गांवीं जाऊन स्वस्थ बसला! एगमॉट परत आल्यावर त्याच्या सांगण्यावरून फिलिपच्या राजकीय धोरणांत लवकरच इष्ट असा फरक होण्यासंबंधानें कांहीं लोकांस जी आशा वाटूं लागली होती ती लवकरच नष्ट झाली. कारण फिलिपच्या ज्या तोंडानें एगमॉट यास गोडगोड बोलून मोहित केलें व त्याच्या ज्या हातांनीं त्यास मोठमोठ्या मेजवान्या व देणग्या देऊन तृप्त केलें त्याच तोंडानें व त्याच हातांनीं त्याच्या तक्रारीस न जुमानतां धर्मसंबंधीं कायद्याची अंमलबजावणी जास्त सक्तीनें करण्याचे हुकूम गुप्तपणें रीजंट मार्गरेट हिजकडे पाठविण्याची कामगिरी बजावली असल्याकारणानें त्यांची अंमलबजावणी पूर्वीप्रमाणेंच चालू राहिली! नेदर्लंडांतील लोकांची खोड मोडून त्यास सर्वस्वीं गुलाम करून टाकण्याकरितां फिलिप स्पेनमध्यें एक मोठें सैन्य तयार करीत होता परंतु तें तयार होईपर्यंत त्यासंबंधानें वाचांश न करितां 'साम, दाम' करून वेळ मारून नेण्याचा त्याचा बेत होता. म्हणून एगमॉटला खुष व संतुष्ट करून त्यानें त्याच्या तक्रारी दूर करण्याचीं तोंडीं आश्वासनें त्यास दिलीं होतीं. तथापि तीं रीजंटनें खरी मानूं नयेत म्हणून तिला त्यानें वरीलप्रमाणें गुप्त हुकूम पाठविले होते. फिलिपच्या ह्या सर्व हालचालींची बातमी वुइल्यम यास आपल्या गुप्त हेराकडून कळलेली होती व लवकरच फिलिपबरोबर उघडपणें सशस्त्र झगडा करावा लागेल हें ओळखून तोही त्याची तयारी करीत होता. पण फिलिपसारख्या बलाढ्य आणि उत्तम प्रकारचें लष्कर पदरीं असलेल्या सम्राटाबरोबर टक्कर देण्यास नेदर्लंडांतील वारिकसारिक सरदार व सामान्य लोक —ज्यांच्यांत शिस्त व संघटना आणि द्रव्यबल याची मोठी उणीव असावयाची— समर्थ होतील असा त्यास भरंवसा वाटत नव्हता. त्यांचा मुळींच उपयोग होणार नाहीं असें त्यास वाटत नव्हतें परंतु त्यांच्या पाठीशीं शिस्तीचें व कसलेलें सैन्य पाहिजे असें त्याचें मत होतें. हें सैन्य तत्कालीन परिस्थितींत देशांतल्या देशांत त्यास मिळण्याचा संभव नव्हता. म्हणून जर्मनी, फ्रान्स, येथील राजपुत्र व संस्थानिक तसेंच इंग्लंड व डेन्मार्क येथील राणी व राजाचे मुखत्यार यांचेकडून सैन्याची मदत मिळविण्याची खटपट त्यानें गुप्तपणें चालविली होती. ती यशस्वी होईपर्यंत आपणही अधिकारावर राहून फिलिपची नोकरी शक्य तितक्या रीतीनें

करून त्याच्याशीं सलोखा राखावयाचा, असें त्यानें ठरविलें होतें. इकडे फिलिपनेंही आपलें सैन्य तयार होईपर्यंत त्याच्याबरोबर वरपांगी गोडी राखण्याचें ठरविलें होतें. याप्रमाणें ह्या दोन प्रसिद्ध पुरुषांचे डावपेच चालू असतां इकडे सामान्य लोकांचा व दुय्यम प्रतीच्या–छोट्या-सरदारांचा—मानकरी जहागिरदार वगैरे—फिलिपच्या जुलमाचा प्रतिकार करण्याप्रीत्यर्थ जोराची चळवळ चालू होती. ती करण्याकरितां त्यांनीं एक संघ स्थापन केला होता. त्याचें नेतृत्व वुइल्यमचा भाऊ लुई याजकडे होतें. ह्या संघांत तरुण लोकांचाच विशेष भरणा असल्यामुळें त्यांच्याकडून विकारवशतेच्या भरांत सहजच कांहीं अप्रबुद्धपणाच्या गोष्टी घडून येत होत्या. † त्या वुइल्यमला पसंत नव्हत्या. शिवाय तो स्वतः वडा सरकारी अधिकारी व संस्थानिक असल्यामुळें त्यास त्या संघाबरोबर संबंध ठेवतां येणें शक्य नव्हतें. तथापि एगमॉंट अपेश घेऊन परत आल्यानंतर त्यानें गुप्तपणें ह्या संघाच्या चळवळीस योग्य वळण लावून त्याचा आपल्या हेतूच्या सिद्ध्यर्थ उपयोग करून घेण्याचें ठरविलें.

मध्यंतरी, नवीन जर्मदार सैन्य नेदर्लंडांत पाठविण्याची फिलिपची तयारी झाल्यामुळें इ. स. १५६५ च्या आक्टोबर महिन्यांत फिलिपनें एक निर्वाणीचा खलिता मार्गारेटकडे पाठवून तिला असें स्पष्ट कळविलें कीं, “ धार्मिक गुन्ह्यांची चौकशी करून गुन्हेगारांस कडक शासन देण्याचें काम आमच्या हुकुमाप्रमाणें व कायद्यास अनुसरून चाललेंच पाहिजे. त्यांत ढिलाई कामाची नाहीं. न्यायाधिशांनीं या कामीं बिलकुल दयामाया दाखवितां कामा नये. जो कोणी न्यायाधीश मनोदौर्बल्यामुळें, हलगर्जीपणामुळें अथवा धार्मिक औदासिन्यामुळें अशा प्रकारच्या गुन्हेगारास सोडील अथवा त्यास मायेनें वागवील त्यास तावडतोब कामावरून दूर करून त्याच्या जागीं अधिक योग्य माणसाची नेमणूक करण्यांत येईल. तसेंच, स्टेटस जनरलच्या बैठकी नियमितपणें भरविणें, स्थानिक अंमलबजावणीच्या खात्यांत परकीयांची नेमणूक न करणें व धार्मिक पाखंडाचा बंदोबस्त करण्याप्रीत्यर्थ काढलेलीं फर्मानें सौम्य करणें ह्या ज्या वुइल्यमादि सरदारांच्या

† ह्या संघाच्या पुढाऱ्यांनीं लोकांस चिथावणारीं पत्रकें प्रसिद्ध करून फिलिपच्या विरुद्ध बंड करण्याचाही पर्यायानें उपदेश करण्याचें आरंभिलें होतें व त्याबद्दल वुइल्यमनें लुईची एकदां चांगली कानउघाडणी केली होती.

मागण्या, त्या मान्य करणें बिलकुल शक्य नाहीं असेंही त्यानें वरील खलित्यांत लिहिलें होतें. फिलीप या वेळपर्यंत दुटप्पीपणानें वागत होता व वुइल्यमची त्याच्याविरुद्ध उघडपणें शस्त्र उचलण्याची तयारी होईपर्यंत त्याचें तें वर्तन त्याच्या पथ्यावर पडण्याजोगें होतें कारण त्यामुळें त्यासही अधिकारावर राहून राजनिष्ठेचा साक्षात् भंग न होऊं देतां फिलीपबरोबर दोन हात करण्याची तयारी गुप्तपणें करतां येण्याजोगी होती परंतु फिलिपच्या वरील निर्वाणीचा खलिता आल्यानंतर त्यास संमति देऊन त्याची अंमलबजावणी करण्यास तयार झाल्याखेरीज त्यास अधिकारावर राहणें शक्य नव्हतें. आज नाहीं उद्यां फिलिपला आपण त्याचें धोरण बदलवयाला लावूं अशा आशेनें लोक आजपर्यंत चालू असलेला धर्मच्छल सहन करीत होते व वुइल्यमादि वरिष्ठ प्रतीचे सरदारही त्याच प्रयत्नांत असल्यामुळें त्यांचें थोडेंबहुत तरी ते ऐकत होते. परंतु वरील खलित्यामुळें त्यांची सर्वस्वी निराशा झाल्याकारणानें त्या खलित्याची अंमलबजावणी करण्याचें वुइल्यमादि प्रमुख सरदारांनीं कबूल केल्यास जनतेवरील त्यांचें वजनही नष्ट होणार होतें. हा खलिता म्हणजे फिलिपच्या उन्मत्तपणाचा कळस होय. त्याच्या द्वारें त्यानें नेदर्लंडच्या जनतेचे स्वातंत्र्याचेच केवळ नव्हे तर त्यांच्या माणुसकीचेही धिंडवडे करून त्यांस राक्षसी वृत्ति धारण करण्यास जणू काय आव्हानच केलें, असें म्हटल्यास अतिशयोक्ति होणार नाहीं ! त्याचें तें आव्हान त्यांनीं मोठ्या मर्दुमकीनें कसें स्वीकारलें हें पुढील कथाभागावरून कळून येईल.

फिलिपच्या उपरोक्त खलित्यांतील हुकूम व प्रचलित लोकमत यांचा मेळ घालणें शक्य नाहीं असें दिसून आल्यावरून वुइल्यमनें इ. स. १५६६ च्या जानेवारी महिन्यांत मॉर्गरेटला एक पत्र लिहून त्यांत हल्लींच्या परिस्थितींत फिलीपचे वरील हुकूम अंमलांत आणणें कसें शक्य नाहीं हें दाखवून देऊन ते अंमलांत आणण्याचा तिचा निश्चय असल्यास आपणास गव्हर्नर, स्टेटकौन्सिलर वगैरे सर्व अधिकाराच्या जागांचा राजिनामा देणें भाग पडेल असें कळविलें. त्यानें हें पत्र लिहिल्यानंतर, त्याच्या बरोबरीचे दुसरे सरदार व गव्हर्नर मॉंतिग्ने, बर्घेम, मॅन्सफिल्ड यांनीं आपापल्या प्रांतांत फिलिपच्या सदर हुकमाची अंमलबजावणी करण्याचें नाकारलें ! तसेंच सामान्य लोक व दुय्यम प्रतीचे तरुण सरदार यांनींही त्याचा निषेध करणारीं पत्रकें काढून तीं जाहिर केलीं. ठिकठिकाणीं सभा भरून त्या

संबंधानें तीव्र निषेध व्यक्त करण्यांत येऊं लागला ! मागें उल्लेखिलेल्या लुईच्या संघानें तर ' कॉंप्रमाइज ' या नांवाचा एक जाहिरनामा काढून त्यांत तेथील अधिकारीवर्गावर पुढीलप्रमाणें उघड उघड आरोप केले.

" सर्वांस जाहिर होण्यास्तव कळविण्यांत येतें कीं, परकीय लोकांच्या टोळीनें येथील राज्याधिकार बळकाविले असून ह्या देशाच्या हिताहिताचा विचार न करितां ते त्यांची मन मानेल तशी अंमलबजावणी करीत आहेत. XXX ह्या लोकांनीं खोट्यानाट्या गोष्टी सांगून व प्रजेच्या हेतूसंबंधानें राजाच्या मनांत गैरसमज उत्पन्न करून त्याजकडून धर्मसंबंधी जुलमी कायद्यांची अंमलबजावणी करण्याबद्दल सक्तीचे हुकूम आणविले आहेत. ते हुकूम मानवी व परमेश्वरी कायद्याविरुद्ध असून त्यायोगानें अमानुष व भयंकर रानटीपणाचीं कृत्यें करण्यास उत्तेजन मिळणार आहे. तसें झाल्यास ह्या देशांतील सुखस्वास्थ्याची राखरांगोळी होऊन येथें सर्वत्र जुलमाचें व अत्याचाराचें साम्राज्य माजेल. त्यायोगानें आमच्या देशाच्या वैभवाची व मानप्रतिष्ठेची भयंकर हानी होऊन तो उजाड होण्याच्याही पंथास लागेल. ह्या ढोंगी अधिकाऱ्यांच्या वर्तनानें येथील जुने कायदे, लोकांचे नैसर्गिक व सनदशीर हक्क, आणि येथील समाजव्यवस्था हीं रसातळास जातील या करितां लोकांनीं वेळींच सावध होऊन ह्या गोष्टीचा प्रतिकार करण्याची तयारी करावी. वगैरे. " ह्या जाहिरनाम्यावर सरदार व सामान्य लोक मिळून दोन हजार सह्या होत्या. हा जाहिरनामा काढण्यांत वुइल्यमचें अंग नव्हतें व त्यास तो फारसा पसंतही नव्हता. परंतु तो निघाल्यापासून ह्या संघाच्या पुढाऱ्यांशीं तो गुप्त रीतीनें खलबतें करून त्यांच्या चळवळीस योग्य वळण व अप्रत्यक्ष प्रोत्साहन देऊं लागला असें दिसून येतें. ह्या संघानें पुढें बरीच महत्त्वाची हालचाल केली असल्याकारणानें त्याच्या पुढाऱ्यांची येथें वाचकांस थोडी ओळख करून देणें जरूर आहे. लुई ऑफ नासू ( वुइल्यमचा भाऊ ) हा त्याचा मुख्य होता. तो यावेळीं २९ वर्षांचा तरुण असून मोठा धीट, शूर उत्साही, उदार मनाचा, दिलदार परंतु कांहींसा हट्टी, विकारवश, व उतावळा उर्फ उच्छृंखल होता. तो प्रॉटेस्टंट पंथाचा अनुयायी असून आपल्या भावाप्रमाणेंच इतर धर्ममतासंबंधानें सहिष्णुत्व बाळगणारा होता. दुसरा पुढारी ब्रेडरोड हा होता. तो अतिशय दारुबाज, परंतु मोठा उमद्या पण उथळ स्वभावाचा, निष्कपटी, धार्मिक व उत्साही भावनावश व आनंदी असा होता. तो मोठा

वक्ता, विनोदी व नकल्या असून खोंचदार मर्मभेदक शब्दप्रयोग करण्यांत त्याचा अगदीं हातखंडा असे. त्याचा लुईवर पूर्ण भरंवसा असून त्याची कोणती पाळण्यास तो नेहमीं तत्पर असे. तिसरा पुढारी सेंट अल्डेगाँड हा मोठा लेखक असून धर्म व साहित्य या विषयांत प्रवीण होता. तो स्वतः शूर सेनानी व सामान्य मुत्सद्दी होता. तो कॅल्व्हानिस्ट पंथाचा अनुयायी असून कॅथोलिकांचा कट्टा द्वेष्टा होता. तो करारी, कर्तव्यदक्ष व कतबगारही होता. पुढे वुइल्यम दि सायलेंट यास त्याचा वेळोवेळीं पुष्कळ उपयोग झालेला आहे. निकोलस डी हेम्स ( हा मोठा धाडसी व क्रूर होता. ), सेंट अल्डेगाँडचा भाऊ थोलुज, रॉवर्ट ड ला मार्क वगैरे आणखी कांहीं वरील संघाचे पुढारी होते. हे सर्व लोक मोठे उत्साही व आवेशानें काम करणारे होते; परंतु राजकारणांत ते मुरलेले नसल्यानें त्यांच्या हातून पुष्कळ अप्रबुद्ध व अप्रयोजक गोष्टी घडून येत आणि त्यायोगानें वुइल्यमच्या कार्यक्रमास व्यत्यय येऊन पुष्कळदां त्याची मोठी नाजूक स्थिति होई. पण मोठमोठ्या राष्ट्रीय घडामोडी चालू असतांना हें असें व्हावयाचेंच, असें समजून वुइल्यम आपल्या कार्यापुरता त्यांचा उपयोग करून घेत असे. ह्या संघाच्या पुढाऱ्यांच्या व सभासदांच्या मनांत फिलिपच्या जुलमाचा प्रतिकार करण्याची भावना किती जरी जाज्वल्य असली व त्याकरितां ते आपल्या जिवावर उदार होण्यास जरी तयार झाले, तरी फिलिपच्या शिस्तीच्या लष्करी सामर्थ्यापुढें त्यांच्या भावनात्मक आवेशाचा टिकाव लागण्याचा संभव नव्हता. या दृष्टीनें पाहातां त्यांची चळवळ कांहीं अंशीं आत्मघातक व कार्यनाश करणारीच दिसत होती. सबब योग्य वेळ येईपर्यंत, ती शक्य तितकी कह्यांत ठेवण्याच्या हेतूनें वुइल्यमनें उपरोक्त पुढाऱ्यांशीं गुप्तपणें दळणवळण ठेवून त्यांस सल्लामसलत देण्यास आरंभ केला. या पुढाऱ्यांची एक छोटीशी परिषद त्यानें ब्रेडा येथें आपल्या राजवाड्यांत बोलावली व हॉर्न, एग्मॉंट, मॉंतिमे, हुगस्ट्रेटेन बर्ग्हेयाम, मेघाम, वगैरे आपल्या स्नेह्यांसही त्यांच्याशीं वाटाघाट करण्यास बोलावलें. लुईच्या लोकांनीं एकदम बंड करण्याची सूचना पुढें आणली; परंतु वुइल्यम व त्याचे स्नेही यांनीं तिचें वैय्यर्थ्य दाखवून देऊन ती फेटाळून लावली. पुढे उभयपक्षांत आणखी वाटाघाट झाल्यावर शेवटीं तूर्त लुईच्या संघानें मार्गारेटकडे एक शिष्टमंडळ पाठवून त्याच्यामार्फत एक विनंती-अर्ज तिला सादर करावा असें ठरलें. एग्मॉंट व मेघॅम यांनीं या गोष्टीसही विरोध केला; परंतु तो कोणी जुमानला नाहीं. ह्या शिष्टमंडळानें

अदवीनें व निःशस्त्रपणें येऊन मार्गरेटची गांठ घ्यावी असें वुइल्यमनें लुईस व त्याच्या अनुयायांस बजावलें. ह्या परिषदेची हकीकत मेर्घमनें भर कौन्सिलांत मार्गरेटच्या कानावर घालून लुईच्या संघाच्या शिष्टमंडळाची भेट न घेण्याची तिला सल्ला दिली. एग्मॉटनेंही त्याच्या म्हणण्यास दुजोरा दिला. धर्मविषयक कायद्याची अंमलबजावणी सौम्यपणानें केली पाहिजे असें एगमॉटचें मत होतें; परंतु ती गोष्ट बंडखोर लोकांच्या धाकामुळें केली असें कोणास वाटतां कामा नये, म्हणून रीजंटनें त्यांची गांठ न घेतां स्वयंप्रेरणेनेंच तसें करावें, असें त्यानें तिला सुचविलें. रीजंट ही फिलिपच्या हुकमाची बंदी असल्यामुळें तिला स्वतःच्या इच्छेनें त्यांत ढवळाढवळ करण्याचा अधिकार नव्हता. अशा स्थितींत ह्या शिष्टमंडळाशीं कोणत्या रितीनें वागावें याची तिला मोठी पंचाईत पडली. त्याची गांठ न घेतली आणि त्यामुळें जर कदाचित् दंगाधोपा झाला अथवा बंडास सुरुवात झाली तर कसें, गांठ घेतली तर त्यास काय उत्तर द्यावें, फिलीप त्याबद्दल काय म्हणेल, असे अनेक प्रश्न तिच्या मनांत येऊन ती गोंधळून गेली; व त्यांच्या भेटीचा प्रसंग टाळण्याकरितां राजधानी सोडून एखाद्या निवांत स्थळीं जाऊन बसण्यास तयार झाली! पण वुइल्यमनें तिचा तो बेत तत्काळ मोडून काढला व शिष्टमंडळाची गांठ घेतल्यानें कोणतेंही संकट येण्याचा संभव नाहीं, आल्यास त्याचें आपण निवारण करूं, असें त्यानें तिला आश्वासन दिलें. तेव्हां तिनें पळून जाण्याचा विचार सोडून दिला व शिष्टमंडळास मुलाखत देण्याचें कबूल केलें. याप्रमाणें तिचा बेत ठरल्यानंतर वुइल्यमनें आपल्या भावास पुन्हा सूचना पाठविली कीं, "तुम्ही सशस्त्र येणार अशा प्रकारच्या अफवा पसरलेल्या आहेत तरी तशा प्रकारचा संशय घेण्यास बिलकूल थारा देऊं नका. तुम्हांपैकीं कोणी उच्छृंखल माणूस कदाचित् लपवून छपवून शस्त्र आणील आणि तसें झाल्यास फार वाईट परिणाम होईल; याकरितां सावधगिरी ठेवा." लुईच्या मंडळींनीं ही सूचना अक्षरशः पाळली. त्यांच्यापैकीं सुमारें ३०० लोक आपला अर्ज घेऊन तारीख २ एप्रिल (१५६६) रोजीं ब्रुसेल्स येथें येऊन दाखल झाले. ता. ३ रोजीं वुइल्यम, हॉर्न व मॅन्सफील्ड यांच्याशीं त्यांची मुलाखत झाली व ता. ५ रोजीं ते मार्गरेटला भेटण्याकरितां तिच्या राजवाड्यांतील बाहेरच्या आवारांत येऊन दाखल झाले. त्यावेळीं मार्गरेट स्टेट कौन्सिलच्या सभासदांसह कौन्सिलचेंबरमध्यें त्यांची वाटच पहात बसली होती. तथापि ते आल्याची वार्ता कळतांच तिचें तोंड गोरेंमोरें झालें!

पण प्रसंगाकडे लक्ष देऊन तिनें आपले मनोविकार दाबून धरिले आणि अर्जदारांस आपणासमोर येण्याची परवानगी दिली. तेव्हां बाहेर असलेले ३०० लोक व्यवस्थित रीतीनें व शांतपणें आंत येऊन मार्गरेटला मुजरा करून उभे राहिले. त्यांचा पुढारी ब्रेडरोड हा मॉर्गरेटच्या सिंहासनासमोर आला व त्यानें शिष्टमंडळाच्या येण्याचें प्रयोजन काय, हें थोडक्यांत सांगितलें. त्याच्या हातांत मार्गरेटला सादर करावयाच्या अर्जाची छापील प्रत होतीच. त्याचें बोलणें संपल्यावर तो अर्ज वाचून दाखविण्याची मार्गरेटनें त्यास आज्ञा केली, तेव्हां तो त्यानें मोठ्या गंभीरपणें वाचून दाखविला. त्यावेळीं चहूंकडे पूर्ण स्तब्धता असून सर्वांचें लक्ष त्या अर्जांतील मजकुराकडे होतें. त्याचें वाचन चालू असतां मार्गरेटच्या मनाची वारंवार चलबिचल होऊन तिच्या चेहऱ्यावर भीति, खेद, संताप वगैरे निरनिराळ्या मनोविकारांची छटा उमटत होती! त्यांतील भाषा अदबीची व सौम्य परंतु स्पष्टवक्तेपणास साजेशी होती व त्यांत प्रचलित परिस्थितीचें वर्णन करून लोकमत शांत करण्याकरितां ईस्टेट्स जनरलची बैठक भरविण्याची, धार्मिक गुन्ह्यांची चौकशी करणाऱ्या खास न्यायमंडळांचें काम तहकूब करण्याची व लोकांना धार्मिक स्वातंत्र्य देऊन त्यांच्या पूर्वापारपासून चालत आलेल्या राजकीय हक्कांचें संरक्षण करण्याबद्दल राजास शिफारस करण्याची, अशा मुख्य मागण्या केल्या होत्या. वुइल्यमनें स्टेट कौन्सिलच्या बैठकींत अनेक वेळां या किंवा अशाच प्रकारच्या गोष्टी करण्याबद्दल सूचना केल्या होत्या. त्याचीच ह्या शिष्टमंडळाच्या अर्जांत पुनरुक्ति झालेली पाहून मार्गरेट व वुइल्यम यांच्या मनांत कोणते विचार उद्भवले असतील बरें? आपण आज सत्ताधाऱ्यांचे सल्लागार आहों, परंतु आपली सल्ला त्यांनीं ऐकली नाहीं; अथवा त्यांना पटली नाहीं, तर आपलें खरें स्थान सल्लागारमंडळापेक्षां शिष्टमंडळांतच आहे असें दिसून येणार नाहीं काय? आणि कर्मधर्मसंयोगानें तें स्थान—ती भूमिका—पत्करण्याची जर आपणास पाळी आली, तर पुढें केवढा मोठा झगडा आपणांस करावा लागेल व त्या झगडण्यास लागणारी तयारी होण्यापूर्वींच जर त्यांत आपणांस पडावें लागलें तर आपल्या देशाची किती दुर्दशा होईल, वगैरे विचारांचें त्याच्या मनांत काहूर माजून तो अंमळ गोंधळला. फिलिपचें लष्करी सामर्थ्य त्यास माहीत होतें. त्याच्यापुढें प्रस्तुत शिष्टमंडळामागें असणाऱ्या बेशिस्त व बाजारबुणग्यांच्या योग्यतेच्या हजारों किंबहुना लक्षावधी लोकांचा निभाव लागणें शक्य नाहीं असें त्यास वाटत होतें. हे लोक देशभक्ति व देशाभिमान या भावनांनीं भारलेले असून

देशोद्धाराकरितां प्राण खर्चण्यासहा तयार असले, तरी उत्तम शिस्त व उत्तमप्रकारची युद्धसामग्री यांचा वाण त्यांच्या नुसत्या वरील भावनांना भरून येण्याजोगी नव्हती. वरील भावनांचे प्रदर्शन, संभावित, संत, अथवा उदार तत्ववेत्ते यांचे ठायीं त्यांच्याविषयी कौतुक व सहानुभूति उत्पन्न करण्यास समर्थ होतें; परंतु फिलिपसारख्या कृष्णकारस्थानी, मदांध, स्वार्थी, परमतद्वेष्टया आणि सर्वंकष अशा सत्तेचा अभिलाष करणाऱ्या राजापुढे या भावनांचे काय तेज पडणार? दगडाला कधी पाझर फुटतो काय? फिलिपचे मन तर कठोरपणांत दगडालाही लाजविणारें होतें! त्याची खोड मोडण्यास शिष्टमंडळाचे अर्ज व त्यांचे बाजारबुणगें सैन्य हीं सर्वस्वी पंगु होतीं. त्यांना शिस्तीच्या सैन्याची व उत्तम प्रकारच्या रणसामुग्रीची जोड हवी होती. ती मिळविण्याविषयी वुइल्यमचे गुप्त प्रयत्न चालू होते; पण अद्याप त्यांत त्यास यश आलेलें नव्हतें. तें येइपर्यंत राजनिष्ठेचा बुरखा फेकून देऊं नये व त्याशीं विसंगत असें वर्तन उघडपणे करूं नये असा त्याचा बेत होता. पण तो सिद्धांस जाणें हें मार्गारेटच्या वर्तनावर-राजधोरणावर-अवलंबून होतें. वरील शिष्टमंडळाच्या अर्जांतील मागण्या एकून घेतल्यावर मार्गारेटच्या मनांत आलेले विचार वुइल्यमच्या वरील बेतास फारसे अनकूल नव्हते. ह्या मागण्यांच्या मुळाशीं वुइल्यम व त्याचे वजनदार स्नेही आहेत, निदान त्यांची त्यांविषयीं सहानुभूति तरी खास आहे असें तिच्या मनानें घेतलें. त्या मागण्या तिला पसंत होत्या असें नव्हे, परंतु जर त्या धुडकावून लावल्या तर वुइल्यमादि मंडळी आतांच आपणास सोडून जातील आणि मग शांतता राखण्याचा बोजा आपल्या एकटयावरच पडून तो आपणास असह्य होईल असें तिला वाटत असल्यामुळे, त्या धुडकावून लावण्याचे धैर्य तिला होइना. बरें; त्या मान्य कराव्यात तर फिलिपची त्यांसंबंधानें करडी नजर असल्याचें त्याच्या गुप्त पत्रांवरून तिला कळून चुकलें होतें. त्याला नाराज करणें तिला शक्य नव्हतें. वुइल्यमादि सरदारांवर मनांतल्या मनांत ती जळफळत होती; पण फिलिपचें नवें सैन्य अद्याप तिच्या मदतीस येऊन पोंचलें नसल्यामुळे तो राग मनांतल्या मनांत गिळून तूर्त त्यांच्याच सल्ल्यानें राज्यशकट हांकणे तिला भाग होतें. तेव्हां वरील शिष्टमंडळास रितीप्रमाणें रजा दिल्यावर तिनें आपल्या सल्लागारमंडळाकडे वळून 'ह्या बंडखोर लोकांना काय उत्तर द्यावयाचें?' असा अंमळ रागांतच प्रश्न केला. तो ऐकतांच, 'ते बंडखोर नाहीत; त्यांचे वर्तन पूर्णपणें राजनिष्ठपणाचें आहे; त्यांना अर्जांत प्रदर्शित

नं.

केलेले विचार व मतें आज देशांत सर्वत्र प्रचलित असून त्यांच्या मागण्यांस बहुतेक जनतेचा पाठिंबा आहे; त्यांनीं त्या मागतांना शिष्टाचार व शिस्त यांस सोडून वर्तन केलेलें नाहीं; अर्थात् त्यांचा योग्य विचार करून त्यांस कांहींतरी समाधानकारक उत्तर देणें हेंच योग्य आहे.' असें वुइल्यमनें तिला स्पष्टपणें कळविलें. हॉर्न, मॅन्सफील्ड हुग्स्ट्रॅटेन वगैरे मंडळींनीं त्याच्या म्हणण्यास पुष्टी दिली. परंतु एग्मॉटला, सरकारने लोकांच्या धाकानें माघार घेणें अथवा सौम्यपणा धारण करणें पसंत नव्हतें. लोकांच्या विनंतीस न जुमानतां सरकारनें आपण होऊनच तें धोरण स्वीकारून जाहीर करावें असें त्याचें मत पडलें. मेघॅम, व अरशॉट यांनीं शिष्टमंडळाच्या लोकांस हद्दपार करण्याचा सल्ला दिली. बर्लेमॉंट म्हणाला, "माझें ऐकावयाचें असेल तर ह्या भिकाऱ्यांना तावडतोब येथून (शहरांतून) संगिनींच्या जोरावर हांकून द्या व त्यांचा अर्ज कचऱ्याच्या टोपलींत टाकून द्या." या सर्वांवर ताण करून व्हिजलियस यानें त्यांस राजवाड्यांत बोलावून गोळ्या घालण्याची सल्ला दिली! परंतु वुइल्यमनें त्याचा आवेशानें निषेध केला व असल्या भलत्याच गोष्टीच्या भरीं पडल्यास देशांत शांतता राखण्याची जबाबदारी आपण आपल्या शिरावर घेणार नाहीं असें साफ बजावलें. अखेरीस बरीच भवति न भवति होऊन अर्जदारांस सौम्यपणाचें उत्तर देण्याचा ठराव झाला व त्याप्रमाणें दुसरे दिवशीं ब्रेडरोड व त्याचे कांहीं साथिदार यांस मॉर्गरेटनें "तुमच्या अर्जाचा सहानुभूतिपूर्वक विचार व्हावा अशी शिफारस करून तो फिलिपकडे रवाना करण्यांत येईल. त्यांतील मागण्या त्याच्या संमतिवांचून मान्य करण्याचा रीजंटला अधिकार नाहीं तथापि त्याचें उत्तर येईपर्यंत धर्मसंबंधीं कायद्यांची अंमलबजावणी सौम्यपणें करण्याचे हुकूम देण्यांत येतील" अशा अर्थाचें लेखी उत्तर दिलें. हें उत्तर मिळतांच आलेली मंडळी रीतीप्रमाणें रीजंटचे आभार मानून आनंदानें निघून गेली. त्या दिवशीं रात्रीं तेथील (ब्रुसेल्स) एका सरदाराच्या घरीं त्यांनीं एक मोठा मेजवानीचा समारंभ केला व त्यांत बर्लेमॉंटनें त्यांना तिरस्कारबुद्धीनें दिलेल्या 'भिकारी§' ह्या संज्ञेचा जयजयकार करून सर्वांनीं तिला किताब समजून ती आपल्या समुदायास स्वेच्छेनें लावून घेण्याचा ठराव केला! राजाच्या नांवाबरोबरच त्या किताबाच्या नांवानेंही मद्यप्राशन (टोस्ट) करून

§ कौन्सिलांतील त्याचे एतद्विषयक उद्गार खासगी रीतीनें ह्या लोकांस कळले होते.

तो ओळखण्याचीं कांहीं विशिष्ट चिन्हें * व पदकें धारण करून, नष्ट झालेलें राष्ट्रीय स्वातंत्र्य परत मिळविण्याकरितां इमानें इतबारें झटण्याचा शपथविधी त्यांनीं तेथें उरकून घेतला. त्यावेळीं दारूनें बेफ़ाम होऊन, हवे तसें बरळून त्यांनीं मोठा गोंधळ माजवून टाकला. हे लोक असला कांहीं तरी आचरट प्रकार करतील, अशी वुइल्यमला शंका होतीच. म्हणून तो रात्रींचें जेवण झाल्यावर एग्मॉंट व हॉर्न यांच्यासह तेथें आला. त्यांना पाहतांच तेथील मंडळींनीं त्यांचा जयजयकार करून 'राजा आणि भिकारी यांच्याप्रीत्यर्थ दारू प्या' अशी ओरड सुरू केली. ते दारूच्या निशेंत होते; परंतु वुइल्यमनें थोडेंसें चापतांच ताळ्यावर ऊन शुद्धीवर बोलूं लागले. तेव्हां त्यांना नेमस्तपणें व बेतानें वागण्याची व लवकर आपापल्या घरीं जाण्याची सूचना देऊन आणि त्यांच्या जमावांत असलेल्या हुग्स्ट्रेटेन नामक आपल्या कौन्सिलदार संवगड्यास त्या रात्रीं भरणाऱ्या कौन्सिलच्या बैठकीस हजर राहण्यास्तव बरोबर घेऊन ते निघून गेले. त्यानंतर दोनतीन दिवसांनीं हे 'भिकारी' लोक ब्रुसेल्सहून अँटवर्पला निघून गेले. जातांना त्यांनीं एक मोठी मिरवणूक काढून त्यांत उच्छृंखलपणें ते हवे तसे वरळलेच! त्यांचें हें कृत्य देशभक्तीच्या उत्कटत्वाचें आणि उत्साहाचें लक्षण होतें हें खरें; परंतु असल्या कृत्यांनीं अवेळींच म्हणजे सैन्य व रणसामुग्री यांची जुळवाजुळव होण्यापूर्वींच फिलिपशीं उघडपणें सामना करण्याचा प्रसंग उद्भवण्याची वुइल्यमला भीति वाटत असल्यामुळें असलीं कृत्यें त्यास नापसंत असत व तीं घडून आल्यास त्याचें मन अस्वस्थ होत असे. असो. इ० स० १५६६ च्या उन्हाळ्यांत धर्मसुधारकांची चळवळ नेदर्लंडांतील सर्व प्रांतांत फारच जोरावली. प्रत्येक शहरांत व खेड्यापाड्यांत त्या लोकांचीं धार्मिक प्रवचनें शहराबाहेर उघड्या मैदानांत अथवा शेतांत उघडपणें होऊं लागलीं व त्यांस हजारों लोकांचा जमाव जमूं लागला. अँटवर्प, ॲमस्टरडॅम, युत्रेक्ट वगैरे शहरांत अधिकाऱ्यांनीं या लोकांच्या प्रवचनास बंदी करण्याचे पुष्कळ प्रयत्न केले; परंतु त्यांत त्यास फारसें यश आलें नाहीं. ह्या शहरांच्या अंतर्भागांत दंडुक्याच्या जोरावर ते त्यांचे जमाव हुसकून लावूं शकले; परंतु त्यांच्या तटबंदीच्या

* एक कातड्याची झोळी, एक लाकडी कटोरा–भिक्षापात्र–हीं तीं विशिष्ट चिन्हें होतीं. पदकें हीं चमड्याचीं केलेलीं असून त्यावर long live the beggers (भिकारी दीर्घायु होवोत!) अशीं अक्षरें खोदलेलीं होतीं.

# ४–राजनिष्ठेची ओढाताण.

२८६२५१

बाहेर व आसपास त्यांचें कांहीं चाललें नाहीं. सरकारच्या परवानगीची वाट न पाहातां व त्यांच्या दंडुकेशाहीस न जुमानतां जेव्हां शहरोंशहरीं व गांवोंगांवीं प्रोटेस्टंट, कॅल्व्हानिस्ट व अनाबाप्टिस्ट सुद्धां उघड उघड आपापल्या मतांचा प्रसार करूं लागले, तेव्हां एक तर त्या सर्वांना धरून जाळून टाकणें अथवा त्यांना आपल्या मतांचा प्रसार करूं देणें यांपैकीं कोणता तरी मार्ग स्वीकारणें सरकारास भाग होतें. पहिला मार्ग स्वीकारण्याचें धैर्य व सामर्थ्य तूर्त रीजंटपाशीं नव्हतें व फिलिपच्या भयामुळें दुसरा मार्गही स्वीकारण्यास तिचें मन कचरत होतें. परंतु सरकारची कांहीं तरी इभ्रत राखण्यास्तव तिनें नवीन परिस्थितीचा विचार करून ( Act of moderation ) धर्मसंबंधीं सवलतीच्या कायद्याचा एक मसुदा तयार केला व त्यास फिलिपची संमति मिळवून आणण्यास्तव मॉंतिम्रे आणि बर्घेम यांस कौन्सिलच्या अनुमतीनें स्पेनला पाठविलें. एग्मॉंटचीही या कामीं तिनें नेमणूक केली होती; परंतु त्यानें जाण्याचें नाकारलें आणि बर्घेम व मॉंतिम्रे यांस मॉर्गरेट व फिलिप यांच्या गुप्त कृष्णकारस्थानांची जर माहिती असती तर तेही गेले नसते ! हेच लोक नेदर्लंडांतील असंतोषाचे आणि अस्वस्थतेचे प्रमुख पुरस्कर्ते आहेत तेव्हां त्यांची चांगली खोड मोडा असें तिनें गुप्तपणें फिलिपला कळवून ठेवलें ! त्याचा परिणाम असा झाला कीं, हे उमदे सरदार एकदां जे स्पेनच्या हद्दींत गेले ते गेलेच ! त्यांना पुन्हा आपल्या मातृभूमीचें दर्शन झालें नाहीं ! ! त्यांचा शेवट किती भयानक व करुणास्पद रीतीनें झाला हें पुढें एखाद्या प्रकरणांत सांगावें लागेलच, तेव्हां तूर्त त्यांना आनंदी वृत्तींत स्पेनची सफर करण्यास सोडून देऊन आपण पुढील कथाभागाकडे वळूं. उपरोक्त ( Act of moderation सौम्यपणाचा-सवलतींचा-कायदा ) कायद्याला फिलिपची संमति मिळणार नाहीं आणि मिळाली तरी त्यांत कांहीं हंशील नाहीं; कारण त्या कायद्यांत पोकळ शब्दावडंबरच फार असून लोकांची खरी तक्रार मिटविण्यास त्याचा फारसा उपयोग होण्याजोगा नाहीं हें वुइल्यम जाणून होता. तसेंच फिलिपकडून जरी त्यास गौरवाचीं व सत्काराचीं पत्रें येत होतीं तरी गुप्तपणें तो त्यास दगा करण्याच्या तयारींत असल्याचें वृत्तही त्यास माहीत होतें; परंतु त्याची अद्याप लढाईचें शिंग फुंकण्याची तयारी नसल्यामुळें तो कोणीकडून तरी वेळ मारून नेत होता. मॉर्गरेटही अलीकडे मनांतून त्याचा द्वेष करूं लागली होती; मात्र वरून ती त्याच्याशीं फार अदबीनें व किंचित् प्रेमानेंही वागत असे. तिच्या आज्ञेवरून तो

अँटपर्व शहरांतील बखेडा मोडण्यास्तव तेथें गेला. त्या ठिकाणीं लुईच्या संघाचे "भिकारी" हा किताब धारण करणारे लोक तळ देऊन बसले होते वुइल्यम येतांच त्याच्या सन्मानार्थ त्यांनीं बंदुकांची फेर झाडून सलामी दिली व "भिकारी चिरायु होवोत, आपण आमचे व्हायकाऊंट व संरक्षक आहां" अशा अर्थाच्या गर्जना त्यांनीं सुरू केल्या! वुइल्यमनें त्याबद्दल नापसंती व्यक्त करून त्यांना असे बेहोष न होण्याबद्दल ताकीद केली आणि तेथील धर्मसुधारकांनीं आपलीं प्रवचनें शहराच्या बाहेर चालू ठेवावींत, आंत चालवूं नयेत असा हुकूम केला. परंतु हा हुकूम अक्षरशः पाळला जाण्यासारखी लोकस्थिति आतां राहिली नव्हती! तो ऐकतांच त्याचा भाऊ लुई यानें आपल्या संघांतील १५०० शें लोकांचा एक मजलस भरविली आणि त्यांत आपल्या मदतीस चार हजार जर्मन घोडेस्वार व ४० पायदळ पलटणी जमविण्याचा ठराव पास करून आपल्या मागण्या मॉर्गरेटपुढें मांडण्यास्तव त्यांनीं एक अर्जाचा मसुदा तयार करून तो वुइल्यमच्या स्वाधीन केला. वुइल्यमनें त्यांच्या मागण्यांचें स्वरूप त्यांचेचकडून अंमळ सौम्य करून घेतलं व त्यासंबंधानें मॉर्गरेटजवळ मध्यस्थी करण्याचें कबूल केलें. संघांतील निवडक लोकांच्या मदतीनें राज्यकारभार चालविण्याची मागणी मॉर्गरेटकडून मान्य होणें शक्य नव्हतें व ती सोडण्यास संघवाले तयार नसल्यामुळें उभय-पक्षांत तडजोड करण्याचें श्रेय वुइल्यमला संपादितां आलें नाहीं. संघवाल्यांशीं इतक्या सौम्य रीतीनें वागल्याबद्दल मॉर्गरेट रागावली व तिनें वुइल्यमला अँटवर्प सोडून तांबडतोब ब्रुसेल्स येथें परत येण्याचा हुकूम केला. तिचें हें कृत्य अविचाराचें होतें, लोकमताची तिला बरोबर अटकळ नव्हती. वुइल्यमच्या वैयक्तिक वजनामुळें तो असेपर्यंत अँटवर्पच्या शांततेचा भंग झाला नाहीं; पण त्याची त्या शहराकडे पाठ वळतांच तेथे क्षुल्लक कारणावरून दंगाधोपा सुरू झाला व कॅथोलिकपंथीय देवळांवर हल्ला करून दंगेखोरांनीं तेथील मूर्ति व इतर मौल्य-वान् चिजा यांचा विध्वंस केला! अँटवर्प शहरीं घडलेल्या ह्या प्रकाराची बातमी हां हां म्हणतां इतर प्रांतांतील शहरांत पसरली; तेव्हां तेथेंही असाच प्रकार सुरू झाला! फ्लुशिंग, मिडलबर्ग, मेक्लीन, घेंट, ब्रेडा वगैरे मोठ्या व त्यांच्या खालोखालच्या आणखी कित्येक शहरांतून कॅथोलिकांचीं देवळें उध्वस्त करण्यांत आलीं व त्यांतील चीजवस्त लोकांनीं लुटलीं! एकट्या फ्लँडर्स प्रांतांत सुमारें ४०० देवळांची नासधूस झाली, यावरून सर्व नेदर्लंडांत झालेल्या नुकसानीची कांहींशी

कल्पना करतां येईल! ह्या लुटालुटीची व दंग्याची वार्ता कानीं येतांच मॉर्गरेट घाबरली! बहुतेक सर्व शहरांतून हे दंगे झाल्यामुळें ब्रुसेल्समध्येंही ते कशावरून होणार नाहींत, आणि झालेच तर आपल्या प्राणावर येऊन बेतल्यास काय करावें, असा विचार मनांत आणून तिनें मॉन्स शहरीं पळून जाण्याचा बेत केला. पण इतक्यांत, व्हिज्लियसनें, धावऱ्या धावऱ्या येऊन शहरच्या लोकांनीं तिला पळून जातां येऊं नये म्हणून शहराचे दरवाजे बंद केल्याची बातमी तिला कळविली! तेव्हां नाइलाज होऊन तिनें ह्या परिस्थितींतून बाहेर निघण्याची तोड काढण्याकरितां स्टेट कौन्सिलची बैठक भरविली. ह्या कौन्सिलचे लोकप्रिय सभासद वुइल्यम, हॉर्न, हुग्स्ट्रॅटन, एग्मॉंट यांस मूर्ती फोडणें व लुटालूट करणें ह्या समाजविघातक गोष्टी मुळींच पसंत नव्हत्या. वुइल्यमचा भाऊ लुई व त्याचे प्रमुख साथिदार यांसही त्या पसंत नव्हत्या. ह्या गोष्टी कनिष्ठ दर्जाच्या (Mob) लोकांनीं केलेल्या असून त्यांचें समर्थन करण्यास कोणीही शहाणा माणूस तयार होण्याचा संभव नव्हता. अशा स्थितींत मॉर्गरेटनें भीतिवश होऊन पळून न जातां जनतेचीं खरीं गाऱ्हाणीं दूर करण्याचा यत्न करावा म्हणजे दंगेखोरांचें दमन करण्याचें काम सुलभ होऊन त्यांना कडक शासन करतां येईल, असें ह्या तिघांनीं तिला सांगून त्याप्रमाणें वागल्यास दंगेखोरांस शासन करण्याचें कार्यही त्यानीं आपल्या शिरावर घेण्याचें कबूल केलें. फिलिपच्या जुलमी सत्तेविरुद्ध शस्त्र उचलण्याचा जरी वुइल्यमचा निश्चय ठरल्यासारखा असला, तरी मूर्तिभंग व देवळें फोडणें, असले अत्याचार त्यास पसंत नव्हते. प्रॉटेस्टंट, कॅल्व्हानिस्ट वगैरे पंथांच्या लोकांना धर्मस्वातंत्र्य असावें असें त्याचें मत होतें; परंतु त्यांनीं इतरधर्मीय लोकाच्या मनोवृत्ती दुखवाव्यात व असलीं सूडाचीं कृत्यें करावींत हें त्यांस बिलकूल पसंत नव्हतें. फिलिपच्या सत्तेच्या ऐवजीं जरी त्याची सत्ता असती तरी असले समाजविघातक प्रकार त्यानें चालू दिले नसते. त्याची सत्ता अद्याप स्थापन झालेली नव्हती व त्याप्रीत्यर्थ सुरू करावयाच्या झगड्यास प्रारंभ करण्याचीही अजून त्याची तयारी नव्हती. तेव्हां आहे त्या कायदेशीर सत्तेचाच आश्रय करून अत्याचाराचें बंड मोडावें असें त्यानें ठरविलें. मात्र तसें करण्यापूर्वी लोकांच्या मनांत आपल्या हेतूसंबंधानें विपर्यास येऊं नये म्हणून त्यांच्या बाजवी गाऱ्हाण्यांची दाद घेण्याबद्दल त्यानें मॉर्गरेटला आग्रहपूर्वक सल्ला दिला. इतकेंच नव्हे तर ती दाद घेतल्यावांचून दंगेखोरांस शासन

करणें दुर्घट आहे असेंही त्यानें तिच्या नजरेस आणलें. तेव्हां मॉर्गरेटनें त्याचा भाऊ लुई याजबरोबर तांतडीनें पत्रव्यवहार करून ता. २५ आगस्ट इ. स. १५६६ रोजीं उभय पक्षांस संमत असलेला Accord (संमतिपत्र) नामक एक करारवजा खलिता प्रसिद्ध केला. त्याअन्वयें धर्मसुधारकांस आपापल्या मतानुरूप जाहिरपणें प्रार्थनाविधी करण्याची परवानगी मिळून, पूर्वी जेथें जेथें त्यांच्या मताच्या प्रार्थना चालू होत्या, तेथें त्या चालू ठेवण्याचें सरकारनें मान्य करून धर्मच्छलाचें सत्र बंद करण्याचें कबूल केलें; उलटपक्षीं लुईच्या संघानेंही देशांत शांतता राखण्याविषयीं सरकारला मदत करण्याचें व आपली चळवळ बंद ठेवण्याचें कबूल केलें. हें संमतिपत्र प्रसिद्ध झाल्यावर नेदर्लंडांत कांहीं काल सर्व ठिकाणीं आनंदीआनंद व आशा यांची लाट उसळली. परंतु वुइल्यम मात्र त्यास भाळला नाहीं. तो ह्या संमतिपत्राची खरी किंमत ओळखून होता. पण त्याला अद्याप बरेंच कालहरण करावयाचें असल्यानें त्यानें मौन धारण केलें होतें.

मॉँतिग्नि व बर्घेम हे मागें सांगितल्याप्रमाणें स्पेनला जाऊन पोंचल्यानंतर फिलिपनें त्यांचें म्हणणें ऐकून घेऊन प्रॉटेस्टंट लोकांस कांहीं सवलती देण्याचा हुकूम पाठविला; पण त्याच वेळेस तो हुकूम नाइलाज म्हणून आपण देत असून त्यांतील एक अक्षरही आपणास संमत नाहीं अशा अर्थाची त्यासंबंधानें मॅजिस्ट्रेट-पुढे खासगी रीतीनें नोंद करून ठेविली! हा हुकूम येण्यापूर्वीच कॅथोलिक देवळांचा उच्छेद होऊन मॉर्गरेटला वरीलप्रमाणें संमतिपत्र (Accord) जाहीर करावें लागलें. त्याची हकीकत फिलिपला कळली तर तो आपणांस काय म्हणेल, याविषयीं तिला मोठी चिंता उत्पन्न झाली होती. ती त्याच्या उपरोक्त हुकुमामुळें थोडीशी कमी झाली. तिनें ह्या सर्व प्रकाराची सविस्तर हकीकत त्यास कळविली व सदर्हु संमतिपत्र परिस्थितीच्या कांचामुळें आपण आपल्या मर्जीविरुद्ध जाहीर केलें असल्यामुळें, तें पाळण्याचा बोजा तुमच्यावर नाहीं, असें त्यास सुचवून ठेविलें. तसेंच एग्मॉँट, हॉर्न, व वुइल्यम हे तिघेही फिलिपचें राज्य उलथून पाडण्याचा उद्योग करीत आहेत असेंही तिनें त्यास गुप्त पत्रद्वारा कळविलें. हें पत्र वाचल्यावर तो अतिशय संतप्त झाला व शिवाजीच्या धाडसी कृत्यांमुळें रागावून औरंगजेब*

* फिलिप व औरंगजेब यांच्यांत पुष्कळ प्रकारें साम्य आहे. दोघेही बलाढ्य व महत्वाकांक्षी सम्राट असून दोघांचें धर्मवेडही सारखेंच होतें. मात्र औरंगजेबाचें कर्तृत्व फिलिपच्या अंगीं नव्हतें.

नं. ५५

जसा कधीं कधीं आपली दाढी उपटून घेई, त्याप्रमाणे त्यानेंही संतापाच्या भरांत आपल्या दाढीला हिसके दिले आणि, "ह्याबद्दल त्यांना जबर भुर्दंड सोसावा लागेल" असें तो मोठ्या आवेशानें उद्गारला! फिलिप व लेडी रीजंट यांचे वरील तिन्ही सरदारांसंबंधानें गुप्त विचार कांहींहां असोत, ते दोघेही अद्यापि बाह्यतः त्यांची स्तुती व गौरवच करीत होते आणि ते सरदारही अद्याप त्यांचे कायदेशीर हुकूम पाळून देशांत शांतता राखण्याची शक्य ती खटपट करीत होते. पण हें असें कोठवर निभणार? 'संमतिपत्र' प्रामाणिकपणें पाळण्याची मॉर्गरेटची तयारी असती तर वुइल्यमादि सरदारांच्या प्रयत्नांचें चीज झालें असतें व त्यांच्या राजनिष्ठेची ओढाताण होण्याचा समय आला नसता; परंतु मॉर्गरेटची लहर वारंवार बदलणारी असल्यामुळें तिला संतुष्ट राखणें त्यांस शक्य नव्हतें. ती क्षणभर सौम्यपणाचें बोलणें बोले व लागलींच सर्व धर्मसुधारकांस कडक शासन करण्याची आज्ञा करी; अशी तिची धरसोड चालू होती. मूर्तिभंजकांना व दंगेखोरांना कडक शासन करण्याची वुइल्यमादि सरदारांची तयारी होती-नव्हे आपापल्या प्रांतांत त्यांनीं तसें केलेंही होतें. वुइल्यमनें तर आपला भाऊ लुई याजकडूनही कित्येक अपराध्यांस देहांत शासन करविलें होतें—पण सरसकट सर्व धर्मसुधारकांस छळण्यास ते तयार नव्हते. नुकत्याच जाहीर झालेल्या संमतिपत्रांतील कलमें ते पाळीत होते व सरकारनेंही तीं अक्षरशः पाळावीत असें त्यांचें म्हणणें होतें. मॉर्गरेटला तीं कलमें अमान्य करावयाचीं नव्हतीं पण त्यांची अंमलबजावणी करितांना सरकारच्या मनाचा कल लक्षांत घेऊन ह्या सरदारांनीं वर्तन करावें अशी तिची इच्छा होती. ती तृप्त करण्याचें काम त्या सरदारांच्या हातून होणें दुर्घट होतें. याप्रमाणें आंतून एक व बाहेरून एक असा सरकारचा डाव पाहून वुइल्यमला औपचारिक राजनिष्ठा पाळणेंही कठीण वाटूं लागल्यास, त्यांत नवल कोणतें?

---

# प्रकरण ५ वें.

## राजनिष्ठेची अखेर.

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें, औपचारिक राजनिष्ठा पाळणेंही वुइल्यमला जसजसें कठिण होत चाललें तसतसें फिलिपशीं उघड सामना करण्याची तयारी होईल तितक्या त्वरेनें करण्याची त्यास जास्त आवश्यकता भासूं लागली. मॉर्गरेटनें पूर्वी जाहीर केलेलें 'संमतिपत्र' ( Accord ) पाळण्यास फिलिप बिलकूल तयार होणार नाहीं; इतकेंच नव्हे तर ते पाळण्याचा सल्ला देणाऱ्या सरदारांना पंचत्वास पोंचविण्याचीही त्याची तजवीज चालू असल्याचें त्यास आपल्या हेरांच्या द्वारें कळून चुकलें होतें! अशा स्थितींत डोळेझांक करून आपल्या योजना लांबणीवर टाकणें त्यास शक्य नव्हतें. म्हणून त्यानें आपला भाऊ लुई याला फ्रान्सांतील ह्युजेनॉटस् लोकांचे पुढारी कोंदे व कोलिग्नि यांस वश करून घेण्यास्तव पाठविलें. त्याचप्रमाणें जर्मन संस्थानिकांच्या मदतीनें जर्मनींत सैन्याची जुळवाजुळव करण्याचा उद्योग सुरू ठेवून, इंग्लंडची राणी इलिझाबेथ हिच्या मुखत्यारांशींही लष्करी मदतीविषयीं त्यानें बोलणें सुरू केलें. स्वदेशांत या वेळीं त्याला पाहिजे तशी मदत मिळण्याचा संभव नव्हता. कारण तेथें सर्वत्र बजबजपुरी माजलेली होती. लुईचा संघही ' संमतिपत्र ' ( Accord ) जाहीर झाल्यानंतर मोडला होता व त्याचे पुढारी चहुंकडे पांगले होते. वुइल्यमच्या बरोबरीच्या सरदारांपैकीं मॉंतिग्नि व बर्घम हे स्पेनमध्यें अडकले होते व बादशाही नोकरीच्या पायांत हॉर्न कर्जबाजारी झाल्याकारणानें त्याचा देखील फारसा उपयोग होण्यासारखा नव्हता. एकटा एग्मॉंट काय तो त्याच्या उपयोगीं पडणारा होता; पण तो चंचल व उच्छृंखल असून पोकळ डौल बाळगणारा असल्यामुळें त्याचा त्यास भरंवसा वाटत नव्हता. तथापि तो शूर योद्धा असून लोकप्रियही असल्यामुळें त्याला आपले हेतू कळवून फिलिपविरुद्ध उठण्यास तयार करावें म्हणून त्यानें आपल्या भावामार्फत त्यास टरमॉंडे येथें बोलावून आणलें. तेथें हॉर्न, हुग्स्ट्रॅटेन लुई व

वुइल्यम यांचें बराच वेळ खलबत झालें. फिलिपचा कटाक्ष केवळ धर्मसुधारकांवरच नसून कॅथोलीकपंथीय लोकांसही राजकीय गुलामगिरींत लोळत ठेवण्याचा त्याचा बेत आहे, असें वुइल्यमनें अनेक उदाहरणें देऊन एग्मॉंटच्या निदर्शनास आणलें व लुइनें त्याचा स्वाभिमान, देशाभिमान व पौरुष हीं जागृत करण्याकरतां आपल्या वक्तृत्वशक्तीची परमावधी केली; तसेंच वुइल्यम, हॉर्न व एग्मॉंट यांचा नाश करण्याच्या योजनांनीं भरलेलें एक फिलिपचें गुप्त पत्रही त्यानें त्यास दाखविलें; परंतु एगमॉंटच्या मनावर त्याचा कांहींच परिणाम झाला नाहीं! भोळा विचारा एग्मॉंट! फिलिपच्या वरपांगी गोड गोड पत्रांस व मुलथापांस तो भाळला होता! आपल्या देशांत चालू असलेला जुलूम दूर करण्यास Loyal and constitution opposition सनदशीर प्रतिकारच पुरेसा आहे असें त्यास तिकडे स्पेनमध्यें नेदर्लंडवर येणाऱ्या नव्या सैन्याची तयारी झाली तरी–अद्याप वाटत होतें! सध्याचा जुलूम अधिकाऱ्यांनीं फिलिपचा गैरसमज केल्यामुळेंच होत असून आपण निग्रहानें पण राजनिष्ठापूर्वक खरी स्थिति त्याच्या लक्षांत आणून दिल्यास तो आपल्या प्रजेस दयाळूपणानें वागवील असें त्यास अजूनही वाटत होतें! त्याची मनःस्थिति अशी असल्यामुळें वुइल्यम व लुई यांच्या उपदेशाचा परिणाम ‘पालथ्या घड्यावर पाणी’ याप्रमाणें व्हावा हें साहजिक आहे. एग्मॉंट हा देशद्रोही किंवा स्वार्थी नव्हता; परंतु अविचारी, अहंमन्य व उथळ स्वभावाचा होता. प्रामाणिकपणा व स्पष्टवक्तेपणा हे जे शूर शिपायाच्या अंगीं साहजिक असणारे गुण ते त्याच्या अंगीं होते; परंतु दूरदर्शीपणा व दीर्घसूत्री राजकारणांतील पेंच ओळखण्याचें तारतम्य हे जे मुत्सद्याचे गुण ते त्याच्या अंगीं नव्हते. तसेंच फिलिपचें बलाढ्य सामर्थ्यही त्याला दिपवून टाकीत होतें व त्यापुढें बेशिस्त आणि मोडक्यातोडक्या लोकपक्षाचा निभाव लागण्याची त्यास फारशी आशा वाटत नव्हती. तेव्हां अशा शंकास्पद स्थितींत फिलिपशीं उघड विरोध करून आपलें हंसे व हानि करून घेण्यांत कांहीं अर्थ नाहीं असें त्यास वाटत होते. वरील शेवटच्या बाबतींत त्याचे व वुइल्यमचे विचार सारखेच होते; पण त्यामुळें कच खाऊन स्वस्थ बसणें हें देशहिताच्या दृष्टीनें वुइल्यमला इष्ट वाटत नव्हतें व एग्मॉंटला तें इष्ट वाटत होतें, हा या दोघांच्या मनोवृत्तींत भेद होता व तो अर्थातच महत्त्वाचा होता. एग्मॉंटनें याप्रमाणें हातपाय गाळल्यामुळें

वुइल्यमची मोठी निराशा झाली व त्याला त्याबद्दल अतोनात वाईट वाटलें; परंतु तो त्याच्यावर रागावला नाहीं. त्यानें त्याची कींव केली व याबद्दल पुढें पश्चात्ताप करण्याची वेळ लवकरच येईल तरी सावध रहा, असें त्यास बजावून तो आपल्या भावासह अँटवर्पला निघून गेला. एग्मॉटच्या ह्या कृत्यानें फिलिपचा मोठाच फायदा झाला असें एका इतिहासकारानें लिहिलें आहे. यावेळीं जर तो त्याच्याविरुद्ध उठता तर सुमारें साठ हजार लोक त्याचें अनुकरण करण्यास प्रवृत्त झाले असते व त्यांनीं हां हां म्हणतां ब्रुसेल्स राजधानी काबीज केली असती! इतकेंच नव्हे तर, वुइल्यमच्या मदतीनें त्यास सर्व नेदर्लंडावर आपली छाप बसवितां आली असती. ही उत्तम संधी दवडल्याबद्दल वुइल्यमला तर वाईट वाटलेंच; पण खुद्द एग्मॉटलाही पुढें लवकरच त्याबद्दल पश्चात्ताप करण्याची पाळी आली. पण त्यावेळीं तो शत्रूच्या हातांत गेल्यामुळें त्या पश्चात्तापाचाही मनांतल्या मनांत जळफळत बसण्यापेक्षां जास्त कांहीं उपयोग होण्याजोगा नव्हता! असो; एग्मॉटच्या ह्या अवसानघातकीपणामुळें बाहेरून मदत मिळेपर्यंत उघडपणें फिलिपच्या विरुद्ध शस्त्र उचलण्याचा बेत वुइल्यमला सोडून द्यावा लागला. तेव्हां असलेल्या परिस्थितींतच शक्य तितकी शांतता राखून अवेळीं बंड उद्भवण्याचा प्रसंग टाळण्याचें त्यानें ठरविलें.

प्रॉटेस्टंट, कॅल्व्हानिस्ट व अनाबाप्टिस्ट हे लोक आतां अगदीं अनावर झालेले होते. कॅथोलिक पंथाच्या लोकांतही त्यांच्या राजकीय हक्कांचा संकोच * होत गेल्यामुळें असंतोष माजला होता. या सर्वांचें समाधान करण्याकरितां इस्टेट्स-जनरलची–लोकसभेची–बैठक लवकर बोलवावी असा वुइल्यमनें मॉर्गरेटला आग्रह केला. तीही त्यास कबूल होती; परंतु नेदर्लंडांत येणारें नवें सैन्य स्पेनमधून कुच करण्याच्या तयारींत असल्यानें, फिलीप त्या गोष्टीस संमति देईना, यामुळें तिचा नाइलाज झाला. तेव्हां तूर्त आहे या स्थितींतच कशी तरी शांतता राखा, अशी वुइल्यमची तिनें विनवणी केली आणि ती मान्य करून तो इ. स. १५६६ च्या आक्टोबर महिन्यांत अँटवर्प येथें स्थिरस्थावर

* नेदर्लंडांतल्या प्रांतांतील व शहरांतील सर्व राज्यकारभार तेथील लोकांमार्फत चालविण्याचा त्यांस हक्क होता. त्याचा संकोच करून फिलिपनें ह्या राज्यकारभाराचीं सर्व सूत्रें स्टेटकौन्सिलच्या हातीं देऊन, राज्यकारभाराच्या सर्व खात्यांत स्पॅनिश लोकांची भरती केली होती. ह्या खात्यांत स्वदेशी लोकांचीच नेमणूक करावी असा पूर्वीचा शिरस्ता व कायदा होता.

करून हॉलंड, झीलंड व युत्रेक्ट ह्या आपल्या ताब्यांतील प्रांतांत शांतता राखण्यास निघून गेला. यावेळीं हॉलंडांतील लोकांनीं त्याचा मोठा सत्कार करून त्यास ५५ हजार पौंडांची थैली अर्पण केली; परंतु त्यानें ती आदरपूर्वक नाकारली! त्यानें वरील प्रांतांतील प्रमुख शहरीं जाऊन अत्याचार करणारांस शासन केलें व इतर धर्मसुधारकांस सार्वजनिक रीतीनें प्रार्थना करण्याकरितां शहराबाहेर विवक्षित स्थानें आखून दिलीं. मात्र अमस्टरडॅम शहराभोंवतीं समुद्राच्या पाण्याचा वेढा असल्यामुळें तेथील धर्मसुधारकांच्या प्रार्थनाविधीची सोय शहरांतच करणें त्यास भाग पडलें. पण तें मॉर्गरेटला पसंत पडलें नाहीं. ‘शहराबाहेर बोटींत त्यांची सोय करतां येणार नाहीं काय?’ असा तिनें त्यास सवाल केला तेव्हां, ‘त्यांना बोटींत प्रार्थनाविधी करावयास लावण्यास कोण धजावेल व तें कसें शक्य आहे, तुमच्या डोक्यांत ही कल्पना कशी आली हेंच मला समजत नाहीं.’ असें वुइल्यमनें तिला कळविलें; त्यावरून या उभयतांत सभ्य परंतु मर्मभेदक–खोंचदार–भाषेंत बराच पत्रव्यवहार झाला. तिच्या मनांतून धर्मसुधारकांना अंतःकरण-पूर्वक खरोखर सवलती द्यावयाच्या नव्हत्या. त्या दिल्या विषयीं नुसता बहाणा करावयाचा होता. वुइल्यमच्या मनांतून मागें सांगितलेल्या ‘संमतिपत्रा’स अनुसरून चालावयाचें होतें; अर्थात् उभयतांमध्यें त्यासंबंधानें वरील प्रकारचा वाद उत्पन्न होणें अपरिहार्य होतें पण त्याकडे लक्ष न देतां तो आपलें कर्तव्य करीत राहिला. लोक व सरकार यांनीं यावेळीं कोणतें धोरण स्वीकारावें याचें मुद्देसूद व मार्मिक विवेचन करणारें एक विस्तृत जाहीरपत्रक त्यानें काढलें. त्यांतील मथितार्थ पुढीलप्रमाणें होताः—

“ह्या देशांतील धार्मिक व राजकीय परिस्थितीसंबंधानें लोकांत जीं विविध आणि परस्परविरोधी मतें प्रचलित आहेत, त्यामुळें या देशाचा लवकरच नाश होणार असें वाटून माझें मन तळमळतें; व भीति, स्वार्थ, आणि औदासिन्य यां-पैकीं कोणत्या तरी एका पिशाच्चानें पछाडल्यामुळें किती थोडे लोक या गोष्टींचा विचार करून उपायचिंतन करतात हें पाहिलें म्हणजे निराशा वाटूं लागते. माझें वय व अनुभव यांकडे विशेष लक्ष न देतां मी असें म्हणतों कीं, हल्लींच्या स्थितींत, आपल्या देशाच्या व राजाच्या उन्नतीकरितां प्रामाणिकपणें ज्याला जो उपाय बरा वाटेल त्या दिशेनें देशोद्धाराच्या कामीं मदत करणें हें प्रत्येक नागरिकाचें कर्तव्यकर्म आहे.”

" सध्यांच्या स्थितीमुळें भांबावून जाण्याचें अथवा हत्यार उपसण्याचें कांहीं कारण नाहीं. राजा व प्रजा यांचे धर्म भिन्न असल्याचीं व तशा स्थितींत ते सुखासमाधानानें नांदल्याचीं पुष्कळ उदाहरणें इतिहासांत आहेत. नेदर्लेंडाच्या आसपासच्या देशांतून धर्मसुधारणा तीव्र वेगानें चालू आहे आणि व्यापारामुळें परकीय लोकांचें ह्या देशाशीं असलेलें दळणवळण लक्षांत आणलें म्हणजे या वेळपर्यंत जरी येथील लोकांत धर्मजागृति झाली नसती तरी पुढें मागें ती झाल्यावांचून खास राहती ना असें कबूल करावें लागेल. परक्यांच्या संसर्गापासून अलिप्त राहणें आपणांस अशक्य आहे; कारण तसें केल्यास आपल्या व्यापाराची हानी होऊन आपला देश कंगाल बनेल. निरनिराळ्या लोकांच्या संसर्गानें ह्या देशांत नवीन विचार व मतें यांचा प्रसार झाला असल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं व वाईटही नाहीं. परंतु परमतांविषयीं सहिष्णुत्व न दाखविल्यास राजा व प्रजा यांची कशी सारखीच धुळधाण उडते, हें शेजाऱ्यांच्या उदाहरणावरून आपण लक्षांत घेतलें पाहिजे."

" हल्लींच्या आपल्या स्थितींत, आपण प्रथम, रीजंटनें लोकसमूहास दिलेल्या सवलती मंजूर करण्याबद्दल राजाचें मन वळविण्याची खटपट केली पाहिजे. या सवलतीमुळें लोकांत शांतता स्थापन झाली असून त्यांची चळवळ कायद्याच्या मर्यादेंत राहिली आहे आणि त्या सवलतीस संमति देण्यास राजा कांकूं करीत असून येथील लोकांवर स्वारी करण्याप्रीत्यर्थ सैन्याची जमवाजमव करीत आहे, अशा प्रकारच्या बातम्या जर येथील लोकांच्या कानावर येत्या ना तर त्या सवलतींचा याहूनही त्यांच्या मनावर अधिक इष्ट परिणाम झालेला दिसून आला असता. एका जिल्ह्यांत शांतता राखण्याचा प्रयत्न करावा, तों दुसऱ्या जिल्ह्यांत हुल्लड सुरू व्हावी यांत कांहीं अर्थ नाहीं. सर्व ठिकाणीं शांतता झाली पाहिजे व प्रस्तुतच्या लढ्याचा कायमचा निकाल लागला पाहिजे. शेजारच्या देशांशीं असलेला संबंध तोडून आपला देश हेंच जग मानून आपलें चालावयाचें नाहीं. शेजाऱ्यांच्या स्नेहभावावर आमच्या इतकें विशेष अवलंबून असणारें दुसरें कोणतेंही राष्ट्र ख्रिस्ती जगांत नाहीं. तसेंच (फिलिपच्या) साम्राज्याला चिकटून राहणें हेंही आमच्या हिताच्या दृष्टीनें योग्य आहे व त्याकरितां आमच्या स्थानिक राष्ट्रीय संस्थांना साम्राज्यांतील राष्ट्रीय संस्थांचें वळण देऊन स्पेनचा राजा व आपला बादशाहा याचे हक्क व इतमाम रक्षण करणें हेंही आपलें कर्तव्य आहे.

नं. ... ना. ६१ ठाणे

## ५—राजनिष्ठेची अखेर.

प्रॉटेस्टंट व कॅथोलिक या दोन्ही मतांच्या राज्यकर्त्यांनीं जर आपसांत तडजोड करून गतकालीन गुन्ह्यांची माफी केली तर जगांत आणि जगांतील सर्व लोकांच्या व्यापाराचें केंद्र बनलेल्या आपल्या ह्या देशांत कायमची शांतता नांदेल. हल्लींच्या स्थितींत फेरबदल करण्याकरितां माझ्या मतें पुढील उपायांची योजना करतां येईल:—

१ नव्या धर्ममतांच्या प्रसाराचा व प्रार्थनाविधींचा दंडुक्याच्या जोरावर निरोध करणें.

२ जे लोक कॅथोलिक मत स्वीकारणार नाहींत त्यांना देशांतून हद्दपार करणें व त्यांची मालमत्ता जप्त करणें.

३ ज्यांना त्यांना आपापल्या जागेंत त्यांच्या मर्जीप्रमाणें धर्मविधी करण्याची मोकळीक देणें.

४ वाटेल त्या धर्ममताचें अनुकरण करण्याचें स्वातंत्र्य देऊन प्रत्येक प्रांतांत अशा प्रत्येक मताच्या धर्मविधींकरतां निरनिराळ्या जागा आखून देणें.

५ प्रत्येक स्थानिक अधिकाऱ्याला त्याच्या हद्दींत नव्या धर्ममताच्या प्रसारास बंदी करण्याची अथवा सवलत देण्याची पूर्ण मोकळीक देणें.

६ कॅथोलिक धर्माचे आचार संभाळून फक्त लूथरच्या मताप्रमाणें प्रार्थनाविधी करूं देणें.

७ कॅथोलिकांप्रमाणेंच लूथर व कॅल्व्हिन यांच्या मतांच्या अनुयायांस त्यांच्यांतील मतभेद कायम असेपर्यंत स्वतंत्रपणें आपल्या मतानुसार वागण्याची परवानगी देणें.”

ह्या सात उपायांच्या बरेवाईटपणाबद्दल सदर पत्रकांत त्यानें विस्तृत उहापोह केला आहे. पहिले तीन उपाय कमजास्त प्रमाणानें छलोत्पादक असल्यामुळें देशाच्या नाशास कारणीभूत होतील म्हणून त्यानें मोठ्या आवेशानें त्यांचा धिक्कार केला आहे. सहावा भ्रामक व अयोग्य म्हणून त्याज्य ठरविला आहे. सातवा फिलिप एक क्षणभरही कबूल करण्याचा संभव नसल्यामुळें सोडून देणें भाग आहे, असें सांगून चवथा अथवा पांचवा जास्त व्यवहार्य व सद्यस्थितींत उपयोगी असा असल्याचें त्यानें प्रतिपादिलें आहे. चवथ्याचा त्यानें अनुभव घेतला होता व आपल्या ताब्यांतील प्रांतांत त्याच्याच योगानें त्यास शांतता राखणें सुलभ झालें होतें. नेदर्लंडांत अनेक ठिकाणचे लोक वारंवार येत असल्यामुळें, तेथें सर्व प्रकारच्या धार्मिक मतांस ( अर्थात् ख्रिस्ती ) स्वातंत्र्य असावें म्हणजे पर्यायानें तेथें धार्मिक बाब-

तींत तटस्थपणाचें धोरण ठेवण्यांत यावें असें त्याचें मत होतें. तो स्वतः जरी कॅथोलिक मताचे आचार पाळीत होता, तरी इतर मतांसंबंधानें त्याच्या मनांत अनादर मुळींच नव्हता. तसेंच कॅथोलिक मताचा फाजील अभिमानही तो बाळगीत नव्हता. धर्म हा मनाचा प्रांत आहे आणि त्या प्रांतावर फक्त परमेश्वराचीच सत्ता असावी, मानवी राजांनीं त्यावर अंमल गाजवूं नये, परमेश्वर ज्याला ज्या मताची प्रेरणा करील त्या मताचा त्याला अनुवाद करूं देणें हेंच योग्य होय, असें तो मानीत असे. या बाबतींत जुलूम जबरदस्ती केल्यास राष्ट्रांत बखेडा माजून विनाकारण भयंकर प्रकार कसे घडून येतात, याचें सदर पत्रकांत मार्मिक विवेचन करून फिलिपला तो प्रसंग टाळण्याची त्यानें मोठ्या मिनतवारीनें विनंती केली आहे. "नवीन प्रचलित धर्ममतें जर खोटीं असतील तर कालांतरानें त्यांचा खोटेपणा उघडकीस येऊन तीं आपोआपच मरतील, त्याकरितां मानवी रक्ताचे पूर वाहूं देण्याचा आणि समाजोपयोगी मालमत्तेची राखरांगोळी करण्याचें प्रयोजन नाहीं" असा त्यानें अखेर इषारा दिला आहे. ह्या जाहीरपत्रकाचा फिलिपच्या मनावर जर थोडाबहुत तरी परिणाम होता, तर पुढें नेदर्लंडांत होणारा रक्तपात व मालमत्तेचा विध्वंस पुष्कळ अंशानें टळला असता; परंतु जुलमी आणि एकसूत्री सत्तेचा कैफच असा कांहीं विलक्षण असतो कीं, त्याचा अंमल बसलेल्या अधिकाऱ्यास अथवा राजास स्वतःच्या व भोंवतालच्या स्थितीचें आकलन करण्याचें बुद्धिसामर्थ्यच रहात नाहीं! आणि तोच प्रसंग सध्यां फिलिपवर आलेला असल्यामुळें त्याला त्याच्या ह्या सुविचारी नोकराचा उपदेश पटला नाहीं. त्यामुळें पुढें केवढा अनर्थ ओढवला हें ओघानें सांगावें लागणार आहेच.

वरील आशयाचें जाहिरपत्रक काढण्याचें काम चालू असतांनाच, इकडे फ्रान्स, जर्मनी व इंग्लंड येथून सैन्याची व द्रव्याची मदत मिळविण्याचे वुइल्यमचे प्रयत्न सारखे चालू होते. आपल्या जर्मन नातेवाइकांस संतुष्ट करण्याकरितां तो प्रॉटेस्टंट मतांचा अनुयायी होण्यासही तयार होता; परंतु त्याच्या अंमलाखालच्या प्रांतांत 'हालंड, झीलंड, युत्रेक्ट' कॅल्व्हानिस्ट मताचाच विशेष प्रसार झालेला असल्यानें व तेथील लोकांची प्रॅटेस्टंट मतासंबंधानें सहानुभूति नसल्याकारणानें त्यानें तसें जाहिर करण्याचें तूर्त तहकूब केलें होतें. मात्र गुप्तपणें त्यानें प्रॅटेस्टंट पंथाची दीक्षा घेतली. जर्मनींतील राजपुत्र कॅल्व्हानिस्टपंथीय जनतेकरतां आपलें द्रव्यबल व मनुष्यबल खर्च करण्यास तयार नव्हते; सबब केवळ धर्मसंबंधीं मतभेदाकडे

लक्ष देऊन त्यांना एका जुलमी व आसुरी वृत्तीच्या राजाच्या गुलामगिरींत लोळत ठेवणें तुम्हास बरें वाटतें काय, असें आर्तस्वरानें त्यांस विचारून त्यांचें मन वळविण्याविषयीं त्यानें पुष्कळ खटपट केली; पण त्याचा कांहीं फारसा उपयोग झाला नाहीं. कांहीं जर्मन नातलगांनीं त्यास थोडीशी अप्रत्यक्ष मदत करण्याचें मात्र आश्वासन दिलें. फ्रेंच ह्युजेनॉटस् व इंग्लंडची राणी यांच्याकडूनही खात्रीपूर्वक मदत मिळण्याचा संभव दिसेना; तथापि त्याचे व त्याचा भाऊ लुई याचें एतद्विषयक प्रयत्न चालूच होते. इकडे ब्रेडरोड व त्याचे साथिदार हेही देशांतल्या देशांत बंडाची तयारी करीत होते. मात्र त्यांच्याशीं वुइल्यमचा प्रत्यक्ष संबंध नव्हता. तथापि लुईच्या मार्फत त्यांना त्याजकडून सल्लामसलत मिळत असावी असें अनुमान करण्यास (तत्कालीन पत्रव्यवहारावरून) जागा आहे. याप्रमाणें ही बंडाची तयारी चालू असतां फिलिपनें धर्मसंबंधी कायद्याची अंमलबजावणी जारीनें करण्याचे पुन्हा हुकूम सोडले व आपल्या प्रमुख अधिकाऱ्यांकडून एक राजनिष्ठेची नवीन शपथ घेण्याविषयीं रीजंटला फर्माविलें. त्या शपथेचा मसुदा असा होताः—

" परमेश्वराला स्मरून मी शपथ घेतों कीं, मी आपल्या राजाची इमानें इतबारें सेवा करीन व त्याच्या सर्व आज्ञा–मग त्या कोणाच्याही विरुद्ध अथवा सुद्ध असोत–त्यास कसलीही मर्यादा न घालतां बिनशर्त पाळीन." हे नवे हुकूम आल्याची बातमी देशांत पसरतांच लोकांत पुन्हा खळबळ सुरू झाली व पूर्वीच्या 'संमतिपत्रानें' उत्पन्न केलेली शांतता नष्ट होण्याचा संभव दिसूं लागला. तेव्हां मॉर्गरेटनें वरील नवी शपथ घेऊन देशांत शांतता राखण्याचें काम शिरावर घेण्याची वुइल्यम, एग्मॉंट, हॉर्न वगैरे गव्हर्नर व कौन्सिलर यांस आज्ञा केली. एग्मॉंटनें पहिल्या सपाट्यासरशीं ती शपथ घेतली; परंतु इतरांनीं विचार करण्याच्या सबबीवर तसें करण्याचें पुढें ढकललें. इतक्यांत ओस्ट्रावेल शहरीं बंड उद्भवल्याची बातमी आली ! तेव्हां वुइल्यम मॉर्गरेटच्या विनंतीवरून त्याचा बंदोबस्त करण्यास तिकडे निघून गेला.

मागें वर्णन केलेल्या लुईच्या ऊर्फ 'भिकाऱ्यांच्या' संघाचा एक पुढारी सेंट अल्डेगॉंड याचा भाऊ मार्निक्स ऊर्फ लॉर्ड ऑफ थोलूज–हा कॅल्व्हानिस्ट होता–यानें कांहीं बाजारबुणगेवजा लष्कर उभारून वॉल्चेरन बेटावर हल्ला करण्याचा यत्न केला पण तो सिद्धीस गेला नाहीं. तेव्हां त्यानें अँटवर्पच्या उत्तरेस असलेल्या ओस्ट्रावेल नामक शहरावर हल्ला केला. हे बंडवाले कॅल्व्हानिस्ट पंथाचे

असून त्यांची संख्या सुमारें ३ हजार होती. त्यांना अँटवर्प येथील सरकारी लष्करानें अकस्मात् चढून आल्यावर उभय दळांचें युद्ध जुंपलें, त्यांत मार्निक्स व फ्रेंच बहुतेक लोक मारले गेले. हें युद्ध अँटवर्प शहराच्या तटबंदीनजीक सुमारें २ मैलांवर झालें. अर्थात् मार्निक्सच्या मृत्यूची व पराभवाची बातमी अँटवर्प शहरांत तावडतोब पसरली. तेव्हां शहरांतील कॅल्व्हानिस्ट लोकांच्या कांहीं टोळ्या ह्या पराभूत झालेल्या सैन्याच्या मदतीस जाण्यास उत्सुक झाल्या. ह्या लोकांपाशीं पुरेशीं व चांगली हत्यारें नव्हतीं. तथापि त्यांचा उत्साह इतका दांडगा होता कीं, या वैगुण्याकडे कोणींच लक्ष दिलें नाहीं! ज्याला जें जखम करण्याचें साधन सांपडेल तेंच हत्याराऐवजीं घेऊन तो निघण्यास तयार झाला. या सुमारास वुइल्यम कांहीं निवडक सैन्य बरोबर घेऊन शहरांत आला व त्यानें शहराचे दरवाजे बंद करून या बेहोष लोकांस बाहेर जाण्याची मनाई केली व "विजयी झालेलें सरकारी लष्कर शिस्तीचें असून त्यांच्यापाशीं भरपूर रणसामुग्री आहे व त्यांचे अधिकारीही हुषार आहेत, अशा स्थितींत तुम्ही त्यांचा भिकार शस्त्रांनीं प्रतिकार तो काय करणार? तुम्ही ह्या अविचारानें मार्निक्सच्या सैन्याप्रमाणेंच आपली धूळधाण करून घ्याल व सर्व अँटवर्प शहरावर मोठें संकट आणाल; तरी ह्यावेळीं असा अविचार करूं नका." असा त्यानें त्यास उपदेश केला. परंतु तो त्या संतापग्रस्त व चिडलेल्या लोकांस रुचला नाहीं. त्यांपैकीं कांहींजण त्यासच 'विश्वासघातकी,' 'देशद्रोही,' 'ख्रिस्ती धर्माच्या शत्रूचा प्रधान,' 'पोपचा सैनिक' वगैरे मर्मभेदक शब्दांनीं चंचुघात करूं लागले! एकजण तर "विश्वासघातक्या दंगेखोरा, आमच्या बांधवांची कत्तल होण्यास मूळ कारण तूंच आहेस." असेंही म्हणाला! पण वुइल्यमनें ह्या शाब्दिक भडिमाराकडे फारसें लक्ष दिलें नाहीं. शहरांतील शांततेचा भंग न होऊं देणें हें त्याचें ह्या वेळचें मुख्य ध्येय होतें व तें साध्य करण्याकडेच मुख्यतः त्याचें लक्ष होतें. त्या दिवशीं त्याच्या सैन्याच्या दबदब्यानें हे उतावळे लोक स्वस्थ राहिले पण दुसरे दिवशीं त्यांनीं आपल्या बाजूस सुमारें १५ हजार लोकांचा जमाव जमवून युद्धाची तयारी केली. त्यांचें मुख्य ठाणें शहराच्या मध्यभागीं 'फेसदमीर' या जागीं होतें. त्यांची ही तयारी पाहून कॅथोलिक लोकांचें धाबें दणाणलें व त्यांच्या बायका आक्रोश करूं लागल्या. या लोकांनीं तुरुंग फोडून

… डी ग्रंथ …

तेथील कैदीही आपल्या जमावांत सामील केलेले होते. शहरांतील मुख्य सरकारी सैन्य, टाऊन हॉल व मॅजिस्ट्रेटचीं कोर्टें यांच्या रक्षणांत गुंतलें होतें; व वुइल्यम-जवळ असलेलें सैन्यही छोटेसेंच होतें. तथापि वुइल्यमनें धैर्य न सोडतां शांतता राखण्याबद्दल शिकस्त करण्याचा निश्चय केला. तो कांहीं निवडक आत्मसंरक्षकांसह (body guard) बंडवाल्यांच्या जमावांत जाऊन दाखल झाला व मुलकी अधिकाऱ्यांशीं तडजोडीचें बोलण करण्याप्रीत्यर्थ कांहीं निवडक प्रतिनिधींची नेमणूक करण्याची त्यानें बंडवाल्यांच्या पुढाऱ्यांस सूचना केली. ते लोक शहराच्या दरवाजाच्या किल्लया मागूं लागले; परंतु वुइल्यमनें आपल्या नैतिक आत्मबलाच्या जोरावर पुन्हा त्यांची कानउघाडणी व झाडणी करून त्या देण्याचें नाकारलें व त्यांना शांततेनें आपला कार्यभाग सिद्धीस नेण्यास सांगितलें तेव्हां तो दिवस तसाच गेला. एवढी फुरसत मिळतांच वुइल्यमनें तेथील कॅथोलिक, प्रॉटेस्टंट व परकीय व्यापारी यांस अनुकूल करून घेऊन एक बरेंच मोठें सैन्य तयार केलें. हें सैन्यही नवशिक्या लोकांचेंच होतें; परंतु तें तयार करण्यांत वुइल्यमचा हेतु लढण्यापेक्षां मुख्यतः प्रतिपक्षास भयभीत करण्याचाच असल्यानें त्याला त्या वैगुण्याबद्दल विशेष फिकीर वाटली नाहीं. ही जमवाजमव त्यानें एका रात्रांत केली! दुसरे दिवशीं सकाळपासून संध्याकाळपर्यंत त्यानें तडजोडीच्या शर्तींची वाटाघाट करण्यांत वेळ घालवून युद्धप्रसंग लांबणीवर टाकला. ह्या तडजोडींत पुढील गोष्टी ठरल्या:—

१. कॅल्व्हानिस्ट व प्रॉटेस्टंट यांना धर्मसंबंधीं पूर्वी 'संमतिपत्र'क्राच्या आधारें ज्या सवलती मिळाल्या होत्या त्याप्रमाणें त्यांना ठराविक स्थळीं आपापल्या मता-प्रमाणें प्रार्थनाविधी करण्याची मुभा असावी.

२. नगररक्षकांच्या तुकडींत सर्व मतांच्या व पंथांच्या लोकांचा समावेश व्हावा व त्यास पाठिंबा देण्याकरितां शहरांतील सर्व जातींच्या लोकांच्या खर्चानें एक घोडदळ व आरमार तयार करावें

३ शहरांत परदेशीय सैन्य ठेवण्यांत येऊं नये.

ही तडजोड सर्व पक्षांना मान्य झाली अथवा कबूल करावी लागली हें खरें; पण कॅल्व्हानिस्टांच्या जमावांतील पिसाळलेल्या लोकांना ती कितपत मान्य होईल व त्याप्रमाणें वागण्यास ते शांतपणानें तयार होतील कीं नाहीं, ह्या-बद्दल वुइल्यमला मोठी शंका वाटत होती; व या जमावाच्या तत्कालीन मनो-

वृत्तींचा* विचार करतां ती अगदीं यथार्थ होती. हे लोक न्याय मिळविण्यापेक्षां सूड घेण्याच्या हेतूनें विशेष प्रेरित झालेले होते. त्यांना कांहींतरी निमित्तानें दंगा करून कॅथॉलिक लोकांची व तत्पक्षीयांची राळ उडवून द्यावयाची होती. व त्याप्रीत्यर्थ ते अगदीं जिवावर उदार झालेले होते. अशा स्थितींत त्यांना शांततेचा उपदेश व तडजोड हीं कशीं रुचणार? पण ती तडजोड त्यांच्या पदरीं बांधून त्यांना स्वस्थ बसविण्याचा वुइल्यमचा तर ठाम निश्चय ठरलेला होता. तो अंमलांत आणण्याकरितां तिसरे दिवशीं सकाळीं (मार्च १५ इ. स. १५६७) सुमारें शंभर निवडक सैनिक बरोबर घेऊन तो पुन्हा 'फ्रूस द मीर' येथें गेला व त्यानें आपल्या एका हस्तकाकडून तडजोडीचीं वरील कलमें तेथील जमावास वाचून दाखविलीं. तीं वाचून झाल्यानंतर त्यानें स्वतः त्या जमावास उद्देशून गंभीरपणें पुढील आशयाचें भाषण केलें:—"ही तडजोड फार परिश्रमानें घडवून आणिली असून ती धर्मसुधारकांस विशेष फायदेशीर आहे. सद्यस्थितींत ती मान्य करून तुम्हीं स्वस्थ असावें हेंच उचित आहे. प्रॉटेस्टंट, कॅल्व्हानिस्ट व कॅथॉलिक ह्या सर्वांना त्यामुळें धर्मस्वातंत्र्य प्राप्त होणार असून कोणी कोणाचा हेवा करण्यास कारण उरलेलें नाहीं. याउपर तुम्ही शांतताभंग करण्याचा हट्ट धराल तर त्यापासून तुमचा किंचित् देखील फायदा होणार नाहीं. उलट ओस्ट्रावेल येथें जशी तुमच्या लोकांची कत्तल झाली तशीच पुन्हा येथें होईल. येथील कॅथोलिक, प्रॉटेस्टंट व परदेशीय व्यापारी हे सर्व ह्या तडजोडीस अनुसरून वागण्यास व ती अंमलांत आणण्याकरितां एकदिलानें लढण्यासही तयार आहेत. या सर्वांची संख्या तुमच्या दुप्पट आहे; तेव्हां त्यांच्यापुढें तुमचा कितपत व कसा टिकाव लागेल याचा नीट विचार करा." याप्रमाणें त्याचें भाषण होतांच त्याचा तेथील लोकांच्या मनावर विद्युत्शक्तीप्रमाणें परिणाम झाला! वुइल्यमचीं दानत व शील हीं श्रेष्ठ प्रतीचीं असल्यामुळें मुळांतच एकंदर जनतेच्या मनांत त्याच्याविषयीं आदर व दबदबा होता. तशांत, प्रसंगास अनुरूप असें व लोकांवर छाप बसविण्याजोगें भाषण करण्याची शैलीही त्यास चांगली साधलेली असल्यामुळें त्याच्या

---

*त्यांची मनोवृत्ति किती खवळली होती याची कल्पना त्या वेळचा तेथील इंग्रज वकील ग्रेशॅम याच्या "I never saw men so desperate willing to fight." या उद्गारांवरून होण्यासारखी आहे.

भाषणाचा तेथील श्रोतृसमाजावर चांगला परिणाम झाला. त्याचें म्हणणें पुष्कळांना मनांतून आवडलें नाहीं अथवा पटलें नाहीं; पण अशांना सुद्धां त्याच्याविरुद्ध बोलण्याचें धारिष्ट झालें नाहीं. इतकेंच नव्हे, तर अखेरीस त्या सर्वांनीं जेव्हां त्याच्या म्हणण्यास रुकार दिला तेव्हां, अरिष्ट टळल्याबद्दल आनंद व संतोष व्यक्त करतांना वुइल्यमनें 'परमेश्वर राजाचें रक्षण करो' असे उद्गार काढले असतां ह्या बंडखोरांनीं देखील त्या वाक्याचा त्रिवार घोष केला!! जे लोक थोडया वेळापूर्वी फिलिपविरुद्ध बंड करण्यास तयार झाले होते त्यांच्याच तोंडून अशा प्रकारचा शब्दघोष व्हावा हें आश्चर्य नव्हे काय? आश्चर्य तर खरेंच; पण वुइल्यमच्या वजनाचें, मुत्सद्दीपणाचें व कर्तबगारीचें तें फळ होतें! ह्या एकाच उदाहरणावरून त्याची थोर योग्यता स्पष्टपणें निदर्शनास येण्यासारखी आहे. त्यानें हें जें कृत्य केलें तें फिलिपच्या लोभाकरितां केलें असें नाहीं. त्याबद्दल फिलीपकडून बक्षीस मिळण्याऐवजीं उलट आपला नाश होण्याचाच अधिक संभव आहे हें त्यास ठाऊक होतें. परंतु अवेळीं आणि अर्धकच्च्या लोकांकडून झालेले बंड यशस्वी न होतां उलट त्या योगानें फिलिपला जास्तच जुलूम करण्यास फावेल व तसें झाल्यास आपल्या राष्ट्राचा नाश होईल या भीतीनें त्यानें कॅल्व्हानिस्टांच्या उच्छृंखलपणास वरीलप्रमाणें आळा घातला. या कामांत एकदां त्याच्या प्राणावर येऊन बेतण्याचीही वेळ आली होती; पण त्यानें त्या प्रसंगास भिऊन कर्तव्यनिष्ठा सोडली नाहीं. या प्रकरणांत विजय मिळविल्यानंतर त्यानें आपल्या स्नेह्यास जें पहिलें पत्र लिहिलें त्यांत, " मी तुम्हांला खास सांगतों कीं, मोठ्या दैवानें मी या संकटांतून निभावून निघालों. परमेश्वरी कृपेनें हा माझा पुनर्जन्मच झाला असें मी समजतों " असे उद्गार काढलेले आहेत! त्यावरून ह्या प्रसंगाची दुस्तरता वाचकांच्या नीट लक्षांत येईल. या प्रकरणांत त्यानें केलेल्या वर्तनावरून व दाखविलेल्या धारिष्टावरून भावी काळांत राष्ट्रोद्धाराची जी बिकट कामगिरी त्याजवर येऊन पडावयाची होती ती पार पाडण्याची त्याची लायकी चांगली सिद्ध होण्याजोगी आहे, असें अनेक पाश्चात्य इतिहासकारांचें मत आहे. त्याच्या शत्रूंनींही तें मान्य केलें आहे.§ अँटवर्पप्रमाणें, फ्लँडर्स, टूर्ने, व्हॅलेंसिनेस्, लॅनॉय

§ "The garrulous Pontus ( Historian ) who never would believe in the Prince's soldierly courage, declares that Orange then saved the city from pillage and mssacre; etc," "Eye-

वगैरे ठिकाणींही बंडें उद्भवलीं; पण तीं एग्मॉंट व नॉयरकार्म्स या दोन शूर सेनानींनीं निष्ठुरपणें मोडून टाकलीं. त्यांच्या कवाइतीच्या लष्करापुढें वरील शहरांतील लोकांचा निभाव लागला नाहीं. ते पतंगाप्रमाणें सरकारी सैन्याच्या माराස भराभर बळी पडले! त्यामुळें सर्व धर्मसुधारकांचे ठायीं निराशा व खिन्नता यांचें साम्राज्य पसरलें व ते हताश होऊन कांहीं काळ स्तब्ध बसले! सरकारी सैनिकांस याप्रमाणें यश आल्यामुळें वुइल्यमनें अँटवर्प येथें कॅल्व्हानिस्टांशीं केलेली तडजोड मॉर्गरेटला पसंत पडली नाहीं आणि ती त्याबद्दल वुइल्यमला दोष देऊं लागली. एग्मॉंटप्रमाणें नवी राजनिष्ठेची शपथ घेऊन त्याच्यासारखेंच निष्ठुरपणानें पाखंडी व राजद्रोही लोकांस शासन करण्याविषयीं ती वुइल्यमला आग्रह करूं लागली. या लोकांचें बंड मोडण्याकरितां पुढें काय काय तजविजी कराव्यात, हें ठरविण्याकरितां तिनें त्यास एग्मॉंटची मुलाखत घेण्यास सांगितलें. वुइल्यमला एग्मॉंटचें धोरण पसंत नव्हतें व नवीन शपथ घेण्यासही तो तयार नव्हता. तथापि पुन्हा एकदां एग्मॉंटला वश करून घेण्याचा यत्न करावा अशा हेतूनें त्यानें एग्मॉंटची भेट घेतली. त्यावेळीं हॉर्नेही तेथें होता वुइल्यमनें त्यास आपल्या देशाची परिस्थिति नीट समजावून दिली व स्पेनमधून नवीन सैन्य येण्यापूर्वींच जर बंडाचें निशाण उभारलें नाहीं, तर तें सैन्य आल्यावर आपल्या हातून कांहीं होणार नाहीं, फिलिपच्या भुलथापांस भाळून उपयोग नाहीं, तो आपणां सर्वांचाच नाश करण्याच्या तयारींत आहे, सामोपचारानें हा तंटा आतां मिटणार नाहीं वगैरे अनेक गोष्टी सांगून त्यानें त्याचें मन वळविण्याचा प्रयत्न केला; परंतु एग्मॉंटनें फिलिपच्या दयाळूपणावर अवलंबून राहण्याचा आपला हट्ट सोडला नाहीं. त्याचें असें म्हणणें पडलें कीं, नवीन सैन्याबरोबर किंवा त्याच्या मागोमाग फिलिप स्वतः येथें येईल, व त्याला येथील स्थिति नीट कळून आल्यावर तो आपल्या मागण्या मान्य केल्यावांचून राहणार नाहीं. कारण आपल्या साह्यावांचून नेदर्लंडावर राज्य

---

witness Sir Thomas Gresham (Elizabeth's envoy) wrote "The Prince very nobly hath travailed, both night and day, to keep this town from manslaughter and from despoil, which doubtless had taken place, if he had not been-to the loss of 20,000 men; for that I never saw men so desperate willing to fight."

— *William's life by Fredrick Harrison. Page 73.*

करणें त्यास शक्य नाहीं. हा त्याचा निव्वळ भ्रम आहे असें त्यास वुइल्यमनें साधक-बाधक प्रमाणांनीं सिद्ध करून दिलें, तरीही त्याचें मन वळेना; तेव्हां 'देशाचें दुर्दैव' असे उद्गार काढून त्यानें त्याचा अखेरचा निरोप घेतला! त्यावेळीं उभयतांना गहिंवर येऊन त्यांनीं परस्परांस आलिंगन दिलें व दोघांचेही डोळे अश्रूंनीं भरून आले! पुन्हा आपली भेट होणार नाहीं असें दोघांनाही वाटत होतें व तेंच अखेर खरें ठरलें!

एग्मॉटची शेवटची मुलाखत घेतल्यानंतर परिस्थितीचा विचार करून वुइल्यमनें सर्व अधिकार सोडून कांहीं काल देशत्याग करण्याचा बेत केला. नवीन राजनिष्ठेची शपथ घेण्याचें त्यानें नाकारलें, परंतु ती घेण्याचा आग्रह जेव्हां रीजंटनें सुरू केला तेव्हां त्यानें आपल्या सर्व अधिकारांचा राजीनामा देऊन आपली सुटका करण्याकरितां ताबडतोब दुसरा मनुष्य पाठविण्याबद्दल रीजंटला लेखी विनंति केली. स्पेनमधून जें नवें सैन्य यावयाचें होतें तें येऊन पोंचल्याखेरीज वुइल्यमची राज्यकारभारांतून सुटका करण्यास रीजंट मॉर्गरेट ही तयार नव्हती. सबब तिनें 'तुमचा राजिनामा फिलिपच्या संमतिशिवाय मला मंजूर करतां येत नाहीं' असा जबाब दिला. परंतु वुइल्यमनें तिची ही सबब ऐकली नाहीं. आपल्या राजिनाम्याची एक प्रत त्यानें फिलिपकडे पाठवून त्यासोबत एक पत्रही पाठविलें. "नवीन शपथ पूर्वापार वहिवाटीच्या विरुद्ध असून आपल्या सद्सद्विवेकबुद्धीस ती पटत नसल्यामुळें ती घेतां येत नाहीं, याबद्दल दिलगिरी वाटते; पण ती घेण्याविषयीं आपला व रीजंटचा आग्रह असल्यामुळें मला राजिनामा देण्यावांचून दुसरें गत्यंतर नाहीं. तथापि अधिकारी या नात्यानें आपली सेवा करणें शक्य नसलें तरी प्रजाजन व नागरिक ह्या नात्यानें आपलें **खरें हित** साधण्याकरितां मी काय पाहिजे तें करण्यास तयार आहें." वगैरे औपचारिक मजकूर त्या पत्रांत होता. त्यानंतर त्यानें एग्मॉट, हॉर्न, बर्घेम वगैरे स्नेही व बरोबरीच्या मंडळींस आपल्या देशत्यागाचीं कारणें सांगून त्यांचा निरोप घेणारीं पत्रें लिहिलीं. तसेंच अँटवर्प येथील प्रॉटेस्टंट लोकांस शहरांत प्रार्थनाविधीची मनाई होण्याचा संभव असल्यामुळें व शहराबाहेरही जागा नसल्या-मुळें, तूर्त त्यांना देशत्याग करण्याचा त्यानें सल्ला दिला. हे लोक सर्वस्वीं निराश व हताश झालेले होते. त्यांना धीर देऊन वुइल्यमनें भावी कालाकडे आशापूर्ण नेत्रांनीं पाहण्यास सांगितलें. सध्यांचा आपला देशत्याग हा आपल्या देशाच्या

भावी उद्धाराचा पायाच आहे, असें त्यानें त्यांस सांगितलें. "प्रभातकाल होण्यापूर्वी जसा अंधकार असतो तशांतलाच हा प्रकार आहे. त्यामुळें हताश अथवा निराश होण्याचें कारण नाहीं" असें तो म्हणाला! त्याच्या हल्लींच्या स्थितीचें जर सूक्ष्म निरीक्षण केलें तर त्याचे हे उद्गार केवळ धाष्टर्याचेच द्योतक होते असें म्हणणें भाग आहे. जर्मनींत जाऊन तेथील व इतर ठिकाणची लष्करी मदत मिळवावयाची व तिच्या जोरावर नेदर्लंडवर स्वारी करून फिलिपची सत्ता हाणून पाडावयाची असा त्याचा संकल्प होता हें खरें; पण तो सिद्धीस नेणें किती तरी दुर्घट होतें! एग्मॉंट, हॉर्न वगैरे नेदर्लंडांतील प्रमुख सरदारांचें जर त्यास पाठबळ मिळतें तर देशांतल्या देशांत राहून त्यास परराष्ट्रांची मदत मिळविणें सुलभ गेलें असतें. परंतु आतां देशत्याग करण्याची पाळी आल्यामुळें त्याला आपल्या जहागिरी व सरंजाम या सर्वांस मुकावें लागलें! जवळ भरपूर पैसा असेल म्हणावें तर तसेंही नव्हतें; उलट त्यास कर्जच पुष्कळ होतें. कांहीं जड-जवाहीर त्याजपाशीं होतें व त्याचा त्याला उपयोगही झाला; पण तेवढ्यानें मोठ्या सैन्याची तयारी कशी होणार? त्याचा भाऊ लुई व जॉन हेही कर्जबाजारीच होते. अधिकार हातीं असल्यामुळें त्याला एक प्रकारचें महत्त्व होतें तेंही आतां नष्ट होणार होतें. या स्थित्यंतरामुळें खुद्द त्याची बायको ॲन ही देखील त्याच्यावर रुष्ट होऊन नेदर्लंडांत एकटीच राहण्यास तयार झाली होती! तिचें व त्याचें खडाष्टक पूर्वीच सुरू झालेलें असल्यामुळें तो गृहसौख्यालासुद्धां पारखा झालेला होता! असल्या परिस्थितींत फिलप-सारख्या बलाढ्य राजाच्या जुलुमापासून स्वदेशाचें रक्षण करण्याची, महत्त्वाकांक्षा धरणें हे केवढें धारिष्ट! पण वुइल्यमनें हें 'धारिष्ट जीवीं धरलें' होतें. यांत शंका नाहीं. ता. ११ एप्रिल इ. स. १५६७ रोजीं तो कांहीं व्यापारी व प्रॉटेस्टंट लोक यांच्यासह ॲंटवर्पहून ब्रेडा येथें जाण्यास निघाला. त्या-वेळीं हजारों लोक त्यास निरोप देण्यास शहराबाहेर आले होते. तो आपल्या परिवारासह ब्रेडा येथें सुमारें ११ दिवस राहिला. इतक्यांत, त्याला स्वतःच्या सुरक्षिततेविषयीं शंका येण्याजोगी कांहीं गोष्ट घडून आल्यावरून तो थोड्या लोकांनिशीं ग्रेव्हे येथें गेला व तेथून जर्मनीच्या सरहद्दीवर असलेल्या क्लेव्हज् शहरीं जाऊन नंतर सुमारें २ आठवड्यांनीं आपल्या परिवारासह डिलेनबर्ग शहरीं जाऊन राहिला.

मराठी ग्रंथ संग्रहालय नं. ... ता. ... ठाणे.

# प्रकरण ६ वें

## आल्हाची धुमश्रक्री

वुइल्यम नेदर्लंडांतून निघून गेल्यावर तें राष्ट्र पोरकें झालें! त्याच्या बरोबरीचे अधिकारी व सरदार–हॉर्न, एग्मॉंट, मेघॅम, मॅन्सफील्ड, हूग्स्ट्रेटेन व बर्लेमॉंट या सर्वांनीं मागील प्रकरणांत उल्लेखिलेली नवी राजनिष्ठेची शपथ घेतली असल्याकारणानें ते फिलिपच्या हुकमाचे बंदे गुलाम बनले होते. यांपैकीं मेघॅम, मॅन्सफील्ड व बर्लेमॉंट हे तर निखालस सरकारपक्षाचे होते. त्यांनीं आपलें मन व शरीर हीं दोन्ही सरकारास विकलीं होतीं. एग्मॉंटला लोकांच्या राजकीय हक्कांबद्दल बरीच आस्था होती; परंतु कॅथोलिक देवळांचा व त्यांतील मूर्तींचा विध्वंस करण्यास हे लोक प्रवृत्त झाल्यापासून त्याची त्यांच्याविषयींची सहानुभूति नष्ट होत चालली होती. त्यानें आपल्या ताब्यांतील फ्लँडर्स परगण्यांत वरील प्रकारचा अत्याचार करणारांचा सूड घेऊन 'संमतिपत्रा'न्वयें (Accord) इतर प्रांतांस मिळालेल्या धर्मविधीसंबंधाच्या सवलतीही लागू केल्या नाहींत! वुइल्यम स्वदेशांत असतांना त्याच्या दाबामुळें त्याला आपला रागाचा आवेश थोडासा तरी दाबून ठेवावा लागे. त्याच्या देशत्यागामुळें हा दाब नाहींसा होऊन त्याचें वर्तन उपरोक्त सरकारपक्षाच्या सरदारांच्या तोडीचें व त्यांच्याच कलाप्रमाणें होऊं लागलें. त्यामुळें लोकांचा जो कांहीं थोडासा विश्वास अद्याप त्याच्यावर होता तोही उडाला. वास्तविक त्याचें मन अद्याप सर्वस्वी गुलाम बनलेलें नव्हतें. आपल्या देशाच्या दुर्दशेची त्याला जाणीव असून त्याबद्दल त्याला हळहळही वाटत होती. परंतु तिचा परिहार फिलिपची मर्जी संपादून त्याचेकडूनच करून घेतला पाहिजे असें त्याचें मत होतें; आणि फिलिपच्या '**मधुतिष्ठति जिव्हाग्रे हृदये तु हलाहलं,**' अशा प्रकारच्या धोरणानें तें अधिक दृढ झालें होतें. त्याचें कपट अथवा त्याच्या अंतःकरणाच्या कुपींत सांठवून ठेवलेलें काळकूट विष यांची त्यास जाणीव उत्पन्न झाली नाहीं. इतका पोच अथवा धूर्तपणा त्याच्या अंगीं नव्हताच. जर असता तर वुइल्यमच्या उपदेशाचें व धोरणाचें रहस्य त्याला कळलें असतें व मग त्याच्यासारखा मोहरा फुसकीबारी

फिलिपच्या कपटनीतीस बळी पडण्याचा प्रसंग न येतां, तो नेदर्लंडच्या इतिहासास निराळें वळण देऊन, लोकपक्षाचा नियंता या नात्यानें चिरकाल सर्व जगाच्या आदरास पात्र झाला असता! त्यानें स्वीकारलेल्या मार्गामुळें तो जगाच्या आदरास पात्र होण्याऐवजीं अनुकंपेस मात्र पात्र झाला आहे! असो; हॉर्न व हुग्स्ट्रॅटेन हे दोघे लोकांचा कैवार घेणारे होते; परंतु एग्मॉट अथवा वुइल्यम यांच्याइतकें कर्तृत्व त्यांच्या अंगीं नसल्यामुळें आणि हॉर्न हा तर बहुतेक दरिद्री होत चालल्यामुळें त्यांच्या हातून लोकपक्षाला फारसें साहाय्य होण्याजोग नव्हतें. या परिस्थितीमुळें वुइल्यमच्या प्रयाणानंतर नेदर्लंडांत लवकरच जिकडे तिकडे सामसूम झालें! मॉर्गरेटनें लोकांत दहशत उत्पन्न करण्याकरितां ता. २४ मे १५६७ रोजीं एक नवें फर्मान काढलें. त्यांत पाखंडाचा म्हणजे प्रॉटेस्टंट, कॅल्व्हानिस्ट वगैरे मतांचा प्रसार करणारे व त्या मताचें अनुकरण करणारे आणि अशा लोकांस आश्रय देणारे, प्रॉटेस्टंट लोकांच्या सभेस आपल्या मुलास अथवा चाकरास पाठविणारे, त्या मताचीं पद्ये गाणारे; तत्संबंधी वाङ्मयाचा प्रसार व क्रयविक्रय करणारे, कॅथोलिक धर्मगुरूंची निंदा वा टवाळी करणारे, आपल्या मुलांचा जन्मसंस्कार कॅथोलिक मताप्रमाणें न करणारे आणि त्याकामीं दुसऱ्यास साहाय्य करणारे व कॅथोलिक मताखेरीज अन्यमतांचे विधी आणि आचार पाळणारे, या सर्वांस फांशीची शिक्षा फर्माविली होती!* हें फर्मान प्रसिद्ध झाल्यावर नेदर्लंडांतून पुष्कळ धनिक प्रॉटेस्टंट व हजारों कॅल्व्हानिस्ट लोक परदेशांत पळून जाऊं लागले. तेव्हां कांहीं दिवसांनीं पळून जाणारांस मदत करणें हा गुन्हा ठरविण्यांत येऊन त्यांसही देहांतशिक्षा फर्माविण्यांत आली! या फर्मानामुळें नेदर्लंड कांहीं काल ओसाड व चैतन्यहीन झालें! लोकांमध्ये सरकारी अधिकाऱ्यांस विरोध करण्याचें धैर्य व सामर्थ्य उरलें नाहीं, हें पाहून अधिकाऱ्यांनीं उपरोक्त फर्मानाची कसून अंमलबजावणी करून त्यांना जास्तच चेपून टाकण्याचा उद्योग आरंभिला. त्यांचें हें काम चालूं असतां, इकडे नेदर्लंडाच्या सरहद्दीवर आल्प्स् पर्वताच्या रोखानें स्पेनहून येणाऱ्या आल्व्हाच्या सैन्याच्या रणवाद्यांचा ध्वनि दुमदुमूं लागला! हें

---

* या फर्मानाची प्रत फिलिपकडे गेल्यावर त्यानें त्याच्या सौम्यपणाबद्दल (?) मॉर्गरेटला दोष दिला! फांशीच्या शिक्षेऐवजीं जिवंत जाळून मारण्याची शिक्षा ठरविणें जरूर असल्याचें त्यानें मॉर्गरेटला कळविलें! (मोटलेकृत डच रिपब्लीकच्या उदयाचा इतिहास पहा.)

हें सैन्य तयार होत असल्याच्या बातम्या नेदर्लंडांत पूर्वीच येऊन पोंचल्या होत्या. फिलिपनें सुमारें एक वर्षापूर्वीच मॉर्गेरेटला त्याची बातमी गुप्तपणें कळविली होती. ती कळतांच, त्या सैन्याचें आधिपत्य आल्व्हास न देतां खुद्द फिलिपनें तें स्वीकारावें व त्यानें स्वत: नेदर्लंडांत यावें, त्याखेरीज तेथें शांतता होणार नाहीं असें तिनें त्यास आपलें मत कळविलें होतें; परंतु फिलिपनें त्याकडे लक्ष दिलें नाहीं. तथापि त्या सैन्याबरोबर आपण येणार असल्याचें कळवून तसें जाहीर करण्याबद्दल त्यानें तिला आज्ञा केली होती. वस्तुतः फिलिपचा येण्याचा विचार मुळींच नव्हता. परंतु 'खुद्द राजा येऊन तुमचें म्हणणें ऐकून घेऊन तुमच्या तक्रारी दूर करील' ह्या आश्वासनानें नेदर्लंडच्या लोकांस रीजंटला खेळवितां यावें व तिलाही खरें वाटावें म्हणून त्यानें वरीलप्रमाणें तिला कळविलें होतें. अर्थात् अखेरीस एकटा आल्व्हाच हें सैन्य घेऊन आल्यामुळें तिला खेद वाटला व कांहींसा रागही आला. त्या रागाच्या भरांत तिनें फिलिपला पत्र लिहून आल्व्हाच्या अधिकाराची मर्यादा तरी किती म्हणून पृच्छा केली आणि तो स्वतः न आल्याबद्दल निराशा व दिलगिरी प्रदर्शित केली ! पण फिलिपनें ह्या पत्राकडे लक्षच दिलें नाहीं ! असो; आल्व्हाबरोबर आलेलें सैन्य हें स्पेनमधल्या निवडक व कसलेल्या शिपायांचें होतें. त्यांत ९ हजार पायदळ व १२०० घोडेस्वार होते. शिवाय २ हजार लहान मोठे लष्करी अधिकारी असून ते त्या वेळच्या युद्धकलेंत निष्णात होते. त्यांचे पोषाख भपकेदार असून आश्चर्य व भय उत्पन्न करणारे होते. त्यांच्याबरोबर असलेलें रणसाहित्य अगदीं पहिल्या प्रतीचें असून त्यांना लागणारें इतर सामान—कपडालत्ता खाद्यपेय वगैरे—त्यांच्यापाशीं मुबलक होतें. त्यांचा लढण्याचा उत्साह व दम अव्वल दर्जाचा होता. एकंदरींत युद्धाचें यंत्र या दृष्टीनें तें सैन्य इतकें उत्तम होतें कीं, त्या वेळीं युरोपात संख्येनें त्यांच्याशीं सम असणारें दुसरें कोणतेंही सैन्य त्यांची बरोबरी करण्यास समर्थ नव्हतें असें तज्ज्ञांचें मत आहे. ह्या सैन्याचा मुख्य अधिपति जो ड्यूक ऑफ आल्व्हा तोही नामांकित योद्धा व सेनापति होता. तो या वेळीं ६० वर्षांचा होता. तथापि त्याचा रंगेल-पणा, कडवेपणा व युद्धविषयक उत्साह बिलकुल कमी झालेला नव्हता. त्याचा चेहरा उग्र, कपाळ भव्य, नाक सरळ, मोठें व अणकुचिदार, डोळे पाणीदार, काळेभोर व क्रूरपणाची झांक मारणारे, मिशा व दाढी करड्या रंगाची व भव्य असून त्याचा बांधा मजबूत, उंच व धिप्पाड होता. वयपरत्वें त्यास थोडेसें वार्धक्य

आलेलें असून **गाउट** (संधिवाताचा एक प्रकार) नामक रोगाचाही प्रादुर्भाव त्याचे ठायीं झालेला होता. तथापि त्याची इच्छाशक्ति व श्रमसाहस करण्याची प्रवृत्ति अद्याप दुर्बल झालेली नव्हती. त्याचा जन्म बेझंटाईन बादशहाच्या राजघराण्यांत झालेला होता (इ. स. १५०८). अल्पवयांत त्याचा बाप वारल्यामुळें त्याच्या आजानें त्याचा परिपाळ केला. हा आजा मोठा शूर लढवय्या असल्याकारणानें लहानपणापासूनच आल्व्हास लष्करी शिक्षण मिळालेलें होतें. वयाच्या १६ व्या वर्षीं त्यानें एका लढाईंत शौर्य गाजवून विजय मिळविला होता. इ. स. १५३० मध्यें फिलिपच्या बापाबरोबर तुर्कांशीं लढण्याकरितां तो गेला होता. त्या युद्धांत त्याचें लष्करी तेज व कौशल्य हीं विशेष दृष्टोत्पत्तीस आलीं. आणि तेव्हांपासून तो स्पॅनिश सैन्याचा एक प्रख्यात सेनानी–जनरल होऊन राहिला. लष्करीदृष्ट्या तो अगदीं पहिल्या प्रतीचा पुरुष होता. त्याच्या अंगीं मुत्सद्याचे गुण प्रायः कांहींच नव्हते म्हटलें तरी चालेल कॅथोलिक धर्माचा तो कट्टा भक्त असून (फिलिपप्रमाणेंच) तद्विरुद्ध पंथांचा कट्टा दुस्मान होता. त्याचें धर्मवेड फिलिपच्या धर्मवेडाला मागें सारणारें होतें! फिलिपच्या धर्मवेडांत राजकीय हेतु होता तसें याचें नव्हतें. कॅथोलिक पंथाविषयीं जाज्वल्य भक्ति हीच मुख्यतः त्याच्या धर्मविषयक जुलमाची जननी होती. व्यक्तिशः पाहिलें तर तो अगदीं साधा माणूस होता. त्याच्या अंगीं नांवाजण्याजोगा असा कोणताच सद्गुण नव्हता. रुधिरप्रियता, सूडाची वासना व क्रौर्य हे त्याच्या अंगचे मुख्य दुर्गुण होते. तो पैशाचा मोठा लोभी असून मितव्ययी असल्यानें त्याचें उत्पन्न थोडें असूनही त्यानें पुष्कळ संपत्ति संग्रहित केली होती. तो लोकांत फारसा मिसळत नसे व कारणावांचून दुसऱ्यास आपल्या मुलाखतीस येऊं देत नसे. त्याची शिस्त कडक असून हाताखालच्या नोकरांवर त्याची चांगली जरब असे त्याचा आत्मविश्वास स्पृहणीय होता. त्याची कोणी स्तुति अथवा निंदा केल्यास त्याकडे तो बिलकुल लक्ष देत नसे. वुइल्यमला पुढें ज्याच्याबरोबर सामना करणें भाग पडलें व ज्यानें आपल्या क्रूर कृत्यांनीं कांही काल नेदर्लंडांत रक्ताचे पूर वाहविले, तो इतिहासप्रसिद्ध आल्व्हा, वरील प्रकारचा मनुष्य–कोणी त्यास सैतान म्हणतात–होता. इ. स. १५६६ च्या डिसेंबर महिन्यांत नेदर्लंडवर स्वारी करण्यास तयार असलेल्या उपरोक्त सैन्याचें त्यास अधिपति नेमण्यांत आलें होतें. परंतु अनेक कारणांमुळें इ. स. १५६७ च्या मे महिन्यापर्यंत स्पेनमधून त्याची रवानगी होऊं शकली

नाहीं. अखेरीस ता० १० मे रोजीं स्पेनच्या कार्थेजेना बंदरांतून हें सैन्य निघालें तें जिनोआ येथें येऊन तेथून खुष्कीच्या मार्गानें आल्प्स, माऊंट केनीस, सॅव्हॉय, बर्गंडे, लॉरेन वगैरे प्रदेशांतून ऑगस्टच्या अखेरीस लक्झेंबर्ग संस्थानच्या सरहद्दी-वरील चिनव्हिले शहरीं येऊन दाखल झालें. तेथें बर्लेमॉंट व नॉयरकार्म्स यांनीं मॉर्गरेटच्या वतीनें त्यांचें सरकारी रीतीनें स्वागत केले. ता. २२ ऑगस्ट रोजीं आल्व्हा ह्या सैन्यासह टिर्लेमॉंट शहरीं येऊन पोंचला; तेव्हां त्यास एग्मॉंट व हॉर्न हे सामोरे गेले. त्यांस दुरून पाहून एग्मॉंटसंबंधानें तिरस्कारबुद्धीनें 'हा वडा पाखंडी येत आहे' असें आल्व्हा आपल्या भोंवतालच्या मंडळीस म्हणाला !' त्याला कैद करून २४ तासांच्या आंत त्याचा अवतार संपविण्याविषयींचा फिलिपचा हुकूम त्याच्या खिशांत होता; पण या प्रसंगीं त्यानें त्याची ओळख दिली नाहीं. त्यानें सभ्य-पणानें त्याची मुलाखत घेतली व त्याच्याशीं संभाषण करीत तो पुढील मुक्कामास निघून गेला. टिर्लेमॉंट येथून तो लूव्हेन शहरीं गेला. तेथील प्रख्यात विद्यापीठांत वुइल्यम दि सायलेंटचा वडील पुत्र फिलिप ऊर्फ काउंट ब्यूरन हा शिकत होता. (त्याचें वय अवघें १३ वर्षांचें असून त्यास वुइल्यमनें नेदर्लंडांतील आपल्या जहागिरीचा वारस म्हणून तेथें ठेविलें होतें. ही त्याच्या हातून मोठी चूक झाली असें पुढें त्यास अनुभवानें कळून आलें व त्या चुकीचा परिणामही फार अनिष्ट झाला.) आल्व्हानें या मुलाची गांठ घेतली व त्यास माया दाखवून त्यानें त्याचें मन आपणांकडे ओढून घेतलें. नंतर एक पायदळ पलटण व थोडेसे घोडेस्वार बरोबर घेऊन तो ब्रुसेल्स शहरीं गेला. तेथें मॉर्गरेटची गांठ घेऊन त्यानें तिला आपलीं अधिकारपत्रें दाखविलीं. (मात्र कांहीं गुप्त हुकूम होते ते दाखविले नाहीत.) मॉर्गरेटनें त्याचें वरकरणी औपचारिक स्वागत (कारण त्याचें येणें तिला मनांतून आवडलें नाहीं) केल्यावर सुमारें एक तास उभयतांचें संभाषण झालें. त्या-वेळीं आल्व्हानें बहुतेक सर्व प्रमुख शहरांत आपल्या लष्कराचीं ठाणीं बसविण्याचा आपला विचार असल्याचें कळवून त्या कामीं सहाय्य करण्याबद्दल तिला विनंति केली व तो पुढील योजना करण्यास्तव आपल्या मुक्कामास निघून गेला. आल्व्हाची नेमणूक तूर्त 'कॅप्टन जनरल' म्हणून झालेली होती व त्यानें मॉर्गरेटच्या सहाय्यानें आपलें काम करावें, असें त्याच्या सरकारी अधिकारपत्रांत लिहिलें होतें. परंतु फिलिपनें खासगी रीतीनें त्यास नेदर्लंडांत आपल्या नांवानें वाटेल तें करण्याची मुभा दिली होती. सबब लवकरच त्यानें मॉर्गरेटला धाब्यावर बसवून

नेदर्लंडच्या कारभाराचीं सर्व सूत्रें आपल्या हातीं घेतलीं. मात्र बाह्यतः तिच्या अधिकाराचा अथवा तिचा बोज त्यानें राखला होता. एग्मॉटच्या राजवाड्यानजीक असलेल्या मॅडम डी जेसे नामक बाईच्या वाड्यांत आल्व्हानें आपलें ठाणें दिलें होतें. तेथें आपल्या राहण्याची व कचेरीची व्यवस्था केल्यानंतर त्यानें सर्व प्रांतिक व म्युनिसिपल अधिकाऱ्यांस आपापल्या हद्दींत स्पॅनिश लष्करांची ठाणीं बसविण्यास मदत करण्याविषयीं बरोबर आणलेले फिलिपचे हुकूम—त्यांवर मॉर्गरेटच्या संमतीचे शेरे घेऊन—पाठविले. ह्या हुकुमांत फिलिपनें नेदर्लंडांतील सर्व अधिकाऱ्यांस, " आपण लवकरच नेदर्लंडांत येणार आहों व तोंपर्यंत आल्व्हाची आज्ञा पाळून त्यास सर्व प्रकारें सहाय्य करावें " अशी आज्ञा केली होती. त्यास अनुसरून आल्व्हानें ब्रुसेल्स, घेंट, अँटवर्प, मेक्लीन, अमस्टरडॅम, वगैरे बहुतेक प्रमुख शहरांत आपल्या सैन्याचीं ठाणीं बसविलीं व तेथील म्युनिसिपल अधिकाऱ्यांकडून त्या त्या शहरांच्या दरवाजांच्या किल्ल्या हस्तगत करून त्या आपल्या सैनिकांच्या हवालीं केल्या. ह्या सैन्याची स्थिरस्थावर होईपर्यंत एग्मॉट, हॉर्न वगैरे सरदारांशीं लाघवीपणाचें वर्तन ठेवून त्यानें त्यांस मोहून टाकलें! एग्मॉट यास तर त्यानें मेजवान्या व नजराणे यांनीं सर्वस्वी आपलेसें करून घेतलें होतें. त्याच्या ह्या वर्तनाच्या मुळाशीं दगा करण्याचा हेतू असल्याबद्दलच्या पुष्कळ सूचना एग्मॉटच्या मित्रांनीं त्यांस दिल्या व त्यामुळें तो कांहींसा शंकित व सचिंतही झाला; पण फिलिपकडून येणारीं स्तुतिपर पत्रें व आल्व्हाचे कृपाकटाक्ष यांचाच त्याच्या मनावर विशेष पगडा बसून तो अखेरपर्यंत बेसावधच राहिला! त्याच्या ह्या मनोवृत्तीचें कोडें उकलणें कठीण आहे, तथापि ती तिरस्कारार्ह होती असें अमेरिकन इतिहासकार मोटले याचें मत आहे. असो. प्रत्येक प्रमुख शहरीं आपल्या सैन्याच्या पलटणी व त्यांवर करडे अधिकारी ठेविल्यानंतर, आल्व्हानें एग्मॉट, हॉर्न व हुग्स्ट्रॅटेन यांस दगलबाजीनें पकडण्याची योजना केली. आल्व्हा ब्रुसेल्स शहरीं आला तेव्हां हॉर्न व हूगस्ट्रॅटेन हे आपापल्या गांवीं गेलेले होते. आल्व्हानें त्यांना मधाचें बोट दाखवून आपल्या जाळ्यांत ओढण्याचे पुष्कळ प्रयत्न केले; परंतु कांहीं ना कांहीं तरी सबबीवर त्यांनीं त्याची गांठ घेण्याचें लांबणीवर टाकलें होतें. तथापि एग्मॉटनें त्यांची खातरजमा करून त्यांस भेटीस येण्याचा आग्रह केल्यावर त्यांनीं येण्याचें कबूल केलें. त्याप्रमाणें १५६७च्या सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यांत हॉर्न ब्रुसेल्स शहरीं आला व आल्व्हानें त्याचें सत्कार-

पूर्वक स्वागत करून त्यास गोड बोलून गार केलें. हूग्स्ट्रटेनही येण्यास निघाला, पण वाटेंत त्यास अपघात होऊन त्याच्या हातास दुखापत झाल्यामुळें तो हॉर्नच्या बरोबर येऊं शकला नाहीं; तथापि त्याच्या अपघाताची हकीकत एग्मॉट, हॉर्न, आल्हा यांस माहीत नसल्यामुळें तो ठरल्या वेळीं येईल असें त्यांस वाटत होतें. ह्या सर्वांना एकदम पकडण्याकरितां ता. ९ सप्टेंबर रोजीं संध्याकाळीं आल्हानें आपला दासीपुत्र फर्डिनंड–हा नेदर्लंडांतील सैन्याच्या एका विभागाचा सेनापती होता–याच्याकडून एक मेजवानी करविली आणि जेवणखाण झाल्यानंतर ह्या सरदारांस कांहीं महत्त्वाच्या सरकारी कामासंबंधीं वाटाघाट करण्याच्या निमित्तानें आपणांकडे पाठवून देण्याची त्यानें त्यास सूचना देऊन ठेवली. फर्डिनंड व एग्मॉट हे पूर्वी कांहीं काल एके ठिकाणीं राहिलेले होते व एग्मॉटच्या शौर्यधैर्यादि गुणांबद्दल फर्डिनंडला कौतुक वाटत होतें म्हणून त्याचा प्राण वांचविण्याच्या हेतूनें त्यानें त्यास जेवणखाण आटोपतांच निघून जाण्याबद्दल गुप्त रीतीनें इषारा दिला. तेव्हां एग्मॉटच्या मनाची चलबिचल होऊन तो निघण्यास तयार झाला; पण इतक्यांत त्याची ती चलबिचल ओळखून नॉयरकार्म्सनें त्याला एका बाजूस नेऊन तिचें कारण विचारलें; तेव्हां आल्हाच्या हेतूबद्दल त्यानें शंका प्रदर्शित केली. पण नॉयरकार्म्सनें ती अनुचित आहे असें सांगून आल्हावर विश्वास ठेवण्याचा आग्रह केला. तेव्हां पुन्हा त्याचें मन द्विधा होऊन अखेर नॉयरकार्म्सचीच सल्ला त्यानें ऐकली. झालें, ठरल्याप्रमाणें तो, हॉर्न, नॉयरकार्म्स व इतर कांहीं बडे अधिकारी आल्हाच्या घरीं निघून गेले. तेथें रात्रीं ९ वाजेपर्यंत अँटवर्प किल्ल्याच्या भावी योजनेसंबंधीं चर्चा झाल्यानंतर आल्हा व इतर मंडळी उठून गेली आणि एग्मॉट व हॉर्न हेही निघाले असतां त्यांस आल्हाच्या लष्करी अधिकाऱ्यांनीं पकडून त्यांच्या तरवारी काढून घेऊन त्यांना त्याच घरांत परंतु वेगवेगळ्या खोल्यांत कोंडून टाकलें ! दुसऱ्या दिवशीं एग्मॉटचा खासगी कारभारी बकरझील व हॉर्नचा लू आणि अँटवर्पचा मुख्य म्युनिसिपल अधिकारी व्हान स्ट्रॅलेन या प्रख्यात लोकांस पकडून आल्हानें त्यांचे हाल-हाल केले ! एग्मॉट व हॉर्न यांस पकडल्याची बातमी, ताबडतोब चोहोंकडे पसरली आणि त्यांच्यासारख्या पूर्ण राजनिष्ठ व कॅथोलिक मताभिमानी बड्या सरदारांवरही आल्हानें झडप घातलेली पाहून कॅथोलिक, प्रॉटेस्टंट, कॅल्व्हानिस्ट वगैरे सर्व पंथांच्या लोकांच्या पोटांत सारखीच धडकी भरली ! फिलिपचा रोष व कटाक्ष मुख्यतः प्रॉटेस्टंट व कॅल्व्हानिस्ट

मतांच्या अनुयायांवर होता. कॅथोलिक मतांच्या लोकांचा तो परिपालक व पुरस्कर्ता होता; इतकेंच नव्हे तर, त्या मताच्या संरक्षणाकरितां त्यानें नेदर्लंडच्या धर्मसुधारकांशीं युद्ध चालविलें होतें. तेव्हां त्याच्या हातून त्याच्या इच्छेस अनुसरून वागणाऱ्या कॅथोलिकधर्मीय एग्मॉटवर तरी शस्त्र उचललें जाणार नाहीं असें पुष्कळ लोकांस वाटत होतें. आल्व्हानें त्यांच्या ह्या समजुतीस वरील-प्रमाणें आकस्मिक रीतीनें धक्का दिल्यामुळें ते अगदीं चकित व भयभीत झाले ! आतां हा राक्षस केव्हां कोणावर झडप घालील त्याचा नेम नाहीं असें वाटून ते हवालदिल झाले ! आपल्या मित्रांच्या अटकेची बातमी हुग्स्ट्रॅटेन यास—तो जखमी झाल्यामुळें थांबलेल्या ठिकाणीं—समजतांच तो ह्या राक्षसाच्या तावडींतून निसटण्याकरितां जर्मन सरहद्दीकडे निघून गेला.

एग्मॉट, हॉर्न व त्यांचे कारभारी यांना पकडून कोंडून ठेवल्यानंतर आल्व्हानें राजद्रोहाच्या गुन्ह्यांची चौकशी करून शासन करण्याकरितां एक छोटेंसें व स्वतंत्र न्यायमंडळ स्थापन केलें. या मंडळाच्या कृतीवरून तें 'रुधिरप्रिय मंडळ' ( blood-council ) या नांवानें पुढें प्रसिद्धी पावलें. त्यास 'न्यायमंडळ' ( tribunal ) अशी संज्ञा देणें म्हणजे त्याची थट्टा करणें होय ! ह्या मंडळाचा अध्यक्ष स्वतः आल्व्हा असून त्याजपुढें येणाऱ्या खटल्यांचा अखेर निकाल देण्याचा अधिकार फक्त त्याच्या एकट्याच्याच हातीं होता. डेलरिओ व व्हर्गास ह्या दोन स्पॅनिश सभासदांस त्या कामीं मत देण्याचा अधिकार होता; पण त्यांच्या मताप्रमाणें वागण्यास आल्व्हा बांधलेला नव्हता. दुसरे नॉयरकार्म्स, बर्लेमॉट, वगैरे दहा बारा नेदर्लंडांतील जे बडे लोक ह्या मंडळाचे सभासद होते त्यांना मत देण्याचा सुद्धां अधिकार नव्हता. पुढें आलेल्या खटल्यांचे कागदपत्र सजवून ते आल्व्हाकडे पाठविणें एवढेंच चिटणीशी काम त्यांच्याकडे होतें. त्यांत कोणाही चांगल्या कायदेपंडिताचा समावेश केलेला नव्हता.† एकंदरींत कायदा, न्याय व नीति यांस धाब्यावर बसवून 'हम करेसो कायदा' या तत्त्वावर ह्या कौन्सिलची ऊर्फ मंडळाची रचना झालेली होती. अमेरिकन इतिहासकार मोटले

† आल्व्हानें असें मुद्दामच केलें होतें. फिलिपला यासंबंधीं लिहिलेल्या खासगी पत्रांत तो म्हणतोः—" कायदेपंडित, यांचा कल शाबीत झालेल्या गुन्ह्यांसच शासन करण्याकडे असतो. परंतु येथें आपणांस गुन्ह्याच्या शाबिती नाशाबितीकडे लक्ष देऊन सोय नाहीं हें आपण जाणताच." —मोटले.

यानें त्यास 'खासगी क्लबा'ची उपमा दिली आहे. त्याच्या स्थापनेस फिलिपची खासगी संमति होती, परंतु कायदेशीर अशा लेखी संमतीचा अथवा सनदेचा त्यास आधार नव्हता. आल्हा हाच त्याचा उत्पादक, चालक व नियंत्रक होता. ह्या मंडळाच्या नांवानें राजद्रोहाची व्याख्या करण्याचा, तदनुसार चालणाऱ्या खटल्यांचे मियम करण्याचा आणि अखेर गुन्हेगारास शासन करण्याचा असे त्रिविध अधिकार त्याच्याच हातीं होते ! त्यानें थोड्याच दिवसांत नेदर्लंडांतील सर्व प्रांतिक व म्युनिसिपल कोर्टांचे अधिकार काढून घेऊन न्याय व अंमलबजावणी ह्या दोन्ही खात्यांचीं सूत्रें ह्या मंडळाच्या नांवावर आपल्या हातीं घेतलीं ! मॉर्गरेटचें स्टेट-कौन्सिल अद्याप जीव धरून होतें; पण तें या मंडळानें लवकरच निर्माल्यवत् करून टाकलें. आल्हाचें हें धोरण मॉर्गरेटला पसंत पडलें नाहीं व त्याबद्दल तिच्या व त्याच्या दरम्यान् बाचाबाचीही सुरू झाली होती. परंतु आल्हानें तिच्या मनोवृत्तीकडे लक्ष न देतां, मात्र तिचा उघडपणें उपमर्द न करण्याची खबरदारी घेऊन आपलें काम तसेंच चालू ठेविलें. तेव्हां मॉर्गरेट फिलिपकडे वारंवार तक्रार करून कंटाळली व अखेर आपला राजिनामा घेण्याबद्दल तिनें विनंति केली. त्यानें ती मान्य करून तिला पेन्शनींत काढलें. तेव्हां ती आपल्या अधिकाराचीं सूत्रें आल्हाच्या स्वाधीन करून नेदर्लंडांतून निघून गेली (डिसेंबर १५६७). आल्हाच्या जुलमाच्या छायेपुढें तेथील लोकांस तिच्या जुलमाची छटा अंधुक दिसूं लागल्यामुळें तिच्या प्रयाणसमयीं त्यांपैकीं पुष्कळांच्या मनांत तिजविषयीं सहानुभूति उत्पन्न झाली व कांहीं लोकांनीं तर तिला जातेसमयीं नजराणेही दिले.

मॉर्गरेट निघून गेल्यावर फिलिपनें आल्हास नेदर्लंडचा गव्हर्नर जनरल नेमलें व तेथें आपल्या नांवें चालणारी सर्व मुलकी व लष्करी सत्ता चालविण्याची त्यास पूर्ण अखत्यारी दिली. ती मिळतांच आल्हानें परिक्षितीच्या सर्पसत्राप्रमाणें नेदर्लंडांत मानवसत्र सुरू केलें ! त्याचा दुय्यम व्हर्गास हा तर केवळ सैतान होता ! मनुष्याचा जीव घेणें व त्यांतच आनंद मानणें हा त्याचा जातिस्वभाव बनला होता ! मताधिकारी दुसरा कौन्सिलर डेलरिओ हा केवळ 'होयबा' होता; त्यामुळें आल्हाचा आपल्या सहकाऱ्यांशीं मतभेद होण्याचा प्रसंगच येत नसे. कॅथोलिक मताहून अन्य मताचा प्रसार करणें, अथवा त्या प्रसारास मदत करणें, अन्य मतांच्या लोकांस आश्रय देणें, त्यांना पळून जाण्यास मदत करणें, आल्हाच्या अधिकाऱ्यांचा उपमर्द करणें व त्यांस आपलें कर्तव्य बजावण्याच्या

कामीं मदत न करणें, त्याच्या—सरकारच्या—कृत्यांविरुद्ध नापसंती दर्शविणें वगैरे गोष्टींचा राजद्रोहांत समावेश करण्यांत आला होता. ह्या गुन्ह्यांची चौकशी करण्याची पद्धतीही अगदीं साधी व सोपी होती. त्यांचा तपास करण्याकरतां कांहीं विशिष्ट अधिकारी नेमण्यांत आले होते. त्यांनीं खऱ्या अथवा खोट्या संशयावरून गुन्हेगारास अटक करावी, त्याच्या घरादाराची झडती घ्यावी, व त्याच्यावरील आरोपाची याद पुराव्याच्या कागदपत्रांसह कौन्सिलकडे पाठवावी. नंतर कौन्सिलच्या मताधिकार नसलेल्या सभासदांनीं ते कागदपत्र पाहून गुन्ह्याच्या शाबितीसंबंधानें थोडक्यांत आपला अभिप्राय घ्यावा व तो पाहून व्हर्गास आणि डेलरिओ यांनीं देहांतशासन मिळण्याबद्दल शिफारस करावी व ती आल्व्हानें मान्य करावी. नंतर ती शिक्षा आरोपीस कळविण्यांत येऊन तावडतोब अमलांत यावयाची व त्याची सर्व मालमत्ता सरकारजमा व्हावयाची, असा क्रम चालू झाला. आरोपीला साक्षीपुरावा देण्याचा अथवा वकिलामार्फत आपल्यातर्फे काम चालविण्याचा अधिकार नव्हता ! याप्रमाणें रोजच्या रोज शेंकडों गुन्हेगारांना या कौन्सिलच्या हुकमावरून पंचत्वास पोचविण्याचा व त्यांच्या मालमत्तेचें हरण करण्याचा सपाटा सुरू झाला. प्रत्येक गांवांत—खेड्यापाड्यांत सुद्धां रोज कांहींतरी माणसें—स्त्री व पुरुष मिळून—ह्या कौन्सिलच्या सत्राम बळी पडूं लागलीं !! कौन्सिलची न्यायपद्धति किती चोख व सोपी होती हें वर सांगितलेंच आहे. तथापि रोजच्या रोज शेंकडों नवे गुन्हेगार उत्पन्न होऊं लागल्यामुळें इतक्या सुलभ रीतीनेंही त्यांचा भराभर निकाल करणें कौन्सिलच्या सभासदांस जड जाऊं लागलें ! पुष्कळ खटल्यांचे कागद तुंबून राहूं लागले ! त्यामुळे पुष्कळ गुन्हेगारांना स्वर्गाची वाट पहात तिष्ठत बसावें लागे ! ही गोष्ट धर्मशील आल्व्हास कशी रुचणार? पृथ्वीवरील पाखंडी लोकांचा भूभार उतरून आकाशांतील बापास संतुष्ट करण्याकरितांच आपला अवतार आहे अशी त्याची समजूत होती ! अर्थात् वरील पापी प्राण्यांस त्यांच्या पापाची कौन्सिलच्या दप्तरीं नोंद झाल्यावर कांहीं दिवस जिवंत ठेवणें म्हणजे आपल्या प्रभूशीं प्रतारणा करणें होय, असें त्यास वाटल्यास त्यांत कांहीं नवल नाही. परंतु ह्या संकटांतून त्याला त्याच्या प्रभूच्या पृथ्वीवरील प्रमुख पट्टशिष्यानें लौकरच मुक्त केलें. ह्या कौन्सिलची ही अडचण दूर करण्याकरितां रोमच्या पोपनें इ. स. १५६८ च्या फेब्रुवारी महिन्यांत नेदर्लंडांतील सर्व लोकांस—कांहीं पाखंडी व बाकीचे त्यास मदत करणारे म्हणून—गुन्हेगार ठरवून देहांत-

शासनास पात्र ठरविलें! धर्मगुरूची ही आज्ञा शिरसावंद्य मानून फिलिपनें त्यावर आपल्या राजकीय अधिकाराचें शिक्कामोर्तब केलें व ती अमलांत आणण्याचा आल्हास हुकूम केला! ह्या हुकमामुळें इतःपर गुन्हेगारांचा तपास व चौकशी करण्याची यातायात करण्याचें आल्हास प्रयोजन उरलें नाहीं. श्रीमंत लोकांस भय दाखवून त्यांच्या-कडून पैसे उकळून, स्पेनची रिकामी असलेली तिजोरी भरण्यासही त्यास त्यामुळें चांगलें फावलें. अशा रीतीनें पुष्कळ संपत्ति त्यानें मिळविली. तसेंच २।३ महिन्यांत सुमारें १८०० लोकांस फांशीं देऊन त्यांची मालमत्ता त्यानें जप्त केली!! हें मानवसत्र चालू असतां इकडे ता० २८ जानेवारी इ. स. १५६८ रोजीं त्यानें एका जाहिरनाम्याच्या द्वारें वुइल्यम दि सायलेंट ऊर्फ प्रिन्स ऑफ ऑरेंज, लुईस ऑफ नासू (त्याचा भाऊ,) काऊंट हुग्स्ट्रेटेन, क्यूलेंबर्ग इत्यादि सरदारांवर राजद्रोहाचा आरोप ठेवून त्यांस त्याचा जाब देण्याकरितां ४२ दिवसांच्या आंत ब्लडकौन्सिलसमोर हजर होण्याविषयीं आज्ञापत्र काढलें व त्याची एक प्रत जर्मन बादशहा मॅक्समिलियन याच्यामार्फत वुइल्यमकडे पाठविली. वुइल्यम ह्यावेळीं आपल्या देशाच्या करुणास्पद स्थितीचा विचार करण्यांत व ती दूर करण्यासाठीं जर्मन संस्थानिकांचें आर्जव करण्यांत गुंतला होता त्याच्यावर फिलिपची सत्ता उलथून पाडण्याकरितां कट केल्याचा व आपलें कर्तव्य बजावण्याच्या मिषानें अँटवर्प येथील पाखंडी लोकांस अत्याचारास उत्तेजन दिल्याचा आरोप केलेला होता. तो पहिल्या प्रतीचा बडा सरदार, संस्थानिक व राजकुलांतला पुरुष असल्यामुळें असल्या आरोपांवरून त्याची चौकशी करणें झाल्यास ती खुद्द फिलीप –म्हणजे राजा–व त्याच्या बरोबरीचे सरदार यांच्या कोर्टामार्फत झाली पाहिजे असा कायदा होता. तो फिलिपच्या आज्ञेवरून धाब्यावर बसविण्यास आल्हा तयार झाला होता हें खरें; पण त्याच्या त्या कृत्यास संमति देण्यास वुइल्यम कायद्यानें बांधलेला नसल्यामुळें, त्यानें त्याचें वरील आज्ञापत्र बेकायदेशीर ठरवून त्यास चौकशी करण्याचा मुळींच अधिकार नाहीं असें जाहीर केलें. जर्मन बादशहानें त्याच्याशीं सामोपचारानें वागण्याची फिलिपला सल्ला दिली; परंतु सामोपचाराच्या गोष्टी बोलण्यापूर्वी प्रथम त्यानें आपल्या गव्हर्नर जनरलच्या स्वाधीन झालें पाहिजे असें त्यास फिलिपनें स्पष्ट कळविलें! त्यानंतर ७।८ दिवसांनीं आल्हानें वुइल्यमचा वडील पुत्र काऊंट ब्यूरेन यास ल्यूव्हेन येथील विद्यापीठांतून-तेथील अधिकाऱ्यांस न कळूं न देतां-फुसलावून नेऊन स्पेनला पाठवून दिलें. तो मुलगा यावेळीं फक्त

१३।१४ वर्षाचा असल्यामुळें त्याला आपल्या बापाच्या मनोवृत्तीचें व विचारांचें ज्ञान नव्हतें त्यास मेजवान्या, नजराणे व मिठास भाषणें ह्यांची मोहनी घालून व "तुमच्याच कल्याणाकरितां फिलीप तुम्हावर प्रसन्न होऊन स्पेनमध्यें उच्च प्रकारचें शिक्षण संपादण्यासाठीं तुम्हास नेण्याची इच्छा करीत आहे" अशा अर्थाची थाप मारून त्या मुलास त्याच्या खुषीनें स्पेनमध्यें पाठविण्यांत आलें! तेथें सुमारें २० वर्षें तो त्याच्या कैदेंत होता* व तेवढ्या अवधींत फिलिपनें त्यास स्पॅनिश पद्धतीचें व संस्कृतीचें इतकें उत्तम शिक्षण दिलें कीं, पुढें त्याला आपल्या देशाची व खुद्द बापाचीही ओळख राहिली नाहीं. विचारानें व आचारानें तो नखशिखांत स्पॅनिश सरदार बनून राहिला व आपल्या बापाच्या देशोद्धाराच्या पवित्र कार्यास अडथळा करण्यास प्रवृत्त झाला! वुइल्यमनें जातांना मॉर्गरेटजवळ असलेली आपली ३ वर्षांची मुलगी मेरी नेली परंतु अनेक कारणांमुळें ह्या मुलास त्यानें नेदर्लंडांतच ठेवलें. पण ही आपण मोठी चूक केली असें पुढें त्यास आढळून आलें; व ती दुरुस्त करण्याच्या मर्यादेपलीकडे गेलेली पाहून त्यास फार वाईट वाटलें! आल्व्हानें उपरोक्त आज्ञा-पत्रांतील ४२ दिवसांची मुदत संपल्यानंतर त्यानें वुइल्यम व मागें सांगितलेले इतर सरदार (तेही या मुदतींत हजर झाले नाहींत.) यांस राजद्रोही ठरवून नेदर्लंडांतून हद्दपार केल्याचा व त्यांची स्थावरजंगम मालमत्ता जप्त [illegible]डून जाहीर केला! ( मार्च २ इ. स. १५६८ ) आपला मुलगा, आपली इस्टेट–जहागिरी-हीं हिरावून घेऊन नेदर्लंडांतील प्रजेवर व आपल्या बरोबरीच्या सरदारलोकांवर जुलूमजबरदस्ती करणाऱ्या आल्व्हाच्या दुष्ट कृत्यांकडे इतःपर डोळेझांक करणें वुइल्यमला शक्य नव्हतें. त्यानें तत्काळ वरील प्रकारचा हुकूम करण्यास तुम्हांस अधिकार नसून ब्लडकौन्सिलची सत्ता—तें बेकायदेशीर असल्यामुळें—मानण्यास आपण तयार नाहीं असें आल्व्हास कळविलें आणि सर्व युरोपला उद्देशून त्यानें आपल्या वागणुकीचें समर्थन करणारें एक जाहिरपत्रक प्रसिद्ध केलें! ( ता० ६ एप्रिल इ. स. १५६८ ) ह्या पत्रकांत त्यानें ग्रॅनव्हिले व मॉर्गरेट यांच्या कारकीर्दींत धर्माच्या नांवावर झालेल्या जुलमांचें, त्यामुळें

---

* काउंट ब्यूरेनचें हें उदाहरण आमच्याकडील संभाजीचा पुत्र शाहू याच्या उदाहरणाप्रमाणेंच आहे. निदान या दोन उदाहरणांत बरेंच साम्य आहे एवढें तरी खास कबूल करावें लागेल.

लोकांत उत्पन्न झालेल्या असंतोषाचें व तो असंतोष मर्यादेंत ठेवण्याबद्दल आपण केलेल्या प्रयत्नांचें ऐतिहासिक दृष्टीनें मुद्देसूद विवेचन करून, आपण कायद्याच्या दृष्टीनें राजद्रोहाच्या सदराखालीं येईल असा कोणताही गुन्हा केलेला नसून फिलिपचे दुष्ट अधिकारी आपणावर विनाकारण आग पाखडीत आहेत असें प्रतिपादिलें आहे. ह्या पत्रकांत त्यानें फिलिपसंबंधानें जेथें तेथें आदराचे व राजनिष्ठेचे उद्गार काढून नेदर्लंडांतील जुलमाची सर्व जबाबदारी त्याच्या बुरोक्रॅटिक अधिकारीमंडळावर टाकली आहे ! त्यांनींच आपल्या देशबांधवांसंबंधानें राजाचें मन कलुषित करून त्यास जुलमी कृत्यें करण्यास प्रवृत्त केलें असल्यामुळें त्यांच्या कृत्यांस विरोध केला असतां कायद्याचा भंग होत नसून उलट त्यामुळें फिलीप व त्याची प्रजा असलेले आपले देशबंधू यांचें कल्याण-च होणार आहे; किंबहुना या उभयतांच्या कल्याणाकरितां आल्व्हाच्या अनन्वित कृत्यांचा निरोध करणें व त्याच्या जुलमापासून नेदर्लंडच्या लोकांची सुटका करणें हेंच फिलिपचा राजनिष्ठ प्रजाजन ह्या नात्यानें आपलें कर्तव्य आहे, असेंही त्यांत त्यानें स्पष्टपणें लिहिलें आहे ! वस्तुतः आल्व्हा व त्याच्या पूर्वीचे सत्ताधारी यांचीं सर्व जुलमीं कृत्यें फिलिपच्या आज्ञेवरून किंबहुना प्रेरणेवरून झालीं होतीं व होत होतीं; अशा स्थितींत त्यांचें सर्व पाप त्याच्या अधिकाऱ्यांच्या माथीं मारून फिलिपला त्यापासून मुक्त करण्यास वुइल्यम कसा तयार झाला याचें सकृद्दर्शनीं कित्येकांस आश्चर्य वाटण्याचा संभव आहे. परंतु वास्तविक वुइल्यमचा तसा हेतु नव्हता. तर शिष्टाचार म्हणून आणि लोकमत आपणांस अनुकूल करून घेण्याचा एक सुलभ उपाय म्हणून त्यानें त्या पत्रकांत फिलिपविषयीं औपचारिक राजनिष्ठा व्यक्त केली होती. कोणत्याही देशांत अशा प्रकारच्या आणिबाणीच्या वेळीं एकदम राजाविरुद्ध युद्ध पुकारण्यास अथवा क्रांति हा शब्द उच्चारण्यास पुष्कळ समर्थ व अस्सल देशभक्तही बिचकतात. त्यांना राजासंबंधानें अथवा त्याच्या गादी-संबंधानें सामान्यतः आदर अथवा भीति वाटत असते परंतु इकडे जुलमानें त्यांच्या मनोवृत्ति दुखावलेल्या अथवा खवळलेल्या असतात. अशा स्थितींत राजा अथवा त्याची गादी यास धक्का न लावतां जुलमाचा प्रतिकार करण्याची जर कोणीं युक्ति काढली तर ती त्यांना लवकर पटते व तिचा ते सहज अवलंब करूं लाग-तात. या गोष्टीकडे लक्ष देऊनच वुइल्यमनें वरील पत्रकांत फिलिपविषयीं आदर-बुद्धि दर्शविली होती. त्याच्या जुलमापासून नेदर्लंडाची मुक्तता करण्याचे कामीं

त्यास जर्मन बादशहाची नैतिक व जर्मन संस्थानिकांची आर्थिक आणि मनुष्यबलाच्या रूपानें मदत व सहानुभूति मिळवावयाची होती; व तसेंच फ्रान्स, इंग्लंड येथील श्रीमंत आणि वजनदार लोकांकडूनही त्यास मदत पाहिजे होती. हे सर्व लोक फिलिपविरुद्ध बंडाचें अथवा क्रांतीचें निशाण उभारल्यास-त्याचे शेजारी, मित्र व कांहीं अंशीं बरोबरीचे असल्यामुळें-उत्साहानें मदत करण्यास तयार होतील असें त्यास वाटत नव्हतें. व शिष्टाचारामुळें तसें त्यांस करतां येणें शक्यही नव्हतें. उलटपक्षीं फिलिपविषयीं आदर व राजनिष्ठा दाखवून त्याच्या अधिकाऱ्यांविरुद्ध युद्ध पुकारल्यास त्याच्या उपरोक्त मित्रांना वेळोवेळीं मध्यस्ती करण्याचा मार्ग खुला ठेवून त्यांस शिष्टाचाराचा भंग न होऊं देतां त्याच्या कार्यास मदत करतां येणें शक्य होतें. या सर्व गोष्टींचा नीट विचार करूनच त्यानें सदर पत्रकांत फिलिपसंबंधानें वर सांगितलेलें धोरण स्वीकारलें होतें. हें 'आत्मसमर्थनपर पत्रक' प्रसिद्ध केल्यावर लागलींच नेदर्लंडावर स्वारी करण्याकरितां सैन्य जमविण्याच्या तयारीस तो लागला. जर्मनींतील त्याचे बहुतेक आप्त व स्नेही हे प्रॉटेस्टंट मताचे होते. वुइल्यमच्या घराण्यांतील इतर माणसें-त्याचे बंधु लुइ, जॉन व त्यांचीं कुटुंबें-देखील याच मताचीं अनुयायी होतीं. त्याची बायको ही सॅक्सनीच्या राजाची मुलगी असल्यामुळें मूळ प्रॉटेस्टंट मताचीच होती. ह्या सर्वांच्या सान्निध्यांत राहण्याचा प्रसंग आल्यामुळें व विशेषतः राजकीय दृष्ट्या त्या मताचा त्यास विशेष उपयोग होण्याजोगा असल्यामुळें, त्यानें ह्या सुमारास त्या मताची दीक्षा घेतली. ती घेतल्यामुळें जर्मनींतील प्रॉटेस्टंट मतानुयायी संस्थानिक त्यास द्रव्याची व शिपायांची मदत करण्यास उत्साहानें तयार झाले. त्यांच्या वजनामुळें त्यास जर्मन साम्राज्यांत भाडोत्री सैन्य जमा करण्याची जर्मन बादशहाकडून परवानगी मिळाली. तेव्हां त्याप्रीत्यर्थ पैसा जमविण्यास त्यानें सुरुवात केली. त्यानें आपलें जवाहिर विकून ५० हजार फ्लॉरिन्स युद्धनिधीस दिले. त्याचा भाऊ जॉन यानेंही आपल्या जमिनी गहाण टाकून इतकीच रकम त्यास उभारून दिली. त्याच्याहून धाकटा भाऊ शूर लुई यानें १० हजार फ्लॉरिन्स* दिले. अँटवर्प, अॅमस्टरडॅम, हार्लेम, लेडन वगैरे ठिकाणचे जे व्यापारी इंग्लंडांत पळून गेले होते त्यांनीं एक लक्ष फ्लॉरिन्सची देणगी दिली. क्युलेंबर्ग, व्हानडरबर्ग आणि हुगस्ट्रॅटेन यांनीं प्रत्येकीं ३० हजार फ्लॉरिन्स दिले. काऊंटेस हॉर्न हिनें १० हजार फ्लॉरिन्स दिले. या-

* एक फ्लॉरिन= १॥ रुपया.

नं. ....... ता. ....... ८५

प्रमाणें पैशाची जुळवाजुळव होतांच त्यानें आपला भाऊ काऊंट लुई यास आपल्या नांवानें सैन्य जमा करण्याविषयीं पुढील आशयाचें अधिकारपत्र दिलें :—

"आम्ही वुइल्यम प्रिन्स ऑफ ऑरेंज, ह्या लेखाच्या द्वारें सर्वांस कळवितों कीं, आमच्या राजाविषयीं व त्याच्या नेदर्लंडांतील मुलखाविषयीं आमची खरी कळकळ व प्रेम व्यक्त करण्याकरितां त्या मुलखांत हल्लीं चालू असलेला धार्मिक व राजकीय जुलूम बंद करून तेथील प्रजेचे जे हक्क रक्षण करण्याची राजानें गादीवर बसतांना विधिपूर्वक शपथ घेतली आहे तिचें रक्षण करण्यास्तव आणि त्या प्रजेची गुलामगिरींतून सुटका करण्यास्तव त्या मुलखावर स्वारी करण्याचें योजिलें असून त्याप्रीत्यर्थ आमचे प्रियबंधु लुई नासू यांस लागेल तितकें सैन्य उभारण्याची आम्हीं आज्ञा केली आहे." वगैरे. याप्रमाणें आज्ञा मिळतांच लुई वुइल्यमच्या नांवानें सैन्याची जुळवाजुळव करूं लागला. सॅक्सनी व हेसे येथील संस्थानिकांनीं त्यास सैन्याची व द्रव्याची मदत देऊं केली व इतर प्रॉटेस्टंट जर्मन संस्थानिकांनीं त्यास आपापल्या हद्दींत लष्करभरती करण्यास परवानगी देऊन द्रव्यसाहाय्यही केलें. याप्रमाणें सैन्याची जमवाजमव होतांच वुइल्यमनें नेदर्लंडवर आपली पहिली स्वारी केली. त्याचें सैन्य भाडोत्री व विनशिस्तीचें होतें पण याहून उत्तम सैन्य त्यास मिळणें शक्य नव्हतें. या स्वारीची त्यानें केलेली मूळ योजना चांगली होती. उत्तर, पूर्व व दक्षिण ह्या तिन्ही बाजूंनीं नेदर्लंडवर एकदम चाल करावी असा त्याचा संकेत होता; परंतु पूर्व व दक्षिण बाजूनें हल्ला करणाऱ्या त्याच्या दुय्यम सेनापतीजवळ सैन्य फार थोडें असल्याकारणानें आल्व्हाच्या सैनिकांपुढें त्यांचा टिकाव लागला नाहीं व पाहिल्या झपाट्यासरशीं त्या सैन्याची धुळधाण उडाली! पहिल्याच चकमकीस हा अपशकुन झालेला पाहून वुइल्यम खिन्न होऊन आपला दुय्यम हुग्स्ट्रॅटेन याजबरोबर परत डिलेनबर्गला निघून गेला व तेथें त्याला फिलिपविरुद्ध शस्त्र उचलण्याचा अविचार केल्याबद्दल आपल्या मित्रांची मर्मभेदक टीका निमुटपणे सहन करीत बसावें लागलें! वुइल्यम जरी परत गेला तरी त्याचा भाऊ लुई हा अद्याप रणभूमीवर होता. त्याच्या हाताखालीं मूळचे ४ हजार लोकांचें सैन्य होतें व नेदर्लंडांत शिरल्यावर तेथील लोकांचा देशाभिमान जागृत करून त्यानें त्यांत आणखी बरीच भरती केली होती. त्यानें, "देशाकरितां व धर्माकरितां स्वातंत्र्य मिळवा" अशा अर्थाचीं अक्षरें असलेलीं हजारों निशाणें आपल्या सैन्यांत उभारलीं होतीं व तीं पाहून शेकडों

तरुणांना त्याच्या सैन्यांत सामील होण्याची स्फूर्ति होत होती. शिवाय तो ज्या फ्रिजलंड व ग्रोनिन्ग्रेन प्रांतांत होता तेथें प्रॉटेस्टंट लोकांचीच विशेष वस्ती असल्यामुळें आणि आल्व्हाचें सैन्य वुइल्यमच्या दुसऱ्या दोन सैन्याच्या विभागांशीं लढण्यांत गुंतलेलें असल्यामुळें त्याला युद्धसामुग्री व मनुष्यबल जमा करणें सुलभ जात असे. त्याच्या सैन्याची संख्या थोड्याच दिवसांत दहा हजारावर गेली. तो स्वतःही मोठा शूर व धाडसी असल्यामुळें त्यानें आल्व्हाचा सैनिक अरेंबर्ग यास ( हा ग्रोनिन्गेन प्रांताचा गव्हर्नर होता. ) हेलीगरली येथें गांठून त्याचा पराभव केला. या लढाईत लुइचा धाकटा भाऊ अॅडोल्फस ठार झाला व अरेंबर्गही मारला गेला ( २३ मे १५६८. ) पण ह्या जयामुळें लुईचा प्रत्यक्ष असा कांहीं फायदा झाला नाहीं; कारण एवढ्या एका जयानें त्याला एखाद्या प्रांताचें स्वामित्व प्राप्त होणें शक्य नसून अरेंबर्गच्या मृत्यूची आणि पराभवाची वार्ता आल्व्हाला कळल्यावर तो त्याचा सूड उगविण्याकरितां मोठें सैन्य पाठवील हेंही स्पष्ट दिसत होतें. तथापि नैतिकदृष्ट्या तो विजय महत्त्वाचा होता. सामान्य प्रतीचें व कसलीं तरी हत्यारें बाळगणारें बेकार सैन्य उत्तम प्रकारच्या रणसामुग्रीनें युक्त व कसलेल्या स्पॅनिश सैन्याचा पराभव करूं शकतें—अर्थात् स्पॅनिश सैन्य कांहीं केवळ अजिंक्य आहे असें नाहीं, अशी भावना नेदर्लंडच्या लोकांत उत्पन्न करून देण्यास हा विजय कारणीभूत झाला. त्यामुळें स्पॅनिश सैन्यासंबंधानें लोकांस जो मोठा बाऊ वाटत होता तो कमी होऊन त्याचा पाडाव करण्याचा प्रयत्न करणारांस मदत करण्याकडे त्यांची प्रवृत्ती होऊं लागली. असो; अरेंबर्गच्या मृत्यूनंतर लुई ग्रोनिन्गेन शहर काबीज करून तेथें आपल्या सैन्याचा तळ देऊन बसला. ही बातमी आल्व्हास समजतांच त्याच्या तळव्याची आग मस्तकास गेली. आपल्या इभ्रतीस हा मोठा धक्का बसला असें समजून त्यानें स्वतः लुईची खोड मोडण्यास जाण्याचें ठरविलें परंतु एग्मॉंट, हॉर्न यांच्यासारखे बडे कैदी ब्रुसेल्सच्या नजिक ठेवून निघून गेल्यास तेथें बंड उद्भवेल व त्यांची सुटका होईल अशी त्यास भीति वाटत असल्यामुळें प्रथम या लोकांची वाट लावण्याच्या उद्योगास तो लागला व तोंपर्यंत लुईला आवरून धरण्याचें काम त्यानें मेघॅम नामक सेनापतीकडे सोंपविलें.

एग्मॉंट व हॉर्न यांच्या छलाची, बंदिवासाची व चौकशीच्या फार्साची करुणास्पद आणि हृदयद्रावक कहाणी विस्तारानें सांगणें हें ह्या चरित्राच्या मर्यादेबाहेरचें असल्यामुळें व तितका स्थलावकाशही नसल्यामुळें आम्हांस तो मोह आवरून धरणें

भाग आहे. तथापि विषयपूर्तीस्तव त्यासंबंधाची त्रोटक हकीकत येथें देणें जरूर आहे.

वरील दोन बड्या सरदारांस पकडल्यानंतर कांहीं दिवसांनीं त्यांस घेंट येथें नेऊन ठेवलें होतें. त्यांना केलेली अटक सर्वस्वीं बेकायदेशीर होती. तेव्हां त्यांची पुढील चौकशी तरी कायदेशीर कोठून होणार? तिचा फार्स करण्याकरितां डेल-रिओ व व्हर्गास यांचें स्पेशल कमिशन नेमण्यांत आलें. ह्या कमिशननें त्यांच्यावरील आरोपांची एक लांबलचक याद तयार करून तिचें उत्तर देण्याकरितां त्यांच्याकडे पाठवून दिली. उत्तर देण्यास अवघ्या ५ दिवसांची मुदत देण्यांत आली होती. हें उत्तर तयार करण्याच्या कामीं त्यांस वकिलांची अगर कोणा मित्रांची सल्ला घेण्यास परवानगी नव्हती. प्रारंभीं त्यांनीं, आपण पहिल्या प्रतीचे सरदार असल्यामुळें त्या वर्गांतील सरदारांची चौकशी करण्याच्या नियमान्वयें आपली चौकशी खुद्द राजा व आपल्या वर्गांतील सरदार यांचे समोर झाली पाहिजे, सामान्य कोर्टास अगर ब्लडकौन्सिलच्या सभासदास आपली चौकशी करण्याचा अधिकार नाहीं, अशी तक्रार केली; परंतु सरकारी कायदेपंडित व्हिज्लियस याच्या साह्यानें आल्व्हानें ती फेटाळून लावली तेव्हां ५ दिवसांच्या आंत त्यांनीं आपल्यावरील आरोपांच्या यादीस—त्यांतील आरोपांचें यथायोग्य खंडण करणारें—उत्तर दिलें. त्यानंतर कांहीं दिवसांनीं उपरोक्त कमिशनरांनीं त्यांची तुरुंगातल्या तुरुंगांत उलटसुलट तपासणी केली. पुढें आपल्या तर्फे डिफेन्स देण्याकरितां त्यांना वकील देण्याची सवलत—हा निव्वळ फार्सच होता कारण वकिलांची व त्यांची मुलाखत होण्याचे वेळीं आल्व्हाचे अधिकारी हजर असत—मिळाली. त्यांना आपल्यातर्फे पुरावा गोळा करण्याचीही संधी देण्यांत आली पण तो गोळा होण्यापूर्वीच खटल्याचें काम संपविण्यांत आलें असल्याची त्यास समज मिळाल्यामुळें त्यांचा पुरावा जागच्याजागीं राहिला! सरकारतर्फेच्या पुराव्याची छाननी करण्याची त्यांच्या वकिलांनीं परवानगी मागितली, तीही त्यास मिळाली नाहीं! याप्रमाणें त्यांच्या चौकशीचें काम पुरें झाल्यावर दोन दिवसांनीं आल्व्हानें तत्संबंधीं सर्व कागद-पत्र पाहिले असल्याचें जाहिर करून त्यांस शिरच्छेद करण्याची शिक्षा फर्माविली! हे दोन्ही सरदार प्रख्यात व अनेक दृष्टींनीं लोकांच्या आदरास व कौतुकास पात्र झालेले असल्यामुळें त्यांना झालेल्या शिक्षेची बातमी समजतांच लोकांचें काळिज करपून गेलें! एग्मॉंटच्या ह्या स्थितीबद्दल कित्येक बड्या सरकारी अधिकाऱ्यांसही

चाईट वाटलें ! व त्याजवर दया करण्याची त्यांनीं आल्व्हास विनंती केली. जर्मन संस्थानिक व खुद्द जर्मन बादशहा मॅक्सामिलियन यांनींही ह्या दोन सरदारांवर दया करण्याविषयीं फिलीपजवळ रदबदली केली, परंतु त्यांचा नाश करण्याची फिलीपनें पूर्वींच प्रतिज्ञा केलेली असल्यामुळें कोणच्याही विनंतीचा अथवा रदबदलीचा उपयोग झाला नाहीं. त्यांना पकडण्यापूर्वींच त्यांच्या मृत्यूच्या शिक्षेच्या वारंटावर फिलीपची सही होऊन तीं वारंटें आल्व्हाच्या हातीं पडलीं होतीं ! अर्थात् त्याच्याच नांवानें वरील सरदारांस आल्व्हानें मृत्यूच्या शिक्षेची सुनावणी केली ! ह्या सुनावणीच्या दिवशीं संध्याकाळीं एग्मॉटची बायको आपल्या पतीचा जीव वांचविण्याकरितां आल्व्हाच्या घरीं येऊन त्याच्या पायां पडली ! त्या दीन अबलेच्या आर्तस्वरांनीं व अश्रुबिंदूंनीं एखाद्या पाषाणहृदयी मनुष्याच्या अंतःकरणासही पाझर फुटता, पण त्या अघोर दुरात्म्याला त्याचें कांहींच वाटलें नाहीं ! उलट तिला फसवून घालवून देण्याचाच त्यानें प्रयत्न केला ! ‘ बाई, तुमचा नवरा उद्यां खास मुक्त होईल ’ असें द्व्यर्थी वाक्य उच्चारून त्यानें तिला घरीं जाण्यास सांगितलें. ‘ मुक्त ’ ह्या शब्दाचा आल्व्हाचा अर्थ निराळा होता पण तो त्या बाईच्या लक्षांत आला नाहीं. तिला त्याचे ते उद्गार खरोखरीच आश्वासनपर वाटले व त्याबद्दल आल्व्हाचे आभार मानून ती निघून गेली ! दुसरे दिवशीं सकाळीं ब्रुसेल्स येथील सरकारी राजवाड्यासमोरच्या भव्य पटांगणांत एग्मॉट व हॉर्न यांचा शिरच्छेद करण्याची मोठ्या थाटानें तयारी करण्यांत आली ! ह्याच पटांगणांत थोड्या दिवसांपूर्वीं हजारों शिपायांच्या व नागरिकांच्या समक्ष ज्या एग्मॉटनें आपल्या बहादुरीबद्दल फिलीपकडून सन्मानाच्या पदव्या व नजराणे मिळविले त्या एग्मॉटला त्याच स्थलीं तशाच प्रकारच्या लोकसमूहासमक्ष त्याच फिलीपच्या आज्ञेनें राजद्रोहाच्या काल्पनिक आरोपावरून मृत्यूची शिक्षा भोगण्याची पाळी यावी, हा केवढा दैवदुर्विलास ! परंतु दैवाच्या ह्या विचित्र गतीला पाहून एग्मॉट अथवा हॉर्न यांपैकीं कोणीही घाबरला नाहीं ! एग्मॉटनें अखेरपर्यंत आपली राजनिष्ठा ढळूं दिली नाहीं व हॉर्न यानें राजा व मृत्यु या दोहोंचीही दरकार बाळगिली नाहीं. आपणाला जुलमानें व अन्यायानें मारण्यांत येत आहे असेंच त्यांनीं अखेरपर्यंत आपल्या वर्तनानें लोकांस कळविलें व धीरोदात्तपणें आपला शिरच्छेद करूं दिला ! हें कसायाचें कृत्य आटोपल्यावर आल्व्हानें त्यांचीं शिरें कांहींकाल चव्हाटयावर टांगून ठेवलीं ( नंतर तीं मॅद्रिदला फिलिपकडे पाठविण्यांत आलीं.

असें म्हणतात. ) व धडें त्यांच्या आप्तांच्या स्वाधीन केलीं. त्यांनीं तीं नेऊन रीतीप्रमाणें मूठमाती दिली ! एग्मॉंट व हॉर्न यांचा कांटा काढल्यानंतर त्यांच्या कारभाऱ्यांची व अँटवर्पच्या बर्गोमास्टरची तीच वाट लावण्यांत आली. तसेंच ह्या प्रसिद्ध पुरुषांच्या मृत्यूच्या पूर्वी २।३ दिवस अगोदर दुय्यम प्रतीचे सुमारें १८ ठळक सरदार आल्हानें यमसदनीं पाठविले! त्याचे दूतही हें कसायाचें काम देशांतील कोनाकोपऱ्यांतसुद्धां करून राहिले होते. एकंदरींत आल्हानें आपल्या कारकीर्दींत नेदर्लंडच्या लोकांस अगदीं त्राहि त्राहि करून सोडलें होतें! अमेरिकन ग्रंथकार मोटले यानें या वेळच्या स्थितीचें वर्णन पुढील प्रमाणें केलें आहे.

" सर्व देश हा एक बडा कसाईखाना बनला होता; प्रत्येक खेड्यांत तासा—तासांनीं मृत्यूच्या घंटा वाजत होत्या; एकही घर सुतकाशिवाय सुनें नव्हतें; जेथें तेथें रड्याच्या किंकाळया व दुःखाचे उच्छ्वास कानीं येत होते. आल्हाच्या आगमनानंतर थोड्याच महिन्यांत देशांतील सर्व सत्त्व व चैतन्य नष्ट झाल्यासारखें दिसूं लागलें. तेथील शूर, प्रसिद्ध व श्रेष्ठ व्यक्तींच्या रक्तानें वधस्थानें माखून गेलीं होतीं; लोकांचे नेते, हितकर्ते व मार्गदर्शक हे तुरुंग, मृत्यु अथवा देशत्याग ह्या त्रयीच्या सपाट्यांत सांपडले होते. नम्रपणा अथवा मिनतवारीचा उपयोग होत नव्हता, उघडपणें दंड थोपटून सामना करणें अशक्य होतें; तथापि सूड घेण्याची प्रवृत्ति मात्र चोहोंकडे उत्पन्न झाली होती. रस्त्यावरून रोजच्या रोज प्रेतें व सुतकी मंडळीचा जमाव जात असल्याचा भयाण देखावा दिसत होता. × × × व्यापारधंदा सर्व बंद पडून सर्व मुलूख उजाड व उध्वस्त झाल्या सारखा दिसत होता. सर्व जगांतील बडे बडे व्यापारी ज्या देशांतील शहरांत जमून उद्योगांत व आनंदांत निमग्न झालेले दिसावयाचे तेथें सर्वत्र शुक-शुकाट व मध्यरात्रीप्रमाणें स्तब्धता दिसूं लागली होती." वगैरे.

आल्हाच्या असल्या कृत्यामुळें नेदर्लंडांत तर तो अप्रिय झालाच पण युरोपांतील इतर देशांतही त्याचा उत्तम सेनानी म्हणून असलेला लौकिक कमी होऊं लागला. एग्मॉंट व हॉर्न यांची त्यानें ज्या रितीनें वाट लावली ती पाहून तर त्याच्याविषयीं सर्वत्र तिटकारा उत्पन्न झाला. परंतु त्याच्या पापाचा घडा अद्याप पूर्ण भरलेला नसल्यामुळें आणि फिलिपच्या उत्तम प्रतीच्या लष्कराचा त्यास पाठिंबा असल्यामुळें त्याच्या विचित्र लीला आणखी कांहीं काल तशाच चालू राहिल्या.

वरीलप्रमाणें एग्मॉंट व हॉर्न* आणि इतर ठळक मंडळी यांचा निकाल लावल्यावर वुइल्यमचा भाऊ लुई याची खोड मोडण्याकरितां, तो ब्रुन्स्विक, नॉयरकार्म्स,

*एथें एग्मॉंट व हॉर्न यांच्या बरोबरीचे सरदार बर्घेम व मॉंतिम्रे यांच्या मृत्यूचीही करुणास्पद हकीकत सांगणें जरूर आहे. आपल्या देशाचीं गाऱ्हाणीं फिलीपच्या कानावर घालून त्याच्याकडून न्याय मिळविण्याकरितां व मॉर्गरेटच्या ॲक्ट ऑफ मॉडरेशनला संमति मिळविण्याकरितां तिच्या हुकमावरून हे स्पेनला निघून गेल्याची हकीकत चवथ्या प्रकरणांत आलीच आहे. ते स्पेनमध्यें पोंचल्यावर फिलीपनें वरपांगीं त्यांच्याशीं स्नेहभाव दाखवून त्यास तेथेंच ठेवून घेतलें. त्यांनीं पुष्कळ वेळां स्वदेशीं परत जाण्याची परवानगी मागितली पण फिलीपनें त्यास कांहीं ना कांहींतरी सबब सांगून ती दिली नाहीं. व त्यांच्यावर गुप्तपणें पहारा अथवा टेहळणी ठेवली. त्यांना ह्या गोष्टीचा संशय आला होता; पण तो व्यक्त करण्याची सोय नव्हती. अशा स्थितींत ते कुचंबत पडले असतां बर्घेम एकाएकीं आजारी पडल्याचें निमित्त होऊन मरण पावला. त्यास विषप्रयोग करण्यांत आला असावा असा पुष्कळांचा तर्क आहे व पुढें मॉंतिम्रेची फिलिपनें जी वाट लावली तिचा विचार केल्यास हा तर्क खरा असावा असें कोणासही वाटल्यावांचून राहणार नाहीं. फिलीप या लोकांना वारंवार मेजवान्या देत होता ही गोष्ट प्रसिद्ध आहे. तेव्हां विषप्रयोगाची शंका घेण्यास पुष्कळच जागा आहे यांत शंका नाहीं. बर्घेमच्या मृत्यूनंतर मॉंतिम्रे यानें 'आपणांस परत जाण्याची तरी परवानगी द्यावी; किंवा आपणांवर उघडपणें खटला करून आपणांस ह्या संशयग्रस्त स्थितींतून बाहेर तरी काढावें' अशी फिलिपला विनंति केली. कांहीं दिवस फिलिपनें त्या विनंतीकडे लक्ष न देतां त्याच्याशीं पूर्वीप्रमाणेंच स्नेहभावाचें वर्तन ठेवलें. पण एग्मॉंट व हॉर्न यांना आल्व्हानें पकडून अटकेंत ठेवल्यानंतर इकडे फिलिपनेंही मॉंतिम्रे यास पकडून सेगोव्हियाच्या किल्ल्यांत कोंडून ठेवलें. येथें सुमारें ५।६ महिने तो खितपत पडला असतां एके दिवशीं त्याचे कांहीं स्नेही यात्रेकऱ्यांच्या वेषानें सेगोव्हिया येथें आले व त्यांनीं त्याच्या तुरुंगाच्या खिडकीजवळच्या रस्त्यावरून जाण्याच्या मिषानें फ्लेमिश भाषेंत एक गाणें म्हणून त्यास त्याचा भाऊ हॉर्न व मित्र एग्मॉंट यांच्या वधाची बातमी कळवून आपले प्राण वांचविण्याची सूचना केली. त्याप्रमाणें मॉंतिम्रे यानें तेथून निसटून जाण्याचा एक प्रयत्न केला; पण तो उघडकीस आला! आणि तेव्हांपासून त्याच्या हालांस

व्हिटेली, व डी रोयेल या सेनापतींसह एक बरेंच मोठें सैन्य घेऊन ग्रोनिन्‌गेन प्रांताकडे जाण्यास निघाला.

---

सुरुवात झाली. पुढें आल्व्हाच्या ब्लड कौन्सिलपुढें त्याच्या गैरहजेरींत त्याच्या चौकशीचा फार्स करवून फिलिपनें त्यास देहांतशासनाची शिक्षा फर्माविली. परंतु ती शिक्षा उघडपणें अंमलांत आणण्याचें त्यास धैर्य झालें नाहीं. तेव्हां त्यानें गुप्तपणें त्याचा शिरच्छेद करवून तो आजारी पडून आपोआप मेला असें जाहिर केलें ! मॉंतिग्नेनें मरणसमयीं जें मृत्युपत्र केलें त्यांत त्यास 'आपण अत्यवस्थ आजारी असून लवकरच मरणार असें वाटल्यामुळें हें मृत्युपत्र करीत आहों' असें वाक्य लिहिण्यास फिलिपनें भाग पाडलें होतें ! अशा विलक्षण रीतीनें वकील म्हणून आलेल्या ह्या सरदारांचा खून करून फिलिपनें नीचपणाची कमाल केली ! !

(ही हकीकत मोटलेच्या राइज ऑफ दि डच रिपब्लिक या ग्रंथांतून घेतली आहे.)

# प्रकरण ७ वें.

## युद्ध--पराभव--चिंता.

आल्व्हा ग्रोनिनूगेन नजीक येऊन पोहोंचेपर्यंत लुईला बराच अवकाश मिळाला होता. परंतु द्रव्याचा अभाव व त्यामुळें पगार थकल्याकारणानें त्याच्या भाडोत्री शिपायांत उत्पन्न झालेला असंतोष, या कारणांमुळें त्यास जास्त प्रगती करतां आली नाहीं. ग्रोनिनगेन प्रांतांतील लोकांचा देशाभिमान जागृत करून व त्यांस धमकी देऊन त्यानें आपल्या सैन्याचा खर्च कसा तरी चालविला होता. परंतु आल्व्हाच्या हालचालीची बातमी त्या प्रांतांतील लोकांच्या कानीं येतांच ते भयभीत होऊन लुईला द्रव्याची मदत करीनासे झाले. अशा स्थितींत, युद्ध न करतां आपल्याकडे परत यावें म्हणून वुइल्यमनें लुईची पुष्कळ प्रकारें समजूत केली पण त्यानें आपला युद्ध करण्याचा हट्ट सोडला नाहीं. त्याच्याजवळचें सैन्य सुमारें १० हजार असून त्याचा पगार तुंबला असल्याकारणानें त्यास रजा देऊन परत पाठविणें त्यास कठिण वाटत होतें. इतक्या लोकांचा थकलेला पगार कोठून द्यावा? अशा विवंचनेंत तो होता. वुइल्यमकडून तो मिळविणें त्यास पसंत नव्हतें. कांहीं तरी पराक्रम करून लोकांकडूनच तो पैसा मिळवावा अशी त्याची इच्छा होती. म्हणून आल्व्हाची वाट पहात तो स्वस्थ बसला होता. अरेंबर्गच्या मदतीस आलेला मेघॅम त्याच्या नजीक होता; परंतु त्याचें सैन्य थोडें असल्यामुळें आल्व्हाची मदत येईपर्यंत तो केवळ बचावाचें धोरण स्वीकारून राहिला होता. त्यावेळीं त्याच्यावर हल्ला चढविणें लुईला शक्य होतें; पण पगारासाठीं असंतुष्ट झालेलें त्याचें सैन्य तसें करण्यास तयार नसल्यामुळें त्याचा नाइलाज झाला. अखेर आल्व्हाचें सैन्य येऊन पोंचलें तेव्हां मोठ्या मिनतवारीनें कशी तरी आपल्या सैन्याची समजूत करून तो एम्स नदी व डॉलर्ट बे यांच्या दरम्यान असलेल्या द्वीपकल्पावरील जेमिगेन गांवीं येऊन त्यानें त्यास वेढा दिला. तेव्हां त्यानें आपल्या सैन्यास समुद्राच्या पाण्यास प्रतिबंध करण्यास्तव बांधलेले तेथील धक्के फोडून स्पॅनिश लोकांच्या मार्गांत पाणी सोडून त्यांची गति खुंटविण्याची आज्ञा केली. ती ऐकण्याचें सोडून त्याचे शिपाई पगाराविषयीं कुरकूर करून रडूं लागले. तेव्हां त्यानें त्यांची चांगली कानउघाडणी

केली व या वेळेस कुचराई केल्यास एका बाजूनें समुद्र व दुसऱ्या बाजूनें शत्रूच्या नंग्या तरवारी असल्यामुळें पगार तर दूरच राहिला; पण प्राण सुद्धां वांचणार नाहींत असें जेव्हां त्यानें त्यांस स्पष्ट बजाविलें तेव्हां कोठें हे लोक शुद्धीवर येऊन ते धक्के फोडण्याच्या कामास लागले ! पण त्यापूर्वी बराच वेळ त्यांनीं फुकट दवडल्याकारणानें, वाटेंत कमरेइतकें पाणी होतें न होतें तोंच स्पॅनिश सैन्याची बिनी तेथे येऊन पोंचली व त्यांतील सैन्यानें त्यांच्या कामास प्रतिबंध केला. तेव्हां लुईच्या प्रोत्साहनावरून त्यांनीं स्पॅनिश बिनीवर अनेक निकराचे हल्ले चढवून धक्क फोडण्याचा यत्न केला; पण आल्व्हाच्या तडफेमुळें व युद्धनियंत्रण-कौशल्यामुळें स्पॅनिश सैन्याच्या अनेक पलटणी तेथें भराभर येऊन पोंचल्या व लुईच्या सैन्यावर भडिमार करूं लागल्या; तेव्हां एका अर्ध्या तासांत त्या सैन्याची दाणादाण होऊन त्यापैकीं कांहीं समुद्रांत बुडालें व कांहीची कत्तल उडाली ! अशा रीतीनें आपला सर्वत्र बोजवारा उडालेला पाहून लुई एम्स नदी पोहून जर्मनींत निघून गेला. हा विजय मिळविल्यानंतर येथील ज्या लोकांनीं लुईला मदत केली त्यांचा सूड उगविण्याकरितां आल्व्हानें आपल्या सैन्यामार्फत त्यांना लुटलें व त्यांच्या स्त्रिया भ्रष्ट केल्या. एवढ्यानें त्याचें समाधान न होऊन त्यानें शेंकडों लोकांस धरून जाळलें व फांशीं दिलें ! ! नंतर त्यानें ब्रुमेल्स शहर गांठलें. तेथें ३७ हजार स्पॅनिश सैन्याच्या कवाइतीचें प्रदर्शन करून त्यानें आपल्या डोळ्यांचें पारणें फेडलें !

लुई परत गेल्यावर त्यानें ग्रॉड्फ्रे नामक एका मनुष्याबरोबर आपल्या पराभवाच्या कच्च्या हकीकतीचें पत्र देऊन त्यास वुइल्यमकडे पाठविलें. वुइल्यमनें त्यास पूर्वीच हें युद्ध न करण्याबद्दल सल्ला दिली होती व ती न ऐकल्यामुळें झालेल्या भावी योजनेस मोठा अडथळा येण्याचा संभव होता. तथापि गॉडफ्रेमार्फत कळलेल्या समाचारामुळें तो संतप्त अथवा खिन्न झाला नाहीं. इतकेंच नव्हे, तर त्यानें आपल्या भावास धीर देणारें पुढील आशयाचें पत्र पाठविलें:--

" गॉडफ्रेमार्फत आलेलें तुमचें पत्र व तोंडी निरोप हीं पोंचलीं. + + + तुमच्या ह्या पराभवामुळें आपल्या भावी कार्यास मोठीच अडचण येणार आहे. जे लोक आम्हांस उत्साहानें मदत करण्यास तयार होते त्यांचा उत्साह मंदावून ते आतां उदासीन होतील व जे केवळ आपल्या नैतिक वजनाच्या दर्पामुळें काजेकाजेस्तव मदत करण्यास तयार होते ते तर मदत करण्याचें साफ

नाकारतील. तथापि परमेश्वराला ज्याअर्थी आपणांस अशा स्थितींत लोटून देणें योग्य वाटलें त्याअर्थीं आपण शांतपणें ती सहन केली पाहिजे. म्हणून तुम्हांस माझी अशी विनंती आहे कीं, तुम्ही धैर्य न सोडता शांतपणानें आलिया भोगास सादर व्हा. मीं स्वतः तर तसेंच करण्याचें योजलें आहे, मग पुढें काय होणार असेल तें होवो."

वरील, पत्रांत व्यक्त केल्याप्रमाणेंच लुईच्या पराभवाचा परिणाम झाला. वुइल्यमचे जर्मनींतील मित्र व आप्त यांनीं त्यास तूर्त स्वस्थ बसण्यास सांगितलें. जर्मन बादशहा मॅक्समिलियन यानें तर त्यास सैन्य जमा करण्याचीही मनाई केली. परंतु वुइल्यमनें तीस न जुमानतां सैन्याच्या जमावाचें कार्य तसेंच चालू ठेविलें व आपला तेजोभंग न करण्याबद्दल त्यानें त्यास साहाय्य करणाऱ्या मित्रांची व संस्थानिकांचीही पुष्कळ मनधरणी करून त्यांस गप बसविलें. त्यानें नेदर्लंडांतील दुर्दशेचें चित्र रेखाटणारें एक जाहिरपत्रक प्रसिद्ध करून ती दूर करण्याचा प्रयत्न न केल्यास त्यापासून जर्मन साम्राज्यांतील शेजारच्या मुलुखास कसा उपसर्ग पोंचेल व तेथील लोकांत धार्मिक कारणांवरून अस्वस्थता माजल्यास (कारण या प्रदेशांतही कॅथोलिक व प्रॉटेस्टंट यांचा वाद होताच) त्याचा अनिष्ट परिणाम जर्मन बादशहासही कसा जाचक होईल हें सिद्ध करून हा अनर्थ टाळण्याकरितां नेदर्लंडांतील जुलमाचा प्रतिकार करून तेथें स्वराज्य व सुराज्य स्थापन करण्याच्या आपल्या प्रयत्नास जर्मन बादशहानें व जर्मन संस्थानिकांनीं मनोभावें साहाय्य करण्याची आवश्यकता असल्याचें ध्वनित केलें होतें. ह्या जाहिरपत्रकाच्या प्रती त्यानें जर्मन बादशहा व संस्थानिक, इंग्लंडांतील प्रॉटेस्टंट आणि फ्रान्सांतील ह्युजेनॉटस यांच्याकडे पाठविल्या. ह्या लोकांची नैतिक सहानुभूति दृढ करण्याचे कामीं ह्या जाहिरपत्रकाचा फार उपयोग झाला. तथापि जेमिनूगेनच्या (लुईच्या) पराभवामुळें त्यांची सक्रिय सहानुभूति मिळविणें फार मुष्किलीचें झालें होतें. तरी वुइल्यमने आपल्या परिश्रमाची शिकस्त करून जर्मन्स बर्गंडियन्स व वालून्स मिळून ३० हजार लोकांचें सैन्य जमविलें! मोटलनें म्हटलें आहे कीं, यावेळीं वुइल्यमच्या सर्व साह्यकर्त्यांनीं हातपाय गाळलेले असल्यामुळें जर त्यानें आपल्या जिवाचा धडा करून एवढी तयारी केली नसती व इतरांप्रमाणें तोही हताश होता तर नेदर्लंडांत पुढें स्थापन झालेलें स्वराज्य व स्वातंत्र्य यांचा जन्मच

झाला नसता. असो; आपलें सैन्य तयार झाल्यावर वुइल्यमनें युरोपांतील सर्व राष्ट्रांस व विशेषतः नेदर्लंडांतील लोकांस आपल्या स्वारीचे उद्देश, आपल्या आकांक्षा व अपेक्षा यांची माहिती करून देण्याकरितां ता. ३१ आगस्ट इ. स. १५६८ रोजीं पुढील आशयाचा जाहिरनामा काढलाः—

"परमेश्वरी कृपेनें, 'ऑरेंजचे राजपुत्र' हें नांव धारण करणारे आम्ही, राजाच्या (फिलीपच्या) सर्व विश्वासूक प्रजाजनांना प्रणाम करितों. पुष्कळ दिवसांपासून स्पॅनियर्ड लोकांनीं मन मानेल तसें नेदर्लंडचें राज्य चालविलें आहे हें सर्वांस ठाऊक आहेच. राजाच्या चांगुलपणाचा दुरूपयोग करून त्यांनीं तेथें धर्माच्या नांवावर मानवसत्र चालू ठेवण्यास त्याची परवानगी मिळविली आहे. तें जर तसेंच चालू दिलें तर लोकांचें जीवित व स्वातंत्र्य ह्यांवर गदा येते; व जर त्यांस विरोध केला तर स्पॅनिश सैन्याच्या लुटारूपणास बळी पडावें लागतें, अशी स्थिति उत्पन्न झाली आहे. आपल्या ताब्यांतील ह्या प्रांतांची ही दुःस्थिति लक्षांत घेऊन राजा, तेथील लोकांचा नाश होऊं देणार नाहीं अशी आमची अपेक्षा होती, पण ती सफल झाली नाहीं. राजाचे एकनिष्ठ सेवक या नात्यानें आम्हास इत्युत्तर ह्या स्थितीकडे डोळेझांक करून स्वस्थ बसणें इष्ट वाटत नाहीं. तेथें चालू असलेले खून, लूटालूट, स्त्रियांवर होणारे जुलूम व धर्मच्छल इत्यादि प्रकार अंगावर शहारे उभे करणारे असून यापुढें त्यांची उपेक्षा करणें रास्त नाही. राजाच्या मंत्रिमंडळानें नेदर्लंडच्या ह्या स्थितीविषयीं त्यास विपरीत सल्ला देण्याचें चालू ठेवल्यामुळें त्याच्या हातून ही स्थिति सुधारण्याचा संभव नाहीं म्हणून आम्ही रुधिरप्रियतेचा शत्रु असलेल्या दयाळू परमेश्वराच्या साह्यानें स्पॅनियर्ड लोकांच्या भयंकर जुलमाचा प्रतिकार करण्यास्तव शस्त्र धारण करीत आहों. ह्या कार्याप्रीत्यर्थ आम्ही आपलें सर्वस्व–तनुमनधन–अर्पण करणार असून परमेश्वराच्या कृपेनें आज आम्ही आपल्या खर्चानें घोडदळ, पायदळ व तोफखाना ह्या तिन्ही प्रकारांनीं युक्त असें एक उत्तम सैन्य जमविलें आहे. ह्या कामीं आम्हांस मदत करण्याविषयीं नेदर्लंडांतील सर्व राजनिष्ठ प्रजाजनांसही आम्ही निमंत्रण करितों. आपल्या देशाची प्रस्तुत स्थिति, त्यामुळें त्यांना व त्यांच्या पोराबाळांना भोगावी लागणारी गुलामगिरी व धर्मनाश या गोष्टींचा त्यांनीं नीट विचार करावा. आल्व्हाच्या रुधिरप्रियतेचा नायनाट केल्याखेरीज नेदर्लंडांतील राज्यकारभार शुद्ध होणार नाहीं व तेथील लोकांची भरभराट होणार नाही." वगैरे. वरील आशयाचे परंतु

पैशाच्या मागणीसंबंधीं निकराचें असें एक जाहिरपत्रक त्यानें केवळ नेदर्लंडांतील लोकांकरितां म्हणून काढलें होतें. परंतु त्याचा व्हावा तितका उपयोग झाला नाहीं. नेदर्लंडच्या श्रीमंत व्यापाऱ्यांनीं व सरदारांनीं त्यास म्हणण्यासारखी मदत केली नाहीं. मध्यम व गरीब स्थितींतल्या लोकांनीं मात्र आपल्या शक्तीबाहेर त्यास द्रव्य-साहाय्य केलें. (हे सर्व श्रीमंत व गरीब नेदर्लंड सोडून परदेशीं जाऊन राहिलेल्या लोकांपैकीं होते.)

वुइल्यमनें यावेळीं जमा केलेलें सैन्य, ९ हजार घोडेस्वार, तोफखाना व पायदळ मिळून २१ हजार, असें एकंदर ३० हजारांचें होतें. तें तयार झाल्यावर एग्मँटचा एक नातेवाईक कौंट द ला मार्क हा त्यास कांहीं निवडक सैन्यासह येऊन मिळाला. हा मनुष्य फार अविचारी व दुराचारी होता तथापि तो मोठा शूर, धाडसी व करारी देशभक्त होता. स्वदेशाला स्वातंत्र्य मिळवून दिल्याशिवाय निदान एग्मँटच्या मृत्यूबद्दल सूड उगविल्याशिवाय आपल्या दाढीमिशा कातरावयाच्या नाहींत अशी त्यानें शपथ घेतली होती. त्याच्या ह्या सूड घेण्याच्या बुद्धीमुळें त्यानें पुढें फार क्रूर कृत्यें केलीं व त्यामुळें वुइल्यमला खालीं पहाण्याचेही प्रसंग येत पण त्याच्या तत्कालीन परिस्थितींत असल्या शूर व देशाभिमानी मनुष्याच्या मदतीचा अव्हेर करण्याची त्यास सोय नसल्यामुळें त्याच्या कृत्यांकडे डोळेझांक करणें त्यास भाग पडे. असो; सप्टेंबर अखेर (१५६८) वुइल्यम आपल्या सैन्यासह जर्मन सरहद्द ओलांडून नेदर्लंडकडे निघाला. सेंट फीट येथें ऱ्हाइन नदी ओलांडून त्या नदीच्या कांठीं असलेल्या कोलोन शहरीं त्यानें आपलें सैन्य आणलें तेथून ज्यूलीयर्स व ल्युनेबर्ग येथें येऊन कांहीं दिवस रेंगाळत राहिल्यानंतर ता. ४ आक्टोबर रोजीं म्यूज नदीकांठच्या स्टॉचेम शहरीं येऊन तो दाखल झाला. त्या दिवशीं रात्रीं चंद्रप्रकाशांत आपल्या घोडेस्वारांस नदीच्या मध्यभागीं उभे करून त्यांच्या आस-ऱ्यानें त्यानें आपलें सर्व सैन्य रातोरात नदीपार केलें! नदींत कोठें छातीइतकें तर कोठें गळ्याइतकें पाणी होतें पण त्याची परवा न करितां त्याचे सैनिक बरोबरच्या सामानासह नदीपार झाले! त्यांचें हें धाडस विलक्षण असून कोणासही आश्चर्य-चकित करून टाकण्यासारखें होतें. आल्व्हाला जेव्हां त्याची बातमी समजली तेव्हां ती त्यांस प्रथम मुळींच खरी वाटली नाहीं. 'वुइल्यमचें सैन्य म्हणजे काय रानटी पक्षी आहेत काय, कीं तें इतक्या थोड्या वेळांत एवढी मोठी नदी पार होऊं शकेल?' असे उद्गार काढून त्यानें आपल्या बातमीदाराची खरडपट्टी काढली!

पण थोड्याच दिवसांत वरील चमत्कार करणारा वुइल्यम आपल्या सैन्यासह ब्रॅबंट प्रांतांत येऊन उतरल्यामुळें त्याचा भ्रम दूर झाला! आल्व्हाचा तळ यावेळीं मेस्ट्रक्ट शहरीं होता. त्यानें आपल्या ठिकाणाहून वुइल्यमच्या सैन्याची पाहणी करून त्याच्या अंतरंगाची माहिती मिळविली तेव्हां तें सैन्य आपल्या सैन्यापेक्षां संख्येनें मोठें असल्याचें त्यांस आढळून आलें. त्यांतील शिपाई भाडोत्री व नवशिके होते हें खरें, पण त्यांच्या अग्रभागीं देशभक्ति जागृत करणारीं वचनें लिहिलेलीं निशाणें फडकत असून तीं नेदर्लंडांतील लोकांस आल्व्हाविरुद्ध उठण्यास प्रोत्साहन देत होतीं. अशा स्थितींत त्यांना एखादा मोठा विजय मिळाल्यास तेथील लोक भराभर त्यांच्या गोटांत शिरून त्यास सर्व प्रकारची मदत करतील असें आल्व्हास वाटत होतें. त्याचें कसलेलें सैन्य या सैन्याचा पराभव करील अशी जरी त्यास खात्री होती तरी न जाणो, कदाचित् प्रथम कांहीं काल शत्रूची सरशी झाल्यासारखी दिसली तर सर्व नेदर्लंड आपल्या विरुद्ध उठेल असें त्यास भय वाटत होतें. उलटपक्षीं लढाई न करितां गनिमीकाव्यानें शत्रूला जेरीस आणण्यांत कालहरण केलें असतां लढाईला व लुटालूट करण्याला उत्सुक असलेले शत्रूचे सैनिक कंटाळून जातील. व त्यांना रसद पोंचण्याचें बंद केल्यास उपासमारीमुळे बंडास प्रवृत्त होतील आणि मग अनायासें त्यांची दाणादाण होऊन त्यांचा पराभव करणें सुलभ जाईल असें त्याच्या मनानें घेतलें. सबब त्यानें लढाई न करितां हा दुसरा मार्ग स्वीकारण्याचाच निश्चय केला. तो यशस्वी होण्याकरितां त्यानें गांवोगांव आपले लष्करी लोक पाठवून वुइल्यमच्या सैन्यास अन्नसामुग्री न मिळूं देण्याची तजवीज केली! याचा परिणाम आल्व्हाच्या अपेक्षेप्रमाणेच झाला. सुमारें पंधरा दिवसांच्या आंत वुइल्यमच्या सैन्याची उपासमार होऊन त्याचे शिपाई बंडास प्रवृत्त झाले. एवढ्या कालांत त्यानें परिणामकारक अशी लढाई करण्याविषयीं पुष्कळ यत्न केले, पण आल्व्हाच्या सैन्यानें त्यास हुलकावणी दाखवून बचावाचें धोरण स्वीकारल्यामुळें त्याचा नाइलाज झाला. त्यानें लढाई देण्याकरितां सुमारें अठ्ठावीस वेळां आपला तळ हालविला, पण आल्व्हानें त्याच्याशीं लढाई केली नाहीं! अखेर त्याचे शिपायी इतके कंटाळले कीं, त्यानीं मोठा दंगा करून त्यास सतावून सोडलें! तो दंगा मोडीत असतांना एकानें त्याच्या हातांतील तरवार, बंदुक झाडून खालीं पाडली! इतका प्रसंग आला तरी वुइल्यमनें धीर

सोडला नाहीं. त्यानें मोठया प्रयासानें आपल्या शिपायांचा दंगा मोडून आपल्याबरोबर शांतपणें पुढें कूच करण्याविषयीं त्यांचें मन वळविलें. इतक्यांत काऊंट जेन्लीस नांवाचा त्याचा एक मित्र फ्रान्सांतील ह्युजेनॉट लोकांचें एक बरेंच मोठें सैन्य घेऊन त्यास मिळण्यास येत असल्याचें वृत्त त्यास समजलें. या उभय मित्रांच्या दरम्यान गेटा नदी वाहात होती. तेव्हां आपल्या मित्राच्या सैन्यास जाऊन मिळण्याकरितां हुग्स्ट्रॅटेन यास तीन हजार लोकांनिशीं आपल्या पिछाडीचें संरक्षण करण्यास ठेऊन ता. २० आक्टोबर रोजीं वुइल्यमनें ही नदी ओलांडिली. या संधीचा फायदा घेऊन त्याच्या पिनीवर व पिछाडीवर एकदम हल्ला करण्याची आल्व्हाच्या सेनापतींनीं परवानगी मागितली; पण आल्व्हानें ती देण्याचें नाकारलें. ह्या सैन्याची आपोआप धुळधाण होण्याचें चिन्ह दिसत असतांना उगच लढाई कशास करावी असें तो म्हणाला. तथापि सेनापती आपला आग्रह सोडीनात; तेव्हां त्यांच्या कलाकडे लक्ष देऊन फक्त पिछाडीवर हल्ला करण्याची त्यानें परवानगी दिली. स्पॅनिश सैन्याचा हा हल्ला उत्तमप्रकारें यशस्वी झाला. त्यांनीं अचानक छापा घालून हुग्स्ट्रेटेनचें सर्व सैन्य कापून काढलें व त्या चकमकीत त्याला स्वतःला त्याच्याच हातच्या पिस्तुलानें पेट घेतल्यामुळें जखम होऊन तो पळून गेला व पुढें डिसेंबर महिन्यांत त्याच दुखण्यानें वारला! वुइल्यम आपल्या योजनेप्रमाणें काऊंट जेन्लीस यास जाऊन मिळाला. तेथून लुव्हेन व ब्रुसेल्स हीं शहरें अगदीं नजिक होतीं; परंतु त्यांतील रहिवाशी आल्व्हाच्या धाकामुळें इतके भयाड व स्रैण बनले होते कीं, ते वुइल्यमला आपल्या शहरांत येऊं देईनात! हे लोक आपणांस मदत करतील अशी वुइल्यमची अपेक्षा होती ती आल्व्हाच्या उपरोक्त धोरणामुळें सफळ झाली नाहीं. आल्व्हा लढाई करीना; लोक देशांत थारा देईनात, जवळ द्रव्याचा अभाव, अशी स्थिति झाल्यामुळें तेथेंच मारा मारीत बसण्यापेक्षां त्यावेळीं फ्रान्समध्यें ह्युजेनॉट्स व कॅथोलिक फ्रेंच लोकांचें जें युद्ध चालू होतें त्या युद्धांत ह्युजेनॉट्स लोकांस मदत करण्याकरितां जावें, अशी काऊंट जेन्लीस व त्याचे मित्र यांनीं वुइल्यमला सूचना केली. त्यानें ती मान्य करण्याचें योजिलें; पण त्याचें जर्मन सैन्य त्या गोष्टीस कबूल होईना. 'आल्व्हाशीं युद्ध करण्याचा आमचा करार आहे, इतरांशीं नाहीं.' असें म्हणून ते आपणांस रजा देण्याची विनंती करूं लागले. तेव्हां त्यांस परत पोंचविण्याकरितां वुइल्यम गेटा नदी उतरून म्यूज नदीच्या मार्गानें निघाला. पण त्या नदीस त्यावेळीं महापूर आलेला असल्या-

कारणानें त्याला पुन्हा तसेंच फ्रेंच सरहद्दीकडे माघारीं वळावें लागलें. वाटेंत लीज शहराच्या हद्दींतून आपलें सैन्य नेण्याची परवानगी मिळविण्याचा त्यानें यत्न केला पण तो सफल झाला नाहीं. फ्रेंच हद्दींत आल्यावर तेथील राजाच्या लष्करी अधिकाऱ्यांनीं त्यास त्रास देण्याचा यत्न केला; पण त्या अधिकाऱ्यांजवळ भरपूर सैन्य नसल्यामुळें त्यांचें त्याच्या मोठ्या सैन्यापुढें कांहीं चाललें नाहीं. पुढें फ्रेंच राजानेंही त्यास एवढ्या मोठ्या सैन्यासह तटस्थ राष्ट्रांत शिरण्याचें कारण काय ? म्हणून जाब विचारला. त्यास सामोपचाराचें उत्तर देऊन व राजाचें कोणत्याही प्रकारें नुकसान करण्याचा आपला हेतु नाहीं असें कळवून त्यानें त्याची समजूत केली. पण फ्रेंच लोकांच्या यादवींत गुंतून राहणें हें त्याचें ध्येय नसल्यामुळें व त्याचे शिपायीही लढण्यास उत्सुक नसल्यामुळें त्यानें इ. स. १५६८ च्या डिसेंबरांत आपली सर्व चीजवस्त विकून त्यांचा पगार भागविला व त्यांस रजा दिली. त्यांपैकीं सुमारें बाराशें लोक त्यास चिकटून राहिले. त्यांना आपले बंधु लुई व हेनरी यांच्या स्वाधीन करून तो कांहीं थोड्या लोकांनिशीं वेषांतर करून गुप्तपणें जर्मनींत निघून गेला ! तेव्हां कांहीं दिवस तो कोठें आहे हेंच कोणास कळलें नाहीं. काहींनीं तर तो मेल्याचीही बातमी उठविली ! आल्व्हा देखील त्यास मृतसम मानूं लागला ।† तथापि तो जिवंत असून पुढील कार्याच्या विवंचनेंत होता; मात्र त्याला ह्यावेळीं कर्ज फार झाल्यामुळें व जर्मन संस्थानिकांनीं त्यास आश्रय देण्याचें नाकारल्यामुळें वरचेवर स्थलांतर करून भटकत रहावें लागलें होतें. त्यावेळच्या त्याच्या सर्व हालचालींची संपूर्ण माहिती मिळत नाहीं; तथापि उपलब्ध झालेल्या पत्रव्यवहारावरून इ. स. १५६९ च्या नोव्हेंबर महिन्यांत तो डिलेनबर्ग येथें व डिसेंबर महिन्यांत अर्न्स्टाड येथें असल्याचें दिसून येतें. याप्रमाणें तो सुमारें दोन वर्षें भटकत होता व त्या स्थितींतही आपल्या कार्यप्रीत्यर्थ जें काय करतां येईल तें करीत होता. त्याचा हा अज्ञातवास संपेपर्यंत इकडे आल्व्हानें काय काय चमत्कार केले त्याकडे आतां वळूं.

†" We may look upon orange as a dead man, the greater part of his people are shattered starving, cut up." असें आल्व्हानें एका पत्रांत लिहिलें.

—जॅक कॉलिंग्स् स्कायरकृत वुइल्यमचें चरित्र– पृष्ठ १५२.

वुइल्यमच्या सैन्याची वरीलप्रमाणें वाताहात झाल्यावर आल्व्हा मोठ्या थाटानें ब्रुसेल्स शहरीं आला व आपल्या शत्रूचा मोड करून विजय मिळविल्याबद्दल त्यानें तेथें विजयोत्सव मांडला. देशांतील सर्व लोकांना त्यानें हा उत्सव साजरा करण्याची आज्ञा केली व त्यांस ती निमूटपणें मान्य करावी लागली! ह्या प्रसंगीं आल्व्हानें आपला एक भव्य पुतळा तयार करून तो अँटवर्प येथील (त्यानेंच बांधलेल्या) नवीन किल्ल्यांत उभारला. त्यानें वुइल्यमचा पराजय केलेला पाहून रोमचा पोप त्याजवर फार प्रसन्न झाला व त्या प्रसन्नतेचें चिन्ह म्हणून त्यानें त्यास एक रत्नखचित टोपी व तरवार नजर केली. ह्या विजयाची हकीकत समजल्यावर फिलिपनेंही त्यास शाबासकी दिली. तेव्हां आल्व्हास जुलूम करण्यास जास्त स्फुरण चढलें! ह्या वेळपर्यंत त्यानें हजारों लोकांचें वित्त हरण केलें होतें तरी त्याच्या जुलमी राज्यकारभाराचा खर्च भागेना! म्हणून त्यानें लोकांवर नवीन जुलमी कर बसविण्याचें मनांत आणलें. नेदर्लंडच्या पूर्वापार कायद्यानुसार लोकांच्या संमतिशिवाय नवीन कर बसविण्याचा राजास अथवा त्याच्या प्रतिनिधीस अधिकार नव्हता. पण आल्व्हानें हे कायदे धाब्यावर बसवून सर्व प्रकारच्या मालमत्तेवर शेंकडा १ टका व मालमत्तेच्या प्रत्येक अदलाबदलीच्या व्यवहारावर शेंकडा ५ टक्के व स्थावर अथवा जंगम मिळकतीच्या विक्रीच्या व्यवहारावर शेंकडा १० टक्के याप्रमाणें तीन नवे कर बसविण्याचा घाट घातला. त्याप्रीत्यर्थ त्यानें सर्व प्रांतांतील स्थानिक लोकसभांच्या प्रतिनिधींस ब्रुसेल्स येथें बोलावलें व त्यांस वरीलप्रमाणें कर वसूल करून मध्यवर्ती सरकाराकडे पाठविण्याची आज्ञा केली. त्याच्या आजपर्यंतच्या राजधोरणामुळें तेथील व्यापार बुडाला होता व सामान्य जनतेची सांपत्तिक स्थितीही खालावली होती. यामुळें वरच्यासारखे जबर कर देण्याचें सामर्थ्य कोणाच्याही अंगीं उरलें नव्हतें; तथापि आल्व्हाची भीड राखण्याकरितां वरील प्रतिनिधींनीं पहिला कर मंजूर करून वसूल करण्याचें कबूल केलें. परंतु दुसऱ्या दोन करांविरुद्ध त्यांनीं जोराची तक्रार केली. हे कर अन्यायाचे व लोकांस भिकेस लावणारे असल्याबद्दल आल्व्हाच्या गोटांतील कायदेपंडित व्हिज्लियस् [स्टेट कौन्सिलर] यानें खासगी रीतीनें त्याबद्दल आल्व्हाजवळ निषेध प्रगट केला, पण आल्व्हानें आपला हट्ट सोडला नाहीं. तेव्हां नेदर्लंडांतील क्षीण व हताश झालेल्या लोकांचींही मनें खवळून त्यांनीं ते कर देण्याचें नाकारलें! बलिष्ठांच्या जबरदस्तीमुळें व त्यांच्या हातच्या दंडुक्यास भिऊन

२४८६

हताश आणि क्षीण बनलेल्या लोकांच्या भित्रेपणासही कांहीं मर्यादा असते! तिचा अतिक्रम होऊं लागला म्हणजे हे दुर्बल व भीतीनें गांगरून गेलेले लोकही आपल्या मनावरचा दुर्बलतेचा कृत्रिम पडदा झुगारून देऊन आपणांवर जुलूम करणाऱ्या बलिष्ठांशीं टक्कर देण्यास व आपल्या जीविताचा सोक्षमोक्ष करून घेण्यास तयार होतात! आणि ते तसे तयार झाले म्हणजे बहुधा त्यांच्यावरील जुलमाची परिसमाप्ति होण्याची वेळ नजिक येते, असें इतिहासावरून दिसतें. आल्व्हाची जुलमी कारकीर्द आतां या थराला येऊन पोंचली होती! अमस्टरडॅम, युत्रेक्ट वगैरे प्रमुख शहरच्या स्थानिक अधिकाऱ्यांनीं हा कर वसूल करण्याचें व तेथील लोकांनीं तो देण्याचें साफ नाकारलें! तेव्हां आल्व्हानें त्यांस जबर दंड केला; पण त्याचा परिणाम इष्ट न होतां उलट ह्या जुलमी करांचा प्रतिकार करण्याची प्रवृत्ति सर्वत्र वाढत चालली. त्याप्रीत्यर्थ लोकांनीं आपले धंदे बंद ठेविले! त्यायोगानें खाण्यापिण्याचे पदार्थही लोकांस मिळण्याची पंचाईत पडूं लागली. आल्व्हाच्या सैन्यास व अधिकाऱ्यांसही त्यामुळें चिमटा वसूं लागला. तेव्हां कोठें थोडेसे त्याचे डोळे उघडले व दुसऱ्या दोन करांबद्दल दोन वर्षांप्रीत्यर्थ एकदम एक ठोकळ रक्कम देण्याची तडजोड मान्य करून त्यानें तूर्त हा तंटा मिटविला. तथापि त्यानें ब्लड कौन्सिलच्या साह्यानें तेथील गरीब रयतेचें प्राणहनन करण्याचें काम अव्याहत चालू ठेविलें होतेंच! त्यांचा ह्या संकटापासून सुटका करण्यास तयार झालेला वुइल्यम दि सायलेंट हा या वेळीं मोठ्या संकटांत होता. त्याला भयंकर कर्ज झालेलें असून त्याबद्दल त्याच्या सावकारांचा ससेमिरा त्याच्या मागें होता. त्याच्या पदरीं अद्यापिही थोडेंसें सैन्य होतं; पण त्यास पगार वेळेवर न मिळाल्यामुळें तेंही विथरून गेलें होतें व त्यांतील लोक त्याच्यावरच झडप घालण्यास टपलेले होते. त्याचा भाऊ जॉन हा त्यास आपल्याकडून होईल तितकी मदत करीत होता; परंतु तेवढ्यानें त्याचें काम भागण्यासारखें नव्हतें. ह्या काळांत त्यानें जॉनला पाठविलेल्या पत्रांतून वारंवार दैन्यपणाचे उद्गार काढलेले आहेत. मासल्याकरितां अशा दोन पत्रांतील उतारे पुढें देतों म्हणजे त्यावरून त्याच्या ह्या वेळच्या स्थितीची वाचकांस चांगली कल्पना होईल.

(१) "आपल्या गरीब ख्रिस्ती देशबंधूंकरितां मदत मिळविण्यास मी येथें आलों आहे हें सर्वांस ठाऊक आहेच; आणि याच कारणास्तव राजाचा पक्ष व ड्यूक ऑफ आल्व्हा हे मला इजा करण्यास टपून बसलेले आहेत. माझ्या शिपायांचा

पगार थकलेला असल्यामुळें, ते देखील मला केव्हां काय करतील याचा नेम नाहीं. अशा स्थितींत मी डिलेन्बर्ग येथें राहिलों, तर–ती जागा बळकट व सुरक्षित असल्यामुळें–योग्य होईल हें खरें; पण त्यामुळें तुम्हांस फार त्रास होईल. तेथें मित्रत्वाचा बहाणा करून आल्व्हाचे अनेक गुप्त हेर येऊन तुमच्या किल्ल्याची पाहणी करतील अथवा मला विषप्रयोग करण्याचाही यत्न करतील. शिवाय मी व माझा परिवार यांच्यामुळे तुम्हांस खर्चही पुष्कळ लागेल आणि त्या स्थितीचा फायदा घेऊन माझे शिपायीही आपला तुंबलेला पगार तुमचेकडून वसूल करण्याकरितां तुमच्या किल्ल्यावर हल्ला करतील. ×××× तथापि माझी बायको तेथें येण्यास कबूल असल्यास मी तेथें येण्याचा प्रयत्न करीन; तरी तिचा काय हेतू आहे, हें कळविण्याची मेहेरबानी करावी." ( ता. १७-१-१५७० ).

(२) "भांडीं व इतर सामान यांच्या विक्रीसंबंधानें प्रत्यक्ष भेटींत काय तें ठरवूं. मला वाटतें जत्रेंत त्यांची किरकोळ विक्री करून त्यांचा शक्य तितका अधिक पैसा उत्पन्न करावा. काऊंट गुंटर यानेंही या बाबतींत आपणांकडून होईल तितकी खटपट करण्याचें कबूल केलें आहे. तुम्ही मजविषयीं इतकी तसदी घेतां याबद्दल तुमचे कसें उतराई व्हावे हें मला कळत नाहीं. तुम्हांला मजकरितां इतका त्रास व खर्च सोसावा लागत असलेला पाहून व त्याकरितां तुम्ही कर्जबाजारी झालेले पाहून मला फार खेद वाटतो." ( ता. १७-२-१५७०.)

ज्या पुरुषाचें वैभव कांहीं कालापूर्वी एखाद्या राजाप्रमाणें होतें त्यास वरील पत्रांतून ध्वनित होत असलेली कंगाल स्थिति प्राप्त झाली असतांना कोणत्या प्रकारच्या मानसिक वेदना होत असतील याची कल्पना 'जावें त्याच्या वंशा तेव्हां'च होणारी आहे! ह्या स्थितींतून वर डोकें काढण्यास जर्मनींतील संस्थानिक–विशेषतः त्याचा सासरा सॅक्सनीचा ड्यूक व अगदीं जवळचा आप्त हेसेचा लँडग्रेव्ह–यांनीं त्यास मदत करणें जरूर होतें; परंतु त्यांच्या पूर्वीच्या मदतीचे चीज न झाल्यामुळें ह्या पराभूत मनुष्यास मदत करण्यास यावेळीं ते तयार नव्हते. त्यांचें हें करणें मोठेंसें दूषणार्ह होतें असें नाहीं. ते बोलून चालून मांडलिक संस्थानिक होते. त्यांना जरी आपापल्यापुरतें स्वातंत्र्य होतें, तरी जर्मन बादशहा मॅक्समिलियन याच्या मर्जीविरुद्ध वागणें त्यांस शक्य नव्हतें. ह्या बादशहाची प्रथम वुइल्यमच्या कार्याबद्दल सहानुभूति होती व त्यानें त्याच्यातर्फे फिलिपजवळ मध्यस्तीही केली होती. परंतु मध्यंतरीं फिलिपची बायको वारल्यामुळें त्यास आपली मुलगी

देण्याचा विचार करून तो हेतू साधण्याकरितां त्याची मर्जी संपादन करण्याचा उद्योग ह्या बादशहानें सुरू केला होता. तेव्हां साहजिकच त्यानें वुइल्यमची बाजू सोडून दिली व त्यास कोणत्याही प्रकारची मदत न करण्याबद्दल त्यानें आपल्या मांडलिकांस विनंती केली. वुइल्यमच्या पहिल्या मोहिमेंत जर त्यास यश आलें असतें तर ह्या मांडलिकांनीं मॅक्समिलियनची विनंती बाजूस ठेवून त्यास मदत केली असती; पण त्याला प्रथमपासून सारखें अपयश येत गेल्यामुळें ह्या बुडत्या कार्यास मदत करून ते आपली स्थिति नाजूक करून घेण्यास साहजिकच तयार नव्हते. पण ज्या नेदर्लंडांतील लोकांच्या हिताकरितां वुइल्यमनें आपली एवढी दुर्दशा करून घेतली ते लोकही त्यास अपेश आलेलें पाहून आल्व्हाच्या भीतीमुळें मदत करण्यास उत्सुक नव्हते ! एवंच सर्व बाजूंनीं निराशा उत्पन्न करण्यासारखी जरी यावेळीं वुइल्यमची स्थिति झाली होती, तरी तो तिळमात्रही डगमगला नाहीं. बहुतकाल जुलमानें त्रस्त झाल्यामुळें सर्वतोपरी दुर्बल झालेल्या लोकांतर्फे फिलिपसारख्या बलाढ्य राजाच्या जुलमी अधिकाऱ्यांशीं झगडतांना, प्रारंभीं कांहीं काल देशभक्तांची अशीच दाणादाण व दिशाभूल व्हावयाची हें तो जाणून होता. ती टाळण्याचा शक्य तितका प्रयत्न करूनही जर अपयश आलें तर हताश न होतां आपल्या स्वातंत्र्यास लागलेलें ग्रहण सुटेपर्यंत शस्त्र खालीं ठेवावयाचें नाहीं असा त्यानें निश्चय केलेला असल्यामुळें, कसलाही आपत्काल प्राप्त झाला तरी त्याचें मन भीति-वश व हताश होण्याचा संभव नव्हता. त्याचें मन किती खंबीर व उद्दिष्ट कार्या-विषयीं तत्पर होतें याची कसोटी पहाण्याकरितांच कीं काय कोण जाणें, दैवानें त्याच्यावर वरील प्रकारच्या आपत्तीपेक्षां शंभरपटीनें अधिक वाईट व मनाचें स्वास्थ्य सर्वस्वीं नष्ट करणारा प्रसंग आणला होता; पण त्यालाही त्यानें जुमानलें नाहीं ! ह्या हृदयद्रावक व करुणास्पद प्रसंगाची त्रोटक हकीकत अशी आहे:—

त्याची स्त्री, सॅक्सनीची ॲन—जिच्याबरोबर दहा वर्षांपूर्वी त्यानें मागें सांगितल्या-प्रमाणें मोठ्या थाटानें लग्न केलें होतें—ही त्यानें देशत्याग केल्यामुळें असंतुष्ट होऊन त्याच्याशीं सरळपणानें वागत नव्हती हें मागें एकदां सांगितलें आहेच. त्यानंतर वुइल्यमची सांपत्तिक स्थिति सारखी खालावत चालली तरी हिच्या राजविलासी राहणींत अंतर पडेना ! ती आपल्या खर्चासंबंधानें त्याला फार त्रास देऊं लागली; व नेदर्लंडांत जाऊन राहण्याचा हट्ट धरून बसली; परंतु तिचा तो हट्ट पुरविणें वुइल्यमला शक्य नव्हतें. त्यानें तिला आपल्याबरोबर डिलेनबर्ग येथें नेलें. तेथें

तिला पुढें मॉरिस या नांवानें प्रसिद्धीस आलेला पुत्र झाला. ह्या मुलाचा जन्म-संस्कार प्रॉटेस्टंट मतानुसार करण्यांत आला होता. त्याच्या जन्मानंतर ( इ. स. १५६७) दोन वर्षांनीं वुइल्यमवर मागें वर्णिल्याप्रमाणें अज्ञातवासाचा प्रसंग आला होता. ह्या संधीचा फायदा घेऊन व त्याच्याशीं भांडून ती कोलोन शहरीं जाऊन राहिली होती. तिचें समाधान करून तिला ताळ्यावर आणण्याचे वुइल्यमनें पत्रद्वारें पुष्कळ यत्न केले. तिला आपल्या लग्नसमयींच्या शपथांची आठवण करून देऊन आपल्या आपत्कालांत दुर्वर्तनानें आपल्या मनास त्रास न देतां परमेश्वरावर विश्वास ठेवून कांहीं काल अडचणी सोसण्याची त्यानें तिला विनंती केली; परंतु तिचा कांहींएक उपयोग न होतां दिवसानुदिवस तिच्या पत्रांतून उद्धटपणाची कमाल होत गेली. त्याकडेही वुइल्यमनें दुर्लक्ष केलें असतें-व कांहीं काळ केलेंही होतें. परंतु तिनें त्याच्याशीं नुसता उद्धटपणा करून स्वस्थ न बसतां त्याच्या व आपल्या नांवास बट्टा लागेल अशी कृति केल्याचें नजरेस आल्यावरून त्यास तिचा त्याग करणें भाग पडलें! हें आम्ही अगदीं थोडक्यांत लिहिलें आहे. परंतु ही गोष्ट करण्यापूर्वी, तिच्या यारास पकडणें, ( हा ॲंटवर्पचा माजी मॅजिस्ट्रेट व प्रख्यात युरोपियन चितारी पीटरपॉल रूबेन्स याचा बाप रूबेन्स असून, ॲनच्या आग्रहावरून आपण हें बदकृत्य केलें असें त्यानें पश्चात्तापपूर्वक कबूल केलें ) त्याचा कबुलीजबाब घेतल्यावर ॲनच्या पदरांत तिचा गुन्हा घालून त्यासंबंधीं तिचा चुलता सॅक्सनीचा राजा याची खात्री करून देणें, त्याचे व तिच्या इतर नातेवाइकांचे आक्षेप खोडून काढणें, आणि तोंपर्यंत ॲनला बंदोबस्तानें कैदेंत ठेऊन अखेर त्यांच्या हवालीं करणें, इतक्या गोष्टी होईपर्यंत बराच काळ गेला. त्याचा श्रेष्ठ दर्जा व सार्वजनिक थोर लौकिक, त्याची इभ्रत व त्यानें हातीं घेतलेलें पवित्र स्वदेशोद्धाराचें कार्य, यांवर वरील लज्जास्पद गोष्टीचा कांहीं अनिष्ट परिणाम घडतो कीं काय, ह्या विचारानें ह्या वेळीं त्याच्या मनाची किती त्रेधा उडाली असेल याची कल्पना करण्याचें काम आम्ही वाचकांवरच सोंपवितों! त्याच्या जागीं जर दुसरा कमी धीराचा व कोमल मनाचा मनुष्य असता, तर ह्या अनिष्ट प्रकारामुळें आपल्या अब्रूस कलंक लागेल या भीतीनें वेडा बनला असता!* परंतु वुइल्यमनें

* इ. स १९०७-८ च्या महाराष्ट्रांतील राजकीय चळवळींत पुढाकार घेणाऱ्या एका प्रसिद्ध गृहस्थांची स्थिति सदर प्रकारच्या कारणावरून अशीच झाली होती हें बहुतेकांस विदित आहेच.

आपल्या उद्दिष्ट कार्याकडे लक्ष देऊन वरील प्रकारामुळें होणाऱ्या वेदना घट्ट मन करून सहन केल्या, हें नेदर्लंडचें खरोखर मोठें भाग्य होय! स्वतःच्या वैयक्तिक अब्रूपेक्षां राष्ट्राची अब्रू जास्त महत्त्वाची असते व तिचें रक्षण करण्याचा विडा उचलणाऱ्या पुरुषानें, प्रसंगीं स्वतःच्या अब्रूवर जरी दुर्दैवानें घाला पडला, तरी त्यास न जुमानतां, आपलें राष्ट्रीय कर्तव्य करीत राहणें जरूर आहे हें वुइल्यमनें स्वतःच्या उदाहरणानें उत्तम प्रकारें सिद्ध करून दाखविलें आहे व त्याबद्दल त्याची जितकी तारीफ करावी तितकी थोडीच होणार आहे. असो; याप्रमाणें स्त्रीवियोग, मित्रवियोग व संपत्तिवियोग ह्या त्रयीनें त्रस्त असतांनाही नेदर्लंडच्या मुक्तते-विषयीं त्याचे उद्योग चालूच होते व त्यांपैकीं एक फळास येऊन त्याची स्थिति सुधारण्यास कारणीभूत झाला; तो असा:—

इ. स. १५६९ च्या प्रारंभीं वुइल्यमचे भाऊ लुई व हेनरी हे फ्रान्सांत असतांना त्यांच्या ह्युजेनॉट मित्रांपैकीं कांहींनीं समुद्रकिनाऱ्यावर चांचेगिरीच्या धंद्यांत बरेंच यश मिळविल्याचें त्यांच्या दृष्टोत्पत्तीस आलें; तेव्हां या मार्गानें आपणांस युद्धाप्रीत्यर्थ लागणारा पैसा जमा करावा म्हणून लुई व त्याचा मित्र कोलिग्नि ( हा ह्युजेनॉट लोकांचा पुढारी होता ) यांनीं एक लहानसें डच आरमार तयार करून त्यास समुद्रावर मासे मारण्याची व स्पॅनिश जहाजें लुटण्याची सनद देण्याबद्दल वुइल्यमला विनती केली. अल्व्हाची खोड मोडण्यास ही युक्ति बरी आहे असें समजून त्यानें आपल्या भावाच्या विनंतीस मान दिला. हॉलंड व झीलंड येथील लोक उत्तम खलाशी व धाडसी असून समुद्रावरील युद्धांत प्रवीण होते. अल्व्हाच्या जुलमामुळें त्यांचे नेहमीचे व्यवसाय बंद पडल्याकारणानें त्यांनीं मच्छि-मार व चांचेगिरी सुरू केली होती. ह्या लोकांस हाताशीं धरून लुईनें कोलिग्निच्या साह्यानें एक बरेंच मोठें डच आरमार तयार केलें. ह्या आरमारावर वुइल्यमनें प्रथम चार अधिकारी नेमले होते. त्यांत रायनर डोल्हेन हा मुख्य होता. ह्या सुमारास अल्व्हा व इंग्लंडची राणी इलिझाबेथ यांच्यामध्यें कांहीं गैरसमज उत्पन्न होऊन वितुष्ट वाढलें होतें. सबब ह्या डच आरमारास इंग्लंडच्या किनाऱ्या-वरील बंदरांत आश्रय मिळूं लागला. त्यामुळें त्यांच्या चांचेगिरीचें मान एकसारखें वाढत चाललें. फक्त स्पॅनिश जहाजांवर झडप घालून त्यांतील माल हरण करण्याची वुइल्यमनें त्यांस परवानगी दिली होती; पण त्यांनीं वाटेल त्याचीं जहाजें धरून तीं हस्तगत करण्याचा व त्यावरील मनुष्यांस क्रूरपणें मारण्याचा क्रम सुरू

केला ! थोड्याच काळांत डोल्हेन यानें शेंकडों जहाजें, काबीज करून पुष्कळ संपत्ति मिळविली. या आरमारांतील लोकांस स्पनियर्ड लोकांनीं प्रथम 'समुद्रावरील भिकारी' असें तिरस्कारयुक्त नांव दिलें होतें; पण या भिकाऱ्यांनीं पुढें आपल्या पराक्रमानें व अत्याचारांनीं स्पॅनिश लोकांच्या मनांत इतकी दहशत उत्पन्न केली कीं, ते समुद्रांत फिरत असतांना जलप्रवास करण्याची त्यांस छाती होईनाशी झाली ! व त्यांचें आरमार हें आल्व्हाला जागोजागीं शह देण्यास वुइल्यमच्या हातीं एक उत्कृष्ट साधन होऊन बसलें. ह्या आरमाराचा दरारा जसजसा वाढत गेला तसतसे त्यांतील लोकांचे अत्याचार वाढत चालले. तेव्हां कोलिम्न याच्या सूचनेवरून वुइल्यमनें त्यावरील पूर्वींचे अधिकारी बडतर्फ करून नवे अधिकारी नेमले व त्यांस शिस्तीचे नियम घालून दिले. स्पॅनिश जहाजाखेरीज इतर जहाजांवर हल्ला न करण्याविषयीं त्यानें सक्तीचे हुकूम सोडले; पण ह्या आरमाराच्या स्थलसीमेपासून तो फार दूर असल्यामुळें आपल्या नियमांची अक्षरशः अंमलबजावणी करणें त्यास शक्य नव्हतें त्यामुळें कधीं कधीं ह्या नियमांचा भंग होई; पण एकंदरींत पूर्वीपेक्षां उपरोक्त नवीन अधिकाऱ्यांची कारकीर्द पुष्कळ बरी होती. ह्या आरमाराचें हें काम चालू असतां इकडे फ्रान्सची विधवा राणी व राजा असलेला तिचा पुत्र नववा चार्लस यांची वुइल्यमचा मित्र कोलिम्न व बंधु लुई यांवर अत्यंत मर्जी बसली होती व त्यांनीं नेदर्लंडच्या मोहिमेप्रीत्यर्थ वुइल्यमला साह्य करण्याचें आश्वासनही दिलें होतें. ( मात्र वुइल्यमला त्यांचा विश्वास वाटत नव्हता.) तसेंच इलिझाबेथचें आल्व्हाशीं आणि फिलिपशीं वांकडें येऊन त्या दोघांनीं तिला मारेकरी घालून गुप्तपणें ठार करण्याचे केलेले प्रयत्न उघडकीस आल्यामुळें तिचेंही वुइल्यमच्या पक्षास प्रत्यक्ष सहाय्य मिळण्याचा संभव दिसत होता. तथापि वुइल्यमच्या आरामाराच्या चांचेगिरीकडे दुर्लक्ष करून त्यास आपल्या बंदरांत आश्रय घेऊं देण्यापलीकडे तिनें कांहींच केलें नाहीं.

यावेळीं स्वीडन, डेन्मार्क, फ्रान्स, इंग्लंड वगैरे देशांत आपले मुखत्यार पाठवून तेथील लोकांकडून व राजांकडून मदत मिळविण्याचीही खटपट त्यानें सारखी चालू ठेविली होती. ती यशस्वी होण्याचा रंग दिसेना; तेव्हां खुद्द हॉलंड, झीलंड वगैरे पूर्वी त्याच्या अंमलाखालीं असलेल्या प्रांतांत व जर्मनींत पैशाची मदत मिळविण्यासाठीं त्यानें आटोकाट यत्न केले. फ्रान्स व इंग्लंड येथील राजा-राणीकडून वुइल्यमला जरी प्रत्यक्ष मदत मिळाली नाहीं तरी त्यांच्या भयानें आल्व्हा व फिलिप

यांनीं नेदर्लंडच्या लोकांच्या तोंडास एक मधाचें बोट लावण्याचा प्रयत्न केला. इ. स. १५७० च्या जुलई महिन्यांत त्यांनीं धार्मिक गुन्हेगारांस माफी देण्याचें आमिष दाखविण्याकरितां एक फर्मान काढलें. परंतु धर्मस्वातंत्र्याची इच्छा करणारांस त्याचा कांहींच उपयोग होण्याजोगा नव्हता. 'जे कोणी कॅथोलिक धर्माची दीक्षा पुन्हा घेतील व त्याप्रमाणें आचार ठेवतील त्यांस त्यांच्या पूर्वीच्या गुन्ह्याबद्दल माफी होईल' हें काय तें त्यांतील मुख्य अनुकूल असें कलम होतें. अर्थात् धर्मसुधारकांना त्याचा कांहींच उपयोग होण्याजोगा नसल्यामुळें, त्यानें त्यांचें समाधान झालें नाहीं. ह्या माफीच्या फर्मानाचा लोकांच्या मनावर मुळींच कांहीं परिणाम घडून आला नाहीं असें आल्व्हास फिलिपला कळविणें भाग पडलें. याच वर्षाच्या नोव्हेंबर महिन्यांत फ्लँडर्सपासून फ्रीजलंडपर्यंतचा समुद्र खवळून त्याच्या पाण्याच्या जोरानें किनाऱ्यावरील बंधारे फुटले. त्यामुळें मोठा जलप्रलय होऊन अमस्टरडॅम, रॉटरडॅम् वगैरे शहराभोंवतालचा बहुतेक प्रदेश उध्वस्त झाला. पुष्कळ घरें, जहाजें, जनावरें व सामान यांचा नाश होऊन सुमारें एक लक्ष माणसें दगावलीं! ह्या जलप्रलयामुळें नेदर्लंडांत मोठा हाहाःकार उडून गेला! परंतु त्याची परवा न करितां आल्व्हानें इ. स. १५७१ च्या आरंभीं पुन्हा लोकांकडून मागें सांगितलेले नवीन जुलमी कर वसूल करण्याचा प्रयत्न सुरू केला! त्याची ही अमानुष वृत्ति पाहून त्याचे कौन्सिलर व्हिज़्लियस व बर्लेमॉंट यांस देखील त्याचा वीट येऊन त्यांनीं त्याच्या ह्या योजनेस नेटानें विरोध केला. व्हिज़्लियसचा मित्र व फिलिपचा सल्लागार होपर याच्यामार्फत त्यांनीं आल्व्हाविरुद्ध फिलिपचे कान भरण्यास पूर्वीच सुरुवात केली व आल्व्हानें स्पेनमधूनच पुष्कळ पैसा नेऊन नेदर्लंडच्या कारभारांत खर्च केल्यामुळें फिलिपही त्याच्यावर मनांतून नाराज झाला होता. त्याकाळीं प्रत्येक बडा राजकारणी पुरुष हेरांचा उपयोग करीत असल्याकारणानें त्यास आपल्या विरुद्ध व बाजूनें चाललेलीं सर्व कारस्थानें आगाऊ कळत असत यामुळें आल्व्हा व वुइल्यम ह्या दोघांसही फिलिपच्या वृत्तींत झालेला वरील बदल कळला होता. तो ओळखून व आपलें नेदर्लंडांतलें काम (तेथील लोकांस निःसत्त्व करून सोडण्याचें) संपलें असें समजून त्यानें आपला राजिनामा घेण्याची फिलिपला विनंती केली. फिलिपनें ती मान्य करून त्याच्या जागीं ड्यूक ऑफ मेडिना कोयली याची नेमणूक केली. परंतु त्याला ताबडतोब नेदर्लंडमध्यें जाणें शक्य नसल्यामुळें, तो येईपर्यंत आल्व्हानें आपल्या जागेस चिकटून रहावें असें त्यास

# प्रकरण ८ वें.

# कार्याची प्रगति.

वुइल्यमच्या आरमाराची हकीकत मागें सांगितलीच आहे. ह्या आरमारांतील जहाजांस इंग्लंडच्या किनाऱ्यावर आश्रय मिळतो म्हणून आल्हानें स्वतः व फिलिपच्या मार्फत इलिझाबेथकडे जोराची तक्रार केली होती. कांहीं दिवसांपूर्वी त्यांनीं गुप्तपणें तिचा खून करण्याचे जरी प्रयत्न केले असले तरी इलिझाबेथ त्यांच्याशीं उघडपणें वैर करण्यास तयार नव्हती. अर्थात् त्यांच्या उपरोक्त तक्रारीचा तात्पुरता तरी विचार करणें तिला भाग होतें. म्हणून तिनें वुइल्यमचे आरमारी अधिकाऱ्यांस आपल्या बंदरांतून तावडतोब निघून जाण्याबद्दल आज्ञा केली व किनाऱ्यावरील लोकांस त्यांना धान्यसामुग्री पुरविण्याची मनाई केली. ह्या आरमाराजवळ त्यावेळीं पुरेशी अन्नसामुग्री नसल्यामुळें व ती इंग्लंडच्या बंदरांत पूर्वीप्रमाणें मिळण्याचा संभव नसल्यामुळें त्यांतील लोकांची उपासमार होऊं लागली! ती टाळण्याकरितां हॉलंडच्या किनाऱ्यावरील एकाद्या संपन्न बंदरावर छापा घालावी म्हणून तें डोव्हर बंदरांतून निघून हॉलंडच्या उत्तरकिनाऱ्यावरील एंकहुसेन बंदरांत येऊन दाखल झालें. तेथें त्यांनीं दोन्ही स्पॅनिश व्यापारी जहाजें पकडून त्यावरील चीजवस्त आपल्या कबजांत घेतली व तेथून पुढे जाणार तों वारा विरुद्ध दिशेचा झाल्यामुळें त्यास दक्षिणेस झीलंडकडे म्यूज नदीच्या मुखाकडे वळावें लागलें. ह्या नदीच्या मुखानजीक असलेल्या ब्रिल शहरानजीक हें आरमार इ. स. १५७१ च्या एप्रिल महिन्याच्या आरंभीं येऊन पोंचलें. त्यांत चोवीस जहाजें व सुमारें चारशें माणसें होतीं. त्यांचा मुख्य अधिकारी ॲडमिरल द ला मार्क हा असून ट्रेस्लॉंग, ॲडाम, हॅरेन, ब्रँड वगैरे प्रख्यात् दर्यावर्दी लोक त्याचे दुय्यम अधिकारी होते. एप्रिल फूलसडे* ( ४ एप्रिल ) च्या दिवशीं दोन

* आमच्याकडे ज्याप्रमाणें शिमग्याचा सण वात्रटपणाकरितां प्रसिद्ध आहे त्याप्रमाणें युरोपियन लोकांत एप्रिल फूलसडे हा त्याच कामाकरितां प्रसिद्ध आहे; ह्या दिवशीं मोठमोठे सभ्य साहेबलोकही परस्परांची टवाळी करण्यांत

प्रहरीं दोन वाजण्याच्या सुमारास हें आरमार ब्रिलच्या किनाऱ्यानजीक येऊन उभें राहिलें. त्यांचा जमाव व आकस्मिक येणें पाहून किनाऱ्यावरील लोक घाबरले. त्यावेळीं पीटर कोपेलस्टॉक या नांवाचा एक नावाडी म्यूज नदीच्या मुखांतून नाव घेऊन येत असतां त्याचें लक्ष सहज ह्या आरमारी जहाजाकडे गेलें तेव्हां तीं कोणाचीं आहेत हें पाहण्याच्या हेतूनें तो त्यांच्या नजीक आला. प्रथमदर्शनीं तो ज्या जहाजाजवळ आला त्यावर ट्रूसलॅांग हा अधिकारी होता. त्याची व कोपेलस्टॉक याची पूर्वीची ओळख असल्यामुळें उभयतांनी एकमेकांस ओळखून परस्परांच्या भेटीबद्दल आनंद व्यक्त केला व ट्रूसलॅांग त्यास बरोबर घेऊन ताबडतोब द ला मार्क असलेल्या जहाजावर आला. हा मनुष्य आपल्या फार उपयोगी पडेल, असें सांगून त्याच्यामार्फत गांवांतील अधिकाऱ्यांस शहर आपल्या स्वाधीन करण्याचा निरोप पाठविण्यास तयार होण्याविषयीं त्यानें द ला मार्कचें मन वळविलें व कोपेलस्टॉक याजपाशीं शहरांतील अधिकाऱ्यांस दाखविण्यासाठीं खूण म्हणून आपल्या हातांतील आंगठी देऊन त्यानें त्यास परत शहरांत पाठविलें. कोपेलस्टॉकनें शहरांतील अधिकाऱ्यांस तो निरोप कळविला तेव्हां 'हे किती लोक आहेत ?' म्हणून त्यांनीं प्रश्न केला. त्यास 'सुमारें हजार' असें कोपेलस्टॉकनें अगदीं निष्काळजीपणानें उत्तर दिलें. तें ऐकतांच अधिकाऱ्यांच्या मनाची त्रेधा उडाली. कारण इतक्या लोकांचा प्रतिकार करण्याइतकें सैन्य त्यांचेजवळ नव्हतें व ह्या लोकांच्या लुटारूपणाची व धाडसाची ख्याति पूर्वींच त्यांच्या कानावर आलेली होती. ट्रूसलॅांगनें शहर स्वाधीन करण्यास दोन तासांची मुदत दिली होती व तेवढ्या अवधींत शहर स्वाधीन केल्यास कोणासही इजा पोंचणार नाहीं अशी हमी दिली होती, परंतु अधिकाऱ्यांनीं शहर स्वाधीन करण्याचा मार्ग न स्वीकारतां पळून जाण्याचा मार्ग स्वीकारला! दोन तासाच्या आंत गव्हर्नराखेरीज सर्व अधिकारी पळून गेले. तें पाहून बहुतेक लोकही आपापली चीजवस्त घेऊन पळाले! हें वर्तमान समजतांच ट्रूसलॅांग व द ला मार्क यांनीं आपल्या आरमारी लढवय्यांचे दोन विभाग करून उत्तर व दक्षिण अंगानें शहरावर हल्ला चढविला. त्यांची व शहरांतील रक्षकांची थोडीशी चकमक उडाल्यावर ट्रूसलॅांगनें दक्षिण बाजूनें शहरांत प्रवेश केला व

---

आनंद मानतात. त्यास अनुसरून "ब्रिल अचानकपणें घेऊन आल्व्हाचे उपनेत्र समुद्रावरील भिकाऱ्यांनीं त्यास न कळत पळविले" अशी लोक आल्व्हाची टवाळी करूं लागले.

त्या वाटेनें पळून जात असणाऱ्या तेथील गव्हर्नरास कैद केलें. उत्तरेकडून द ला मार्कही त्यास लवकरच येऊन मिळाला. अशा तऱ्हेनें त्यांनीं एका अर्ध्या तासाच्या आंत तें शहर आपल्या हस्तगत करून घेतलें आणि तेथें फिलिपचा गव्हर्नर या नात्यानें वुइल्यम प्रिन्स ऑफ ऑरेंज याची सत्ता जाहीर केली. वुइल्यमनें फिलिपची आधिसत्ता अद्याप झुगारून दिली नव्हती. त्या सत्तेचें ढोंग कायम ठेऊन पूर्ण स्वातंत्र्याऐवजीं तूर्त नेदर्लंडास पूर्वी असलेलें अंतःस्वातंत्र्यच तूर्त कमाविण्याचा त्याचा संकल्प असल्यामुळें त्यानें आपल्या सैनिकांसही तेंच धोरण स्वीकारण्याची आज्ञा केली होती. त्यास अनुसरूनच द ला मार्कनें ब्रिल येथें वरीलप्रमाणें त्याची सत्ता जाहीर केली. ह्या धाडशी लुटारू 'समुद्रावरील भिकाऱ्यां'नीं ( Sea beggars ) सहज लीलेनें केलेला हा चमत्कार वुइल्यमला प्रारंभी—त्याची बातमी कळतांच—फारसा महत्त्वाचा वाटला नाहीं. कारण ह्या लोकांचें खरें लढाऊ सामर्थ्य किती आहे हे त्यांस ठाऊक असल्यामुळें व त्यांना सैन्याची मदत पाठविण्यास तोही त्यावेळीं असमर्थ असल्याकारणानें तें शहर फार दिवस त्यांच्या हातीं टिकेल असा त्यास भरंवसा नव्हता. परंतु 'प्रयत्नान्तीं परमेश्वर' त्या न्यायानें त्याच्या त्या लोकांस आणखी यश मिळत गेल्यानें ब्रिल हस्तगत करून त्यांनीं भावी डच लोकसत्ताक राज्याचो मुहूर्तमेढच रोवली, असें झालें !

मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें ब्रिल शत्रूच्या हातीं गेल्याची बातमी आल्व्हास समजतांच त्यानें वुइल्यमच्या मागून हॉलंड, झीलंड व युत्रेक्ट या प्रांतांचा झालेला गव्हर्नर काऊंट बॉसू यास ब्रिलला वेढा देण्याची आज्ञा केली. त्याप्रमाणें तो तत्काळ दहा पलटणी घेऊन ब्रिलच्या नजीक आला. त्याचें मोठें सैन्य पाहून ट्रेसलाँग व द ला मार्क यांचे लोक शहराबाहेर येऊन त्या सैन्यावर हल्ला करण्यास भिऊं लागले. हें पाहून वुइल्यमचा पक्षपाती असलेल्या तेथील एका सुतारानें हातांत कुदळ घेऊन समुद्रांत उडी टाकली व पोहत जाऊन शत्रू ज्या रोखानें येत होता त्या बाजूस असलेला एक बंधारा फोडून त्यानें त्याच्या वाटेंत समुद्राचें पाणी सोडून दिलें ! हें पाहून बॉसूनें आपलें सैन्य दुसऱ्या बाजूनें शहराकडे पळविलें. त्या बाजूनें ट्रेसलाँगच्या लोकांनीं त्यांचेवर तोफांचा भडिमार सुरू केला. तो चालू असतांना ट्रेसलाँग व त्याचा हस्तक रूबॉल हे धाडस करून समुद्रांत शिरले व ज्या जहाजांतून बॉसूचे लोक

येऊन शहराच्या किनाऱ्यानजीकच्या जमिनीवर उतरले, त्यांतील कांहीं जहाजांस त्यांनीं आग लावून दिली! एकीकडून आग व दुसरीकडून पाणी अशा पेंचांत सांपडल्यामुळें वॅासूचें सैन्य सैरावैरां पळूं लागलें! तेव्हां कांहीं समुद्रांत बुडालें, कांहीं चिखलांत रुतलें व बरेंचसें एका अरुंद मार्गानें जाऊन आगीच्या सपाट्यां-तून वांचलेल्या जहाजांत बसून परत गेलें! वुइल्यमच्या आरमारी लोकांनीं मिळविलेल्या ह्या विजयाची बातमी लवकरच हॉलंड, झीलंड व युत्रेक्ट प्रांतांत पसरली. तेव्हां आल्व्हाच्या जुलमास कंटाळलेले तेथील लोक साहजिकच त्यांस आपले कैवारी समजून मदत करण्यास तयार झाले. वॅासूचें जें सैन्य परत फिरलें तें रॉटरडॅम शहरावर चालून गेलें परंतु तेथील लोकांनीं त्यांस आंत येण्याचें नाकारलें तथापि त्यांनी जबरदस्तीनें शहरांत प्रवेश केला व तेथील लोकांची भयंकर कत्तल केली! हें सैन्य रॉटरडॅमकडे निघून गेल्यावर द ला मार्कच्या हाताखालच्या देशभक्तांनीं फ्लुशिंग बंदराकडे आपला मोर्चा वळविला. तेथील लोक त्यांस तावड-तोब वश झाल्यामुळें तें तत्काळ त्यांच्या ताब्यांत आलें. हें बंदर शेल्डट् नदीच्या मुखाशीं असून स्पेनबरोबर दळणवळण ठेवण्याचें मुख्य साधन असल्यामुळें महत्त्वाचें ठिकाण होतें. तेथील तटबंदीचें दिरंगाईवर पडलेलें काम सुरू करण्या-साठीं आल्व्हाचा मुख्य इंजिनियर पॅचेको ( हा सर्व युरोपांत प्रसिद्ध होता ) हा नुकताच तेथें येऊन पोंचला होता. तो द ला मार्कच्या लोकांच्या हातीं लागला व त्यास त्यांनीं ठार मारलें! ही वार्ता हॉलंड, झीलंड आणि फ्रीजलंड या प्रांतांत चोहोंकडे पसरतांच त्यांतील बहुतेक शहरांनीं आल्व्हाविरुद्ध बंड पुकारून वुइल्यमची सत्ता—फिलिपचा गव्हर्नर या नात्यानें—मान्य केली. त्यामुळें वॅालचेरन, एंक्हुसेन, एडॅम, उडवॉटर, हार्लेम, लेडन, डॉर्ट, गोर्कम, गौडा, आल्कमार हीं शहरें व गेल्डरलॅंड आणि ओव्हरयेसेल प्रांतांतील कांहीं भाग येथें आपोआप वुइल्यमची सत्ता स्थापन झाली. लोकांच्या ह्या मनोवृत्तीचा पूर्ण फायदा घेण्यास्तव वुइल्यमनें आपल्या देशबंधूस अनुलक्षून एक जाहीरनामा काढून त्यांस आल्व्हाचें जूं झुगा-रून देण्यास प्रोत्साहन दिलें. ह्या कामाप्रीत्यर्थ त्यानें गांवोगांवीं आपले गुप्त हेर व दूत पाठवून मोठी चळवळ सुरू केली. त्याचा परिणाम असा झाला कीं, थोड्याच दिवसांत नेदर्लंडांतील उत्तरेकडील सात प्रांत ( ज्यांत जर्मन व डच लोकांची विशेष वस्ती होती ते ) त्याच्या बाजूचे झाले! तेव्हां ते आपल्या ताब्यांत घेण्याकरितां वुइल्यम पुनः सैन्याची जमवाजमव करूं लागला. त्याचा

भाऊ लुई हा या वेळीं फ्रान्सांत होता. त्यास फ्रान्सचा तरुण राजा चार्लस यानें मदत करण्याचें आश्वासन देऊन कांहीं लोक व द्रव्य त्याच्या हवालीं केलें. तेव्हां सुमारें एक हजार पायदळ व पांचशें घोडेस्वार बरोबर घेऊन तो एकाएकीं फ्रान्समधून निघून मॉन्स शहरानजीकच्या जंगलांत येऊन दाखल झाला. तेथून त्यानें आपला एक दोस्त ऑलिव्हर याग त्याच्याबरोबर कांहीं विक्रीचा माल देऊन व्यापाऱ्याच्या वेषानें टेहळण्याकरितां मॉन्स शहरांत पाठविलें. त्यानें त्या मालाची विक्री करितांना सहज बातमी काढून अशी खबर आणली कीं, शहराचे दरवाजे पहांटे ४ वाजण्याच्या सुमारास उघडतात; परंतु ते उघडणाऱ्या शिपायांस कांहीं लालूच दिली असतां, ते त्या वेळेच्या आधींसुद्धां उघडले जाण्याचा संभव आहे. त्याप्रमाणें त्यांस लांच देण्याची योजना करून लुई दुसरे दिवशीं पहांटे सुमारें ५० घोडेस्वारांनिशीं मॉन्सच्या दरवाजानजीक येऊन पोंचला. तेथून त्यानें आपल्या नोकरांपैकीं कांहींना व्यापाऱ्याच्या वेषानें दरवाजावरील शिपायांस जागें करून त्यांस लांच देऊन त्यांच्याकडून दरवाजे उघडून घेण्याच्या कामगिरीवर पाठविलें. त्यांनीं ती कामगिरी ठरल्याप्रमाणें बजावतांच लुई आपल्या घोडेस्वारांनिशीं एकदम आंत शिरला व दरवाजावरील शिपायाचें मस्तक उडवून, ‘स्वातंत्र्याचा जयजयकार असो!’ ‘प्रिन्स वुइल्यम येत आहे’ ‘आल्व्हाची व त्याच्या जुलमी करांची इतिश्री होवो’ अशा गर्जना करीत त्याचे लोक शहरांतून दौडत चालले! त्यानंतर बराच वेळ गेला तरी लुईचें बाकीचें सैन्य येईना; तेव्हां चिंताग्रस्त होऊन तो झपाट्यानें त्या सैन्याच्या तपासास निघाला तों तें वाट चुकून भलतीकडेच जात असल्याचें त्यास आढळून आलें! मग प्रत्येक घोडेस्वाराच्या पाठीमागें एकेक पायदळांतील शिपाई बसवून त्यानें जलदीनें दौड करून शहराचा दरवाजा पुनः गांठला पण इतकें होईपर्यंत शहरांतील लोक सावध होऊन, सर्व बाजूचे दरवाजे बंद करून, तजविजीस लागलेले होते. लुई येत असतां वाटेत त्यास आणखी कांहीं फ्रेंच सैन्याची कुमक मिळाली होती. त्या सैन्याचा सेनापति जेन्लीस यानें तडफ करून बंद होत असलेला एक दरवाजा आपल्या हस्तकांकरवीं मोडून टाकला व लुईच्या सैन्यास आंत शिरण्यास रस्ता करून दिला. थोड्याच वेळांत तें सर्व सैन्य आंत शिरल्यावर लुईनें शहराच्या मध्यभागीं असलेली घंटा वाजवून सर्व लोकांस व शहरच्या अधिकाऱ्यांस आपणांसमोर बोलाविलें. ते आल्यावर लुई व जेन्लीस यांनीं त्यांचा देशाभिमान जागृत करणारीं भाषणें करून त्यांनां मुकाट्यानें शहर

आपल्या स्वाधीन करण्याची विनंती केली. लोक व अधिकारी यांच्या मनांत त्यांना मदत करावयाची इच्छा उत्पन्न झाली; पण उघडपणें त्यांची सत्ता कबूल करण्याचें धैर्य त्यांस होईना. सबब त्यांनीं त्यांची विनंती मान्य केली नाहीं. तथापि गुप्त रीतीनें त्यांनीं लुईस द्रव्य व अन्नसामुग्री यांची मदत केली. लुईनें ह्या शहरास वेढा घातला व तेथील देवळांतील संपत्ति लुटली. मात्र त्यानें कोणाही माणसास उपसर्ग पोंचूं दिला नाहीं ( मे—जून, इ. स. १५७१ ). ह्या सुमारास द ला मार्क ह्याच्या आरमारानें आल्व्हाच्या जागीं येणाऱ्या नव्या गव्हर्नराचे सामान घेऊन येणारें जहाज लुटलें व त्यांत असलेला मोठा खजिना—सुमारें पांच लक्ष क्राऊन—आणि इतर चीजवस्त हीं हरण केलीं! याप्रमाणें 'बंडवाल्यां'चें सामर्थ्य वाढत चाललेलें पाहून आल्व्हा अतिशय संतप्त व खिन्न झाला. खिन्न होण्याचें कारण असें कीं, त्याच्या मळागार इकडे तरी त्याची तळी उचलून धरणारा कोणी राहिला नव्हता. जो तो त्याची टर उडवून फजिती करण्यास टपलेला होता! राजधानींतील लोकहो त्याच्या गैरहजिरींत त्याची टवाळी करूं लागले होते व तो रस्त्यांतून चालला असतां पूर्वीप्रमाणें त्यास कोणी सलामदेखील करीनासें झाले होतें! अशा स्थितींत लोकमत शांत करण्याकरितां, त्यानें आपल्या नवीन करांपैकीं शेकडा १० टक्क्याचा कर अजिबात माफ—रद्द-केल्याचा जाहीरनामा काढला! परंतु त्याचें हें कृत्य इतक्या उशिरानें झालें होतें कीं, आतां त्याचा लोकांच्या मनावर कांहींएक इष्ट परिणाम होण्याचा संभव नव्हता. वरील जाहिरनामा काढल्यानंतर 'बंडवाल्यां'चा बंदोबस्त करण्याकरितां त्यानें आपला दासीपुत्र डॉन फ्रेड्रिक् यास चार हजार सैन्यानिशीं मॉन्सवर पाठविलें. त्याची व लुईचा दोस्त फ्रेंच जनरल जेन्लीस यांची वाटेंत गांठ पडून एक भयंकर लढाई झाली व त्यांत जेन्लीसच्या सैन्याची धुळधाण उडून तो स्वतः डॉन फ्रेड्रिकच्या हातीं लागला!

इकडे तुइल्यमही जून महिन्याच्या अखेरीस डिलेन्बर्गहून बरीच मोठी फौज घेऊन द ला मार्कच्या लोकांनीं काबीज केलेल्या प्रांतांत आला. ह्या प्रांतांतील लोकांस आल्व्हाविरुद्ध बंड करण्यास प्रोत्साहन देण्याकरितां व त्यांतील स्थानिक लोकसभांच्या मार्फत तेथें आपली सत्ता स्थापून त्यांचेकडून द्रव्याची मदत मिळविण्याकरितां त्यानें आपला मित्र सेंट अल्डेगाँड ( काऊंट लुईचा सवंगडी ) यास अगोदर तेथें पाठविलें होतें. हा मनुष्य मोठा विद्वान्, हुषार व उत्तम वक्ता

असल्यामुळें त्यानें आपलें काम फार नामी रीतीनें बजाविलें. त्याच्या वक्तृत्वामुळें नेदर्लंडांतील उत्तरेकडच्या सात† प्रांतांच्या लोकसभा वुइल्यमला आपला वाली समजून आपल्या भवितव्यतेचीं सर्व सूत्रें त्याच्या स्वाधीन करण्यास तयार झाल्या! त्यांचे प्रतिनिधि वुइल्यमच्या आज्ञेवरून डॉर्ट शहरीं जमा झाले व त्यांनीं एक-मतानें आपापल्या प्रांतांतील सर्व अधिकार, सरकारी कराचें उत्पन्न व जरूर पडल्यास कर्जही त्यास देण्याचें आणि द ला मार्क ह्यास त्याचा प्रतिनिधि मानून चालण्याचें कबूल केलें. त्यानंतर तो सुमारें पंचवीस हजार सैन्य घेऊन ऱ्हाइन नदीच्या तीरावर असलेल्या डयूइस्बुर्ग शहरीं येऊन पोंचला. वाटेंत त्याला जर्मन बादशहा मॅक्सिमिलियन याजकडून ह्या 'फंदांत' न पडण्याबद्दल निरोप येऊन पोंचला. पण त्यानें त्याकडे लक्ष दिलें नाहीं. त्या निरोप्याबरोबर बाद-शहास त्यानें पुढील आशयाचें उत्तर पाठविलें.

" स्वतःच्या न्याय्य रक्षणाकरितां आणि आज कैक वर्षांपासून नेदर्लंडांतील सर्व दर्जाच्या लोकांवर आल्व्हानें व त्याच्या टोळीनें चालविलेल्या असह्य व अतर्क्य जुलमाचा नायनाट करण्याकरितां शस्त्र उचलणें मला भाग पडलें आहे. ... .... सामदामाचे सर्व उपाय थकले. तेव्हां निरुपाय होऊन मी व माझ्या मित्रांनीं आपल्या देशाचा सर्वस्वी नाश न व्हावा आणि त्याचें स्वातंत्र्य व हक्क कायम राहण्याकरितां आल्व्हाच्या असह्य जुलमापासून त्याची मुक्तता व्हावी, म्हणून हा मार्ग स्वीकारला आहे. तेथील दुर्दैवी लोकांची मला कींव येते. त्यांनीं आपल्या मदतीस्तव माझा धावा करण्याप्रीत्यर्थ फोडलेल्या किंकाळ्यांनीं माझें हृदय भरून आल्याशिवाय कसें राहील! शिवाय राजाचा ( फिलिप ) एकनिष्ठ सेवक या नात्यानें मी पूर्वीं ह्या प्रांतांचें रक्षण करण्याची शपथ घेतलेली असल्या-मुळें मला सध्यांचा मार्ग स्वीकारण्यावांचून दुसरें गत्यंतर नाहीं" वगैरे. याप्रमाणें मॅक्सिमिलियनला उत्तर पाठविल्यावर त्यानें कूच करीत करीत, म्यूज नदीकांठचें रोयेरमंड शहर घेतलें (२३ जुलै इ.स.१५७१). व त्या ठिकाणीं त्यास जेन्लीसच्या पराभवाची हकीकत समजली. तेव्हां मॉन्सकडे मोर्चा वळविण्याचा त्यानें विचार केला; परंतु त्याचें सैन्य पुढें कूच करण्यास तयार होईना! कारण त्यांचा पगार तुंबला होता व तो देण्यास वुइल्यमजवळ पैसे नव्हते. सैन्याची जमवाजमव करितांना फ्रान्सांतील ह्युजेनॉट्स व राजा चार्लस आणि इंग्लंडांत पळून गेलेले

† ह्या प्रांतांचीं नांवें पहिल्या प्रकरणांत दिलीं आहेत.

डच प्रॉटेस्टंट लोक यांच्याकडून त्याला कांहीं थोडी मदत मिळाली होती. पण पंचवीस हजार सैन्यास ती किती दिवस पुरणार? त्याचें स्वामित्व कबूल करणाऱ्या सात प्रांतांतील लोकसभेच्या नायकांनीं त्यास द्रव्य देण्याचें कबूल केलें होतें, पण तेंही अद्याप त्याच्या हातीं आलें नव्हतें. त्यामुळें त्यास पैशाची टंचाई भासूं लागतांच त्याचें भाडोत्री सैन्य त्याची अवज्ञा करूं लागलें. तेव्हां तो मोठ्या विवंचनेंत पडला. तथापि त्यानें लुईस पत्र पाठवून आपली स्थिति कळविली व त्यास कांहीं काल धीर धरण्यास प्रोत्साहन दिलें. पुढें २७ ऑगस्टच्या सुमारास लोकसभेकडून पैशाचा पहिला हप्ता आला आणि कर्नल मॅंडेलस्लू नांवाचा एक सेनापति जर्मनींतून कांहीं सैन्य घेऊन येऊन त्यास मिळाला. तेव्हां वुइल्यमनें आपल्या सैन्याचा पगार भागवून पुढें कूच करण्यास आरंभ केला. म्यूज नदी ओलांडून त्यानें डेस्ट, टिर्लेमॉंट, ल्यूव्हेन, मॅक्लीन, टरमॉंडे, उडनार्डे वगैरे शहरांवर चाल करून तीं काबीज केलीं व तेथें आपल्या सैन्याचीं ठाणीं बसवून मॉन्सनजीक असलेल्या डॉन फ्रेड्रिकचा समाचार घेण्यास तो निघाला. इतक्यांत फ्रेंच सरदार व ॲडमिरल कोलिग्नि हा आपल्या ह्युजेनॉट लोकांसह त्यास येऊन मिळणार असल्याचा संकेत त्यास कळल्यावरून तो त्याची वाट पहात बसला. पण दुर्दैवानें फ्रेंच राजाच्या दगलबाज[*] वर्तनामुळें कोलिग्नि व त्याचे बहुतेक सर्व ह्यूजेनॉट्स यांची फ्रान्समध्यें एका रात्रींत अकस्मात् कत्तल झाल्याकारणानें तो संकेत जागच्या जागींच राहिला! कोलिग्नि न आल्यामुळें त्याची मोठी निराशा झाली. शिवाय त्याची वाट पहाण्यांत जो काल गेला तेवढ्या अवधींत आल्व्हा त्याच्या सैन्यानजीक येऊन पोंचला. सप्टेंबर महिन्याच्या प्रारंभीं मॉन्सनजीक असलेल्या हार्मिंगे गांवीं वुइल्यमचा तळ पडला व त्यापासून थोड्याच अंतरावर असलेल्या सेंट फ्लॉरियन गांवीं

---

* फ्रेंच राजा चार्लस व त्याची कारस्थानी माता कॅथरॉईन यांनीं आपल्या देशांतील प्रॉटेस्टंट लोकांचा नायनाट करण्याचा गुप्त कट करून ह्या (इ. स. १५७१) वर्षीच्या सेंट बार्थोलोमोच्या पुण्यतिथीच्या दिवशीं आपल्या राजवाड्यांतील लग्नसमारंभाच्या निमित्तानें कोलिग्नि व त्याचे स्नेही यांस वाड्यांत बोलावून मारेकऱ्यांकडून त्यांचा खून करविला व नंतर त्यांच्या अनुयायांची—ह्यूजेनॉट्स लोकांची—सररहा कत्तल करविली! त्यांत सुमारें पंचवीस हजार प्रॉटेस्टंट लोकांचा संहार झाला! हा प्रसंग 'सेंट बार्थोलोमोची कत्तल' या नावानें इतिहासांत प्रसिद्ध आहे.

डॉन फ्रेड्रिकचा तळ असून त्यास आल्व्हा व त्याच्या जागीं आलेला नवा व्हॉइसरॉय मेडिना कोयली † हे नुकतेच आपल्या सैन्यासह येऊन मिळाले होते. वुइल्यमचें घोडदळ आपल्या घोडदळापेक्षां श्रेष्ठ प्रतीचें आहे असें दिसून आल्यावरून आल्व्हानें तत्काळ त्याचपाशीं मोठी लढाई करण्याचा विचार तहकूब करून मागील खेपेप्रमाणेंच ( १५६९ सालच्या ) गनिमीकाव्यानें त्यास जेरीस आणण्याचा बेत केला. वुइल्यमचें सैन्य भाडोत्री असून त्याजजवळची पुंजीही बेताचीच असल्यामुळें गनिमी काव्यानें कालहरण केल्यास तें कंटाळून विथरेल व मग अनायासें एखाददुसऱ्या हल्ल्यांत त्याचा सहज धुव्वा उडवितां येईल अशी त्याची कल्पना होती व ती खरी होती. वुइल्यमचा भाऊ ( लुई ) मॉन्स येथें अडकला असून आपल्या मदतीस येण्याबद्दल त्याचा त्याच्यामागें सारखा तगादा चालू असल्यामुळें त्याला आल्व्हाच्या सैन्याची झट्दिशीं वाट लावून मॉन्स गांठणें जरूर होतें व तसें करण्याइतकें सामर्थ्यही यावेळीं त्याजपाशीं होतें; परंतु 'सत्कार्याला विघ्नें फार' या म्हणीनुसार ह्या खेपेसही अचानकपणें भयंकर विघ्न येऊन त्याचा हिरमोड झाला! तें असें:—

ता. ११ सप्टेंबरच्या मध्यरात्रा, आल्व्हाचा एक सैनिक रोमेरो यानें कांहीं थोडे निवडक लोक बरोबर घेऊन वुइल्यमच्या तंबूवर हळूच जाऊन छापा घातला. तेथील पहारेकऱ्यांस ठार केल्यावर ते लोक वुइल्यमच्या शय्यागाराकडे वळले. त्यास त्या वेळीं गाढ निद्रा लागली होती व थोडयाच वेळांत ती महानिद्रा होणार होती! परंतु तेथें असलेल्या त्याच्या लाडक्या कुत्र्यानें (स्पॅनेल डॉग*) घूरकऱ्यांची आसपास चाहूल लागतांच आपल्या धन्याजवळ जाऊन त्याच्या तोंडास पंजानें खरचटतांच वुइल्यम जागा झाला व दग्याचें चिन्ह पाहून झट्दिशीं उठून बाहेर पडून आपल्या तयार असलेल्या ( आपला घोडा नेहमीं सामान घालून तयार ठेवण्याची त्याची चाल होती ) घोडयावर बसून दूर

---

† मेडिना कोयली नेदर्लंडांत आला तेव्हां 'बंडवाल्यांशीं' युद्ध जुंपलेलें असल्यामुळें तें संपेपर्यंत आल्व्हाच्या हाताखालीं काम करण्याचें त्यानें कबूल केल्यावरून गव्हर्नर जनरलचें काम आणखी कांहीं दिवस आल्व्हा हाच चालवीत होता.

* ह्या प्रसंगानंतर ह्या जातीचा एक कुत्रा नेहमीं आपल्याजवळ ठेवण्याचें मत वुइल्यमनें मरेपर्यंत पाळलें होतें.

निघून गेला. इतक्यांत रोमेरोचे लोक तेथें येऊन त्यांनीं त्याचे पकून जात असलेले सेक्रेटरी व बॉडिगार्ड यांस गांठलें व त्यांची कत्तल केल्यानंतर बेहोष होऊन त्यांनीं त्या तंबूस आग लावून दिली. पण आगीच्या उजेडानें आपली अल्पसंख्या शत्रूच्या नजरेस पडून तो आपल्यावर हल्ला करील या भीतीनें त्यास तेथून लवकरच पळ काढावा लागला. या प्रसंगांतून वुइल्यम केवळ ईश्वरीकृपेनेंच वांचला असें म्हणण्यास हरकत नाहीं हा भयंकर प्रकार घडून आल्यावर त्याच्या भाडोत्री सैन्यानें कच खाल्ला व तें मॉन्सकडे चालून जाण्यास तयार होईना. पगाराचा तगादा लावून तें त्यास त्रास देऊं लागलें, तेव्हां निरुपायानें लुईला ह्या प्रसंगाची हकीकत कळवून त्याला पिच्छेहाट करावी लागली! आपला भाऊ जॉन हा सर्व सैन्य व पैसा घेऊन रेथेरमंड येथें आपणांस येऊन मिळणार आहे, असा बहाणा करून त्यानें आपल्या शिपायांची समजूत केली व म्यूज नदी ओलांडून तो त्या शहरीं आला; परंतु तेथे त्याच्या सांगण्याप्रमाणें शिपायांस पगार मिळण्याचें चिन्ह दिसेना. तेव्हां ते बिथरले व त्याच्या जिवावरही उठले; परतु त्यांच्यावर वजन असणाऱ्या त्याच्या हाताखालच्या लष्करी अधिकाऱ्यांनीं मोठ्या परिश्रमानें हा अतिप्रसंग टाळला! अखेर त्यानें पुन्हां आपल्याजवळची राहिलेली चीजवस्त विकून व कर्ज काढून त्यांचा पगार भागविला व त्यांच्यापैकीं कांहीं थोडे लोक ठेवून घेऊन बाकीच्यास रजा दिली. इकडे मॉन्स येथें लुई हा तापानें आजारी पडला व तशांत त्यास वुइल्यमचें वरील वृत्त कळलें; तेव्हां निराश होऊन नाइलाजानें त्यानें उदार व सन्मान्य शर्तीवर मॉन्स आल्व्हाच्या स्वाधीन करण्याचें बोलणें सुरू केलें. आल्व्हा–ज्याच्या धोरणास त्याचा कोणीही सल्लागार अनुकूल नसल्यामुळें–आतां अगदीं त्रस्त झालेला असून त्याचें नैतिक बळही संपुष्टांत येत चाललें असल्यामुळें व मॉन्स हें महत्त्वाचें शहर सैन्याची खराबी न करितां हातीं येत असल्यास, शत्रूशीं उदारपणें वागविण्यास तयार झाला होता. तेव्हां उभयपक्षांत त्यासंबंधानें वाटाघाट होऊन अखेर लुई व त्याचें सैन्य आणि शहरांतील त्यांच्या बाजूचे लोक यांना सुरक्षितपणें आपापल्या ठिकाणीं पोंचविण्याच्या शर्तीवर लुईनें मॉन्स आल्व्हाच्या ताब्यांत देण्याचें कबूल केलें व ही शर्त पुरी होईपर्यंत एकमेकांनीं एकमेकांकडे कांहीं लोक ओलीस म्हणून पाठवावेत असें ठरलें आल्व्हानें हा करार बहुतांशीं पाळला; पण मॉन्समधले लुईच्या पक्षाचे जे लोक तत्काळ लुईबरोबर निघून गेले नाहींत त्यांस

त्यानें हालहाल करून ठार मारलें! लुई मॉन्स येथून निघून रेयेरमंड येथें वुइल्यमला येऊन भेटला व त्याची मुलाखत घेतल्यानंतर प्रकृतीस आराम वाटावा म्हणून तो डिलेन्बर्ग येथें आपल्या वृद्ध मातोश्रीकडे निघून गेला. लुई, वुइल्यम व जॉन हे तिघे बंधु हरएकप्रसंगीं एकमेकांच्या सुखदुःखाचे वांटेकरी होऊन वुइल्यमनें हातीं घेतलेल्या थोर कार्यास जसे मनोभावें मदत करीत होते तशीच त्यांची धीरोदात्त व सुशील आईही (ज्युलिआना ऑफ स्टालबर्ग) त्यांस वेळोवेळीं धीर देऊन, आशीर्वाद देऊन व उपदेश करून त्यांचें नैतिकबळ व उत्साह वाढवीत असे. वुइल्यमच्या संकटप्रसंगीं तिनें त्यांस जीं अनेक पत्रें लिहिलीं आहेत तीं वरील प्रकारचीं असून तिचा 'वीरमाता' ह्या पदवीवर पूर्ण हक्क शाबीत करण्यास समर्थ अशीं आहेत मासल्याकरितां, अंमळ विषयांतर करून, त्यांतून कांहीं त्रोटक उतारे पुढें देतों:—

(१) हार्लेमला स्पॅनिश सैन्याचा वेढा पडल्यावेळचें पत्र:—

"परमेश्वरावर विश्वास ठेवा. तोच केवळ तुमचें व तुमच्या माणसांचें रक्षण करण्यास समर्थ आहे. जे त्याच्यावर विश्वास ठेवून त्याच्या कृपेची आशा करतील त्यांना तो कधींही सोडून जाणार नाहीं. हार्लेमच्या लोकांना टिकाव धरण्याचें सामर्थ्य देण्याबद्दल मी त्याची प्रार्थना करितें. माझें मातृहृदय सदैव तुमच्याकडे लागून राहिलेलें आहे."

(२) सेंट बार्थोलोमोच्या कत्तलीनंतर फ्रेंच राजाची मदत मिळविण्याची वुइल्यम खटपट करीत असतांना ती लिहिते:—

"परमेश्वरास रुजू नसणाऱ्या ह्या मदतीवर विश्वास ठेवूं नका. असल्या दगेखोर राजाच्या मदतीवर अवलंबून राहूं नका; पृथ्वीवरील कोणी राजा जरी तुम्हांस मदत करूं शकला नाहीं तरी परमेश्वर तुमची उपेक्षा करणार नाहीं. त्याच्यावर विश्वास ठेवणारास तो कधींच फशीं पाडीत नाहीं."

(३) इ. स. १५७७ सालीं तहाची वाटाघाट चालू असतांना फिलिपच्या भ्रामक माफीपत्रकांस (Pacification) किती किंमत द्यावयाची याविषयीं ती लिहिते:—

"वादविषयक माफीपत्रक हें सर्वांना त्रासदायक होईल अशी मला भीति वाटते. कारण त्यांत मेंढीचें कातडें पांघरून त्यांच्या कळपांत शिरणाऱ्या लांडग्याप्रमाणें सैतानी योजना केलेली असून ती पुष्कळ पवित्र ख्रिस्त्यांचा नाश करील,

परंतु पृथ्वी व स्वर्ग यांवर सत्ता चालविणारा आपला प्रभु त्यांचीं दुःखें दूर करून त्यांना कसल्याही संकटांतून मुक्त करील असा मला भरंवसा आहे. ××× मी तुम्हांस विनवून सांगतें कीं, तुम्ही प्रत्येक गोष्टीचें अंतरंग पहात जा. वरपांगीं बोलण्यावर विश्वास ठेवून तुम्हांला संकटांत नेऊन लोटण्याकरितां तयार केलेल्या जाळ्यांत सांपडूं नका. जग हें विश्वासघातकीपणानें भरलेलें आहे हें लक्षांत ठेवा."

पाउणशें वर्षांच्या वृद्ध स्त्रीचे वरील विचार पाहून कोणासही तिजबद्दल आदर, पूज्यभाव व कौतुक वाटेल यांत शंका नाहीं. वुइल्यम व त्याचे बंधु यांना त्यापासून कितीतरी समाधान वाटलें असेल व त्यांचा आत्मविश्वास दृढ होऊन त्यांच्या उद्दिष्ट कार्याविपर्याचा उत्साह कितीतरी दुणावला असेल.† असो; लुईची गांठ पडल्यानंतर वुइल्यम दोन तीन दिवसांनीं आपल्या छोट्या सैन्यासह रोयेरमंडहून झुटपेन येथें गेला. व तेथें आपल्या सैन्याचें एक ठाणें ठेवून झूडरझीच्या पूर्वकिनाऱ्यावरील कांपेन शहरीं गेला. तो परत फिरलेला पाहून, येतांना जीं जीं शहरें त्याच्या बाजूचीं झालीं होतीं तीं सर्व आल्व्हाच्या भयानें त्यास प्रतिकूल झालीं. हें पाहून त्याची वृत्ति अमळ उदास व खिन्न झाली. या वेळीं त्यानें जॉन यास पाठविलेल्या खलित्यांत पुढील उद्गार काढलेले आहेत. "परमेश्वर कांहीतरी चमत्कार करील तरच ह्या स्थितीत सुधारणा होण्याचा संभव; नाहीं तर मला असेंच एकटें भटकत फिरावें लागलेसें वाटतें. ×××× रोयेरमंडकडे माझी पाठ वळली नाहीं तोंच तेथें उभारलेल्या आमच्या स्थानिक सैन्यानें तें सोडून दिलें. इतर शहरांनीही त्याचाच कित्ता गिरविला ××× मी आतां हॉलंड व झीलंड येथें जाऊन तेथें आपलें बस्तान वसविण्याचा निश्चय केला आहे व त्याप्रीत्यर्थ तिकडे निघालों आहें." वगैरे. कांपेनहून, एंक्हुसेन व तेथून डॉर्ट शहरीं तो नोव्हेंबर (१५७१) महिन्यांत जाऊन पोंचला.

मॉन्स शहर लुईकडून ताब्यांत घेतल्यानंतर आल्व्हानें तेथें नॉयरकार्म्सची

---

† ज्युलिआनाची ही कृति पाहून शिवाजीची आई जिजाबाई हिची आठवण होते. तिनें शिवाजीस वेळोवेळीं कसें प्रोत्साहन दिलें हें महाराष्ट्रांतील लोकांस आतां कळून चुकलेंच आहे. वुइल्यम व शिवाजी यांच्याही कृतींत, चारित्र्यांत व मनोधर्मांत बरेंच साम्य आहे असे उभयतांच्या चरित्रांचें मनन करणारास कळून येईल.

गव्हर्नरच्या जागीं नेमणूक केली. त्यानें सुमारें एक वर्षभर तेथील लोकांचे नानाप्रकारें हाल केले. त्यांचें मोटलेनें जें वर्णन केलें आहे तें वाचून कोणाच्याही अंगावर शहारे आल्यावांचून राहणार नाहींत! फांशीं देणें, कत्तल करणें, जिवंत जाळणें, जीभ कापणें वगैरे घाणेरडे व आसुरी प्रकार त्यानें मन मानेल तसे चालविले होते. मॉन्सची व्यवस्था लावल्यावर आल्व्हा अमस्टरडॅम येथे निघून गेला व त्याचा मुलगा डॉन फ्रेडरिक यानें मेक्लीनवर हल्ला करून तें शहर लुटून व जाळूनपोळून उध्वस्त केलें! तेथील बायका भ्रष्ट करून मग मुलांबाळांसह त्यांची व पुरुषांची त्यानें कत्तल केली! तेथून तो नार्डेन शहरीं गेला व त्या शहराची देखील त्यानें तीच अवस्था केली. हें पाहून फ्रीजलंड प्रांतांतील लोक घाबरले व डॉन फ्रेडरिकला अनुकूल झाले; ओव्हरयेसेल व गेल्डरलँड हे प्रांतही पुन्हा आल्व्हाचें जूं मानेवर घेण्यास तयार झाले. त्याचा सेनापति मॉंड्रेगॉन यानें मोठें धाडस करून—एका रात्रींत दहा मैल लांब खाडीच्या पाण्यांतून चालत जाऊन—न्यूव्हेलँडनजीकच्या टेर्गोज शहरास वेढा देऊन वॉलचेरन प्रांतास शह दिला. नार्डेन उध्वस्त केल्यावर डॉन फ्रेडरिक अमस्टरडॅम येथें आपल्या बापाच्या भेटीस गेला. आल्व्हाची व त्याची गांठ पडतांच त्यानें 'बापसे बेटा सवाई' म्हणून त्याची तारीफ केली! त्या प्रांतांत तेवढेंच एक शहर आल्व्हाच्या बाजूनें राहिलें होतें. त्याखेरीज इतर सर्व हॉलंड प्रांत पूर्वींच वुइल्यमच्या स्वाधीन झाला होता तो त्याच्या पराभवानंतरही त्यास तसाच चिकटून राहिला. इतर पूर्वी त्याच्या स्वाधीन झालेले उत्तर नेदर्लंडांतील बहुतेक प्रांत व शहरें भीतिवश होऊन फिरून आल्व्हाच्या अमलाखालीं आलीं! परंतु हॉलंडच्या व झीलंडच्या लोकांनीं मात्र नेट धरला. त्या प्रांतांचा आल्व्हाचा गव्हर्नर बॉसू यानें 'मुकाट्यानें आमची सत्ता मान्य करा नाहीं तर नार्डेनप्रमाणें तुमच्या शहराची व्यवस्था होईल' असा बहुतेक शहरांतील स्थानिक अधिकाऱ्यांस धाक घातला; पण त्यास त्यांनीं भीक घातली नाहीं. ह्या प्रांतांत वुइल्यमनें आपला दुय्यम सॅनॉय ह्यास गव्हर्नर नेमून तेथें पूर्वींच शिस्तवार आपला अंमल चालू केला होता. तेथील डच लोक हे त्यांच्या इतर बांधवांपेक्षां जास्त काटक, धाडसी, करारी व स्वातंत्र्यप्रिय असल्यामुळे वुइल्यमसारख्या कर्तृत्ववान् देशभक्ताच्या व उदार महात्म्याच्या साह्यानें त्यांच्यावर अनेक वर्षे चालू असलेल्या जुलमी स्पॅनिश अंमलाची इतिश्री करून टाकण्यास उत्सुक झालेले होते. अर्थात् इतर प्रांतांतील लोकांप्रमाणें, वुइल्यमवर आपत्काल

येतांच, त्यांची गाळण उडणें शक्य नव्हतें. त्यांचा हा स्वभाव व मनोवृत्ति वुइल्यमला पूर्णपणें अवगत होती व सर्व जग फिरलें तरी ह्या लोकांचा आत्मविश्वासाच्या भट्टींत स्पॅनिश जुलमाची आपण लवकरच राखरांगोळी करूं असे त्यांस वाटत होतें! स्पॅनिश सरकारच्या सामर्थ्याच्या मानानें त्याची ह्या वेळची स्थिति अगदीं दैन्यवाणी होती; परंतु त्यामुळें तो हताश झाला नाहीं. स्वातंत्र्येच्छु डच लोक, जागोजागीं नद्या व समुद्र यांच्या खाड्यांनीं व्यापलेला बचावाच्या व सुरक्षितपणाच्या दृष्टीनें अत्यंत उपयुक्त असा हॉलंड–झीलंडचा सुप्रदेश, आपल्या प्रेमळ बंधूंचें साहाय्य, आपली बुद्धिमत्ता व परमेश्वरी कृपा इत्यादि साधनांच्या साह्यानें त्यानें तत्कालीन जगांतील अत्यंत प्रबल अशा जुलमी सत्तेपासून आपल्या राष्ट्राची सुटका करण्याचा निर्धार केला आणि तो आमरण पाळला! त्यापीत्यर्थ त्याला व त्यांस चिकटून राहणाऱ्या शूर डच लोकांना नाना प्रकारचीं संकटें व हाल भोगावे लागले. पण त्यांच्या त्या वेदनांतूनच पुढें कांहीं काल सर्व जगांत प्राबल्य गाजविणाऱ्या डच लोकसत्ताक राज्याचा जन्म झाला! असो; स्पॅनिश सैन्याची टोळधाड हॉलंडचा विध्वंस करण्यास टपलेली पाहून शक्य तितक्या रीतीनें तिचा प्रतिकार करण्याची त्यानें तयारी चालविली. हॉलंडचे उत्तर व दक्षिण असे दोन विभाग करून उत्तरविभागांत आपला दुय्यम सोनॉय याचें ठाणें बसवून, दक्षिणभागाचें रक्षण करण्याची कामगिरी त्यानें स्वतः पत्करिली. डॉन फ्रेड्रिक हा कांहीं दिवस विश्रांति घेतल्यानंतर हार्लेम शहरावर चाल करून जाण्यास निघाला. हें पाहून वुइल्यमनें त्या शहरांत अगोदर जाऊन तेथील रहिवाशांना धीर दिला व बाहेरून मदत येईपर्यंत आपल्या सामर्थ्याची शिकस्त करून शहर लढविण्याविषयीं त्यांचा उत्साह प्रज्वलित करून तो पुनः पैशाची व सैन्याची तजवीज करण्यास निघून गेला. त्यानंतर सुमारें एक महिन्यानें डॉन फ्रेडरिक यानें त्या शहरास वेढा घातला. ह्या शहराची रचना एखाद्या बेटाप्रमाणें होती. त्याच्या आजूबाजूस समुद्राचें व नद्यांचें पाणी होतें. अशा स्थितींत तीस हजार लोकांनी वेढलेल्या ह्या शहरास मदत पोंचविणें फार कठीण होतें. शहरांतील लोकांचा उत्साह अवर्णनीय होता. त्यांनी शहर लढविण्याची शक्य ती सर्व तयारी केली होती. शहराभोंवतीं दगडांची व मातीची तात्पुरती तटबंदी करण्यांत येऊन सर्व माणसें–बायकापोरांसुद्धां–शहर रक्षण्याचे कामीं त्यांस नेमून दिलेलें काम काळजीपूर्वक करीत होतीं. परंतु त्यांच्या लढवय्यांची

संख्या अल्प म्हणजे सुमारें चार हजार होती; तथापि त्यांनीं धीर न सोडल्यामुळें बराच कालपर्यंत त्यांस टिकाव धरतां आला. हा वेढा सात महिनेपर्यंत चालू होता. तेवढ्या कालांत दोन्ही पक्षांनीं आपल्या शौर्याची, धाडसाची व एकमेकांचा सूड उगविण्याची कमाल केली! मानवी प्राण्याच्या खुनशी वृत्तीचा व सहनशक्तीचा त्यांत कळलोट झाला! ह्या वेढ्याचें सविस्तर वर्णन‡ करण्यास अवकाश नाहीं. तथापि दोन ठळक प्रसंगांचें वर्णन करणें जरूर आहे. ह्या वेढ्यास इ. स. १५७२ च्या डिसेंबर महिन्यांत सुरुवात झाली. ता. १८, १९, २० डिसेंबर रोजीं डॉन फ्रेड्रिकनें हार्लेमच्या तटावर तोफांचा भडिमार सुरू करून त्यास खिंडारें पाडिलीं. तीं पडतात न पडतात तोंच आंतील लोकांनीं वाळू, दगड, देवळांतील पुतळे यांनीं तीं भराभर भरून काढलीं. त्यानंतर डॉन फ्रेड्रिकनें त्या शहरावर हल्ला चढविला. त्याचा सैनिक रोमेरो हा आपल्या सैन्यानिशीं वेगानें तटावर चाल करून गेला व त्यानें बंदुकीच्या गोळ्यांचा शहरावर वर्षाव सुरू केला. त्यासरशीं शहरांतील सैन्यानें भीतिसूचक घंटा वाजवून सर्व लोकांस शत्रूचा प्रतिकार करण्यास बोलाविलें. तेव्हां सर्व रहिवाशी जें सांपडेल तें हत्यार घेऊन त्यांच्या मदतीस आले व त्यांनीं तापलेलें तेल, कोल टार, जिवंत कोळसे, दगड यांचा शत्रूच्या सैन्यावर सारखा वर्षाव चालू केला आणि लोखंडाच्या गाल कड्यांस तेलकट चिंध्या गुंडाळून तीं पेटवून त्यांच्या अंगावर फेंकून दिलीं. त्यांचें हें धाडस पाहून शूर अशा स्पॅनिश सैन्यासही अचंबा वाटला व त्यांच्या पोटांत धडकी भरली! ह्या झटापटींत रोमेरोचा एक डोळा गेला व त्याच्या हाताखालचे अनेक शूर अधिकारी मारले गेले आणि जखमी झाले व चारशें शिपाई कामास आले! शहरांतील लोकांपैकीं फक्त चार लोक मारले गेले. इतकी हानी झाल्यावर रोमेरोनें पिछेहाट केली. नंतर डॉन फ्रेड्रिकनें त्या शहराची तटबंदी खालून पोखरून काढण्याचा विचार ठरविला. त्याचें तें काम चालू असतां इकडे वुइल्यमनें (त्याचें मुख्य ठाणें यावेळीं सॅसेनहेम येथें होतें) बॅटनबर्गच्या हाताखालीं दोन हजार सैन्य, सात तोफा व पुष्कळसा दारूगोळा देऊन त्यास हार्लेमच्या लोकांच्या मदतीस पाठविलें. यापूर्वी त्यानें द ला मार्क यास इतकेंच सैन्य देऊन पाठविलें होतें; पण

‡ तें मोटलेच्या डच रिपब्लिकचें रा॰ द्रविड यांनीं केलेल्या मराठी भाषांतरांत अथवा मूळ ग्रंथांत पहावें. ह्या वेढ्यांत तीनशें बायकांची एक पलटण स्त्री अधिकाऱ्याच्या हाताखालीं हार्लेमचें रक्षण करीत होती!

मराठी ग्रंथ संग्रहालय ... १२५... नं. ........

त्यास वाटेंत गांठून स्पॅनिश सैन्यानें त्याचा पराभव केला. बॅटनबर्गचें सैन्यही हालमशजारा गल्यावर वाट चुकून शत्रूच्या जाळ्यांत सांपडलें. त्यासरशीं शत्रूनें त्यांच्याजवळचें सर्व सामान हिरावून घेऊन त्यांची दाणादाण करून त्यांस पळवून लाविलें! त्यांतले कांहीं थोडे लोक हार्लेम शहरांत जाऊन पोंचले व बाकीचे ठार व जखमी झाले. बॅटनबर्ग कसातरी वांचला. त्याचा दुय्यम कोनिंग हा शत्रूच्या हातीं सांपडला. त्याचें शीर उडवून त्यावर "हार्लेमच्या संरक्षकांस मदत करण्यास्तव सैन्य व सामुग्री घेऊन येणाऱ्या कॅप्टन कोनिंगचें हें शीर आहे" अशा अर्थाची चिठी लावून तें त्यांनीं शहरांतील तटावर फेंकून दिलें! त्यास उत्तर म्हणून शहरवासीयांनीं अकरा स्पॅनिश कैद्यांचीं शिरें एका पिपांत घालून त्यावर "हीं दहा शिरें डयूक ऑफ आल्व्हास त्याच्या शेंकडा दहा टक्के कराएवजीं व जास्त असलेलें एक शीर त्याच्या व्याजाबद्दल नजर करा" अशा अर्थाची चिठी लावून तें पीप त्यांनीं स्पॅनिश कँपांत फेंकून दिलें! असे अनेक भयानक व मर्मभेदक विनोदाचे प्रकार वारंवार चालू असत! बॅटनबर्गचें सैन्य उधळून लावल्यानंतर स्पॅनिश सैन्यानें हार्लेमवर पुन्हा हल्ला चढविला व लवकरच त्यांनीं तटबंदीचा पहिला भुइकोट किल्ला सर केला; पण त्यावर ते जातात न जातात तोंच त्यांच्याखालील दारू भरून ठेविलेलीं भुयारें शहरवासीयांनीं पेटवून दिल्यामुळे एकदम आगीचा भडका उडाला! त्यांत स्पॅनिश सैन्याच्या बिनीचे लोक गडप झाले! तेव्हां त्यांच्या सेनापतीस पुन्हा माघार घ्यावी लागली याप्रमाणें त्यांचा दुसरा हल्ला फसला. पुढें या उभयपक्षामध्यें वारंवार असेच हल्ले व प्रतिकार होत राहिले व त्यांत हार्लेमच्या लोकांनी आपल्या शौर्याची व धारिष्टाची इतकी कमाल करून दिली कीं, चारपांच महिन्यांच्या आंत डॉन फ्रेड्रिक हताश होऊन वेढा उठविण्याचा विचार करूं लागला! परंतु आल्व्हानें त्यास निग्रहाचा निरोप† पाठवून तसें करूं दिलें नाहीं. वुइल्यमनें हार्लेमच्या

---

† वेढा उठविण्याची परवानगी मागण्यासाठीं आलेल्या अधिकाऱ्याजवळ आल्व्हानें पाठविलेला निरोप असा होता:—"डॉन फ्रेड्रिकला सांगा कीं, जर वेढा चालू ठेवण्याचा त्याचा विचार नसेल तर मी इतःपर त्यास आपला मुलगा समजणार नाहीं. जर तो ह्या वेढ्यांत पडला तर तत्काळ मी त्याच्या जागीं जाईन व वेढ्याचें काम चालवीन आणि मीही पडलों तर माझी बायको स्पेनहून येऊन तेंच काम करील." इतकें कडक उत्तर मिळाल्यावर वेढा उठविण्याचें धारिष्ट डॉन फ्रेड्रिकच्या हातून कसें होणार?

लोकांस मदत करण्याची आपल्याकडून पराकाष्ठा केली. कबुतरांच्या द्वारें तो त्यांस धीर देणारे निरोप पाठवीत होता व धान्य, दारूगोळा यांचीही मदत करीत होता. परंतु पैशाच्या अभावामुळें त्यास स्पॅनिश सैन्याच्या तोडीचें-इतकें मोठें-सैन्य जमवितां येईना. हें पाहून त्याच्या जिवाची अत्यंत तळमळ होत असे. तिचें प्रतिबिंब त्यानें लुईस लिहिलेल्या पत्रांतून पुढीलप्रमाणें उठलेलें आहे.

"हार्लेमचे लोक अद्यापपर्यंत (मार्च १५७३) हिमतीनें टिकाव धरून आहेत; परंतु आम्हांस नेहमी पैशाची व दारूगोळ्याची वाण पडत आहे. देशाची कंगाल अवस्था झाली असल्याकारणानें लोक युद्धास कंटाळले आहेत; त्यामुळें त्यांना आपलें कर्तव्य करण्यास उत्साह वाटेनासा झाला आहे. अशा स्थितींत फार काळ शत्रूला थोपवून धरतां येईलसें दिसत नाहीं. हा वेढा उठविण्याचें साधन मला तर कांहीं सध्यां दिसत नाहीं. तुम्ही तिकडून कांहीं मदत करूं शकाल काय? मी खास सांगतों कीं, असामान्य धैर्य व शौर्य दाखविणाऱ्या या लोकांस मरूं देण्यासारखी दुसरी कोणतीही केविलवाणी व करुणास्पद स्थिति नसेल."

जॉनलाही त्यानें अशाच प्रकारचें पुढील पत्र लिहिलें आहे:—

"ह्या शहराची सुटका करण्याविषयीं तुम्ही आपली शिकस्त करा. नाहीं तर आपणांवर मोठा प्रसंग गुदरेल. ह्या शहराचें आपणांस विशेष महत्त्व नाहीं, परंतु त्याची सुटका न केल्यास आपापल्या कर्तृत्वावरील लोकांचा विश्वास कमी होईल व हार्लेमच्या लोकांची होणारी निराशा व दुर्दशा यांचें इतरत्र साम्राज्य माजून आपल्या कार्यास मोठें विघ्न येईल."

याप्रमाणें आपले बंधू व इंग्लंडची राणी इलिझाबेथ यांच्याकडून मदत मिळविण्याची आटोकाट खटपट करून हॉलंडच्या इतर शहरांतील लोकांस प्रोत्साहन देऊन व्हालंटीअर जमा करण्याचा त्याचा प्रयत्न सारखा चालू होता. मधून मधून ह्या लोकांच्या पलटणी व कांहीं शिस्तीचें सैन्य त्यानें हार्लेमच्या सुटकेकरितां पाठविलीं परंतु त्याचा मधल्यामध्येंच स्पॅनिश सैन्यानें फन्ना उडविला! तेव्हां अखेरचा प्रयत्न म्हणून कांहीं व्हालंटीअर बरोबर घेऊन स्वतः त्या कामगिरीवर जाण्याचें त्यानें ठरविलें! पण त्याच्या भोंवतालच्या लोकांनीं व कित्येक लोकप्रतिनिधींनीं असल्या धोक्यांत जीव घालून, हॉलंडला पोरकें करून, स्वातंत्र्याप्रीत्यर्थ चालविलेल्या ह्या झगड्याचा अंत करण्याचें धाडस न करण्याविषयीं त्याची प्रार्थना केली. तेव्हां त्यांच्या आग्रहावरून त्यानें स्वतः जाण्याचा बेत रहित

केला व आपला दुय्यम बॅटनबर्ग यास त्या कामगिरीवर पाठविलें. परंतु बॅटनबर्ग काय अथवा वुइल्यम काय पांच सहा हजार व्हॉलंटिअर्सच्या साह्यानें तीस हजार कसलेल्या उत्तम स्पॅनिश सैन्याचा पराभव करून हार्लेम शहरांत प्रवेश करण्यास कसा समर्थ होणार? तथापि या लोकांनीं हार्लेम शहरांतील लोकांइतकेंच शौर्य गाजवून बराच काळपर्यंत स्पॅनिश सैन्याशीं झुंज केली व त्यांची पुष्कळ नासाडी केली. पण अखेर शत्रूच्या मोठ्या संख्येमुळें त्यास पराभूत व्हावें लागलें. इकडे अमस्टरडॅममध्यें असलेल्या आल्व्हाचा व डॉन फ्रेड्रिकच्या सैन्याचा संबंध तोडून त्याची रसद बंद करण्याकरितां वुइल्यमनें आपला गव्हर्नर सोनॉय ह्यास पाठविलें होतें; परंतु त्यालाही त्या कामीं यश आलें नाहीं अशा रीतीनें सुमारें सात महिनेपर्यंत हार्लेमचा वेढा चालू होता. त्या मुदती-नंतर शहरांतील लोकांची उपासमार होऊं गेल्यानें व सैन्यास दारूगोळ्याचा पुरवठा करणें अशक्य झाल्यानें त्यांचा पराभव होऊन तें शहर स्पॅनिश लोकांच्या हातीं आलें. तेथील सैन्यानें अखेरपर्यंत आपली बहादुरी गाजविली. 'इतक्या नेटानें व शौर्यानें एवढ्याशा चिमुकल्या शहरानें इतक्या मोठ्या शत्रूच्या सैन्यास तोंड दिल्याचें हें पहिलेंच उदाहरण आपल्या पाहण्यांत आहे' असें खुद्द आल्व्हानें या वेढ्यासंबंधीं फिलिपला लिहिलेल्या पत्रांत उद्गार काढले आहेत! शहरांतील लोक अखेर शत्रूच्या स्वाधीन होण्यापेक्षां शहर जाळून त्यांत मरण्यास तयार झाले होते! पण डॉन फ्रेड्रिकनें तसें न करितां शहर आपल्या स्वाधीन केल्यास आपण कोणासही इजा करणार नाहीं असें आश्वासन दिल्यामुळें त्यांनीं तसें केलें नाहीं. डॉन फ्रेड्रिकनें हें वचन पाळलें नाहीं! शहर हस्तगत होतांच त्यानें वुइल्यमच्या पक्षपाती लोकांची व तेथील उरलेल्या लढवय्यांची कत्तल केली! ह्या लढवय्यांत, कांहीं इंग्लिश, स्कॉट व फ्रेंच शिपाई होते त्यांची देखील त्यानें कींव केली नाहीं! त्यानें मारलेल्या लोकांची संख्या दोन हजार तीनशें होती असें मोटलेनें लिहिलें आहे!

डॉन फ्रेड्रिकनें हा विजय मिळविला खरा; पण त्यांत त्याच्या सैन्याची फार खराबी झाली व त्याच्या शिपायांचे अतिशय हाल झाले. त्यामुळें ते रंजीस झाले होते. तशांतच त्यांस डॉन फ्रेड्रिकनें हार्लेमच्या उत्तरेस असलेल्या आल्क-मर शहरास वेढा घालण्याची कामगिरी सांगितल्यानें ते एकदम बिथरले व आपल्या अधिकाऱ्यांचा हुकूम ऐकेनासे झाले! त्यांचा पगारही थकला असल्या-मुळें तो मिळण्याबद्दल त्यांनीं हट्ट धरला. तेव्हां आल्व्हानें तेथें येऊन मोठ्या प्रयासानें

त्यांची समजूत केली व त्यांच्या थकलेल्या पगारापैकीं निमीअर्धी रक्कम त्यांस देऊन त्यांचें सांत्वन केलें! मग ते आल्कमरला वेढा देण्यास तयार झाले. आपल्या सैन्याची ही स्थिति पाहून व हार्लेम काबीज करण्यास जर सात महिने लागल, तर ह्याचा कित्ता इतर शहरांनीं गिरविल्यास सबंध हॉलंड पादाक्रांत करण्यास किती काळ लागेल याची कल्पना मनांत आणून आल्व्हानें माफीची लालूच दाखवून हॉलंडला स्वखुषीनें आपली सत्ता मान्य करण्याचा उपदेश केला; पण तो व्यर्थ गेला. आल्कमर शहर हार्लेमपेक्षां छोटें असून हार्लेमसारखेंच चोहोंकडून पाण्यानें व्यापलेलें होतें. त्या पाण्याचा शहरास व आसपासच्या भागास उपसर्ग होऊं नये म्हणून ठिकठिकाणीं मोठमोठे धक्के बांधलेले होते व कांहीं ठिकाणीं निसर्गतःच जमिनीचे लांबरुंद उंचवटे पाण्यांतून वर आलेले होते. ह्या धक्क्यांतून पाणी आंतबाहेर सोडण्याकरितां जागजागीं मोठीं दारें बांधलेलीं असून तीं वाटेल तेव्हां उघडतां व बंद करतां येत असत. अशा त्या अवघड व नाजुक ठिकाणास डॉन फ्रेड्रिकच्या सोळा हजार सैन्यानें १५७३ च्या सप्टेंबर महिन्यांत वेढा दिला. तेथील लोकांनींही हार्लेमच्या लोकांप्रमाणेच शहर लढविण्याचा निश्चय केला व डॉन फ्रेड्रिकचा पहिला हल्ला अगदीं हुबेहुब हार्लेमच्या लोकांप्रमाणेंच त्यांनीं परतविला. हार्लेम पडलें तर पडलें पण हें शहर तरी निदान शत्रूच्या हातीं जाऊं द्यावयाचें नाहीं, असा वुइल्यमचा निश्चय झाला होता. पण फ्रेड्रिकनें आपल्या वेढ्याचा घेर इतका बळकट केला होता कीं, त्यांतून एक चिटपाखरूंसुद्धां शहराच्या आंत बाहेर जाण्याचा संभव नव्हता. शहरांतील पुरुषांची संख्या दोनतीन हजार होती व लढाऊ सैन्य अवघें सातआठशें होतें. इतक्या लोकांच्या हातून सोळा हजार स्पॅनिश सैन्यापुढें फार काळ टिकाव धरणें शक्य नव्हतें; पण त्यांना समुद्राचा मोठा आधार होता. अगदीं आणीबाणीचा प्रसंग आल्यास शहरानजिकचे धक्के फोडून स्पॅनिश सैन्यानें व्यापलेला प्रदेश जलमय करून सोडणें त्यांस शक्य होतें. परंतु तसें केल्यास हालंडच्या बऱ्याच भागांतील पिकांचा नाश होणार होता. यास्तव त्या भागांतील लोकांची ह्या गोष्टीस संमति मिळविणें जरूर होतें. म्हणून त्यांनीं एका सुताराबरोबर हातांत धरावयाच्या पोकळ काठींतून वुइल्यम व त्याचा दुय्यम सोनॉय यांस पत्रें पाठविलीं. हा सुतार मोठ्या शिताफीनें स्पॅनिश सैन्याची नजर चुकवून वुइल्यमला येऊन भेटला. त्यानें लागलीच शहरांतील लोकांस आश्वासन देणारें पत्र लिहिलें व त्यांतच आपण कोणत्या रीतीनें ते धक्के फोडून

सर्व स्पॅनिश सैन्य बुडविणार तें विस्तारानें नमूद केलें आणि अगदीं आणीबाणीची वेळ येईल तेव्हां विवक्षित स्थलीं मोठा जाळ करून खूण करण्याची त्यांस सूचना दिली. वुइल्यमनें त्यास गांवांतील लोकांचें पत्र येण्यापूर्वीच हे धक्के फोडण्याची सोनॉय यास आज्ञा केली होती व त्याप्रमाणें त्यानें तें काम सुरूही केलें होतें. मध्यंतरीं स्पॅनिश सैन्याचे दोन हल्ले आल्कमरच्या लोकांनीं त्यांच्यावर तुटून पडून परतविले व त्यांत स्पॅनिश सैन्याची त्यांनीं बरीच खराबी केली. तेव्हां तिसरा हल्ला चढविण्यास तें धजेना. एवढेसे लोक फारशी युद्धसामुग्री नसतांना, भयंकर रीतीनें आपणांवर तुटून पडतात, हें पाहून त्या शहरांत कांहींतरी भुताटकीचा खेळ आहे असें स्पॅनिश शिपायांस वाटून ते गर्भगळित झाले होते! तशांत शहरानजीकचे कांहीं धक्के फोडण्यांत आल्यानें त्यांच्या तळानजीक चिखल होऊन त्यांच्या हालचालींस अडथळा होऊं लागला होता. या सुमारास वुइल्यमकडे शहराच्या लोकांचें विनंतीपत्र घेऊन गेलेला सुतार, त्याचें उत्तर घेऊन परत येत असतां स्पॅनिश शिपायांच्या तावडींत सांपडला. त्यांतून निसटून जाण्याचा यशस्वी प्रयत्न करीत असतां वुइल्यमचें उत्तर आंत असलेली त्याच्या हातांतली पोकळ कांठी शत्रूच्या हातीं लागली. अर्थात् त्यांना पाण्यांत बुडवून टाकण्याची वुइल्यमची योजना त्यांस कळली! तेव्हां डॉन फ्रेड्रिक मुकाट्यानें तो वेढा उठवून अमस्टरडॅमला निघून गेला! अशा रीतीनें आल्कमर शहर शत्रूच्या तावडींतून सुटलें ( आक्टोबर १५७३ ).

तिकडे वुइल्यमचें आरमार व आल्व्हाचा गव्हर्नर काऊंट बॉसू याच्या हाताखालचें आरमार यांची झूडरझीच्या समुद्रांत लढाई होऊन त्यांत वुइल्यमच्या आरमारानें मोठा विजय मिळविला. स्पॅनिश आरमाराची पुष्कळ खराबी करून त्यानीं काऊंट बॉसूस पकडलें. ह्या युद्धानंतर वुइल्यमचा मुख्य आरमारी अधिकारी द ला मार्क यास त्याच्या कित्येक अमानुष व क्रूर कृत्यांबद्दल वुइल्यमनें बडतर्फ करून देशत्याग करण्यास भाग पाडलें.* वुइल्यमचा विश्वासू हस्तक व सहकारी

---

* तेव्हां तो जर्मनींत गेला व पुढें कांहीं वर्षांनीं पिसाळलेलें कुत्रें चावून मरण पावला! द ला मार्क यानें वुइल्यमच्या देशकार्यास प्रारंभीं फार मोठी व महत्त्वाची मदत केलेली असल्यामुळें त्यास बडतर्फ करणें त्याच्या जिवावर आलें होतें; परंतु त्याच्या कार्यास बट्टा न लागावा म्हणून त्यास तसें करावें लागलें!

सेंट अल्डेगाँड हा थोड्या दिवसांपूर्वी स्पॅनिश लोकांच्या हातीं लागला होता, त्याच्या व इतर कित्येक महत्त्वाच्या कैद्यांची सुटका केल्यास काउंट बॉसूची सुटका करूं, असें वुइल्यमनें स्पॅनिश सेनापतीस कळविलें. हॉलंडच्या दक्षिणेसही त्याच्या लोकांनीं आणखी कांहीं किरकोळ जय मिळविले. वरील सर्व जयांमुळें हार्लेमच्या अपयशानें हॉलंडमध्यें उत्पन्न झालेली खिन्नता व औदासिन्य हीं पुष्कळ कमी होऊन तेथील लोकांना आल्व्हाच्या सैन्याचा जोरानें प्रतिकार करण्याचें पुन्हा अवसान चढलें. हें पाहून आल्व्हाची मनोवृत्ति खवळली; परंतु त्याला आतां कोणाचाच पाठिंबा नसल्यानें मनांतल्या मनांत चरफडून भोंवतालच्या परिस्थितीसंबंधानें फिलिपकडे वारंवार तक्रार करण्यापलीकडे विशेष कांहीं करतां येण्याजोगें नव्हतें. त्याच्या जागीं गव्हर्नर म्हणून आलेला पण मागें सांगितल्याप्रमाणें त्याच्या हाताखालीं काम करण्यास तयार असलेला ड्यूक मेडिना कोयली ह्याच्याशीं देखील त्याचें पटेना ! तेव्हां तो ड्यूक परत स्पेनला निघून गेला ! कौन्सिलदार जुमानीनात, लोक मान ठेवीनात, फिलिप तक्रारीकडे विशेष लक्ष देईना, हॉलंडचे लोक त्याच्या डुरकावणीला भीक घालीनात, अशी सर्वतोपरी वैताग उत्पन्न होण्यासारखी आतां आल्व्हाची अवस्था झाली होती. तिला कंटाळून त्यानें आपली लवकर सुटका करण्याबद्दल फिलिपला विनंतीही केली होती; परंतु नेदर्लंड सोडून जाईपर्यंत त्यानें आपला दुराग्रह व दुष्टपणा कमी होऊं दिला नाहीं ! वुइल्यमच्या लोकांस मिळालेले विजय पाहून त्यानें नेदर्लंडांतील बहुत दिवस बंद असलेली इस्टेस्टस् जनरलची बैठक ब्रुसेल्स येथें भरवून तिच्यापाशीं 'हें धर्मयुद्ध' चालू ठेवण्याबद्दल मदत मागितली. मागितली म्हणण्यापेक्षां ती देण्याचा त्यानें त्या सभेस हुकूम केला असें म्हणणें जास्त शोभेल. वुइल्यमनेंही ह्या संधीचा' फायदा घेऊन त्या सभेच्या प्रतिनिधींस अनुलक्षून एक जाहिरपत्रक काढलें. त्यांत त्यानें आल्व्हाच्या कारकिर्दीचें सिंहावलोकन करून त्याच्या जुलमापासून सर्व देशाची सुटका करण्याचें कंकण करीं बांधलेल्या हॉलंडच्या लोकांस इमानपूर्वक साह्य करण्याविषयीं त्यांची प्रार्थना केली होती. ह्या पत्रकाचा इस्टेस्टस् जनरलच्या सभासदांवर उत्तम परिणाम झाला. त्यांनीं आल्व्हास मदत करण्याचें नाकारलें.

आल्व्हाच्या विनंतीस मान देऊन फिलिपनें त्याच्या जागीं डॉन लुइ द रिकेसेन्स नांवाचा नवा गव्हर्नर जनरल नेमला. तो स्पेनहून निघाल्याचें वर्तमान कळल्यावर आल्व्हानें एके दिवशीं रात्रीं मुकाट्यानें ( आपलें खासगी व सार्वजनिक कर्ज

बुडविण्यासाठीं ) अमस्टरडॅमहून पळ काढला व तो ब्रुसेल्स येथें नव्या गव्हर्नर जनरलची वाट पहात बसला. नोव्हेंबर अखेरीस ( १५७३ ) ह्या उभयतांची ब्रुसेल्स येथें मुलाखत होऊन रिकेसेन्स यानें नेदर्लंडचीं राज्यसूत्रें आपल्या हातीं घेतलीं व नंतर दहा पंधरा दिवसांनीं आल्व्हा स्पेनला परत निघून गेला. आल्व्हानें सुमारें सहा वर्षें नेदर्लंडचा राज्यकारभार चालविला. तेवढ्या कालांत त्यानें धर्माच्या नांवानें अठरा हजार सहाशें मनुष्यांचा वध केला ! याखेरीज युद्ध, लुटालूट व कत्तलींत जी प्राणहानि झाली ती वेगळीच ! त्याच्यासारखी अघोर कृत्यांनीं भरलेली व भीषण अशी कारकीर्द जगाच्या इतिहासांत इतरत्र क्वचितच आढळून येईल ! तिचा समारोप मोटलेनें फार नामी रीतीनें केला आहे. त्यांतून पुढील त्रोटक उतारा देऊन हें प्रकरण संपवितों.

"He strode with gigantic steps over haughty statutes and popular constitutions; crushing alike the magnets who claimed a bench of monarchs for their jury, and the ignoble artisans who could appeal only to the laws of their land × × × with all the bloodshed a Mons, and Narden and Mechlin and by the Council of Tumults, daily for six years long, still crying from the ground, he taxed himself with a misplaced and foolish tenderness to the people. He assured the king that when Alkmar should be taken, he would not spare a 'living soul among its whole population;" and as his parting advice, he recommended that every city in the Netherlands should be burned to the ground, except a few which could be occupied permanantly by the Royal troops. On the whole, so finished a picture of perfect and absolute tyranny has rarely been presented to mankind by history, as in Alva's administration of the Netherlands. × × × × × No mode in which human beings have ever caused their fellow-creatures to suffer, was omitted from daily practice. Men, Women and Children, Old and Young, nobles and paupers, opulent burghers, hospital patients, lunatics, dead bodies, all were indiscriminately made to furnish food for the scaffold and the stake. Men were tortured, beheaded, hanged by the neck and by the legs, burned before slow fires,

pinched to death with red-hot tongs, broken upon the wheel, starved and flayed alive. × × × Women and children were executed for the crime of assisting their fugitive husbands and parents with a penny in their utmost need, and even for consoling them with a letter in their exile. × × × The additional barbarities committed amid the sack and ruin of those blazing and starving cities, are almost beyond belief; unborn infants were torn from the living bodies of their mothers; women and children were violated by thousands; and whole population burned and hacked to pieces by soldiers in every mode which cruelty, in its wanton ingenuity, could devise."

*Moteley's Rise of the Dutch Republic end of part III.*

अशा तऱ्हेचा भयंकर जुलूम सोसूनही ज्या डच लोकांनीं धैर्यानें व नेटानें आपल्या देशाचें नष्ट झालेलें स्वातंत्र्य पुन्हा संपादन केलें त्यांची धन्य नव्हे काय? राष्ट्रोन्नतीप्रीत्यर्थ चाललेल्या झगड्यांत थोडेबहुत हाल होतांच अथवा नुकसान होतांच ज्यांची गाळण उडते, त्यांनीं नेदर्लंडच्या ह्या उदाहरणाकडे पाहिल्यास त्यांच्या दुर्बल मनोवृत्तींची त्यांची त्यांनाच कींव येऊं लागेल, यांत शंका नाहीं!

# प्रकरण ९ वें.

# जयापजयांची खिचडी!

मागील प्रकरणांत, कथासूत्राची संगति न तुटावी म्हणून इ. स. १५७३ च्या अखेरीस आल्व्हा स्वदेशास निघून जाईपर्यंतची नेदर्लंडांतील घडामोडींची हकीकत दिली आहे. परंतु त्याच सालांत वुइल्यम व लुई यांनीं परदेशांशीं केलेल्या महत्त्वाच्या कारस्थानांची हकीकत सांगावयाची राहिली आहे. ती अगोदर सांगून मग पुढील कथाभागाकडे वळूं.

फ्रान्सांतील मागें उल्लेखिलेली सेंट बार्थोलोमो येथील कत्तल झाल्यावर फ्रान्सच्या मदतीची अपेक्षा सोडून देऊन वुइल्यमनें इंग्लंडच्या इलिझाबेथ राणीची मदत मिळविण्याची खटपट चालविली. हॉलंड व झीलंड या प्रांतांचें स्थानिक स्वातंत्र्य कायम ठेवून त्यांच्यावर इलिझाबेथची संरक्षक अधिसत्ता स्थापन करण्यासंबंधीं त्यानें तिच्याशीं बोलणें सुरू केलें. इलिझाबेथ ही मोठी धूर्त व हुशार राणी होती. तिच्या स्वतःच्या राज्यांत लोकसत्ता व राजसत्ता यांच्यामध्यें द्वंद्व सुरू असल्या-कारणानें कोणत्याही परराष्ट्राशीं युद्ध करण्यास अथवा त्यास उघडपणें लष्करी मदत करण्यास ती तयार नव्हती. तथापि स्पेन व नेदर्लंड यांच्यामध्यें चालू असलेल्या झगड्याचा त्या दोहोंपैकीं कोणत्या तरी एका राष्ट्राच्या मर्जीप्रमाणें कायमचा निकाल होऊं देणेंही तिला इष्ट वाटत नव्हतें. कारण तसें झाल्यास स्पेनला इंग्लंडवर स्वारी करण्याचा मोह उत्पन्न होईल अशी तिला भीति वाटत होती. स्पेनशीं उघडपणें वैर करून युद्ध पुकारण्यास ती तयार नसल्यामुळें, नेदर्लंडला उघडपणें मदत करणें तिला शक्य नव्हतें. अर्थात् हॉलंड व झीलंड या प्रांतांचें स्वामित्व पत्करण्याची सूचना तिला मान्य करतां आली नाहीं; तथापि वुइल्यमला आपण मुळींच मदत केली नाहीं तर, इंग्लंडचें प्रतिस्पर्धी राष्ट्र फ्रान्स याची त्यानें मदत मिळविल्यास फ्रान्सचें नेदर्लंडांत साहजिकच महत्त्व वाढेल, या भयानें त्यास गुप्तपणें मदत करण्याचें धोरण तिनें वेळोवेळीं अमलांत आणलें. स्पेनबद्दल जरी मनांतून तिला तिटकारा होता, तरी वरपांगीं त्या राष्ट्राशीं आपला स्नेहसंबंध कायम राखण्यास ती नेहमीं तत्पर असे. यामुळें वुइल्यमशीं तिचें वर्तन नेहमीं धरसोडीचें

असे. त्याला ती स्वतः वारंवार गुप्तपणें मदत करी व आपल्या प्रजेसही करूं देई; परंतु त्याचा विशेष बोभाटा होऊन स्पॅनिश सरकारची तंबी तिला येऊन पोंचली, कीं कांहीं काळ ती आपला हात सर्वस्वीं आंखडून धरीत असे. अर्थात् वुइल्यमला सर्वस्वीं तिच्या मदतीवर अवलंबून राहतां येणें शक्य नव्हतें. म्हणून त्यानें डेन्मार्क, स्वीडन, जर्मनसंस्थानें येथील राजांची व सरदारवर्गाची मदत मिळविण्याचे पुष्कळ प्रयत्न केले, पण त्यापासून फारशी कांहीं निष्पत्ति झाली नाहीं. तथापि १५७३च्या प्रारंभापासूनच फ्रेंच राजा चार्लस व त्याची आई कॅथराईन यांनीं सेंट बार्थोलोमाच्या कत्तलीबद्दल खेद प्रदर्शित करून व ती आपण मुद्दाम करविली नसून लोकक्षोभाच्य आकस्मिक उकळीचा केवळ तो एक स्वाभाविक परिणाम होता, असें प्रतिपादून वुइल्यमचें मन आपणांविषयीं शुद्ध करण्याचा प्रयत्न चालविला होता. त्यांचें हें म्हणणें प्रामाणिकपणाचें होतें असें नाहीं; तर त्या कत्तलीमुळें युरोपांतील सर्व प्रॉटेस्टंट लोकांच्या तिरस्कारास ते पात्र होऊन कॅथोलिक लोकांकडूनही त्यांस त्याबद्दल मिळावा तितका पाठिंबा न मिळाल्याकारणानें त्यांना आपण सर्वांपासून एकेकटे–वेगळे–पडूं, अशी भीति वाटूं लागल्याकारणानें त्यांनीं तसें बोलणें सुरू केलें होतें. शिवाय तसें करण्यास आणखीही एक कारण होतें. इ. स. १५७२ त पोलंडचा राजा सिगिसमंड हा मरण पावल्यामुळें तेथील सिंहासन रिकामें झालें होतें. तें चार्लसचा भाऊ हेनरी ड्यूक ऑफ आंजू यास मिळावें अशी कॅथराइनची इच्छा होती. त्या सिंहासनाधिपतीची निवडणूक करण्याचा हक्क जर्मनींतील प्रॉटेस्टंट मतानुयायी संस्थानिकांकडे होता. त्यांनीं वुइल्यमला त्याप्रीत्यर्थ उमेदवार होण्याची सूचना केली; पण त्याचें प्रेम व लक्ष नेदर्लंडाकडे असल्यामुळें त्यानें ती मान्य केली नाहीं. तेव्हां त्याच्या मध्यस्तीनें हेनरीला पोलंडचें राजपद मिळेल असें चार्लस व कॅथराईन यांना वाटून त्यांनीं त्याचें मन आपणांविषयीं शुद्ध करण्याकरितां त्याच्याशीं वरीलप्रमाणें बोलणें सुरू करून त्याची मनधरणी करण्यास व नेदर्लंडच्या झगड्यांत मदत करण्याविषयींचीं आश्वासनें देण्यास सुरुवात केली होती. हें कारस्थान त्यांनीं आपला जर्मनींतील वकील शूंबर्ग याच्यामार्फत चालविलें होतें. सेंट बार्थोलोमोच्या कत्तलीपासून वुइल्यमला चार्लसचा व कॅथराईनचा अत्यंत तिटकारा आलेला होता व हॉलंड आणि झीलंड प्रांतांतील लोकांना–तेथील बहुजनसमाज कॅल्व्हानिस्ट असल्यामुळें तर त्यांची चीड आलेली होती. तथापि राजकारणांत एकच गोष्ट मनांत धरून विकारवश होणें अथवा

भावनेला प्राधान्य देणें हें कार्यसाधुत्वास विघातक असल्यामुळें वुइल्यमनें शूंबर्ग-च्या इच्छेस मान देऊन त्यांची मदत मिळविण्याचा निश्चय केला व त्याप्रीत्यर्थ बोलणें करून करारमदार करण्याकरितां त्यानें आपला भाऊ लुई यास आपल्या नांवचें अधिकारपत्र दिलें. लुईनें शूंबर्गशीं बोलणें चालू असतांना फ्रेंच राजाशीं प्रत्यक्ष पत्रव्यवहार करून त्याच्या गतकालीन धरसोडीच्या वर्तनाबद्दल व सेंट बार्थोलोमोच्या कत्तलीबद्दल त्याची खूप खरडपट्टी काढली व " यापुढें तरी सरळ वर्तन ठेवा व धर्माच्या नांवावर प्रजेचा छळ करून परमेश्वराच्या व मनुष्यांच्या रोषास पात्र होऊं नका; असें कराल तरच तुमचें व तुमच्या राज्याचें हित होईल, एरवीं नाहीं." असें त्यानें त्यास लिहून कळविलें त्याचा राजाच्या अंतःकरणावर कितपत खरा परिणाम झाला हें सांगणें कठीण आहे; तथापि त्यानें लुईचा कार्यभाग झाला एवढें खरें. चार्लसनें शूंबर्गमार्फत त्यास नेदर्लंडांतील युद्धाकरितां तावडतोब सैन्य व द्रव्य देण्याचें कबूल केलें व त्याचा मोबदला म्हणून लुईनें त्यास हॉलंड व झीलंडवरील संरक्षक अधिसत्ता आणि त्याच्या सैन्यानें नेदर्लंडांतील जिंकलेला मुलूख, देण्याचें कबूल केलें. त्याचप्रमाणें हेनरी ऑफ आंजू यास पोलंडची गादी मिळवून देण्यास मदत करण्याचेंही त्यानें आश्वासन दिलें. ती त्यास मिळाल्यास हेनरीनेंही वुइल्यमच्या कार्यास मदत करावी असें ठरलें. नेदर्लंडांतील सर्व प्रांतांस धार्मिक बाबतींत मतस्वातंत्र्य व पूर्वापार चालत आलेले पण अल्व्हाचे कारकीर्दींत नष्ट झालेले स्थानिक स्वराज्याचे हक्क देण्याचाही करार उभयतांमध्यें झाला.

लुईमार्फत फ्रेंच राजाशीं वरीलप्रमाणें कारस्थान चालू असतां इकडे खुद्द फिलिपशीं तह करण्याची एक संधी वुइल्यमला प्राप्त झाली व तिचा शक्य तितका फायदा घेण्याचा त्यानें प्रयत्न चालविला जर्मन बादशहा मॅक्सिमिलियन याच्या मृत्यूमुळें रिकामें होणारें जर्मन साम्राज्याचें तक्त आपणांस मिळावें अशी फ्रेंच राजा चार्लस व स्पेनचा राजा फिलिप या दोघांची इच्छा होती.* त्या तक्ताधिपतीची निवडणूक पसंत करण्याचें काम मुख्यतः प्रॉटेस्टंट जर्मन संस्थानिकांकडे

* फिलिपचें राज्य व फ्रेंच राजाचें राज्य ह्या दोन्ही राज्यांचा समावेश पूर्वी पवित्र रोमन साम्राज्यांत व जर्मन किंवा आस्ट्रोजर्मन साम्राज्यांत होत असल्या-मुळें सध्यां अवशिष्ट असलेल्या जर्मन साम्राज्याच्या अधिपतीच्या कुटुंबाशीं त्यांचा निकट संबंध होता. अर्थात् त्या साम्राज्याच्या गादीवर त्यांचा डोळा असावा हें अगदीं साहजिक आहे.

असल्यानें आणि सेंट बार्थेलोमोच्या कत्तलीमुळें त्यांचीं मनें चार्लसविषयीं विटलीं असल्याकारणानें त्याची ही इच्छा सफळ होण्याचा संभव नव्हता. हें पाहून फिलिपनें त्या बाबतींत उपरोक्त जर्मन संस्थानिकांशीं गुप्त वाटाघाट सुरू केली होती. जर जर्मन सम्राटाचें तक्त आपणांस मिळेल तर त्यापण नेदर्लंडांतून स्पॅनिश सैन्य परत नेऊं; तेथें धर्मस्वातंत्र्य स्थापन करूं; व त्या देशास जर्मन साम्राज्यांत सामील करून त्या साम्राज्यांतील मांडलिकांस असलेले सर्व हक्क त्यास देऊं; इतकेंच नव्हे तर प्रिन्स ऑफ ऑरेंज—वुइल्यम—व त्याचे साथीदार यांस पूर्ण माफी देऊन त्यांच्या जहागिरी व पदव्या त्यांस परत देऊं, असें तो म्हणत होता.* त्याच्या ह्या म्हणण्याचा फायदा घेऊन वुइल्यमनें कांहीं काळ त्याच्याशीं ह्या विषयासंबंधानें चर्चा केली व त्यानेंही त्यास कांहीं काळ महत्त्व दिलें. (कारण जर्मन संस्थानिकांचीं मतें त्याच्या मध्यस्तीशिवाय मिळणार नाहींत असें त्यास वाटत होतें). पण जर्मन साम्राज्याचा सम्राट् झाल्यावर जें करण्यास फिलिप तयार होता तें अगोदर करण्याबद्दल वुइल्यमनें आग्रह धरल्यामुळें व मॅक्समिलियन यास सरळ वारस असल्याकारणानें जर्मन संस्थानिकांचा कल आपणाकडे वळेलच अशी खात्री न वाटून फिलिपनें लवकरच ही चर्चा बंद केली. तेव्हां अर्थातच वुइल्यमचा नाइलाज होऊन त्याला फ्रेंच राजाच्या मदतीचा स्वीकार करणें भाग पडलें. ह्या सबंध वर्षांत (इ.स. १५७३) नेदर्लंडांतील झगडा चालविण्याचें काम मुख्यतः वुइल्यमला एकट्यालाच करावें लागलें. त्याचा भाऊ लुई हा परदेशीं वरील कारस्थानें करण्यांत गुंतला होता व त्याचा विश्वासूक हस्तक सेंट अल्डेगॉंड हा शत्रूच्या हातीं लागला होता.

---

* फिलिपच्या ह्या प्रयत्नावरून नेदर्लंडांतील त्याच्या जुलमी राज्यपद्धतीच्या मुळाशीं प्रामाणिक धर्मवेड होतें असें कोणीही म्हणणार नाहीं, असा मोटलेनें स्पष्ट अभिप्राय दिला आहे तेथील धर्मसुधारक पाखंडाचा प्रसार करून खऱ्या धर्माचा लोप करीत असल्यामुळें नाशास पात्र आहेत, हें जर त्याचें प्रामाणिक मत असतें, तर साम्राज्याचा मुकुट त्याच्यामार्फत त्याच्या शिरावर चढण्याचा संभव दिसतांच ह्या पाखंडी लोकांचे सर्व अपराध विसरून त्यांचें कल्याण करण्यास तो कसा तयार झाला, असा मोटलेचा प्रश्न असून त्याची साधकबाधक चर्चा करून त्यानें त्यास धर्मवेडा म्हणण्यापेक्षां मॅकव्हिलीयन पद्धतीचा अनियंत्रित राजसत्तेचा अभिलाषि म्हणणें अधिक शोभेल, असें म्हटलें आहे.—मोटलेचा डच रि० इतिहास.

जवळ कोणीच जिव्हाळ्याचें व विश्वासाचें माणूस नसल्यामुळें आणि कामाचा बोजा फार असल्यामुळें त्याची मोठी त्रेधा उडत असे. लष्कराची व्यवस्था व जुळवाजुळव करणें, हॉलंड व झीलंड येथील मुलकी कारभार चालवून इतर प्रांतांशीं राजकारण करणें, पैशाची सोय करणें, वगैरे सर्व कामें त्यास एकट्यासच करावीं लागत होतीं; तथापि कालाकडे नजर देऊन तीं तो आनंदानें करीत होता. आपले राजकीय हेतु साधण्याकरितां या वर्षीं त्यानें कॅलव्हिनच्या मताची दीक्षा घेतली. हॉलंड व झीलंड येथें ह्याच मताचे लोक फार असून ते प्रॉटेस्टंट व कॅथोलिक या दोन्ही मतांना विरोध करीत असत. कॅथोलिकांविषयीं तर त्यांच्या मनांत पूर्ण द्वेष असे; पण आपलें राष्ट्रीय स्वातंत्र्य कायम राखण्याची चिकाटी व धारिष्ट ह्याच लोकांच्या अंगीं विशेष असल्यामुळें त्यांच्या सहाय्यावांचून वुइल्यमला नेदर्लंडाचा उद्धार करतां येणें शक्य नव्हतें. शिवाय त्यांच्याप्रमाणें इतर धर्ममतांचा तो द्वेष्टा नसून सर्वांना आपापल्या इच्छेनुरूप धर्म पाळूं देणें हें त्याचें ब्रीद असल्यामुळें, हॉलंडच्या लोकांस धार्मिक बाबतींत परमतसहिष्णुत्वाचा धडा घालून देण्याचा त्याचा विचार होता. हें कार्य, त्यांच्याशीं पूर्णपणें तादात्म्य पावल्याशिवाय होणार नाहीं, असें जाणून त्यानें कॅल्व्हानिस्ट पंथाची दीक्षा घेतली. त्यायोगानें हॉलंडच्या डच लोकांस मोठा संतोष वाटला व ते त्यांस धार्मिक व राजकीय ह्या दोन्ही बाबतींत आपला पुढारी मानून त्याच्यावर पूर्णपणें विश्वास ठेवूं लागले. असो. आतां आल्व्हाच्या जागीं आलेला नवीन गव्हर्नर जनरल रिक्वेसेन्स याच्या कारकिर्दीकडे वळूं.

रिक्वेसेन्स हा मनुष्य उच्च कुळांतला व लष्करी पेशाचा होता; परंतु त्याची योग्यता सामान्यवृत्तीची होती. त्याची बाह्यवृत्ति सौम्य व सरळपणाची होती, परंतु त्याचें अंतरंग आल्व्हाप्रमाणेंच काळेंकुट्ट होतें. मात्र तो आल्व्हाइतका दुष्ट—केवळ सैतान—नव्हता. आल्व्हाचें राज्यधोरण त्यास पसंत होतें पण तें अंमलांत आणण्याचे त्याचे क्रूर मार्ग त्यास पसंत नव्हते. कडू औषध शर्करावगुंठित करून पाजण्याचा प्रयोग करणारांपैकीं तो एक होता. नेदर्लंडच्या लोकांची स्थिति सुधारावी अथवा त्यांस त्यांचे जुने राजकीय हक्क किंवा धार्मिक स्वातंत्र्य देऊन संतुष्ट करावें अशी त्याची मुळींच इच्छा नव्हती; परंतु आल्व्हाचें 'एक घाव, दोन तुकडे' करणारें सडेतोडपणाचें निष्ठुर धोरण चालू ठेवण्याचा त्याचा विचार नव्हता. आल्व्हानें परत जातांना जरी त्यास तेंच

धोरण चालू ठेवण्याचा–जेथें स्पॅनिश सैन्य नसेल अशीं गांवें जाळून पोळून उध्वस्त करण्याचा–उपदेश केला होता, तरी तो बाजूस ठेवून कांहीं काल सौम्यपणाचा आविर्भाव आणणें त्यास जरूर वाटत होतें. खुद्द फिलिपनेंही त्याला तसें करण्यास अनुमति दिली होती आणि त्यांच्या दृष्टीनें पाहिल्यास तसें करणें हेंच या वेळीं योग्य होतें. कारण आल्व्हाच्या दुराग्रही कारकिर्दीमुळें नेदर्लंडची सरकारी तिजोरी रिकामी होऊन स्पेनच्या तिजोरींतूनही बराच पैसा नेदर्लंडच्या लोकांस खऱ्या धर्माची दीक्षा देण्याकरितां त्यांचें रक्त सांडण्याप्रीत्यर्थ खर्च झाला होता! तरीही नेदर्लंडचे लोक ताळ्यावर न येतां दिवसानुदिवस जास्तच भकत चालले होते! हालंड व झीलंड हे प्रांत तर बंडखोर वुइल्यमच्या ताब्यांत जाऊन सर्व नेदर्लंडाची स्पॅनिश अंमलापासून सुटका करण्यास तयार झाले होते! अशा स्थितींत त्यांच्याशीं एकसारखी टक्कर देत गेल्यास फिलिपसारख्या बलाढ्य व श्रीमान् राजाचीही संपत्ति व मनुष्यबळ हीं कोठवर पुरेल, याचा निश्चय करणें कठीण झालें होतें! मनुष्यबळ हें संपत्तीवर अवलंबून असावयाचें व त्या संपत्तीचा तर तूर्त ऱ्हास झाला होता.‡ तेव्हां कांहीं काल हा झगडा थोपवून धरणें त्यास इष्ट वाटत असल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं; शिवाय नेदर्लंडांतील सरकारपक्षीय लोकही आतां ह्या झगड्यास कंटाळलेले होते. स्टेट कौन्सिलचे जुने सभासद अर्शाट व बर्लेमाँट यांनीं देखील बंडवाल्यांस उदारपणानें वागविण्याची व वुइल्यम आणि त्याचे साथीदार यांस माफी देण्याची या वेळीं सूचना केली. रोमेरो व नॉयरकार्म्स ह्या सरकारपक्षीय सेनापतींनीं वुइल्यमशीं स्नेहभावाचा पत्रव्यवहार सुरू केला! त्यांस वुइल्यमनें शिष्टाचाराप्रमाणें उत्तरें पाठवून

‡ आल्व्हाच्या कारकिर्दींत नेदर्लंडांतील बंड मोडण्याप्रीत्यर्थ स्पेनचे चार कोट डॉलर्स ( १ डालर=२॥। रु. ) खर्च झाले होते. सुमारें पासष्ट लक्ष डॉलर्स इतका शिपायांचा पगार थकलेला होता व स्पॅनिश सैन्याचा चालू खर्च दरमहा सहा लक्ष डॉलर्स होता! इतका खर्च आल्व्हाच्या जुलमी करांच्या उत्पन्नानेंही भागत नव्हता. सबब स्पेनच्या तिजोरींतून त्यास वारंवार मदत करणें भाग पडल्यामुळें, ती तिजोरीही रिती पडण्याच्या पंथास लागली होती! दुराग्रहानें प्रजेवर जुलूम करण्याचा हट्ट चालविणारांची प्रथम अशीच संपत्ति ऱ्हास पावते आणि नंतर त्यांचें सामर्थ्य कमी होत जातें; मात्र तोंपर्यंत गांजलेल्या प्रजेनें धीर धरून त्यांच्या जुलमाचा चिकाटीनें प्रतिकार करीत राहिलें पाहिजे.

त्यांच्या सहानुभूतिबद्दल आभार मानले. मात्र नॉयरकार्म्स हा नेदर्लंडचा सरदार असल्यामुळें त्यास त्यानें त्याच्या गतकालीन देशद्रोही वर्तनाबद्दल सौम्य भाषेंत टोमणा मारिला.

वरील सर्व कारणांमुळें सौम्यपणाचें धोरण तूर्त कांहीं काल स्वीकारण्याचा जरी रिक्वेसेन्स याचा विचार होता, तरी तो तावडतोब अंमलांत आणणें शक्य नव्हतें. कारण बंडवाल्यांशीं आल्व्हानें चालू केलेलें युद्ध अद्याप जोरांत असून, मॉड्रिगॉनसारखा अनुभवी व शूर सेनापति मिड्लबर्गच्या* वेढ्यांत अडकलेला होता. अन्नाचा पुरवठा नसल्यानें त्याची स्थिति दिवसानुदिवस कठिण होत चालली होती. त्याची व त्याच्या सैन्याची सुटका करणें हें पहिलें काम होतें व तें केल्याशिवाय बंडवाल्यांना सवलतीच्या व माफीच्या भ्रामक धोरणावर झुकविणें शक्य नव्हतें; कारण बंडवाल्यांची स्थिति त्या वेळीं बरीच चांगली§ असल्याकारणानें वायफळ चर्चा करण्याकरितां ते युद्धापासून निवृत्त होण्याचा संभव नव्हता. मिड्लबर्गच्या सुटकेकरितां स्पॅनिश सेनापति व्हर्गास यानें बंडवाल्यांच्या ताब्यांतील लेडन शहरास वेढा घातला होता; पण तो उठविण्याकरितां लुईनें बरेंच मोठें सैन्य जमवून त्या शहराच्या आसपास स्पॅनिश सैन्यास शह देण्याचा प्रयत्न चालविला असल्यामुळें मॉड्रिगॉनची सुटका करण्याकरितां निराळी स्वतंत्र योजना करणें जरूर होतें. म्हणून रिक्वेसेन्स यानें बर्गेन-ऑप-झूम येथें जाऊन पंचाहत्तर जहाजें जमा केलीं व तीं लष्कर आणि दारूगोळा यांनीं भरून जुलियन रोमेरोच्या स्वाधीन केलीं. अँटवर्प येथेंही त्यानें एकतीस जहाजांचा काफिला तयार करून त्याजवर सँचू द आव्हिला याची नेमणूक केली. या दोन सेनापतींनीं शेल्ड नदीच्या मुखांतून दोन मार्गांनीं जाऊन मिड्लबर्गची सुटका करावी, असें त्यानें त्या उभय सेनापतींस कळविलें.

वुइल्यमला ह्या हालचालीची बातमी लागतांच तो बर्गेन-आप-झूमच्या समोर फ्लुशिंग बंदरांत असलेल्या आपल्या आरमारावर आला व त्याचा तेथील आर-

---

* मिड्लबर्ग हें शहर वॉल्चेरन बेटांत असून त्या बेटांत आतां तेवढेंच शहर स्पॅनिश लोकांच्या हातीं उरलें होतें. बाकीचा सर्व भाग वुइल्यमच्या ताब्यांत होता.

§ हार्लेम, हेग, अमस्टरडॅम यांखेरीज सर्व हॉलंड व झीलंड यांच्या हातीं असून फ्रेंच राजांकडून त्यास पुष्कळ पैसा व माणसेंही मिळाल्याकारणानें त्यांचा लढण्याचा उत्साह दुणावला होता.

मारी सेनापति बुझो यास व त्याच्या हाताखालच्या दर्यावर्दी लोकांस त्यानें मिड्ल-बर्गचें महत्त्व समजावून देऊन तें शत्रूच्या हातीं न जाऊं देण्याप्रीत्यर्थ आपली पराकाष्ठा करण्यास सांगितलें. त्याच्या उत्तेजनपर भाषणानें तेथील सैनिकांचीं मनें इतकीं उत्साहपूर्ण बनलीं कीं, त्यांनीं कोणत्याही प्रकारच्या मोबदल्याची अपेक्षा न करतां जिवावर उदार होऊन मिड्लबर्गचें रक्षण करण्याची शपथ घेतली! एवढें कार्य करून वुइल्यम लेडनच्या सुटकेची तजवीज करण्याकरितां परत डेल्फ्ट येथील आपल्या मुख्य ठाण्याकडे निघून गेला.

ता. २९ जानेवारी (१५७४) रोजीं रोमेरो, बर्गेनहून आपलें आरमार घेऊन निघाला. त्या वेळीं रिक्वेसेन्स तेथें होता. त्याला सलामी देण्याकरितां म्हणून त्यानें जो तोफेचा बार काढला त्याची ठिणगी त्याच्या एका जहाजांतील दारु-गोळ्यावर उडून तें जहाज पेटलें व थोड्याच वेळांत फुटून नाश पावलें! परंतु ह्या अपशकुनाची पर्वा न करितां रोमेरो तसाच पुढें निघाला. थोडया वेळानें रोमर्स्वालनजीक त्याची व बुझोच्या आरमाराची गांठ पडून एक चकमक उडाली. त्यांत बुझोच्या जहाजावरील एक शूर कप्तान जखमी झाला व खुद्द बुझोचा एक डोळा जायबंद झाला. पण त्यानंतर जी मोठी आरमारी लढाई झाली त्यांत बुझोच्या सैनिकांनीं आपल्या शौर्याची शर्थ करून स्पॅनिश आरमाराचा धुव्वा उडवून दिला! ह्या लढाईंत सहा हजार स्पॅनिश सैन्य मारलें गेलें! त्यांची बहुतेक जहाजें, तोफा व इतर सामानही बुझोच्या हातीं लागलीं व रोमेरो मोठ्या कष्टानें थोड्याशा जहाजांनिशीं परत बर्गेनला जाऊन पोंचला. त्याच्या आरमाराची अशी वाट लागलेली समजतांच त्याच्या मदतीस आलेला सँचू द ॲव्हिला वाटेंतूनच माघारा फिरला! हा पराभव झाल्यावर रिक्वेसेन्स व रोमेरो हे ब्रुसेल्सला निघून गेले व नंतर सुमारें एक महिन्यानें मॉड्रॅगॉन वुइल्यमला शरण आला. तेव्हां त्यानें त्यांस आपल्या सैन्यासह मिड्लबर्ग सोडून जाण्याची परवानगी दिली. मात्र सेंट अल्डेगाँडची सुटका न झाल्यास मॉड्रॅगॉननें परत आपल्या कैदेंत राहण्यास्तव यावें असा त्यानें त्याच्याशीं करार केला. पण रिक्वेसेन्सनें तो पुढें अंमलांत येऊं दिला नाहीं! मॉड्रॅगॉन निघून गेल्यावर थोड्या दिवसांनीं वुइल्यम स्वतः मिड्लबर्ग शहरांत आला व तेथील रहिवाशांकडून खंडणी घेऊन त्यानें तें शहर आपल्या ताब्यांत घेतलें आणि आपल्या विश्वासाचे स्थानिक अधिकारी तेथें नेमून तो डेल्फ्टला निघून गेला.

मिड्लबर्ग ताब्यांत आल्यामुळें वुइल्यम व त्याचे अनुयायी यांची स्थिति बरीच सुधारली खरी; परंतु हार्लेम, हेग व अमस्टरडॅम येथील स्पॅनिश सत्तेचें शल्य अद्याप कायम होतें व स्पॅनिश सैन्यानें नुकताच लेडन शहरास वेढा दिलेला असल्यामुळें तो उठवून त्यांना हॉलंडमधून हांकून लावल्याखेरीज तो प्रांत कायमचा देशभक्तांच्या ताब्यांत राहणें कठीण होतें. हा वेढा उठविण्याची कामगिरी मुख्यतः लुईकडे सोंपविण्यांत आली होती. त्यानें फ्रेंच राजा चार्लस व त्याचा भाऊ पोलंडचा राजा व आपला स्वतःचा भाऊ काऊंट जॉन ह्यांच्याकडून मदत मिळवून एक बरेंच मोठें सैन्य उभारलें होतें. तें घेऊन तो लेडनची सुटका करण्यास निघाला होता, हें मागें सांगितलेंच आहे. त्यानें मेस्ट्रिक्ट शहराच्या रोखानें येऊन तें शहर जिंकावें आणि नंतर बोमेल बेटांत वुइल्यमच्या सैन्यास* येऊन मिळावें व तेथून ह्या दोन्ही सैन्यांनीं लेडनकडे चाल करावी असा वुइल्यमचा व त्याचा संकेत ठरला होता. त्याप्रमाणें लुई, आपला धाकटा भाऊ हेनरी (हा नुकताच कॉलेजांतून बाहेर पडला होता) व परम मित्र ड्यूक ख्रिस्टोफर (जर्मन राजपुत्र) यांच्यासह फेब्रुवारी अखेर (१५७४) मेस्ट्रिक्टपासून चार मैलांचे अंतरावर म्यूज नदीचें कांठीं येऊन पोंचला. हिंवाळ्यामुळें त्या नदीचें पाणी गोठलें होतें. तथापि तें दगडासारखें कठीण न बनल्या कारणानें त्यावरून सैन्य जाण्यासारखें नव्हतें. तेव्हां नदी ओलांडण्यास काय करावें याचा विचार करण्यांत त्यानें चार-पांच दिवस घालविले. तोंपर्यंत रिक्वेसेन्सच्या हुकुमावरून त्याला अडविण्याकरितां निघालेला स्पॅनिश सेनापति मेंडोझा हा मेस्ट्रिक्ट शहरांत येऊन पोंचला. हें वर्तमान लुईला कळतांच त्यानें मेस्ट्रिक्ट शहर जिंकण्याची कल्पना सोडून दिली व वुइल्यमला जाऊन मिळण्यास्तव कोठें तरी म्यूज नदी ओलांडण्याच्या हेतूनें तो एखादें सुरक्षित ठिकाण पाहत होता. लुईचें सैन्य मेंडोझाच्या सैन्याहून अनेकपटीनें जास्त होतें. अर्थात् त्याच्या एकट्याच्या हातून लुईचा पराभव होणें शक्य नव्हतें. मेंडोझास न जुमानतां अथवा त्यांस झुकांडी देऊन जर तो वुइल्यमला जाऊन मिळाला तर हॉलंडांतून आपलें समूळ उच्चाटन होईल असें रिक्वेसेन्सला भय वाटत होतें. म्हणून त्यानें लेडनचा वेढा उठवून त्यांत गुंतलेलें व इतर ठिकाणचें सैन्य एकत्र करून त्याचे दोन विभाग केले व ते सँचू द अव्हिला व मॉड्रेगॉन यांच्या हाताखालीं

*ह्या ठिकाणीं वुइल्यम सहा हजार सैन्य जमवून त्याची वाट पहात बसला होता.

देऊन त्यास मेंडोझाच्या मदतीस पाठविलें. लुई वरीलप्रमाणें एका जागेवरून दुसऱ्या जागेवर हिंडत असतांना हे स्पॅनिश सेनापति नवीन सैन्यासह मेंडोझास येऊन मिळाल्यामुळें मेंडोझानें एका रात्रीं थोडयाशा सैन्यासह धाडसानें नदी ओलांडून लुईच्या छावणीवर छापा घालून त्याचे सातशें लोक कापले! तथापि या छाप्यास न जुमानतां लुईनें मोठ्या युक्तीनें तेथून आपलें सैन्य काढून दुसऱ्या ठिकाणीं नेलें. इतक्यांत सँचू द अॅव्हिला हाही आपल्या सैन्यासह त्याच्या दुसऱ्या बगलेस येऊन पोंचला. म्यूज व वॉल ह्या दोन नद्यांच्या दरम्यानच्या अरुंद पट्टयांत, दोन्ही बाजूनें दोन बऱ्याच मोठ्या स्पॅनिश सैन्याच्या कैचीत सांपडल्यामुळें लुईला युद्ध करण्यावांचून गत्यंतर नव्हतें. म्हणून म्यूज नदीच्या कांठावरील 'मूक' नांवाच्या खेडयाजवळ त्यानें लढाईची तयारी केली. त्याचे सैनिक लढण्यास कांकूं करीत होते. परंतु त्यानें अनेक रीतीनें त्यांची समजूत करून त्यांस लढण्यास तयार केलें. नंतर त्यानें आपल्या सैन्याभोंवतीं एक मोठा खंदक खणून आपल्या रक्षणाची सोय केली. तारीख १४ एप्रिल रोजीं सँचूनें लढाईस प्रारंभ केला. पहाटेच्या वेळेपासून लुईचा खंदक सर करण्याकरितां स्पॅनिश सैन्यानें किरकोळ चकमकी सुरू केल्या. त्या सकाळीं दहा वाजेपर्यंत चालू होत्या. सँचूपेक्षां लुईचें घोडदळ जास्त असल्यामुळें सँचू सर्व बाजूनें एकदम हल्ला करण्यास कचरत होता. त्याला आणखी मदत येऊन पोंचणार होती. ती येईपर्यंत फक्त खंदकावर मारा करण्याचें काम त्यानें चालू ठेविलें. परंतु त्याचें हें धोरण लुईला पथ्यकर नसल्यामुळें त्यानें दहा वाजण्याचे सुमारास आपल्या सर्व सैन्यास शत्रूवर एकदम हल्ला करण्याचा हुकूम सोडला. इतक्यांत हेर्जेस व चेवरेक्स नांवाचे दोन दुय्यम सेनापति सुमारें एक हजार घोडदळ घेऊन सँचूला येऊन मिळाले व आणखी पांच हजार सैन्य घेऊन व्हाल्डेझ दुसऱ्या दिवशीं सकाळीं येऊन पोंचणार असल्याचा निरोप त्यांनीं त्यास कळविला. तेव्हां सँचूनें लुईच्या हल्ल्याचा प्रतिकार करण्यास सुरवात केली. थोड्याच वेळांत त्याच्या सैन्यानें गर्दी करून लुईचा खंदक सर केला व तें मूक शहरांत शिरलें. पण लुईनें आपल्या अग्रभागींच्या सैन्यास आणखी मदत पाठवून स्पॅनिश सैन्यास पिछेहाट करावयास लावून पुन्हा आपला खंदक आपल्या ताब्यांत घेतला. स्पॅनिश सैन्यानें पुन्हा त्या खंदकावर हल्ला केला व निकराची लढाई करून तो पुन्हा सर केला. या झटापटींत लुईच्या पायदळ सैन्याचा बराच फडशा उडाला व तें नामोहरम होऊन पळत सुटलें. तेव्हां

लुईनें घोडदळास पुढें होण्याची आज्ञा केली. ह्या घोडदळानें स्पॅनिश घोडदळावर हल्ला करून पहिल्या सपाट्यासरशीं त्याची बिनी उध्वस्त करून टाकली व इतरांस 'दे माय धरणी ठाय' करून सोडलें ! तेव्हां पळतां पळतां भुई थोडी होऊन त्यांतील बहुतेक घोडेस्वार जवळच्या नदींत बुडून मेले व बाकीचे पळून गेले ! ह्या विजयानंतर लुईच्या घोडदळानें थोडासा विसावा घेतला व तें फिरून युद्धास तयार होतें तोंच ह्या पराजयामुळें चिडलेल्या सँचूनें आपले भालाईत व संगिनी-वाले लोक त्यांच्यावर सोडले. तेव्हां उभयपक्षाची एक प्रहरभर त्वेषानें हातघाईची लढाई झाली व त्यांत लुईच्या सैन्याची अतिशय खराबी होऊन त्याचा पुरा मोड झाला. इतकें झालें तरी लुई घाबरला नाहीं. पण त्याच्या सैनिकांनीं दम सोडल्यामुळें त्याची स्थिति अत्यंत नाजूक झाली ! ते त्याच्या हुकुमाप्रमाणें वागेनात. तेव्हां कांहीं निवडक व आज्ञाधारक लोक बरोबर घेऊन लुई स्वतः आपला भाऊ हेनरी व मित्र ख्रिस्तोफर (ड्यूक) यांसह युद्धाच्या धुमश्चक्रींत शिरला व कांहीं काल स्पॅनिश सैन्याशीं निकरानें लढला. पण स्पॅनिश सैन्यास वारंवार नवीन ताज्या दमाची मदत मिळाल्यामुळें व त्याचें सैन्य कमी कमी होत गेल्यामुळें त्यास यश मिळणें बहुतेक अशक्य झालें होतें; तथापि लुई हा उत्साही, तापट, करारी व शूरवीर असल्याकारणानें यशापयशाची परवा न बाळगतां एकसारखा लढत होता. अखेर स्पॅनिश सैन्याशीं हातघाई चालू असतां तो, त्याचा भाऊ व मित्र हे तिघेही त्यांत सामील होऊन एकाएकीं दिसेनासे झाले ! पानपतच्या लढाईंत सदाशिवरावभाऊ व विश्वासराव यांची जी स्थिति झाली तीच ह्या तिघां शूर योद्ध्यांची झाली ! त्यांचीं शवेंही कोणास न ओळखतां आल्यामुळें सांपडलीं नाहींत ! अशा शोचनीय रीतीनें व इतक्या लवकर लुईसारख्या उदार, शूर व जाज्वल्य देशभक्ताचा अंत व्हावा हा दैवदुर्विलासाचा अत्यंत निर्घृण प्रकार होय !* त्याच्या मृत्यूमुळें वुइल्यमचा उजवा हात जाऊन नेदर्लंडची मोठीच हानि झाली !

बोमेल येथें आपल्या बंधूची वाट पहात बसलेल्या वुइल्यमला मूकच्या लढाईचें वृत्त समजलें; परंतु आपल्या बंधूंच्या व मित्राच्या मृत्यूची बातमी त्यास बरेच

---

* इंग्रज ग्रंथकार जॅक कॉलिंगज स्कायर यानें लुईच्या मृत्यूसंबंधाचा उल्लेख करितांना त्यास 'The mirror of Christian chivalry, the undaunted and high of heart' वगैरे अगदीं योग्य विशेषणें दिलीं आहेत.

दिवस कळली नाहीं. यामुळें लढाई संपली तरी तो लुईस त्याचा समाचार व त्याची भावी योजना कळविण्याविषयीं पत्रें पाठवीतच होता! पण लढाईचा निकाल होऊन एक आठवडा होऊन गेला तरीही जेव्हां त्याच्या पत्रास उत्तर मिळेना तेव्हां त्याची वृत्ति साशंक होऊन, ता. २१ एप्रिल रोजीं त्यानें पुढील मजकुराचे पत्रासह एका खास दूतास लुईच्या समाचारास पाठविलें:—

"बंधूनों चालू महिन्याच्या दहाव्या तारखेपासून अठरा तारखेपर्यंत तुम्हांस पाठविलेल्या सातही पत्रांचें उत्तर न आल्यामुळें मी मोठ्या चिंतेंत आहें. तुम्हां-कडून जरी कांहीं बातमी नाहीं तरी फ्रेंच सैन्य कोलोनला येऊन पोंचल्यामुळें मी हा मनुष्य तुम्हांकडे मुद्दाम पाठवीत आहे. माझें अठराव्या तारखेचें पत्र तुम्हांस पोंचलें कीं नाहीं कोण जाणें; त्यांत काय होतें हें हा मनुष्य सांगेल. कृपा करून तुम्ही कोठें आहां व काय करीत आहां हें अवश्य कळवा, कारण मला तुम्हांविषयीं फार काळजी वाटत आहे."

हें पत्र ज्याच्या नजरेस पडावें म्हणून लिहिलें होतें त्याचे डोळे ईश्वरी इच्छेनें केव्हांच झांकले होते! यास्तव वुइल्यमला त्याचें उत्तर मिळूं शकलें नाहीं. तेव्हां त्यानें आपला जर्मनींतील भाऊ काऊंट–जॉन् ह्यास आपल्या बंधूंची व ख्रिस्तोफरची कांहीं बातमी समजली कीं काय, म्हणून पत्रानें विचारलें. हें पत्र लिहिण्याचे वेळीं, वरील तीन शूर पुरुष बहुधा मेले असावेत अशी त्याची भावना झाली होती आणि त्यामुळें सदर पत्रात त्यानें त्यांच्याबद्दल शोकाचे, उद्वेगाचे व भावी स्थितीबद्दल अंशतः निराशेचे उद्गार काढलेले आहेत! पण त्याची ही निराशा क्षणिक होती आणि त्यायोगानें त्याचें धैर्य खचलें नव्हतें हें त्याच वेळीं त्यानें जॉनला लिहिलेल्या पुढील पत्रावरून कळून येईल:—

"एकट्यानें टिकाव धरणें कठीण आहे. पण मीं तुम्हांस पूर्वी काय सांगितलें आहे त्याची आठवण असूं द्या. दोन वर्षेपर्यंत स्वतःच्या जोरावर हा देश स्पॅनिश सैन्याशीं टक्कर देऊं शकेल पण त्यानंतर परराष्ट्रांची मदत अवश्य होईल. परमेश्वरी योजनेनें कांहीं अकल्पित गोष्टी घडून आल्या तर गोष्ट निराळी; पण मी त्यावर नजर न देतां मानवी योजनेचा विचार करूनच लिहीत आहे. हीं दोन* वर्षे संपत आलीं असल्यामुळें आतां कोणातरी परकीय राजाची मदत मिळविणें जरूर आहे. असें जरी आहे तरी जर आम्हास कोणाची मदत मिळाली नाहीं व त्यामुळें

* हॉलंडचीं राज्यसूत्रें त्याच्या हातीं आल्यानंतरची ही कालगणना आहे.

आमचा पाडाव होण्याचा प्रसंग आला तरी ईश्वरावर भार ठेवून आम्ही त्या प्रसंगास तयार होऊं आणि दुर्दैवानें आमचा नाश झाला तर, निदान कोणाच्याही मदतीशिवाय एवढ्याशा छोट्या भूप्रदेशाच्या आश्रयानें स्पॅनिश लोकांसारख्या बलाढ्य शत्रूशीं आत्मरक्षणार्थ अखेरपर्यंत टक्कर देण्याचें जगांतील कोणत्याही राष्ट्राच्या हातून आजपर्यंत न झालेलें महत्कृत्य करण्याचा मान संपादन केल्यावांचून आम्ही राहणार नाहीं. आतां ह्या देशांतील निराश्रित गरीब प्रजेविषयीं म्हणाल तर तिनें जसा आजपर्यंत टिकाव धरला तसाच ती पुढेंही धरील. परमेश्वराच्या मनांत त्यांचा नायनाट करावयाचा असेल तर गोष्ट निराळी; एरवीं स्पॅनिश लोकांच्या हातून त्यांचा नाश होण्यापूर्वी त्यांस मनुष्यें व द्रव्य यांच्या रूपानें निम्मा स्पेन देश खर्चीं घालावा लागेल!" वगैरे.

लुईच्या मृत्यूनंतर थोड्याच दिवसांनीं लिहिलेलें हें पत्र वुइल्यमची कर्तव्यदक्षता, कार्यनिष्ठा व धैर्य यांची उत्तम साक्ष पटविणारें आहे. सत्कार्यावर निष्ठा ठेवून जो कसल्याही आपत्तींत कर्तव्यपराङ्मुख होत नाहीं, त्यास कालेंकरून दैवही अनुकूल होतें व परमेश्वरही त्यास मदत करतो असा सामान्य नियम आहे. त्याचा वुइल्यमला लवकरच अनुभव आला. तो असा:—'मूक'ची लढाई झाल्यानंतर लुईचें उरलेलें सैन्य कोलोनकडे निघून गेलें व स्पॅनिश सैन्यांत त्यांचा पगार थकलेला असल्यामुळें बंड* उद्भवलें! ह्या सैन्यांतील लोकांनीं आपलीं बायकापोरें बरोबर आणलीं होतीं. त्यांना बरेच दिवस पगार न मिळाल्यामुळें ह्या सर्वांची उपासमार होऊं लागली. त्यांनीं आपल्या अधिकाऱ्यांजवळ पगाराची मागणी केली; पण ती व्यर्थ गेली; तेव्हां त्यांनीं सरकारी अधिकाऱ्यांस बडतर्फ करून आपणांपैकींच एकजण मुख्य अधिकारी (इलेटो) नेमला व त्याच्या मदतीस एक सल्लागार मंडळ देऊन त्यांच्या विद्यमानें आपल्या लष्करचा कारभार चालू केला. त्यानंतर त्यांनीं म्यूज

* स्पेनचा लष्करी खर्च अवाढव्य वाढल्यामुळें आल्व्हाच्या कारकिर्दीपासून त्यांच्या सैन्याचे पगार थकूं लागले होते. आल्व्हानें जातांना अशाच प्रकारचें एक बंड मोडलें असल्याचा उल्लेख मागें आलाच आहे. त्यानंतर ह्या सैन्यांत असे प्रसंग वारंवार येऊं लागले. पगाराकरितां बंड करण्याचा शिरस्ता वुइल्यमच्या व लुईच्या भाडोत्री सैन्यांतही पडलेला होता; मात्र हे लोक लढाई होण्याच्या सुमारास बंड करीत व स्पॅनिश शिपाई लढाईनंतर बंड करून मिळालेला जय निरुपयोगी करून टाकीत; एवढाच उभयतांत फरक होता!

नदी ओलांडून अँटवर्प शहर गांठलें व तेथील लोकांपासून धान्य, खाण्यापिण्याचे उत्तम पदार्थ, उत्तम कपडालत्ता व दारू हीं जबरदस्तीनें उकळण्यास सुरुवात केली. अँटवर्पच्या गव्हर्नरानें त्यांचा बंदोबस्त करण्याकरितां रिकेसेन्स यास तावडतोब बोलावल्यावरून तो तेथें गेला; परंतु आपल्याच सैन्यावर शस्त्र उगारून आपली बाजू कमकुवत करून हॉलंडच्या देशभक्तांस त्या गोष्टीचा फायदा घेऊं देण्यास तो तयार नव्हता. त्यानें शिपायांचा पगार भागविण्याकरितां अँटवर्पच्या स्थानिक अधिकाऱ्यांजवळ चार लक्ष क्रौन कर्ज मागितलें, तें मोठ्या कष्टानें त्यांनीं दिलें. तो पैसा शिपायांस वाटून रिकेसेन्स यानें त्यांस संतुष्ट केलें. हा पैसा व त्यापूर्वी गांवांतील लोकांकडून उकळलेली लूट हीं पदरांत पडतांच हे शिपाई आनंदोत्सवाच्या भरांत 'फ्रेस द मीर' नामक इतिहासप्रसिद्ध मैदानांत जमा होऊन मेजवानींत व ख्यालीखुशालींत दंग झाले! दारू पिऊन ते अगदीं ऐन रंगांत येतात तोंच शेल्ड्ट नदीच्या मुखांतून तोफांच्या सरबत्तीचा निर्घृण आवाज त्यांचे कानीं पडला! वुइल्यमचा आरमारी सेनापति ॲडमिरल वुझो–ज्यानें मिड्लबर्ग-नजीक रोमेरोच्या हाताखालील स्पॅनिश आरमाराचा नुकताच पराभव केला होता तो–ह्यानें रोमेरोवर मिळविलेल्या विजयाच्या भरांत अँटवर्प बंदरांतील स्पॅनिश आरमारावर अचानकपणें झडप घातली. ह्या आरमारांत एकंदर बावीस लढाऊ जहाजें असून त्यांवर ॲडमिरल हेमस्टेड या नांवाचा मुख्य अधिकारी होता. वुझोनें त्या आरमारावर एकदम तोफांचा भडिमार सुरू करून हेमस्टेड यास लढाई करण्यास भाग पाडलें. त्या अनपेक्षित लढाईंत बुझोनें चौदा स्पॅनिश जहाजांचा नाश केला व अखेर हेमस्टेड हाही जखमी होऊन त्याच्या हातीं लागला! ह्या आरमारी विजयानें 'मूक'च्या लढाईचें अपयश धुवून काढलें हें पाहून हॉलंड व झीलंडच्या लोकांच्या व इतर प्रांतातल्या देशभक्तांच्या अंगांत स्पेनशीं टक्कर देण्याचें फिरून स्फुरण चढलें! याप्रमाणें 'मूक' येथें स्पॅनिश सैन्यानें मिळविलेला विजय त्यांच्या बंडखोरपणामुळें निष्फळ होऊन शिवाय बुझोनें त्याचा वचपा काढलेला पाहून रिकेसेन्स याची मती क्षणभर स्तिमित झाली! तेव्हां आपल्या सैन्याची पुन्हा नीट घडी बसविण्यास अवसर मिळावा म्हणून त्यानें वुइल्यमशीं तडजोडीचें बोलणें सुरू करण्याकरितां आपला वकील त्याच्याकडे पाठविला. वुइल्यमनें त्यास आपली मुलाखत घेऊं दिली, पण त्यापासून फारशी कांहीं निष्पत्ति झाली नाहीं हें पाहून ग्रँड कमांडर रिकेसेन्स यानें पुन्हा लेडन शहरास वेढा घालून वुइल्यम व

त्याचे अनुयायी यांस वठणीवर आणण्याचा प्रयत्न सुरू केला. परंतु केवळ दंड-नीतीच्या जोरावर हें कार्य सिद्धीस नेण्याचा त्याचा मानस नसून त्यानें भेद-नीतीचा अवलंब करण्याचाही संकल्प केला व त्यास अनुसरून ता. २१ मे १५७४ रोजीं व्हाल्डेझकडून लेडनला वेढा दिल्यावर ता. ६ जून रोजीं आपलें पूर्वसंकल्पित सौम्यपणाचें धोरण अंमलांत आणण्याचा आविर्भाव आणून एक माफीचा जाहीरनामा प्रसिद्ध केला. त्या जाहीरनाम्यान्वयें, जे लोक आपल्या पूर्वीच्या गुन्ह्याबद्दल पश्चात्ताप व्यक्त करून पुन्हा रोमन कॅथोलिक मताची दीक्षा घेतील त्यांना पूर्वीचे सर्व गुन्हे माफ होणार होते. ह्या माफीच्या आमिषाला कांहीं लोक बळी पडतात कीं काय, अशी वुइल्यमला कांहीं वेळ भीति वाटली पण ती निराधार ठरली. हॉलंड व झीलंडच्या लोकांनीं तर तिचा पूर्ण धिःकार केला. त्यांनीं सात वर्षेंपर्यंत नाना तऱ्हेच्या आपत्ति भोगून जो झगडा चालविला होता–व ज्यांत त्यांनीं स्पॅनिश सत्तेचा अर्धाअधिक नकशा उतरला होता–तो कांहीं असल्या भ्रामक माफीस भाळण्याकरितां चालविला नव्हता. त्यांनीं वुइल्यमला असें स्पष्ट कळविलें कीं, “जोंपर्यंत ह्या देशांत एक तरी मनुष्य जिवंत आहे तोंपर्यंत आम्ही आमच्या स्वातंत्र्याकरितां एकसारखे लढत राहूं.” इतका निर्धार ज्या लोकांचा असेल त्यांना कोणत्या जुलमी राजाची तरवार भीतिवश करूं शकेल अथवा जिंकील? स्वतंत्रतेचे हे लाडके व आर्त भक्त प्रसंगीं कितीही अडचणी भोगाव्या लागल्या व कष्ट अथवा हाल सोसावे लागले तरी अखेरपर्यंत तिची आराधना करून तिच्या गळ्यांतले ताईत बनल्याखेरीज राहात नाहींत हें इतिहासानें अनेक वेळां सिद्ध केलेलें आहे. हॉलंडच्या लोकांसही पुढें ह्याच अनुभव आलेला आहे. असो; आतां लेडनच्या वेढ्याकडे वळूं.

अतिमानुष सहनशक्ति, शौर्य व धैर्य यांच्या प्रदर्शनामुळें जगांत प्रसिद्धी पावलेलें हें लेडन शहर हॉलंडच्या मध्यभागी ऱ्हाईन नदीच्या मुखाजवळ परंतु समुद्रापासून पंधरा मैल आंत जमिनीवर होतें. तथापि त्याच्या आजूबाजूस खाडीचें व ओहोळांचें पाणी असून त्यापासून शहराभोंवतालच्या प्रदेशाचें रक्षण करण्या-करितां मोठमोठे धक्के ( डॉक्स ) बांधलेले होते. त्या शहराची रचना मनोरम असून तेथील लोक शांतताप्रिय व उद्योगी होते. व्यापाराचें तें एक महत्त्वाचें ठिकाण असल्यामुळें सांपत्तिकदृष्ट्या तें चांगलें भरभराटींत होतें. तेथील घरें बळकट व शोभिवंत असून रस्ते सफाईदार व नाले स्वच्छ होते. शहराच्या भोंवतीं

व मध्यभागीं एका जमिनीच्या उंचवट्यावर सुंदर झाडी असून त्याच उंचवट्याच्या मध्यावर एक मोठा थोरला उंच बुरूज होता. ह्या ठिकाणीं शहराच्या मुख्य अधिकाऱ्याची ( बर्गोमास्टर ऊर्फ मॅजिस्ट्रेट ) कचेरी व सार्वजनिक क्रीडोद्यान होतें. तेथें शहरांतील लोक रिकाम्या वेळीं येऊन आपली करमणूक करीत असत. अशा ह्या शहरांत, बाह्योपाधी कांहीं नसल्यास लोकांचा आयुष्यक्रम सुखानें चालावयाचा; परंतु प्रस्तुत वेढ्यामुळें तेथील सर्व लोक चिंताग्रस्त होऊन आपल्या संरक्षणाकरितां शहराच्या तटबंदीची दुरुस्ती करण्यांत निमग्न झालेले होते. तेथील पहिला वेढा उठला त्याचवेळीं ही दुरुस्ती करण्याची सूचना वुइल्यमनें त्यांस केली होती; परंतु लुईचा विजय होऊन लवकरच स्पॅनिश सैन्याची हॉलंडमधून उचलबांगडी होईल अशा समजुतीनें त्यांनीं त्याकडे लक्ष देण्यास हयगय केली त्यामुळें आतां त्यांची मोठी त्रेधा उडून गेली होती ! तथापि ते तें दुरुस्तीचें काम मोठ्या नेटानें व उत्साहानें करीत होते. वुइल्यमनें त्यास " तीन महिनेपर्यंत टिकाव धरा; तोंपर्यंत तुमची सुटका करण्याची तजवीज करतों." असा निरोप पाठविला होता व तसें करण्याचें त्यांनीं कबूल केलें होतें.

वेढा घालणारा मुख्य सेनापति व्हाल्डेझ हा असून त्याच्या हाताखालीं कसलेले निष्णात असें आठ हजार स्पॅनिश सैन्य होतें. ह्या लोकांनीं लेडनपासून सुमारें पांच मैलांचा टापू व्यापलेला होता. त्या टापूंत बरींच खेडीं होतीं व सुमारें साठ भुईकोट किल्ले होते, त्यांच्या आसऱ्यानें स्पॅनिश सैन्यानें वेढ्याचें काम चालविलें होतें. लेडनपासून सुमारें एक मैलावर असलेल्या लेडरड्रॉप खेड्यांत व्हाल्डेझचें स्वतःचें ठाणें होतें व तेथून एक मैलावर असलेल्या लामेन खेड्यांत त्याचा दुय्यम कर्नल बोर्गिया याचें ठाणें होतें. शहरांतील लोकांत लढवय्ये व इतर मिळून सुमारें अडीच हजार लोक शहररक्षणाच्या कामावर होते. केवळ लष्करी पेशाचे असे त्यांत एक हजार सुद्धां लोक नव्हते; तथापि ह्या लोकांचा उत्साह व देशाभिमान जाज्वल्य होता. 'मारूं किंवा मरूं, पण हार जाणार नाहीं' अशा भावनेनें ते प्रेरित झालेले होते.

वुइल्यम दि सायलेंट याचें ठाणें डेल्फ्ट व रॉटरडॅम ह्या दोन ठिकाणीं होतें. ह्या दोन शहरांच्या दरम्यान पोल्डरवर्ट नांवाचा एक किल्ला असून तो वुइल्यमच्या ताब्यांत होता. ह्या किल्ल्याजवळ म्यूज व येसेल नद्यांचीं मुखें असून त्यावर बांधलेले धक्के वुइल्यमच्या स्वाधीन होते. हे धक्के फोडून समुद्राचें पाणी आंत लेडनपर्यंत नेऊन पोंचविल्यास स्पॅनिश सैन्यास वेढा उठवून जाणें भाग होतें; आणि

तसेंच करण्याचा वुइल्यमचा बेत होता. स्पॅनिश सेनापतीस हें व्यंग ठाऊक असल्यामुळें त्यांनीं ता. २९ जून १५७४ रोजीं पोल्डरवर्ट किल्ल्यावर तोफांचा भडिमार करून तो सर करण्याचा प्रयत्न केला. परंतु त्यांत त्यांचा पराभव झाल्यामुळें तो किल्ला अखेरपर्यंत वुइल्यमच्याच हातीं राहिला. ह्या चकमकीनंतर म्यूज व येसेल ह्या नद्यांच्या मुखांवरील धक्के व रॉटरडॅम, शिडॅम आणि डेल्फ्टशेव्हन येथील मोठे बंधारे फोडून समुद्राचें पाणी आंत घेण्याचा वुइल्यमनें निश्चय केला. परंतु ह्या कृत्यांमुळें हॉलंडांतील बऱ्याच गांवांतील पिकें व खेडींपाडीं यांचें भयंकर नुकसान होणार असल्यामुळें तेथील लोकसभेची त्या कृत्यास संमति मिळविणें जरूर होतें. म्हणून त्यानें त्या सभेची एक बैठक भरवून तिच्या सभासदांपुढें, त्यांना प्रचलित स्थितीची बरोबर कल्पना करून देणारें एक उत्कृष्ट भाषण केलें. व त्यांच्यापुढें लेडनच्या सुटकेप्रीत्यर्थ स्वतः आंखलेली योजना विचाराकरितां मांडली. तिच्या गुणावगुणांबद्दल थोडीशी भवति न भवति झाल्यावर सर्व सभासदांनीं एकमतानें "Better a drowned land than a lost land" (गमावलेल्या जमिनीपेक्षां बुडालेली जमीन बरी) असे उद्गार काढून ती योजना पसंत ठरविली व ती अंमलांत आणण्याकरितां लागणाऱ्या खर्चाची मंजुरी देऊन त्यापासून होणारें नुकसान लोकांस भरून देण्याकरितां त्यांनीं एक फंड उभारण्याचें ठरविलें. मध्यंतरीं व्हाल्डेझ् यानें लेडनच्या लोकांस भरपूर माफी देण्याची आशा दाखवून शहर आपल्या स्वाधीन करून घेण्याची पुष्कळ खटपट केली; परंतु शहरांतील लोकांनीं प्रत्येक प्रसंगीं त्याचें बोलणें फेटाळून देऊन त्याची निराशा केली. धक्के फोडून समुद्राचें पाणी आंत घेण्याची वुइल्यमची योजना त्यांना अद्याप समजली नव्हती व त्यांची अन्नसामुग्रीही संपत आली होती. तथापि अशा स्थितींतही शत्रूच्या गोड बोलण्यावर विश्वास ठेवण्यापेक्षां वुइल्यमच्या कर्तृत्वावरच अवलंबून राहणें त्यांस जास्त श्रेयस्कर वाटलें. आपल्या पुरस्कर्त्यावर त्यांनीं ठेवलेला हा विश्वास गैर नव्हता; त्यास वुइल्यम सर्वस्वीं पात्र होता असेंच त्याच्या पुढील कृतींवरून दिसून येईल.

हॉलंडच्या लोकसभेची आपल्या योजनेस संमति मिळविल्यानंतर (जुलईचा मध्य) वुइल्यमनें म्यूज व येसेल यांच्या मुखानजिकचे धक्के व शेडॅम आणि रॉटरडॅम येथील बंधारे फोडण्याचें काम सुरू केलें. तीन ऑगस्टच्या सुमारास तो स्वतः तें काम पाहण्याकरितां गेला. तोंपर्यंत उपरोक्त धक्के सोळा ठिकाणीं फोडण्यांत येऊन

वरील दोन बंधारे फोडण्याचें कामही संपत आलें होतें आणि त्यांतून समुद्राचें पाणी आंतील जमिनीवर येऊं लागलें होतें. पाणी येऊन आपलें काम करीपर्यंत त्यानें आसपासच्या शहरांतून पुष्कळ अन्नसामुग्री व ती लेडनला वाहून नेण्याकरितां सुमारें दोनशें जहाजें जमा करविलीं. तोंपर्यंत समुद्राचें पाणी मंदगतीनें चढत चढत लेडनपासून पांच मैलांच्या अंतरावर असलेल्या 'लँड-शिल्डींग' नामक भूप्रदेशावर येऊन पोंचलें. इतकें होईपर्यंत तिकडे लेडनच्या लोकांची अन्नसामुग्री संपून त्यांची उपासमार होऊं लागली होती. ता. २१ ऑगस्ट रोजीं त्यांनीं वुइल्यमला तीन महिने टिकाव धरण्याचें दिलेलें वचन पुरें झालें, तरीही त्यांची सुटका होण्याचा कांहींच रंग जेव्हां त्यास दिसेना, तेव्हां त्यांनीं हताश होऊन वुइल्यमला आपली स्थिति पत्रद्वारें कळविली. त्यानें तत्काळ कबुतरामार्फत त्यांस चिठी पाठवून धक्के फोडून पाणी आंत सोडल्याचें वर्तमान कळविलें व आणखी कांहीं काल असाच टिकाव धरण्याची त्यांस विनंति केली. वुइल्यमनें त्यांना जेव्हां हा निरोप पाठविला तेव्हां तो रॉटरडॅम शहरीं दोषी तापानें अत्यवस्थ होता; पण त्यांचा धीर सुटेल म्हणून ही गोष्ट त्यानें त्यांस कळविली नाहीं. धक्के फोडण्याच्या कामाची देखरेख करण्यानें झालेले श्रम, दलदलीची हवा आणि मानसिक चिंता ह्या सर्व कारणसमुच्चयामुळें त्यास हा ताप आलेला होता. पण तो अगदीं अवेळीं आला. लेडनची सुटका झाल्यावर तो येता तर वुइल्यमला त्याचें कांहीं वाटलें नसतें; परंतु तें कार्य चालू असतां मध्यंतरीं हें विघ्न उद्भवल्यामुळें आतां लेडनची सुटका होते कीं नाहीं कोण जाणे, असा विचार मनांत येऊन त्याचें चित्त बावरूं लागलें व त्यासरशीं त्याचा तापही वाढूं लागला. अखेर त्यास वायू झाला! परंतु ईश्वरीकृपेमुळें त्याचा भलताच परिणाम झाला नाहीं. रॉटरडॅमचे उत्तम डॉक्टर त्याला औषधोपचार करीत असून त्याचा विश्वासू खासगी कारभारी ब्रूनॅक व कांहीं मायाळू नोकर हे अत्यंत काळजीपूर्वक त्याची सुश्रूषा करीत होते. ब्रूनॅक रोजच्या रोज त्याची खबर त्याचा भाऊ जॉन यास पत्रानें कळवीत होता. कांहीं दिवसांनीं तापाचा जोर कमी झाला; पण वायू झाला असतांना त्याच्या डॉक्टरांनीं त्याच्या अंगांतून वारंवार रक्त काढल्यामुळें त्यास विलक्षण थकवा आला होता. तो इतका कीं, कष्टावांचून त्यास अंथरुणावरून उठतां येत नसे! तथापि लेडनच्या लोकांचें काय होईल, हा विचार सारखा त्याच्या मनाला त्रास देत होता. मनाला त्रास होईल असा कोणताही विचार मनांत आणूं नका; म्हणून

त्याचे डॉक्टर त्यास वारंवार सांगत; पण त्याचा कांहींएक उपयोग होत नसे. एकदां तर त्याला लेडन पडल्याचा भास होऊन त्याचा ताप फिरून वाढला, पण ती गोष्ट खोटी असून लेडन अद्याप टिकाव धरून आहे असें जेव्हां त्यास कांहीं कारणावरून भेटावयास गेलेल्या तिऱ्हाईत इंग्रज गृहस्थानें सांगितलें, तेव्हां त्याचें समाधान होऊन त्या वेळेपासून त्याचा ताप उतरत चालला व तो बरा होण्याच्या मार्गास लागला. ह्या आकस्मिक विघ्नामुळें एक पंधरवडा फुकट गेला.

धक्के फोडून पाणी सोडल्याचा निरोप लेडनच्या रहिवाऱ्यांस पोंचल्यावर ते आनंदांत गर्क झाले होते, पण समुद्राच्या मंदगतीमुळें पाणीही लवकर लेडनच्या नजीक जाईना व वुइल्यमच्या आजारामुळें त्यांच्या सुटकेकरितां जाणाऱ्या आरमाराची तयारीही रेंगाळली. दिवस गेले तरी अद्याप कोणी येत नाहीं व पाणीही आल्याचें दिसत नाहीं असें पाहून लेडनच्या लोकांचा धीर सुटत चालला. त्यांचें अन्न कधींच संपून गेलें होतें आणि घोडे, कुत्रीं व मांजरें यांच्यावर त्यांनीं आपला चरितार्थ चालविला होता. हें अन्नही पोटभर मिळत नव्हतें ! कसा तरी जीव धरून राहण्यापुरतें मिळत होतें ! ह्या घाणेरड्या आणि अपुऱ्या अन्नामुळें त्या शहरांत प्लेगाची साथ उद्भवून रोज शेंकडों माणसें त्यांस बळी पडूं लागलीं होतीं ! मुलांच्या मृत्युसंख्येचें प्रमाण भयंकर वाढलें होतें ! व गर्भवतींचे गर्भपात होऊं लागले होते ! असल्या आपत्तींत सांपडलेल्या मनुष्यांचें धैर्यस्खलन झालें तर त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं; परंतु लेडनचे बहुतेक रहिवाशी ह्या स्थितींतही शत्रूच्या आहारीं जाण्यास तयार नव्हते ! तथापि कांहीं लोक मात्र आतां कुरकूर करून इतरांचा उत्साहभंग करूं लागले होते. त्यांना शहरांतील कांहीं राजपक्षीय लोकांनीं हिणविल्यावरून ते विशेष चिडले व 'कधीं सुटका होणार तें सांगा नाहींतर शहर शत्रूच्या स्वाधीन करून आमचे हाल दूर करा' असा त्यांनीं तेथील बर्गोमास्टरच्या मागें तगादा लावला. ह्या लोकांच्या झुंडीच्या झुंडी रोज त्याच्या कचेरीसमोर जमून त्याला सतावूं लागल्या व तो रस्त्यांतून जात असतां त्यास धाक घालूं लागल्या. तेव्हां एके दिवशीं त्यानें ह्या सर्व असंतुष्ट लोकांस आपल्या कचेरी समोरच्या मोठ्या पटांगणांत जमा होऊं दिलें व नंतर स्वतः त्यांच्या मध्यभागीं येऊन त्यानें त्यांस अनुलक्षून पुढील भाषण केलें:–"माझ्या मित्रानों, तुम्ही काय म्हणतां ? आम्ही आपली शपथ मोडून हें शहर स्पॅनियर्ड लोकांच्या हवालीं करीत नाहीं म्हणून तुम्ही कां कुरकुरतां ? तसें केल्यास सध्यां तुमचे जे हाल होत आहेत त्याहून

जास्त भयंकर रीतीनें तुमचा नाश होणार नाहीं काय ? मी तुम्हांस निक्षून सांगतों कीं, अखेरपर्यंत टिकाव धरण्याची मीं शपथ घेतली आहे व ती पाळण्याचें धैर्य व सामर्थ्य माझ्या अंगीं असावें अशी मी परमेश्वराजवळ नित्य प्रार्थना करीत आहें. मला केव्हां तरी एकदां मरावयाचेंच आहे; मग तें मरण तुमच्या हातानें येवो अथवा शत्रूच्या हातानें येवो, किंवा परमेश्वरी इच्छेनें आपोआप येवो. माझ्या जिवाची मी फिकीर करीत नाहीं; परंतु माझ्या ताब्यांतील शहराविषयीं मात्र मला तसें बेफिकीर होतां येत नाहीं. जर आपली लवकर सुटका झाली नाहीं तर आपण उपाशी मरूं हें मी जाणतों; परंतु अपमानास्पद मृत्यूपेक्षां—शहर शत्रूच्या स्वाधीन केल्यास तोच आमच्या वांट्यास येणार-उपासमारीचा मृत्यू पुष्कळ बरा. तुमच्या धाकानें माझा निश्चय ढळणार नाहीं. माझें जीवित मी तुम्हांस अर्पण करीत आहे; तुम्ही त्याचें काय वाटेल तें करा; अथवा ही माझी तरवार घेऊन माझी छाती फोडा आणि माझें मांस वाटून घ्या. तुमची क्षुधा तृप्त करण्यास्तव माझें शरीर घेऊन चला; पण जोंपर्यंत मी जिवंत आहे तोंपर्यंत शत्रूला शरण जाण्याची अपेक्षा करूं नका."

बर्गोमास्टर, ॲड्रियन व्हान डर वर्फ, याचें हें धिटाईचें, उत्तेजक आणि हृदय-द्रावक भाषण ऐकून स्वतःच्या जिवाचा कसा तरी बचाव करण्यास आतुर झालेल्या खिन्न व असंतुष्ट लोकांस आपल्या वर्तनाची लाज वाटली व तेही आलेल्या संकटास धैर्यानें तोंड देण्यास तयार झाले! व्हान डर वर्फसारखे एकनिष्ठ निग्रही आणि मानी देशभक्त जेथें नेते असतील, तेथें कितीही संकटें आलीं तरी कार्य-नाश होण्याचा बहुतेक संभव नसतोच; कारण अशा पुरुषांना अखेर दीनवत्सल प्रभू बहुधा यश देतोच आणि प्रस्तुत प्रसंगीं हाच अनुभव आलेला आहे.

वुइल्यमच्या आजारामुळें लेडनला मदत पोंचविण्याचें काम जें ढिलें पडलें होतें तें त्यास अंमळ बरें वाटूं लागतांच नेटानें चालीस लागलें. त्याचा प्रख्यात् व शूर ॲडमिरल बुझो हा पूर्वी सांगितलेलीं दोनशें जहाजें व हजार उत्तम धाडसी आणि शूर झीलंडचे खलाशी बरोबर घेऊन, वुइल्यमच्या आज्ञेवरून झपाट्यानें लँड-शिल्डिंगनजीक येऊन पोंचला होता. तेथें आल्यावर मात्र त्याची गति कुंठित झाली. कारण वारा प्रतिकूल असल्यामुळें लँड-शिल्डिंगच्या पृष्ठभागावर समुद्राचें पाणी चढेना. तेव्हां सुमारें आठवडाभर त्यास तेथेंच कुचमत पडावें लागलें. ह्या अवधींत वुइल्यम हिंडूं फिरूं लागल्यामुळें डॉक्टरच्या सल्लयास धाब्यावर बसवून बुझोच्या आरमारांत येऊन

दाखल झाला. तोंपर्यंत बुझोनें लॅंड-शिलिंडगवर असलेल्या स्पॅनिश पहारेकऱ्यांच्या तुकडीचा धुव्वा उडवून तें ठिकाण आपल्या कबजांत घेतलें होतें. बुइल्यमनें तेथून आसपासच्या प्रदेशाची बारीक टेहळणी केली तेव्हां त्यास असें आढळून आलें कीं, लॅंड-शिलिंडगच्या पलीकडे एकामागें एक असे अनेक धक्के व भुईकोट किल्ले असून, हे धक्के फोडून किल्ले सर केल्याशिवाय पुढें प्रगति होणें शक्य नाही. पूर्वी ह्या स्थानाची त्यानें जी माहिती मिळविली होती त्यांत ह्या एकांत एक असलेल्या धक्क्यांची माहिती नव्हती, म्हणून ते फोडण्याची व्यवस्था त्यानें केली नाहीं. ती करणें आतां भाग होतें. ती करून व पुढील योजनेसंबंधी बुझोशीं खलबत करून तो डेल्फटला परत निघून गेला. बुझोनें आठपंधरा दिवसांत हे धक्के फोडले. पण वारा अनुकूल नसल्यामुळें त्याचीं जहाजें तरंगण्याइतकें पाणी फोडलेल्या भागांत खेळेना; तेव्हां अनुकूल वाऱ्याची वाट पहात त्यास पुन्हा स्वस्थ बसावें लागलें! जों जों त्याला पुढें जाण्यास जास्त काल लागूं लागला, तों तों इकडे शहरांतील लोकांची पांचावर धारण बसूं लागली! त्यांच्यापैकीं कांहीं रोज शहरांतील मध्यभागच्या बुरजावर येऊन पाणी व मदत कोठवर येऊन पोंचली आहे हें पहात असत. लॅंड-शिलिंडग काबीज केल्यावर बुझोनें त्याच्या नजीकच्या एक दोन खेड्यांस आग लावून मोठा थोरला जाळ केला होता तो या लोकांना दिसला. तसेंच तेथील धक्के फोडल्यावर समुद्राचें पाणी नजीकच्या भूमीवर आलेलेंही त्यांनीं पाहिलें; पण ह्या खुणा नजरेस पडून एक आठवडा होऊन गेला तरी देखील जेव्हां पाणीही जास्त चढेना व मदतही येईना तेव्हां त्यांची निराशा होऊन ते अनुकूल वाऱ्याची याचना करीत आकाशाकडे डोळे लावून बसले! अखेर परमेश्वराला त्यांची करुणा आली व त्याच्या कृपेनें पश्चिमेकडील वारा सुटून वादळ उत्पन्न झालें. त्यासरशीं बुझोनें आपलें आरमार वेगानें पुढें चालविलें. परंतु लेडनपासून एक मैलाच्या अंतरावर तें येऊन दाखल होतांच त्यास पुन्हा एक नवीन अडथळा उत्पन्न झाला. किर्क-वे नांवाचा आणखी एक मोठा धक्का त्यांच्या मार्गांत आडवा आला. सबब नॉर्थ आ नांवाच्या खेड्यानजीक त्यास आपलें आरमार थांबवावें लागलें. पुढें वादळ बंद होऊन पश्चिमेकडील वारा बंद झाला; त्यामुळें समुद्राचें पाणी पुन्हा मंदगतीनें चोहोंकडे पसरूं लागल्यानें उथळ झालें. अर्थात् आरमाराची गति फिरून कुंठित झाली! येथेंही एक आठवडा

फुकट गेला. त्या अवधींत ॲडमिरल बुझोही पुढें प्रगति होईना म्हणून निराश झाला होता; मग लेडनमध्यें हाल भोगीत असलेल्या लोकांची सर्वस्वी निराशा झाली असल्यास त्यांत आश्चर्य कसलें? तथापि ते परमेश्वरावर विश्वास ठेवून निमूटपणें हाल सहन करीत होते! पुढें कांहीं दिवसांनीं पुन्हा एक वादळ उद्भवलें; तोंपर्यंत किर्क-वेला बुझोनें जहाजें जाण्यासारखें मोठें भगदाड पाडून ठेविलें होतें. वादळामुळें जहाजें तरंगण्यापुरतें पाणी तेथें खेळूं लागतांच त्यानें आपलीं जहाजें हाकारलीं. पुढें झूटरवुड खेड्यानजिक स्पॅनिश सैन्याची व त्यांची झटापट होऊन त्यांत स्पॅनिश लोकांचा पराभव झाला व त्यांचीं सर्व जहाजेंही बुडविलीं गेलीं. नंतर झूटरवुड व लॅमेन ह्या किल्ल्यानजीक बुझोचें आरमार आलें. हे किल्ले लेडनपासून अनुक्रमें पांचशें व अडीचशें यार्ड लांब होते. झुटरवुड खेड्यांतील स्पॅनिश सैन्याच्या पराभवाची बातमी समजल्यामुळें त्याच नांवाच्या किल्ल्यांतील सैन्य हेगच्या रस्त्यानें पळत सुटलें. त्याचा बुझोच्या लोकांनीं पाठलाग करून त्यांपैकीं सुमारें एक हजार लोक समुद्रांत बुडविले व त्या किल्ल्यास त्यांनीं आग लावून दिली! आणि नंतर लॅमेननजीक येऊन शहरांतील लोकांस आपल्या आगमनाची वर्दी देण्याकरितां त्यांनीं कबुतराबरोबर चिठी पाठविली. ती चिठी तेथील बर्गोमास्टरनें सर्व लोकांस वाचून दाखवितांच जिकडे तिकडे आनंदीआनंद होऊन आनंदसूचक घंटा वाजूं लागल्या! त्यांचा नाद लॅमेनच्या किल्ल्यांतील सैन्याच्या कानीं येऊं लागला व झूटरवुडच्या किल्ल्याला लागलेली आगही त्यांच्या दृष्टीस पडली. तेव्हां ते भांबावून भयभीत झाले व हॉलंड-झीलंड येथील लोकांचें आरमारी युद्धकौशल्य आणि शौर्य जगप्रसिद्ध असल्यानें त्यांच्यापुढें पाण्यावर आपला टिकाव लागणार नाहीं असें वाटून त्या दिवशींच्या मध्यरात्रीं त्यांनीं त्या किल्ल्यांतून गुप्तपणें पोबारा केला. ह्या किल्ल्यावर दुसरे दिवशीं पहाटे बुझोनें भडिमार करण्याचा संकल्प केला होता व तो यशस्वी व्हावा म्हणून शहरांतील लोकांनींही दुसऱ्या बाजूनें त्याच्यावर हल्ला करण्याचा बेत केला होता; परंतु कोणासच कांहीं करण्याचें प्रयोजन उरलें नाहीं. स्पॅनिश सैन्य मुकाट्यानें पोबारा करीत असल्याचा देखावा लॅमेनच्या खेड्यांतील एका तरुण मुलानें पाहिला होता. तो पहाटेस उठून लॅमेन किल्ल्यावर गेला व त्यानें तेथून आपली टोपी हालवून किल्ला रिकामा असल्याची खूण बुझोच्या आरमाराकडे तोंड करून केली. प्रथम बुझोला ही लबाडी आहे कीं काय अशी शंका आली; पण थोड्या वेळानें ती दूर होऊन त्यानें अखेरीस लेडन शहरांत प्रवेश केला व बरोबर आणलेली

अन्नसामुग्री–रोटी वगैरे–तेथील लोकांस वाटून दिलें. पहिल्या दिवशीं ह्या अन्नावर लोकांनीं झडप घालून ज्याला जितकें खावेसें वाटलें तितकें त्यानें खाल्लें. पुष्कळ दिवसांच्या उपासानंतर एकदम हावरेपणानें सडकून अन्न खाल्ल्यामुळें कित्येक लोक हगवणीनें आजारी पडले; पण अशीं उदाहरणें थोडीं होतीं.

याप्रमाणें बहुत प्रयासांतीं एकदांची ह्या शहराची सुटका झाली! ॲडमिरल बुझोनें शहरांत प्रवेश केला त्या दिवशीं आक्टोबरची ३ तारीख असून रविवार होता. त्याचें तेथील बर्गोमास्टरनें आदरपूर्वक स्वागत केल्यानंतर शहरांतील सर्व लोकांची एक मिरवणूक काढून ते तेथील मुख्य देवळांत गेले व परमेश्वरानें त्यांस हा सोन्याचा दिवस दाखवून स्वातंत्र्याप्रीत्यर्थ त्यांनीं चालू केलेल्या झगड्यांत यश दिलें म्हणून त्याची मनःपूर्वक प्रार्थना केली. त्याच दिवशीं तिसऱ्या प्रहरीं वुइल्यमला ह्या शहराच्या सुटकेचें वर्तमान बुझोनें पत्रद्वारें कळविलें. हें पत्र त्याच्या हातीं आलें त्यावेळीं तो डेल्फ्ट येथील देवळांत रविवारानिमित्त चाललेली प्रार्थना ऐकत बसला होता. प्रार्थना आटोपल्यावर त्यानें तें पत्र तेथील मुख्य धर्माध्यक्षाच्या हातीं दिलें व त्यानें तें सर्वांस वाचून दाखविलें. नंतर तेथें जमलेल्या सर्व लोकांनीं लेडनच्या सुटकेबद्दल परमेश्वराचे सानंद आभार मानले.

दुसरे दिवशीं वुइल्यमनें स्वतः लेडन शहरच्या लोकांस भेट देऊन त्यांचें कौतुकपूर्वक अभिनंदन केलें आणि समुद्राचें पाणी आंत घेण्याकरितां फोडलेले धक्के व बंधारे पुन्हा पूर्ववत् दुरुस्त करण्याचें काम सुरू करून तो तेथून निघून गेला. पुढें कांहीं दिवसांनीं ह्या शहरांतील लोकांच्या सोशिकपणाचें व धैर्याचें बक्षीस म्हणून त्यानें हॉलंडच्या लोकसभेकडून त्यांस दरसाल दहा दिवस करांशिवाय आपल्या गांवीं जत्रा भरविण्याची सनद दिली आणि त्यांच्या ह्या शौर्याचें कायमचें स्मारक करण्यास्तव तेथें एका विद्यापीठाची स्थापना केली. हें विद्यापीठ पुढें युरोपांतील नामांकित विद्यापीठांच्या तोडीचें झालें व अद्यापही त्याचें महत्त्व कायम आहे.

लेडनच्या वेढ्यांत तेथील लोकांनीं प्रकट केलेलें धैर्य व साहस आणि सोसलेल्या यातना ह्यांस जगाच्या इतिहासांत दुसरी जोड नाहीं, म्हणून त्याचें येथें एवढें विस्तारानें वर्णन केलें आहे. शिवाय ह्या शहराच्या सुटकेमुळें नेदर्लंडांतील स्वातंत्र्याच्या युद्धास निराळेंच वळण लागून तेथील देशभक्तांच्या कार्याची झपाट्यानें प्रगति झाल्यामुळें ह्या युद्धांतील Turning point ह्या दृष्टीनेंही त्याचें विशेष महत्त्व असल्यामुळें तसें करणें जरूर होतें.

# प्रकरण १० वें.

# सर्वांचें ऐक्य !

हॉलंड व झीलंड येथील देशभक्तांनीं समुद्राच्या साहाय्यानें स्पॅनिश सैन्यास पळवून लावून मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें लेडनची सुटका केल्यामुळें रिक्वेसेन्स गोंधळून गेला व आतां पुढें काय करावें हें त्यास सुचेना! लेडनच्या वेढ्यामुळें हॉलंड दुभंगला होता; तो वेढा उठल्यामुळें पुन्हा एकवटला. हार्लेम व ॲमस्टरडॅम येवढीं दोनच हॉलंडांतील मोठीं शहरें स्पॅनिश सरकारच्या ताब्यांत होतीं. तेवढ्यांच्या आधारावर हॉलंडच्या देशभक्तांचा नक्षा उतरणें कठीण होतें. रिक्वेसेन्सचें आरमार बहुतेक नष्ट झालें होतें व नवीन आरमार तयार करावें तर त्या कामास पुरेसा पैसा त्याचेपाशीं नव्हता व स्पेनची तिजोरीही रिती झालेली असल्यामुळें तिकडूनही तो येण्याचा—निदान लवकर येण्याचा—संभव नव्हता. लेडनचा वेढा चालू असतांना इ. स. १५७४ च्या जून महिन्यांत ‘रुधिरप्रिय मंडळ’ ऊर्फ ब्लड कौन्सिल रद्दबातल करण्याचें आमिष दाखवून प्रांतिक लोकसभेच्या पुढाऱ्यांकडून पैसे उकळण्याचा त्यानें प्रयत्न केला होता; पण त्यांत त्यास यश आलें नाहीं. अशा स्थितींत कांहीं काल युद्ध थांबवून तहाचें बोलणें सुरू करून कालहरण करण्याचा त्यानें बेत केला; आणि त्याच्या कैदेंत असलेला वुइल्यमचा स्नेही सेंट अल्डेगॉंड याची सुटका करून तो व त्याच्याबरोबर आणखी दुसरे तीन वकील देऊन त्यांस त्यानें वुइल्यमकडे तहाचें बोलणें करण्यास्तव पाठविलें. सेंट अल्डेगॉंड यानें वुइल्यमची मुलाखत घेतली व त्यास त्यानें ह्या संधीचा फायदा घेऊन शक्य तितक्या त्वरेनें तह घडवून आणण्याची विनंती केली. “योग्य रीतीनें तह होऊन शांतता स्थापन झाल्यास मी खरोखर आनंद मानीन, इतकेंच नव्हे तर माझ्या एकट्याच्या व्यक्तीमुळें तहास अडथळा येत असेल तर मी देशत्याग करण्यास देखील तयार आहें” असें वुइल्यमनें आपल्या मित्रास सांगितलें. पुढें तहाच्या अटींविषयीं वाटाघाट चालू झाली तेव्हां (१) स्पॅनिश सैन्य नेदर्लंडांतून काढून नेणें, (२) धार्मिक बाबतींत लोकांस मतस्वातंत्र्य देणें, (३) सर्व अंतर्गत कारभार पूर्वापार चालत आलेल्या

सनदाप्रमाणें नेदर्लंडच्या लोकांच्याच हातीं राखणें व त्यांच्या लोकसभेस पूर्वी मिळालेले हक्क कायम राखणें; ह्या मुख्य शर्ती अगोदर मान्य झाल्या पाहिजेत, असें सांगून त्यानें आपल्या सेक्रेटरीमार्फत लोकसभेच्या प्रतिनिधींकडून आलेला तहाचा मसुदा सेंट अल्डेगॉंड व त्याचे सहकारी यांच्या हवालीं केला. तो घेऊन ते रिक्वेसेन्सकडे परत गेले.

तहाची वाटाघाट सुरू झाल्यामुळे वुइल्यमला जें थोडेंसें स्वास्थ्य मिळालें त्याचा त्यानें आपली सार्वजनिक व खासगी स्थिति सुधारण्याकडे उपयोग करून घेतला. हॉलंड व झीलंड येथील लोकसभेनें त्यास आपापल्या प्रांताची एकसूत्री सत्ता मागेंच दिली होती. परंतु ह्या प्रांतांतील मोठमोठीं शहरें आपापल्या स्थानिक राज्य कारभारापुरतीं स्वतंत्र असल्यानें त्यांना वुइल्यमच्या एकसूत्री अंमलाचा मत्सर वाटूं लागला होता; शिवाय हीं शहरें मुख्यतः व्यापारी लोकांच्या वस्तीनें भरलेलीं असल्यामुळें त्यांचे प्रतिनिधी त्यास युद्धाप्रीत्यर्थ पैसा देण्याचे कामीं मारवाडी धोरण स्वीकारून फार घासाघीस करूं लागले होते. अशा स्थितींत वुइल्यमला हातीं अधिकार असूनही त्या प्रांतांचा राज्यकारभार चालविणें व शत्रूपासून त्यांचें रक्षण करणें कांहींसें दुर्घट झालें होतें. ही स्थिति सुधारण्याकरितां त्यानें २० आक्टोबर १५७४ रोजीं त्या प्रांतांतील लोकसभांच्या प्रतिनिधींची सभा भरवून त्यांच्यापुढें तिचें आविष्करण केलें. “ अशा कुचराईनें अगर अर्धवट विश्वासानें जर शहरांचे प्रतिनिधी वागणार असतील तर आपण हातीं घेतलेलें काम यशस्वी होणें दुरापास्त होईल, जर त्यांना असेंच वागावयाचें असेल व मजबद्दल त्यांस अविश्वास वाटत असेल तर ह्या प्रांतांचीं सर्व अधिकारसूत्रें तेथील लोकसभांच्या स्वाधीन करून मी मोकळा होण्यास तयार आहें. मीं जो अधिकार धारण केला आहे तो माझ्या स्वतःच्या हिताकरितां नसून ह्या प्रांतांच्या कल्याणाकरितां धारण केला आहे. त्यांत मी प्रतारणा करीन अथवा करीत आहें असें जर कोणास वाटत असेल तर ह्या प्रांतांच्या लोकसभांनीं माझा राजीनामा घेऊन मला ह्या कामांतून मुक्त करावें हेंच उत्तम. त्यांनीं तसें केल्यास मी बिलकूल असंतुष्ट होणार नाहीं व जिवांत जीव आहे तोंपर्यंत ह्या भूमीचें स्वातंत्र्य रक्षण करण्याचे कामीं कसूर करणार नाहीं.” असें त्यानें लोकांस कळविलें. त्याच्या ह्या सरळ व स्पष्ट बोलण्याचा जमलेल्या लोकप्रतिनिधींच्या मनावर इष्ट परिणाम झाला व त्यांनीं आपलें साशंक आणि कुचराईचें धोरण

सोडून देण्याचें व त्यास देशोद्धाराचे कार्यांत योग्य प्रकारें मदत करण्याचें आश्वासन दिलें. पुढें ता. १२ नोव्हेंबर रोजीं त्यांनीं डेल्फ्ट येथें आपापल्या लोकसभांचें अधिवेशन भरवून दिवाणी, मुलकी, फौजदारी व लष्करी या सर्व प्रकारच्या सत्तेचें केंद्रीकरण करून ती वुइल्यमच्या हातीं दिली व त्याच्या मदतीस एक छोटेसें कौन्सिल देऊन त्या कौन्सिलवरही त्याचाच अंमल चालू ठेवण्यास त्यांनीं संमति दिली. मात्र नवीन कर, वार्षिक बेहडा व राज्यसंस्थेंतील महत्त्वाचे फेरफार इतक्या बाबतींत त्यानें लोकसभांची मंजुरी घेतली पाहिजे असें त्यांनीं ठरविलें व तें वुइल्यमनें कबूल केलें. नंतर वुइल्यमनें चालू लष्करी खर्चाकरितां दरमहा पंचेचाळीस हजार फ्लॉरिन्सची मागणी केली; पण लोकसभांनीं तीस हजार देऊं केले. तेव्हां पुन्हा त्यांची कानउघाडणी करणें वुइल्यमला भाग पडलें व त्यानंतर त्याची मागणी त्यांनीं मंजूर केली. पुढें, युद्ध चालू असेपर्यंत ह्या दोन्ही सभांचीं मतें फक्त पांच* प्रतिनिधींमार्फत व्यक्त करण्याचा ठराव करून हें अधिवेशन बरखास्त झालें. ह्या बैठकींत ठरलेली ही व्यवस्था सुमारें सहा महिने चालली. नंतर इ. स. १५७५ च्या उन्हाळ्यांत वुइल्यमच्या इच्छेवरून हॉलंड व झीलंड हे दोन्ही प्रांत एकत्र झाले व प्रत्येकानें आपल्या स्थानिक स्वातंत्र्याचा संकोच करून घेऊन उभयतांना हितावह अशी एकच शासनपद्धति व शासनसंस्था निर्माण केली आणि तिचीं सर्व सूत्रें वुइल्यमच्या हातीं दिलीं. ह्या व्यवस्थेनें वुइल्यम यास ह्या दोन्ही प्रांतांचें राज्यपदच प्राप्त झालें असें म्हणण्यास हरकत नाहीं. परंतु स्पेनच्या राजाची नामधारी सत्ता झुगारून देण्यास तो अद्याप तयार नसल्यामुळें त्याचा प्रतिनिधि ऊर्फ रीजंट अथवा त्याचा मांडलिक—काऊंट ऑफ हॉलंड—या नात्यानें ह्या राज्यपदाचा उपभोग करण्यास त्यानें आपली कबुली दिली व सदर प्रांतांच्या लोकसभांनीं ती मान्य केली. त्यास राज्यकारभार चालविण्याचे कामीं मदत करण्याकरितां त्यांनीं एक कौन्सिल ऊर्फ सल्लागार मंडळही निवडून दिलें. ही नवीन राज्यव्यवस्था अंमलांत आणण्यापूर्वीं त्यांतील धर्मसंबंधीं कलमांत

* हॉलंडचे सरदार व मोठीं शहरें यांचा एक प्रतिनिधी, झीलंडच्या लोकसभेचा एक प्रतिनिधी, हॉलंडच्या लहान शहरांचा एक प्रतिनिधी, बोमेल व ब्यूरेन (ही वुइल्यमच्या सर्वांत वडील-स्पेनमध्यें फसवून नेलेल्या—मुलाची जहागीर होती.) या शहरांचा एक प्रतिनिधी व स्वतः वुइल्यम अथवा त्याचा प्रतिनिधी; अशी ही पांच प्रतिनिधींची ऊर्फ मतांची योजना होती.

थोडासा फेरफार करण्याची वुइल्यमला आवश्यकता वाटत होती. परंतु ती बाब नाजूक असल्यामुळें तें कार्य घडवून आणण्यास त्यास बरेच प्रयास पडले. हॉलंड व झीलंड येथें कॅल्व्हिनच्या मताचें सर्वत्र प्राबल्य होतें. हे कॅल्व्हिनिस्ट लोक रोमन कॅथोलिकांचा द्वेष करीत असत. प्रॉटेस्टंट मताशींही त्यांचा विरोध होता, म्हणून त्यांनीं वरील शासनपद्धतीच्या सनदेंत धर्मरक्षणासंबंधीं जें कलम घातलें होतें त्यांत वुइल्यमवर फिलिपचा प्रतिनिधी अथवा मांडलिक या नात्यानें कॅल्व्हिनिस्ट मताचें परिपालन व रोमन कॅथोलिक मताचें उच्चाटन करण्याची जबाबदारी टाकली होती. परंतु वुइल्यमला कोणत्याच मताचा द्वेष करणें इष्ट वाटत नसल्या-मुळे व धार्मिक बाबतींत ज्याला त्याला आपल्या मनाच्या प्रेरणेप्रमाणें वागण्याची मुभा असली पाहिजे असें त्याचें मत असल्याकारणानें वरील कलमांतील 'रोमन-कॅथोलिक मताचें उच्चाटन' हे शब्द काढून त्याऐवजीं 'बायबलशीं असंबद्ध —विसंगत—असणाऱ्या मताचें उच्चाटन' हे शब्द घालण्याविषयीं त्यानें तेथील लोक-सभेचें मन वळविलें व त्यांत त्यास यश आल्यानंतर इ. स. १५७५ च्या जुलई महिन्यांत त्यानें ह्या नवीन शासनपद्धतीचा अंमल सुरू केला.

ह्या सुमारास जर्मन बादशहा मॅक्समिलियन यास नेदर्लंडांत शांतता स्थापन करण्याबद्दल फिलिपशीं मध्यस्ती करण्याची लहर आल्यावरून त्यानें तसा प्रयत्न केला. फिलिपही पैशाची ओढ झाल्यामुळें व इतके दिवस युद्ध करून कांहीं विशेष उपयोग झाला नाहीं हें पाहून युद्धास कंटाळला होता व रोमन कॅथोलिक धर्म आणि आपली अनियंत्रित सत्ता नेदर्लंडच्या लोकांनीं मान्य केल्यास गतगोष्टी विसरून त्यांस माफी करण्यास व धर्मसुधारकांस सुरक्षितपणें परदेशीं जाऊं देण्यास तयार झालेला होता. सबब मॅक्समिलियनच्या विनंतीस मान देऊन त्यानें वरील शर्तींवर बंडवाल्यांशीं तह करण्याची रिक्वेसेन्स यास आज्ञा केली. त्यावरून रिक्वेसेन्स यानें पूर्वीं चालू केलेलें तहाचें बोलणें जास्त नेटानें व पद्धतशीर रीतीनें चालू केलें. ह्या कामाकरितां दोन्ही पक्षांची परिषद् आपल्या राजधानीच्या शहरीं भरविण्याचा त्याचा मनोदय होता; परंतु स्पॅनिश अधिकाऱ्यांनीं पूर्वीं अनेक वेळ वचनभंग केलेला असल्यामुळें त्यांच्या वचनावर व परवान्यावर ( सेफ कॉंडक्ट् ) विश्वास ठेवण्यास वुइल्यम तयार नस-ल्यानें अखेर ही परिषद् वुइल्यमच्या ताब्यांतील ब्रेडा शहरीं भरविण्याचें ठरलें. त्या परिषदेस वुइल्यमनें आपल्यातर्फें सेंट अल्डेगॉंड, पॉल बुई, चार्लस बुसो (ॲडमिरल

वुझोचा भाऊ) व डॉ० ज्यूनियस हे प्रतिनिधी पाठविले व रिक्वेसेन्स यानें आपल्या-तर्फे लिओनियस, सायनर द रशिंघम, कॉनेलियस सुई, व आर्नोल्ड सास्बो हे लोक पाठविले. ह्या परिषदेची पहिली बैठक ब्रेडा येथें ता. ३ मार्च १५७५ रोजीं झाली व पुढें जुलई अखेरपर्यंत तहाच्या वाटाघाटींचें काम चालू होतें; पण दोन्ही पक्ष केवळ आपापल्या अटींवरच तह करण्यास तयार असल्यामुळें ह्या वाटाघाटीचा कालहरण करण्यापलीकडे कांहींएक उपयोग झाला नाहीं.

वुइल्यम व त्याची बायको सॅक्सनीची ॲन यांच्यामध्यें बिघाड होऊन त्यानें तिचा त्याग केल्याची हकीकत मागें दिलीच आहे. तेव्हांपासून किंबहुना त्याच्या पूर्वी कांहीं दिवसांपासून त्यास स्त्री-सुख नव्हतें. त्याची स्वाभाविक प्रवृत्ति व परिस्थिति ह्या सुखाची अपेक्षा करणारी होती. तथापि सार्वजनीक कामाची दगदग, काळजी व अडचणी यांनीं मन त्रस्त व अस्वस्थ झाल्यामुळें ह्या वेळपर्यंत त्यानें आपल्या ह्या स्वाभाविक मनोवृत्तीकडे दुर्लक्ष केले होतें. पण आतां तहाची वाटाघाट सुरू झाल्यानें त्यास जी थोडीशी फुरसत मिळाली तेवढ्या अवधींत त्यानें आपला तिसरा विवाह करण्याचें योजलें. इ. स. १५७५ च्या मार्च महिन्यांत त्यानें आपला मित्र सेंट अल्डेगॉंड यास जर्मनींतील इलेक्टर पॅलाटाईन नामक संस्थानिकाकडे कांहीं खासगी कामाकरितां पाठविलें असतां हिडेलबर्ग येथें 'चार्लोटी ऑफ् बुरबोन' नामक राजपुत्रीची व त्याची सहज भेट झाली. तिचा बाप कॅथोलिक मताचा कट्टा अभिमानी असून फ्रान्समध्यें रहात होता. सेंट बार्थो-लोमेची कत्तल करण्याकरितां (प्रॉटेस्टंट ह्युजोनाट लोकांची) फ्रेंच राजा व त्याची आई यांच्या गुप्त संमतीनें झालेल्या कटाशीं त्याचा संबंध होता. त्याच्या उपरोक्त कन्येचा प्रॉटेस्टंट मताकडे विशेष कल असल्यामुळें ती ह्या धामधुमीच्या वेळीं फ्रान्सांतून पळून गेली व तिचा नातेवाईक वरील इलेक्टर पॅलाटाईन याच्या आश्रयास जाऊन राहिली. पुढे तिच्या बापानें तिला परत घरीं येण्याविषयीं पुष्कळ आग्रह केला; पण त्यच्यावर तिचा विश्वास न बसल्यामुळें ती त्याच्याकडे गेली नाहीं. वुइल्यमची तिला ऐकून पुष्कळ माहिती झाली होती व त्यावरून त्याच्यासंबंधानें तिच्या मनांत पुष्कळ पूज्यभाव उत्पन्न झालेला होता. सेंट आल्डेगॉंड यानें तिचा विशेष परिचय करून घेऊन तिजजवळ वुइल्यमशीं विवाह करण्याची गोष्ट काढली तेव्हां तिनें त्यास आपली खुषी असल्याचें मर्यादेनें ध्वनित केलें. परंतु हा विवाह करण्यास अडचणी फार होत्या. ॲन अद्याप जिवंत असल्यानें

कायदेशीर रीतीनें तिच्याशीं 'कार्बामोड' करणें जरूर होतें व तसें केल्यास तिचे नातेवाईक रुष्ट होऊन त्यांच्या व त्यांच्यामुळें जर्मन बादशहाच्या सहानुभूतीस वुइल्यमला मुकावें लागणार होतें. फ्रेंच राजासही ह्या कृत्यामुळें राग येण्याचा संभव होता. या सर्व गोष्टींचा विचार करून काऊंट जॉन यानें वुइल्यमला हा विवाह न करण्याबद्दल आग्रह केला; परंतु वुइल्यम व चार्लोटी यांच्या दरम्यान त्यासंबंधानें जास्त वाटाघाट होऊन वुइल्यमची कर्जबाजारी व धोक्याची स्थिति पत्करूनही जेव्हां चार्लोटीनें ह्या विवाहास आपली कबुली दिली तेव्हां जॉनचें म्हणणें क्षणभर बाजूस ठेवून त्यानें हा विवाह करण्याचा निश्चय केला व त्याप्रमाणें सेंट अल्डेगॉंड याच्या साह्यानें त्यानें ता. ७ जुलई सन १५७५ रोजीं डॉर्ट शहरीं हा विवाहविधि त्याच्या योग्यतेस अनुरूप अशा थाटानें उरकून घेतला. त्यामुळें त्याचे जर्मनींतील सहाय्यकर्ते, जर्मन बादशहा व फ्रेंच राजा आणि त्याची आई यांची त्याजवर कांहीं काल इतराजी झाली. त्याचा भाऊ जॉन हा सुद्धां त्यामुळें विपण्ण होऊन त्याचें हें कृत्य वेडेपणाचें मानूं लागला होता. परंतु वुइल्यमनें आपल्या नेहमींच्या धिम्मेपणानें व धैर्यानें ह्या सर्वांचा व विशेषतः जॉनचा रोष सहन केला ! ॲनच्या नातेवाईकांनीं तर चार्लोटीसंबंधानें भलत्यासलत्या कंड्या उठवून त्याला चिडविण्याचा प्रयत्न कांहीं काल केला; परंतु तो फुकट गेला. वुइल्यमच्या सुदैवानें त्याची ही स्त्री अत्यंत सुशील, प्रेमळ व त्याच्या संकटांचा आणि श्रमांचा भार हलका करून त्यास सुख देणारी अशी निघाली आणि त्यामुळें ह्या लग्नानंतर लवकरच जॉनचा त्यासंबंधाचा विरोध दूर होऊन वुइल्यमप्रमाणेंच तिलाही तो आदरानें व मायेनें वागवूं लागला.

वुइल्यमच्या लग्नसोहळ्यानिमित्त चालू असलेला मंगल व मंजुळ वाद्यध्वनि थांबतो न थांबतो तोंच हॉलंडच्या दक्षिणेस रणवाद्यांचा घणघणाट सुरू झाला ! ब्रेडा येथें जी तहपरिषद् मार्चपासून चालू होती, तिचा कांहींएक उपयोग न झाल्यामुळे जुलईअखेर तहाचें बोलणें खुंटून पुन्हा युद्धास सुरवात झाली होती. ता. २० जुलईच्या सुमारास स्पॅनिश सेनापति हिर्जेस यानें वुडवॉटर शहरास अनपेक्षित रीतीनें वेढा दिला. तेथील लोक सावध नसल्यामुळें शहररक्षणाची पूर्वतयारी त्यांनीं केली नव्हती. तथापि अठरा दिवसपर्यंत त्यांनीं मर्दुमकीनें शहराचें रक्षण केलें; त्यानंतर त्यांचा पराभव होऊन तें शत्रूच्या हातीं आलें. स्पॅनिश सैन्यानें त्यांच्या नित्यक्रमाप्रमाणें तेथें जाळपोळ, लुटालूट, कत्तल वगैरे सर्व प्रकार केले.

नंतर हें सैन्य शूनोव्हेन शहराकडे वळलें. त्या शहरांतील लोकांजवळ आत्म-रक्षणाचीं साधनें नसल्यामुळें ते कांहीं शर्तीवर प्रथमदर्शनींच शत्रूला शरण गेले. ह्याप्रमाणें इकडे युद्ध चालू असतां मध्यंतरीं रिक्वेसेन्स यानें स्पेनमधून आरमारी मदत मागितली होती; परंतु ह्या आरमारास आश्रय घेण्याजोगी अशी निर्धास्त-पणाची जागा त्याचेपाशीं उरली नव्हती. हॉलंडचा बहुतेक सर्व पश्चिम व उत्तर किनारा वुइल्यमच्या 'समुद्रावरील भिकाऱ्यां'च्या (Sea beggars) ताब्यांत होता. वॉलचेरन बेटानजीकचें फक्त थोलोन नांवाचें एक छोटेंसें बेट रिक्वे-सेन्सच्या अमलाखालीं होतें. त्या बेटाच्या आश्रयानें एक छोटेंसें आरमार गुप्तपणें समुद्रांत पाठवून डयूवेलँड व शौवेन हीं दोन बेटें काबीज करून स्पेनहून येणाऱ्या आरमारास आश्रयस्थान तयार करण्याचा व वॉलचेरन बेटास शह देण्याचा बेत रिक्वेसेन्स यानें केला. हा अमलांत आणणें अत्यंत कठीण होतें. कारण भोंवताल-च्या उघड्या समुद्रांत वुइल्यमचें आरमार फिरत होतें व त्या आरमारास ह्या योजनेचा सुगावा लागल्यामुळें तें विशेष सावधगिरी बाळगून होतें. ह्या आरमाराचा डोळा चुकवून जाण्यास एक मार्ग होता; पण तो अत्यंत अरुंद व धोक्याचा असून त्याची रिक्वेसेन्सला बरोबर माहिती नव्हती. तथापि डयूवेलँड येथील कांहीं देशघातकी लोकांनीं कांहीं लांच घेऊन त्याला ह्या मार्गाची बरोबर माहिती करून दिली व त्यांच्यापैकीं कांहींजणांनीं वाटाड्याचें कामही पत्करलें! इतकें झाल्यावर रिक्वेसेन्स यानें एक दोन हुषार अंमलदार पाहून त्यांच्या हाताखालीं सुमारें एक हजार लोक व कांहीं जहाजें देऊन एका अंधाऱ्या रात्रीं त्यास शौवेन काबीज करण्याकरितां पाठविलें. वाटेंत त्यांची चाहूल लागल्यामुळें वुइल्यमच्या आरमारानें त्यांजवर भडिमार केला. त्यामुळें व अंधाराच्या योगानें अरुंद रस्त्या-वर पाय घसरून ह्या सैन्यांतले बरेच लोक मेले; पण अंधाराच्या आश्रयानेंच त्यांनीं महत्प्रयासानें सकाळीं डयूवेलँडचा किनारा गांठला. नंतर थोडा उपहार करून विश्रांति घेतल्यावर त्यांनीं किनाऱ्यावर भडिमार सुरू केला. येथील देश-भक्तांच्या सैन्याचा अधिपति चार्लस बुझो (अॅडमिरल बुझोचा भाऊ) हा होता. तो एकाएकीं (विश्वासघातानें) मारला गेल्यामुळें त्याच्या सैन्यांत बखेडा उत्पन्न होऊन ते गर्भगळित झालें व पळत सुटलें! अर्थात् डयूवेलँड स्पॅनिश सैन्याच्या सहज ताब्यांत आलें. तेथून आणखी थोडे कष्ट सोसून ह्या सैन्याचा एक भाग शौवेन बेटांत जाऊन दाखल झाला. त्यांतील शिपायांनीं त्या बेटाच्या किनाऱ्यावर

मारडिमार सुरू करितांच तेथें संरक्षणाकरितां ठेविलेलें सैन्य भयभीत होऊन त्या बेटाची राजधानी असलेल्या 'झीर्कझी' शहरांत पळून गेलें. नंतर लवकरच तेथें प्रख्यात स्पॅनिश सेनापति मॉड्रेगॉन हा नवीन सैन्य घेऊन आला व तेथील आणखी दोन तीन शहरें काबीज केल्यावर त्यानें आक्टोबर अखेरीस 'झीर्कझी'ला वेढा दिला.

झीर्कझीला स्पॅनिश सैन्याचा वेढा पडला खरा; परंतु रिक्वेसेन्स याच्याजवळ द्रव्याभावामुळें पुरेशी युद्धसामुग्री नसल्यानें हें वेढ्याचें काम रेंगाळत चाललें होतें. शहरांतील लोकांनीं होतां होईल तोंपर्यंत टिकाव धरण्याचा निश्चय केला होता आणि वुइल्यमकडून मदत मिळाल्यास ह्या शहराचें रक्षण होण्याचा पूर्ण संभव होता; परंतु वुइल्यमची सांपत्तिक स्थितीही यावेळीं सर्वस्वीं खालावलेली होती आणि इतर ठिकाणाहूनही त्यास मदत मिळण्याची फारशी आशा नव्हती. त्याचा भाऊ जॉन हाही यावेळीं द्रव्याच्या अडचणींत होता. हॉलंड व झीलंड येथील लोकसभेकडून मिळणारा पैसा युद्ध चालविण्यास अगदीं अपुरा होता व जास्त पैसा देण्याचें ह्या प्रांतांतील लोकांस सामर्थ्य राहिलें नव्हतें. कारण आल्व्हाच्या जुलमी कारकीर्दीमुळें त्यांचे भरभराटींत असलेले उद्योगधंदे व व्यापार ह्यांचा नाश होऊन त्याच्या जुलमी खंडण्यांच्या भारानें त्रस्त झाल्यानें ते बहुतेक कंगाल बनले होते. शांततेच्या अभावामुळें तेथील सरदार व जहागिरदार यांची सांपत्तिक स्थितीही खालावलेली होती. तात्पर्य, हॉलंड व झीलंडचे लोक व स्वतः वुइल्यम हे सर्वच चारुदत्ताप्रमाणें दरिद्री झाल्याकारणानें त्यांस परराष्ट्राच्या मदतीची तीव्र अपेक्षा उत्पन्न झाली होती. इंग्लंड, फ्रान्स व जर्मन संस्थानें येथील सत्ताधीशां-कडून द्रव्याची मदत मिळविण्याविषयीं वुइल्यमनें आजवर पुष्कळ खटपट केली व त्यांत त्यास मधून मधून यशही येत गेलें; परंतु ह्या भिक्षेनेंही आतां कार्यभाग होण्यासारखा नव्हता. कारण ती पाहिजे तितकी व **नियमित वेळीं** मिळेलच अशी खात्री नव्हती. अशा स्थितींत, वरील दोन्ही प्रांतांनीं एकत्र होऊन स्पेनच्या राजाचें त्यांनीं धारण केलेलें नामधारी छत्र झुगारून द्यावें व युरोपांतील दुसऱ्या कोणा वरिष्ठ राजाच्या छत्राचा आश्रय करावा अशी सूचना वुइल्यमनें त्या प्रांतांतील लोकसभेपुढें मांडली. तिचा बराच खल झाल्यावर त्या सभेनें ती पास केली. परंतु ही बाब अत्यंत महत्त्वाची असल्यामुळें त्यासंबंधानें सर्व देशाचें मत घेण्याचें वुइल्यमनें ठरविलें व प्रत्येक शहरांतील स्थानिक स्वराज्याच्या संस्थे

मार्फत आणि व्यापारी व सरदार यांच्या संघामार्फत सर्व जनतेचीं मतें मिळ-विण्याची लोकसभेस विनंती केली. हीं मतें जमा झाल्यावर--तीं वुइल्यमच्या मूळ सूचनेस अनुकूल अशींच होतीं--डेल्फ्ट येथें वरील दोन्ही प्रांतांच्या लोक० सभांची एक बैठक भरून तींत स्पेनच्या राजाची अधिसत्ता झुगारून देऊन दुसऱ्या कोणत्या तरी बलिष्ठ राजाची अधिसत्ता मान्य करून त्याच्याकडून आपल्या अंतस्थ स्वातंत्र्याचें धार्मिक व राजकीय रक्षण करून घेण्याचा ठराव एक-मतानें पास झाला व त्या ठरावाची अंमलबजावणी करण्याचा अधिकार सर्वांनीं एक-मतानें वुइल्यम यास दिला ( आक्टोबर १५७५ ). हा ठराव हाच भावी डच लोकसत्ताक राज्याचा कायदेशीर पाया होय. कारण कायद्याच्या दृष्टीनें फिलिपच्या राज्यांतून फुटून आपलें स्वतंत्र राजकीय अस्तित्व जाहीर करण्याचें श्रेय सदर प्रांतीय लोकांनीं प्रथमतः ह्याच ठरावाच्या रूपानें संपादन केलें. मात्र तें संपादन करीत असतांना त्यांना आपण सर्वस्वी आपल्याच पायावर उभे राहून ह्या स्वतंत्र राज्याची इमारत उभारूं अशी खात्री वाटत नसल्यामुळें त्यांनीं एकाचें छत्र झुगारतांच दुसऱ्याच्या छत्राची अपेक्षा केली; तें छत्र त्यास मिळवून देण्या-करितां इंग्लंड, फ्रान्स व जर्मनी येथील राजपुरुषांशीं वुइल्यमनें सुमारें एक वर्ष-भर पुष्कळ कारस्थानें केलीं; पण त्यांच्यामध्यें असलेला परस्परांविषयींचा मत्सर, अविश्वास व भीति इत्यादि कारणांमुळें त्यास यश आलें नाहीं. तेव्हां तो अगदीं हताश व निराश झाला. तथापि स्पॅनिश जुलमास मान वांकविण्यास तो तयार नव्हता. त्या जुलमाचा प्रतिकार करण्याचे सर्व उपाय थकले व आपल्या ताब्यांतील लोकांचें जीवित व वित्त यांचा नाश होण्याचा समय आला तर सर्वांनीं मिळून त्या देशाचा त्याग करून अमेरिका खंडांत वसाहत करण्यास जावयाचें असें त्यानें आपल्या मनांत ठरवून ठेवलें होतें; परंतु इतक्या निर्धारानें जुलमी सत्तेशीं झग-डून आपलें स्वातंत्र्य रक्षण करण्याचा प्रयत्न करणारांस परमेश्वर अखेर मदत केल्याशिवाय रहात नाहीं; हा ऐतिहासिक सिद्धान्त लवकरच खरा ठरल्यामुळें वरील निर्वाणीचा उपाय योजण्याचें त्यास कारणच पडलें नाहीं.

झार्केझीला वेढा पडल्यापासून वुइल्यम जसा त्रस्त व चिंताग्रस्त झाला होता तसाच रिक्वेसेन्सही कष्टि व खिन्न झालेला होता. द्रव्याचा त्याजपाशीं कसा अभाव होता हें मागें सांगितलेच आहे. त्यामुळें त्याच्या सैन्यास पगार न मिळाल्याकारणानें तें असंतुष्ट होऊन ठिकठिकाणच्या स्थानिक ( Civil )

मुलकी अधिकाऱ्यांस व जनतेस त्रास देऊं लागलें होतें. हार्लेम येथील सैन्यानें उघडपणें बंड केलें, तेव्हां तें मोडून टाकण्याकरितां तेथील जनतेस बंडखोर स्पॅनिश शिपायांवर गोळ्या झाडण्याची परवानगी देणें त्यास भाग पडलें ! ब्रॅबंट, फ्लँडर्स व इतर राजनिष्ठ आणि कॅथोलिक धर्ममतानुयायी प्रांतांतून त्यानें पैसे मिळविण्याचा प्रयत्न केला; पण त्यास ते मिळाले नाहींत. त्याची पैशाची मागणी पुरी करण्याऐवजीं उपरोक्त प्रांतांच्या लोकसभांनीं स्पॅनिश सैन्याच्या गैरवर्तणुकीविषयीं त्याजकडे तक्रारी करण्यास सुरवात केली ही सर्व परिस्थिति फिलिपला कळवून त्याजकडून पैशाची मदत मिळविण्याचा त्याचा प्रयत्न चालू होता. पण परिस्थितीच्या ह्या कांचामुळें त्याला अत्यंत मानसिक पीडा होत असे. त्यांतच त्यास दोषी ज्वर येऊन तो विकोपास गेल्यामुळें ता. ५ मार्च सन १५७६ रोजीं एकाएकीं त्याचा अंत झाला !

रिक्केसेन्सच्या आकस्मिक मृत्यूमुळें स्पॅनिश सरकारची बाजू लंगडी पडली. तो अशा रीतीनें मरेल हें कोणासच ठाऊक नसल्यामुळें त्याच्या जागीं त्यानें स्वतः अथवा फिलिपनें कोणाचीच नेमणूक करून ठेविली नव्हती. अर्थात् त्याच्या पश्चात् त्याचे सर्व अधिकार पूर्वी निर्माल्यवत् झालेल्या स्टेट कौन्सिलनें आपल्या हातीं घेतले. स्टेट कौन्सिलमध्यें ह्यावेळीं एकंदर सात सभासद होते. पैकीं अर्शाट, बर्लेमॉंट, व्हिजलियस हे जुने सभासद कायम असून त्यांच्या जोडीस, तीन नेदर्लंडचे सामान्य योग्यतेचे सरदार व जेरोम रोडा या नांवाचा एक हुशार स्पॅनिश सरदार असे चार नवीन सभासद होते. वस्तुतः हें कौन्सिल दुर्बल व केवळ सल्लागार मंडळाच्या तोलाचे बनलेलें होतें. आल्व्हा व रिक्केसेन्स ह्या दोघांनींही त्यास अंमलबजावणीचे अथवा कायदे करण्याचे अधिकार कधींच उपभोगूं दिले नाहींत. तथापि हल्लीं हे अधिकार चालविण्यास त्यांच्या जागीं दुसरा कोणीही कायदेशीर माणूस नसल्यामुळें ह्या कौन्सिलनें ते सर्व अधिकार आपल्या हातीं घेतले व रिक्केसेन्सच्या जागीं कोणाची नेमणूक करावी हें ठरविण्यास फिलिपला बराच वेळ लागणारा असल्यामुळें त्यानेंही त्यांच्या ह्या कृत्यास तात्पुरती संमति दिली. ह्या कौन्सिलचे सर्व सभासद राजनिष्ठ होते. कॅथोलिक धर्माचेही ते कट्टे अभिमानी होते. परंतु आल्व्हानें त्यांच्या देशांतील लोकांचे अल्पस्वल्प असे देखील राजकीय हक्क संपुष्टांत आणून सर्वांस त्राहि त्राहि करून सोडलेलें पाहून—विशेषतः देशाची कंगाल अवस्था पाहून—त्यांना आपल्या प्रतिपक्षीयांशीं तडजोड करून

शांतता स्थापन करण्याची इच्छा झाली होती. वुइल्यम व त्याचे अनुयायी हे किती झालें तरी त्यांचे देशबंधू होते. अर्थात् केवळ धार्मिक मतभेदाकरितां त्या सर्वांचा नायनाट करण्याच्या कल्पनेचा उशिरानें कां होईना; पण त्यास वीट येणें अपरिहार्य होतें. त्यांची ही सामबुद्धि स्पॅनिश कौन्सिलर रोडा यास पसंत नव्हती. पण सबंध कौन्सिलांत त्याच्या मताचा तो एकटाच असल्यामुळें त्याच्या पसंती नापसंतीला निदान प्रस्तुतसारख्या वेळीं तरी विशेष महत्त्व येण्याचा संभव नव्हता. ह्या कौन्सिलनें सर्व राज्यकारभाराचीं सूत्रें हातीं घेतल्यावर त्यांनीं काउंट पीटर मॅन्सफील्ड यास स्पॅनिश सरकारच्या सर्व सेनेचें आधिपत्य दिलें. हा नेदर्लंडचा सरदार असल्यामुळें त्याच्या हाताखालीं काम करावें लागणार म्हणून त्या सेनेंत असलेले स्पॅनिश सेनापति व अधिकारी नाक मुरडूं लागले; पण त्याचा कांहीं एक उपयोग झाला नाहीं.

वरील परिस्थितीचा शक्य तितका फायदा घेऊन आपल्या पक्षाची स्थिति सुधारण्याचा वुइल्यमनें निश्चय केला. प्रथम त्यानें झीर्कझी शहराचा वेढा उठविण्याची खटपट सुरू केली. फ्रेंच राजा व इंग्लंडची राणी ह्या दोघांना जरी उघडपणें नेदर्लंडच्या तंट्यांत पडतां येत नव्हतें तरी प्रत्येक जण आपापल्या परीनें स्पॅनिश सत्तेचा मत्सर करीत असल्यामुळें वुइल्यम व त्याचे अनुयायी यांस चुचकारून स्पॅनिश सत्तेशीं त्यांनीं सुरू केलेला झगडा चालू ठेवण्यास वेळ पडल्यास गुप्तपणें मदत करीत असे. शिवाय नेदर्लंडांत आपलें वर्चस्व स्थापन करण्यासंबंधानेंही ह्या उभयतांत अंतस्थ स्पर्धा असल्यामुळें तिचा उपयोग करून घेऊनही वुइल्यमला त्यांचेकडून पैसे काढतां येत असत. पण अशा प्रकारें त्यास मिळणारी मदत फार अपुरी व तीही महत्प्रयासानें मिळत असे. प्रस्तुत प्रसंगीं तशा प्रकारची थोडीशी मदत मिळवून त्यानें दोन हजार स्कॉटिश लोकांचें एक सैन्य तयार करून जमिनीच्या मार्गानें झीर्कझीच्या मदतीस पाठविलें. आणि अॅडमिरल बुझो यास सव्वाशें जहाजांनिशीं समुद्राच्या मार्गानें त्याच कामगिरीवर पाठविलें. अॅडमिरल बुझोचें शौर्य व धाडस आमच्या वाचकांस माहीत आहेच. आजपर्यंत ह्या दोन गुणांच्या जोरावर त्यानें अनेक विजय मिळविले; पण ह्या खेपेस हेच गुण नाशास कारण व्हावयाचे होते! झीर्कझीच्या नजीक असलेला किनारा उथळ होता. तेथें भरतीच्या वेळीं रात्रीं बुझोनें आपलें जहाज आणलें त्या ठिकाणीं एक अर्धवट पडलेला धक्का होता त्या धक्याच्या भगदाडांतून आंत जाण्याचा त्यानें यत्न केला; पण तो न साधतां त्याचें जहाज मात्र तेथें अडकून राहिलें. पुढें

थोड्या वेळानें तें जहाज वाळूंत रुतलें, इतक्यांत शत्रूला त्याच्या आरमाराची चाहूल लागल्यामुळें त्यांनीं त्यावर तोफांचा भडिमार केला. तेव्हां त्याचें आरमार तो चुकविण्या-करितां दूर पळालें व बुझोलाही आपल्या जहाजावरील तीनशें लोकांसह समुद्रांत उडी टाकून पलायन करणें भाग पडलें ! शत्रूच्या आरमारानें त्याच्या आरमाराचा पाठलाग केल्यामुळें तें त्याच्या दृष्टीच्या टप्यांतून पूर्वीच निघून गेलें होतें. अशा स्थितींत नवीन जहाजांची मदत येईपर्यंत–सकाळपासून संध्याकाळपर्यंत–समुद्रांत एका लाकडाच्या फळकटाच्या आसन्यानें तरंगत व पोहत बराच मार्ग आक्रमण केल्यानें दमून जाऊन हा शूर आरमारी योद्धा आपल्या अनेक साथीदारांसह बुडून मेला ! त्याच्या मृत्यूची वार्ता ऐकून बुइल्यम व त्याची स्त्री चार्लोटी यांस अत्यंत दुःख झालें ! त्याचा भाऊ चार्लस बुझो हा डयूवलेंड येथें नुकताच मारला गेल्याचें वृत्त मागें आलेंच आहे. ह्या दोघांही बंधूंनीं नेदर्लंडच्या स्वातंत्र्याकरितां जिवापाड श्रम केलेले होते. त्यांची अद्याप ह्या कार्यास पुष्कळ जरूरी होती. तेव्हां अशा आकस्मिक रीतीनें त्यांचा अंत झालेला पाहून बुइल्यमादि सर्व देशभक्तांस खेद वाटावा हें अगदीं साहजिक आहे. बुझोच्या स्वारीचा असा शेवट झाल्यावर जमिनीवरून येणाऱ्या दोन हजार लोकांचा त्यांच्या चौपट मोठ्या व शिस्तीच्या सैन्यापुढें कोठून निभाव लागणार ? त्याचाही पहिल्याच तडाक्यासरशीं पराभव झाला. यानंतर फ्रान्स व इंग्लंड येथून मदत मिळविण्याविषयीं बुइल्यमनें आणखी प्रयत्न केले; पण त्यांत त्यास यश आलें नाहीं. तेव्हां नाइलाज होऊन त्यानें झीर्कझीच्या लोकांस शक्य तितक्या सवलतींच्या व मानाच्या अटीवर शहर•शत्रूच्या स्वाधीन करण्याची परवानगी दिली. मॉड्रेगॉनच्या सैन्यांत बंडाचीं चिन्हें दिसूं लागलीं होतीं; सबब त्यानें शहरांतील सर्व सैन्यास व त्याच्याबरोबर जाणाऱ्या नागरिकांस कांहींएक इजा न करितां निघून जाण्यास परवानगी दिली व शहरां-तील लोकांकडून अगदीं माफक खंडणी घेऊन त्यांस इतर कोणत्याही प्रकारें उपसर्ग पोंचूं न देण्याची हमी घेतली, तेव्हां ता. २१ जून १५७६ रोजीं हें शहर त्याच्या स्वाधीन झालें. अशा रीतीनें नऊ महिनेपर्यंत चालू असलेला हा वेढा स्पॅनिश सरकारचा विजय होऊन उठला खरा; पण ह्या विजयानंतर लागलीच त्यांच्या सैन्यांत जिकडे तिकडे बंडाळी माजल्यामुळें ह्या विजयाचा त्यास कांहीं एक उपयोग झाला नाहीं ! उलट बुइल्यमला मात्र त्या बंडाळीमुळें आपलें कार्य साधण्याची उत्कृष्ट संधि मिळाली. स्टेट कौन्सिलची दुर्बलता त्यास ठाऊक होती, तसेंच

त्यांतील बहुतेक सभासद युद्धास कंटाळलेले असल्याचेंही त्यास माहीत होतें. अशा लोकांच्या हातून स्पॅनिश शिपायांचें बंड मोडलें जाण्याचाही संभव नव्हता व त्या बंडास उत्तेजन देणेंही त्यास शक्य नव्हतें. ह्या स्थितीचा फायदा घेऊन सर्व प्रांतांतील लोकांचा देशाभिमान प्रज्वलित करून त्यांचें ऐक्य घडवून आणण्याचा उद्योग त्यानें झपाट्यानें सुरू केला. हॉलंड व झीलंड ह्या दोन प्रांतांचें ऐक्य त्यानें मागेंच घडवून आणलें होतें. त्यास त्यानें आतां व्यवस्थितपणें संघाचें रूप देऊन इतर प्रांतास त्यांत सामील होण्याचा मार्ग खुला करून दिला. वरील दोन प्रांतांच्या संघाचें आधिपत्य त्या प्रांतांतील लोकसभेनें एकमतानें वुइल्यम यास देऊन तेथील सर्व राजसत्ता व राज्याधिकार हे सर्वस्वीं त्याच्या हवालीं केले होते. फक्त जमाबंदी व इतर कांहीं थोड्या महत्त्वाच्या बाबतींत प्रांतिक लोकसभेची सल्ला व मत घेण्याचा तेवढा निर्बंध त्यास घालण्यांत आला होता.

झीरिकझीचा वेढा उठल्यानंतर नित्याप्रमाणें तेथें लुटालूट करण्यास न सांपडल्या-मुळें आधींच ( पगार थकल्यामुळें ) असंतुष्ट झालेलें स्पॅनिश सैन्य बिथरलें. त्यांना शांत करण्याचा त्यांच्या अधिकाऱ्यांनीं पुष्कळ यत्न केला; पण व्यर्थ! मॉंड्रॅगॉन याचें त्यांच्यावर पुष्कळ वजन होतें; पण त्याचाही यावेळीं उपयोग झाला नाहीं. ह्या सैन्यानें आपल्यावरील अधिकाऱ्यांची सत्ता झुगारून देऊन आपल्या-पैकींच एका असामीस सैन्याचा मुख्य नेमून तें नेदर्लंडच्या दक्षिण भागांतील शहरें लुटूं लागलें. मेक्लीन, ब्रुसेल्स या शहरांवर हल्ला करून—तेथें त्यांचें कांहीं न चालल्यामुळें—फ्लँडर्स प्रांतांतील अलॉस्ट शहर काबीज करून तेथें त्यांनीं आपलें ठाणें बसविलें व आसपासच्या गांवावर खंडणी बसवून ती वसूल करण्यास आरंभ केला. मध्यंतरीं ब्रुसेल्सच्या स्टेट कौन्सिलनें त्यांचे शांतवन करण्याकरितां काऊंट मॅन्सफील्ड यास पाठविलें होतें. त्यानें त्यांची परोपरीनें समजूत केली; पण 'पैसा द्या अथवा एकादें शहर स्वाधीन करा; पोकळ आश्वासनें नकोत' असा त्यांनीं रोकठोक जबाब दिल्यामुळें त्यास हात हालवीत परत फिरावें लागलें! अलॉस्ट येथील स्पॅनिश सैन्याचें इतर ठिकाणच्या स्पॅनिश सैन्यांनीही अनुकरण केलें, तेव्हां स्टेट कौन्सिलच्या ताब्यांत असणाऱ्या पंधरा प्रांतांतील रहिवाशांनीं प्रॉटेस्टंट व रोमन कॅथोलिक हा भेद क्षणभर बाजूस ठेवून एकमतानें ह्या सैन्याचा प्रतिकार करण्याची तयारी केली आणि त्यास बंड-खोर ठरवून त्यांचें पारिपत्य करण्याविषयीं स्टेट-कौन्सिलची कायदेशीर अनुज्ञा

मागितली. ब्रुसेल्स शहरच्या लोकांनींही स्टेट-कौन्सिलला हीच मागणी केली. स्टेट कौन्सिल हें दरिद्री असल्यामुळें स्वतः बंडवाल्यांचा बंदोबस्त करण्यास असमर्थ होतें. त्या कामीं आपल्या नैतिक व कायदेशीर वजनाचा त्यांनीं शक्य तितका उपयोग करून पाहिला; पण त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. तेव्हां अखेर जनतेची वरील मागणी मान्य करणें त्यास भाग पडलें आणि लवकरच त्यांनीं ह्या सैन्यास बंडखोर ठरवून त्यांतील शिपायांस पाहिजे त्या नागरिकानें गोळी घालून ठार करावें असा जाहीरनामा काढला ! कौन्सिलचें हें कृत्य त्यांतील स्पॅनिश सभासद रोडा यास पसंत न पडल्यामुळें तो ब्रुसेल्समधून पळून अँटवर्प येथें जाऊन राहिला. येथें स्पॅनिश सैन्याचा बराच मोठा जमाव असल्यामुळें त्या सैन्याच्या आश्रयानें त्यानें स्टेट कौन्सिलचा ( तें ब्रुसेल्सच्या जनतेच्या अटकेंत–कांचांत–असल्यानें त्यास स्वतंत्रबुद्धीनें वागतां येणें शक्य नाहीं, अशा सबबीवर ) अधिकार चालविण्यास आपण एकटेच पात्र असल्याचा व तो अधिकार आपण चालविणार असल्याचा जाहीरनामा काढून स्टेट कौन्सिलनें काढलेला उपरोक्त जाहीरनामा रद्द केल्याचें जाहीर केलें ! याप्रमाणें स्टेट कौन्सिलची उडालेली दैना आणि स्पॅनिश सैन्यानें चालू केलेला धुमाकूळ पाहून वुइल्यमनें अद्याप राजनिष्ठ असलेल्या पंधरा प्रांतांतील लोकसभांचे पुढारी, वजनदार व्यापारी, सरदार, सामान्य लोकांचे अग्रणी, स्थानिक अधिकारी, म्युनिसिपल कौन्सिलर्स, गव्हर्नर्स वगैरे सर्व प्रकारच्या लोकांशीं पत्रव्यवहार करून ज्याच्या त्याच्या मनोवृत्तीस व भावनेस अनुकूल असा युक्तिवाद करून त्यांना ह्यावेळीं स्पॅनिश जुलमी सत्तेचें जूं झुगारून देऊन आपल्या देशाचें नष्ट झालेलें स्वातंत्र्य मिळविण्याची आलेली संधि साधून घ्या म्हणून उपदेश सुरू केला. स्पॅनिश सैन्याच्या अत्याचारामुळें बर्लेमाँटचा पुत्र आणि गेल्डरलँडचा गव्हर्नर हेजेस यांच्यासारखे फिलिपचे दासानुदासही त्याच्या बुद्धिवादाकडे लक्ष देऊं लागले ! मग इतरांची कथा काय ? नेदर्लंडच्या दक्षिण भागांत कॅथोलिक मतानुयायी लोकांचाच विशेष भरणा असल्यामुळें उत्तर भागांतील–विशेषतः हॉलंड व झीलंड येथील–कॅल्व्हानिस्ट लोकांचें व त्यांचें सूत जमणें सामान्यतः शक्य नव्हतें आणि ह्या तीव्र धार्मिक मतभेदामुळेंच दक्षिणेकडील प्रांत अद्यापही राजनिष्ठ राहिले होते; परंतु फिलिप व आल्व्हा यांनीं तारतम्य न राखतां दक्षिण व उत्तर येथील सर्व लोकांस एकाच राजकीय जुलमाच्या *जात्यांतून भरडून काढल्या-

*फिलिपच्या जुलमाचें बाह्य स्वरूप जरी धार्मिक असलें, तरी त्याच्या मुळाशीं राज-

मुळें त्यांची जी दैन्यावस्था झाली होती तिच्या दडपणामुळें त्यांनीं आपसांतील तीव्र धार्मिक मतभेद बाजूस ठेवून आपल्या नैसर्गिक व परंपरेनें चालत आलेल्या राजकीय हक्कांच्या रक्षणाप्रीत्यर्थ एक होण्याची संधि प्राप्त होतांच ह्या ऐक्यासाठीं धडपड करणाऱ्या वुइल्यमच्या आर्तस्वराकडे थोडा वेळ तरी लक्ष द्यावें हें अगदीं साहाजिक आहे. तो या लोकांच्या मनांतील समदुःखित्वाच्या भावनेचें उद्दीपन करून त्यांचे ठायीं ऐक्याची उत्कट इच्छा उत्पन्न करण्याकरितां डेल्फ्टचा मुक्काम हालवून दक्षिणभागांत मिडलबर्ग येथें येऊन राहिला व तेथून त्यानें पंधरा प्रांतांच्या लोकसभेस अनुलक्षून एक जाहीरनामा काढला. त्यांत पुढील आशयाचा मजकूर होताः—

" मतभेदाच्या व फटकून वागण्याच्या प्रवृत्तीचा त्याग करा. ही वेळ सर्वांनीं एकमतानें व एकविचारानें वागण्याची आहे. लोकसभांच्या इच्छेविरुद्ध त्यांच्या कक्षेतील प्रांतांतल्या धर्मांत बदल करण्याची आमची इच्छा आहे, असें समजू नका. तशा प्रकारचा नुसता संशय देखील मनांत येऊं देऊं नका. कोणाही मनुष्याच्या नैसर्गिक हक्कांची पायमल्ली करण्याची आमची इच्छा नाहीं. उलट ह्या हक्कांचें रक्षण करण्यास्तव आम्हीं शस्त्र धारण केलें आहे. सनदशीर व कायदेशीर स्वातंत्र्याचें रक्षण करणें हेंच आमचें ध्येय आहे. पूर्वेतिहास पाहिला तर स्टेटस् जनरल–म्हणजे सरदार, धर्मगुरु व सामान्य लोक–यांच्या प्रतिनिधीच्या हातांतच येथील सतरा परगण्यांची राज्यव्यवस्था असणें जरूर आहे. राजा हा या प्रांतांचा वंशपरंपरेनें चालक आहे हें खरें; परंतु त्याची अबाधित व अनियमित सत्ता येथें कधींच नव्हती. येथील राज्यसंस्था प्रतिनिधिक स्वरूपाची असून तिला लोकशाहीचे निर्बंध आहेत. हे निर्बंध पाळणें हें ह्या प्रांतांच्या राजाचें कर्तव्य आहे. गादीवर बसतांना ते पाळण्याची त्यास शपथ घ्यावी लागते व त्याप्रमाणें फिलिपनें ती घेतलेलीही आहे. परंतु त्या शपथेस गुंडाळून ठेवून त्यानें आमचे सर्व सनद-

---

कीय हेतु होता हें मागें सिद्ध केलेंच आहे. ह्या सिद्धीस ह्या प्रसंगामुळें जास्त बळकटी येणार आहे. दक्षिण भागांतील वालुन्स व फ्लेमिश लोक हे फिलिपसारखे रोमन कॅथोलिक धर्माचे कट्टे अभिमानी किंबहुना दुराभिमानी होते. ह्यांच्या राजकीय हक्कांचा जर त्यानें धिंडवडा केला नसता तर ते केवळ धार्मिक जुलमासाठीं त्याच्याविरुद्ध झाले नसते, हें खास.

शीर हक्क पायाखालीं तुडविले आहेत. आपली काय दशा झाली आहे, हें तुम्ही जाणतच आहां. त्यांतून वर डोकें करणें असेल तर, आपल्यांतील मतभेद, मत्सर व औदासिन्य हीं पार टाकून देऊन एकदिल व्हा व हॉलंड आणि झीलंड यांनीं जो न्याय्य झगडा चालू ठेवला आहे त्यांत सामील व्हा. × × × सर्वजण एक होऊन आम्ही प्रस्तुतचा जुलूम नष्ट करण्याचा दृढनिश्चय केला आहे असें स्पष्टपणें फिलिपला कळवा. आंत एक व बाहेर एक असलें ढोंगी व धरसोडीचें वर्तन करणारांच्या वाऱ्यास सुद्धां उभें राहूं नका. स्वातंत्र्याच्या युद्धाची जबाबदारी सर्वांनीं सारखी वाटून घेतल्याशिवाय राष्ट्रकार्याचा गाडा सुरळीत चालणें कठीण आहे. ही जबाबदारी घेण्यास भिऊं नका. × × × लहान व मोठे, श्रीमंत व गरीब, स्त्री व पुरुष, सरदार, व्यापारी, शेतकरी वगैरे झाडून सर्व प्रकारचे लोक एकमतानें आपल्या जुलमाचा प्रतिकार करण्यास सिद्ध झाले आहेत हें फिलिपच्या नजरेस आणून द्या. × × × × हॉलंड व झीलंड येथील मूठभर लोकांनीं जर इतका काळपर्यंत टिकाव धरून ह्या जुलमी सत्तेचा कोट अनेक ठिकाणीं भग्न केला, तर नेदर्लंडचे सर्व प्रांत एकत्र झाल्यावर काय करणार नाहींत ? ह्या दोन प्रांतांच्या कर्तृत्वासंबंधानें प्रारंभीं पुष्कळांस शंका वाटून त्यांनीं, 'हा पाण्याचा बुडबुडा आहे,' 'बाजारबुणग्यांचें बंड आहे,' 'उत्साही चळवळयांच्या मनोवृत्तीचें आत्मघातकी प्रदर्शन आहे' वगैरे शब्दप्रयोगांनीं आमचा उपहास केला; पण आतां त्यांची ती उपहासबुद्धि मावळत चालली आहे. म्हणून मी तुम्हास निक्षून सांगतों कीं, फिलिपच्या सेनासामर्थ्यामुळें दिपून न जातां धैर्यानें, आपल्या हक्कांकरितां चालू असलेल्या ह्या झगड्यांत निःशंकपणें सामील व्हा आणि निश्चयानें आपलें कर्तव्य करून भावी कालांतील स्वातंत्र्येच्छु लोकांस स्वातंत्र्यप्रियतेचें व जुलमी आणि एकतंत्री अंमल गाजविणाऱ्या राजास अथवा त्याच्या अधिकाऱ्यांस दहशत उत्पन्न करण्याचें उदाहरण घालून द्या."

वरील आशयाचीं अनेक गुप्त व जाहीरपत्रकें बुइल्यमनें पूर्वोक्त पंधरा प्रांतांत वाटण्याची व्यवस्था करून अनेक लहानमोठ्या महत्त्वाच्या माणसांशीं गुप्त कारस्थानेंही सुरू केलीं. त्याचा योग्य तो परिणाम होऊन सदर प्रांतांच्या लोकसभांनीं स्पॅनिश लोकांस नेदर्लंडांतून हांकून देण्यास्तव सर्व प्रांतांचा एक संघ बनविण्याची तजवीज करण्याकरितां बुइल्यमच्या हालंड-झीलंडच्या प्रतिनिधींशीं बोलणें करण्यासाठीं घेंट येथें आपापले प्रतिनिधि पाठविण्याचें ठरविलें. त्यांच्या

परिषदेची तयारी चालू असतां इकडे स्पॅनिश शिपायांच्या बंडास अधिकाधिक रंग चढत चालला होता. ठिकठिकाणीं लोकांच्या व त्यांच्या चकमकी उडून हजारों लोक त्यांच्या शस्त्रांस बळी पडत होते. त्यांनीं आतां आपला मोर्चा ब्रुसेल्सकडे वळविला. ही बातमी त्या शहरांतील लोकांस समजतांच त्यांनीं तेथील स्टेट कौन्सिलास शहरच्या रक्षणाची तजवीज करण्याची विनंती केली; परंतु ह्या कौन्सिलजवळ कागदी घोडे नाचविण्यापेक्षां जास्त महत्त्वाचें असें कांहींच सामर्थ्य व अवसान नसल्यामुळें त्यांना नवीन सैन्य उभारतां आलें नाहीं. शहरांतील लोक हें काम करण्यास तयार होते; पण त्यांस युद्धसामुग्री पुरविण्यापुरताही कौन्सिलजवळ पैसा नव्हता. अशा स्थितींत शहरवासीयांना शहर रक्षण करण्याचें नुसतें प्रोत्साहन देऊन तें स्वस्थ बसले. तेव्हां शहरांतील कांहीं लोकांच्या मनांत त्याच्या वागणुकीबद्दल संशय उत्पन्न झाला. ह्या लोकांत सायनर द हेझे या नांवाचा एक धाडसी व उत्साही देशभक्त होता. तो ब्रुसे येथील एक दुय्यम प्रतीचा सरदार असून वुइल्यमशीं त्याचा गुप्त संबंध होता. त्यानें स्टेट कौन्सिलच्या सभासदांस पकडून ब्रुसेल्स शहर आपल्या कबजांत घेण्याची एक योजना वुइल्यमला गुप्तपणें कळविली. त्यानें ती पसंत करून त्यास ती अंमलात आणण्याविषयीं प्रोत्साहन दिलें. नंतर ता. ५ सप्टेंबर १५७६ रोजीं ब्रुसेल्स येथील सरकारी राजवाड्यांत जेथें मॉर्गरेटनें मागें लुईच्या संघाच्या पुढाऱ्यांची गांठ घेतली तेथें—स्टेट कौन्सिलची बैठक चालू असतां सायनर हेझे हा पांचशें शिपायांसह तेथें आला व ब्रॅबंट प्रांताच्या लोकसभेचा प्रतिनिधि या नात्यानें त्यानें सदर कौन्सिलास मुलाखत मागितली. ती देण्याचें त्यांनीं नाकारलें व दरवाजे बंद केले. तेव्हां आपल्या शिपायांच्या मदतीनें दरवाजे फोडून त्यानें आंत प्रवेश केला. आणि कौन्सिलच्या सभासदांस कैद करून घेऊन ते निघून गेले! डयूक ऑफ अर्शोट व व्हिजलियस हे त्या बैठकीस हजर नसल्यामुळें ते मात्र बचावले. डयूक ऑफ अर्शोट यापूर्वीच वुइल्यमला अंशतः अनुकूल झालेला असल्यामुळें त्यास पकडण्यांत आलें नाहीं. पण व्हिजलियस जरी त्यावेळीं आजारी होता तरी त्यास पकडून त्याच्या राहत्या घरांतच* त्यास कैदेंत ठेवण्यांत आलें. बाकीच्या मंडळींस

---

* हा वृद्ध कौन्सिलर पुढें कांहीं महिन्यांनीं याच ठिकाणीं वारला!

एग्मॉंट व काऊंट हॉर्न ज्या कदखान्यांत खितपत पडले होते तेथें नेऊन ठेवण्यांत आलें! त्यानंतर ब्रुसेल्सची सर्व सत्ता तेथील लोकपक्षीय म्युनिसिपल अधिकाऱ्यांनीं आपल्या हातीं घेतली. ब्रुसेल्स येथें ह्या घडामोडी चालू असतां तिकडे घेंट येथें सर्व प्रांतांतील प्रतिनिधींची परिषद भरून सर्वांचें ऐक्य घडवून आणणाऱ्या संघाच्या योजनेविषयीं चर्चा सुरू झाली होती. तसेंच तिकडे फिलिपनें आपला सावत्र भाऊ डॉन जॉन याची नेदर्लंडच्या गव्हर्नर जनरलच्या जागीं नेमणूक करून त्यास सवलतींचें व सामोपचाराचें धोरण स्वीकारण्याची आज्ञा केल्याबद्दलची बातमी नेदर्लंडांत येऊन पोंचली होती. स्पॅनिश सैन्याचा धुमाकूळ तर चालूच होता. ब्रुसेल्सवर हल्ला करण्याचा बेत रहित करून हें सैन्य घेंटवर चाल करून आलें. त्या शहरांत असलेलें लोकपक्षीय सैन्य शहररक्षणास अपुरें असल्यामुळें तेथील स्थानिक अधिकाऱ्यांनीं वुइल्यमला सैन्याची मदत मागितली व कांहीं शर्तींवर ती त्यानें दिली. ह्या सैन्याच्या मदतीमुळें घेंटचें रक्षण होऊन तेथें पूर्वोक्त परिषदेचें काम चालू झालें. पण शहराच्या तटबंदीवर स्पॅनिश सैन्याच्या व शहरांतील सैन्याच्या रोज चकमकी होत होत्याच. इतक्यांत मॅस्ट्रिक्ट् शहरांतील लोकांनीं तेथील स्पॅनिश सैन्यावर हल्ला करून त्यास शहराबाहेर घालवून दिल्याची बातमी घेंटनजीक असलेल्या स्पॅनिश सैन्यास समजली; तेव्हां आपल्या बांधवांची इभ्रत संभाळण्याकरितां तें सैन्य मॅस्ट्रिक्टवर चाल करण्यास निघून गेलें. ता. २० आक्टोबर रोजीं ह्या शहरावर हल्ला करून त्यांनीं तेथील लोकांची बेहाय कत्तल व लुटालूट करून हें चवताळलेलें सैन्य ॲंटवर्पकडे वळलें. त्या शहरांत सँचू द अव्हिला, रोमेरो, रोडा, शॅंपेग्न, हावरे; वगैरे स्पॅनिश अधिकारी होते. त्यांनीं जर्मन्स व वाॅलून्स लोकांच्या पलटणींच्या साह्यानें वरील बंडखोर स्पॅनिश शिपायांचा प्रतिकार करण्याचा पुष्कळ यत्न केला; पण अखेर त्यांचा पराभव होऊन स्पॅनिश सैन्य शहरांत घुसलें व तेथेंही त्यांनीं भयंकर कत्तल व लुटालूट केली! ॲंटवर्प शहर हें सर्व नेदर्लंडाचें नाक होतें. तेथें युरोपांतील प्रत्येक देशांतील मोठमोठे व्यापारी येऊन राहिलेले होते. सर्व जगांशीं त्याचें व्यापारी दळणवळण असल्यामुळें तेथें सर्व तऱ्हेचा माल व संपत्ति हीं भरपूर होतीं. त्यावर स्पॅनिश सैन्यानें झडप घालून दोनचार दिवसांत त्यास प्रेतकळा आणून सोडली!

वरील लुटालुटीची व रक्तपाताची हकीकत वुइल्यमला समजतांच त्यानें घेंट येथें भरलेल्या परिषदेस एक उत्तेजक पत्र पाठवून तिला आपलें काम लवकर

आटोपून घेण्याची सूचना केली. धार्मिक मतभेदामुळें ह्या परिषदेंतील चर्चा बेसुमार लांबत चालली होती, परंतु अँटवर्पच्या दुर्दशाची कहाणी कानीं येतांच कॅथोलिक मताभिमान्यांचे डोळे उघडले व त्यांनीं धार्मिक विषयासंबंधीं चालू असलेली घासाघीस बंद करून स्पॅनिश सैन्यास देशांतून घालवून देण्याच्या मुद्द्यावर भर देणारा एक तहनामा मंजूर केला. यास 'पॅसिफिकेशन ऑफ घेंट' अशी संज्ञा आहे.

ह्या तहनामा एका बाजूस वुइल्यम व हॉलंड–झीलंडची लोकसभा आणि दुसऱ्या बाजूस ब्रॅबंट, फ्लँडर्स, आर्तांय हेनॉस्ट, हॅलेन्सेनीस, लिले, डूये, ऑर्चेस, नामूर, टूर्ने, युत्रेक्ट, व मेक्लीन वगैरे प्रांतांच्या लोकसभा यांच्या दरम्यान ठरला. त्यांतील मुख्य कलमें अशीं होतीं:–" ( १ ) एकमेकांनीं एकमेकांचे गतकालांतील अपराध विसरून जावे व पुढें परस्परांनीं परस्परांवर विश्वास ठेऊन मित्रत्वाचें नातें पाळावें. ( २ ) दोन्ही पक्षांनीं मिळून शक्य तितक्या लवकर स्पॅनिश सैन्याची नेदर्लंडांतून हकालपट्टी करावी. ( ३ ) हें कार्य झाल्यावर सर्व प्रांतांची इस्टेटस् जनरल ऊर्फ लोकसभा पूर्वीच्या वहिवाटीप्रमाणें भरवावी. ( ४ ) धार्मिक प्रश्नांचा व राजाच्या सत्तेसंबंधीं अखेरचा निर्णय करण्याचें काम ह्या सभेकडे सोंपवावें. ( ५ ) दोन्ही पक्षांतील लोकांना एकमेकांच्या हद्दींत वस्ती करण्याची व व्यापारी दळणवळण चालू ठेवण्याची परवानगी असावी. ( ५ ) हॉलंड व झीलंडच्या लोकांनीं आपल्या प्रांताबाहेर रोमन कॅथोलिक मताच्या प्रसारास अडथळा करूं नये व ह्या धर्माच्या लोकांस कोणत्याही रीतीनें चिडवूं नये. ( ६ ) इस्टेटस् जनरलचें अधिवेशन होईपर्यंत, फिलिप व आल्व्हा यांनीं धार्मिक अनुशासनासंबंधीं केलेल्या सर्व कायद्यांची आणि वट हुकुमांची अंमलबजावणी तहकूब रहावी. ( ७ ) स्पॅनिश सैन्यास हाकून दिल्यानंतर, हॉलंड, झीलंड व इतर प्रांतांचीं राज्यसूत्रें राजाचा मुलकी, दिवाणी व लष्करी प्रतिनिधि ह्या नात्यानें वुइल्यमनें हातीं घेऊन राज्यकारभार चालवावा. ( ८ ) १५६६ पासून सरकारी हुकुमानें जप्त झालेली मालमत्ता ज्याची त्यास परत मिळावी व कैद्यांची सुटका व्हावी. (९) हॉलंडांतील माजी रोमन कॅथोलिक धर्माधिकाऱ्याच्या स्थावर मिळकती मिळणें शक्य नसल्यास त्यास योग्य प्रकारें नुकसानभरपाई मिळावी. ( १० ) वुइल्यमनें आजपर्यंत युद्धाकरितां काढलेल्या कर्जाची फेड करण्याचा प्रश्न वरील लोकसभेपुढें मांडावा. ( ११ ) ह्या तहाचा फायदा घेऊं इच्छिणाऱ्या प्रांतानें

अथवा ( स्वतंत्र ) शहरानें त्यावर सही केल्यावांचून त्यास त्याचा फायदा मिळू नये; मात्र त्यावर सही करण्याची सर्वांस मोकळीक असावी."

ह्या तहनाम्यावर ता. ८ नोव्हेंबर १५७६ रोजीं वुइल्यम व हॉलंड-झीलंड यांच्या वतीनें सेंट अल्डेगाँड व इतर आठ प्रतिनिधि आणि बाकीच्या प्रांतांच्या वतीनें एलबर्ट लिओनियस व इतर कांहीं प्रतिनिधि यांच्या सह्या झाल्या. ह्या तहनाम्यामुळें नेदर्लंडांतील बहुतेक वादग्रस्त व तंट्याच्या बाबींचा बराच समाधानकारक निकाल लागल्याकारणानें तो वुइल्यमच्या मुत्सद्देगिरीचा एक उत्कृष्ट नमुना म्हणून नांवाजला गेला आहे. ह्यावर उभय पक्षांच्या वकिलांच्या सह्या होतांच सर्व प्रांतांतील लोकांचें ऐक्य घडवून आणण्याप्रीत्यर्थ केलेल्या परिश्रमाचें सार्थक झालें असें वाटून वुइल्यमला आनंद झाला व त्याच्या नेहमींच्या प्रवृत्तीप्रमाणें त्यानें सर्व जनतेची त्यास पद्धतशीर रीतीनें संमति मिळविण्याची निरनिराळ्या प्रांतांतील लोकसभेस सूचना केली; पण तसें करण्याचें कारणच उरलें नाहीं. शहरांतील व गांवांतील चव्हाट्यावर त्याचें जाहीर वाचन होतांच तेथील लोकांच्या झुंडीच्या झुंडी जमून आनंदद्योतक वाद्यें वाजवून व आभारप्रदर्शक भाषणें करून त्या तहनाम्याचें अभिनंदन करूं लागल्या. मग त्यांचीं मतें घेण्याचा निराळा खटाटोप कोण करतो? व करण्याची जरूरी तरी काय?

याप्रमाणें राजकारणांतील महत्त्वाचा डाव जिंकूनच यावेळीं वुइल्यम स्वस्थ बसला नाहीं. तर त्यानें आपला सेनापति काउंट होहेन्लो याच्या द्वारें, रिक्वेसेन्सनें महत्प्रयासांनें जिंकलेला झीलंडचा भाग--झीर्कझी, शौवेन, डयूवेलँड वगैरे परत मिळवून लष्करीदृष्ट्याही त्यानें आपल्या प्रतिपक्षावर मात केली! ह्या घडामोडी नेदर्लंडांत चालू असतांना इकडे एक उमदा व तरुण सरदार आपल्या सहा संरक्षकांसह मूरीश गुलमाच्या वेषानें फ्रान्सची सरहद्द ओलांडून लक्झेंबर्ग शहरांत येऊन दाखल झाला! हा सरदार दुसरा तिसरा कोणी नसून नेदर्लंडचा नवा गव्हर्नर जनरल डॉन जॉन हाच होय! यांची ओळख पुढील प्रकरणांत करून देऊं.

# प्रकरण ११ वें.

## डॉनजॉन आणि वुइल्यम.

डॉन जॉन ऑफ ऑस्ट्रिया, हा फिलिपचा बाप जो माजी चार्लस बादशहा याचा दासीपुत्र होय. ही दासी जातीची परटीण असून तिचें नांव बार्बरा ब्लुंबर्ग असें होतें. ही उत्तम गाणारीण असल्यामुळें चार्लसच्या करमणुकीकरितां त्याच्या परिवारांत तिचा प्रवेश झाला होता. पुढें कांहीं दिवसांनीं त्यांचें व तिचें मन मिळालें व त्याचें डॉनजॉन हें फळ होय. याचा जन्म जर्मनींतील रॅटिसबॉन शहरीं इ. स. १५४५ त झाला होता. राजघराण्यांत वाढल्यामुळें त्याच्या सवई, मनोवृत्ति व शिक्षण हीं सर्व राजपुत्राच्या तोडीचीं होतीं. लहानपणापासून तो पटाईत घोडेस्वार व धाडसी वीर म्हणून प्रसिद्धि पावला होता. पुढें मोठा झाल्यावर त्यानें लष्करी पेशा पत्करून मूर ( आफ्रिकन लोक ) व तुर्क लोकांशीं चार्लसनें केलेल्या लढायांत विलक्षण शौर्य गाजवून अनेक महत्त्वाचे जय मिळविले होते. पुढे तो ऑस्ट्रियाचा ड्यूक बनला होता. नेदर्लंडांत तो आला त्यावेळीं त्याचें वय बत्तीस वर्षांचें होतें. त्याचा चेहरा भव्य होता. त्याचा बांधा मजबूत व सडपातळ असून त्याची बोलण्याचालण्याची ढब नाटकी थाटाची होती. तो शूर, धीट व महत्त्वाकांक्षी परंतु कल्पनेच्या वातावरणांत भराऱ्या मारणारा होता.

रणभूमीवर त्याचें जितकें तेज पडत असे त्याच्या चतुर्थांशानेंही राजकारणांत त्याची मति चालत नसे. तथापि इंग्लंडची कैदेंत असलेली स्कॉच राणी मेरी हिची सुटका करून तिच्याबरोबर लग्न लावून इंग्लंडचा राजा होण्याचे विचार त्याच्या मनांत सारखे घोळत होते! नेदर्लंडच्या गव्हर्नर जनरलची जागा त्यानें ह्याच हेतूच्या सिद्धीकरितां पत्करली होती. नेदर्लंडांत शांतता स्थापन केल्यावर तेथील सैन्याच्या साह्यानें व फिलिपच्या सहानुभूतीनें हें कार्य सिद्धीस नेण्याचा त्याचा विचार होता. चित्ताकर्षक व गोड स्वभाव, मधुर वाणी, सुंदर चेहरा आणि जगप्रसिद्ध योद्धा म्हणून त्याची असलेली ख्याति; या साधनसामुग्रीच्या जोरावर नेदर्लंडांत आपण तावडतोब शांतता स्थापन करूं अशी त्याची उमेद होती. प्रथमतः सामोपचाराचें धोरण स्वीकारण्याबद्दल फिलिपची त्यास ताकीद होती.

परंतु 'राजाची अनियंत्रित व अबाधित सत्ता' आणि 'रोमन कॅथोलिक धर्माचें प्रतिपालन' हे दोन मुद्दे जसेच्या तसेच कायम ठेवून, इतर बाबतींत हवी ती तडजोड करण्याचा फिलिपनें त्यास अधिकार दिला होता! नेदलँडांतील लोकांचा मुख्य कटाक्ष वरील दोन मुद्यांवरच होता. रोमन कॅथोलिक मतास 'राजधर्म' म्हणून समजण्यास ते तयार होते; परंतु इतर मतांच्या लोकांचा छळ न होतां त्यांस ठराविक जागीं आपापल्या मताप्रमाणें धर्मविधी उरकून घेण्याची सवलत त्यांना पाहिजे होती. हॉलंड व झीलंड येथें बहुतेक धर्मसुधारकांचीच वस्ती असल्यामुळें त्या ठिकाणीं सार्वजनिक रीतीनें त्यांच्या मताचे विधी चालू ठेवण्यास आडकाठी नसावी, असें त्या प्रांतांतील लोकांचें म्हणणें होतें. फिलिपच्या सत्तेसंबंधानें पाहतां त्यास मुळांतच ह्या देशावर अनियंत्रित सत्ता चालविण्याचा हक्क नव्हता. तेथील सर्व कारभार इस्टेट्स जनरल नामक लोकसभेच्या संमतीनें व सल्ल्यानें चालावा अशी पूर्वापार वहिवाट होती. तसेंच स्थानिक स्वराज्याचे विस्तृत हक्क लोकांस पूर्वीच्या सनदांवरून प्राप्त झालेले होते. देशाच्या अंतर्व्यवस्थेंत परकीय अधिकारी व सैन्य यांस ढवळाढवळ करण्याचा अधिकार नव्हता. तेथील लष्करी व मुलकी खात्यांतील नोकरीवर केवळ तद्देशीय लोकांचाच हक्क होता आणि त्या जुन्या हक्काच्या आधारावरच त्यांनीं स्पॅनिश सैन्याची देशांतून हकालपट्टी करण्यासंबंधानें हट्ट धरला होता. ह्या सैन्याचा आजपर्यंत त्यांना जो अनुभव आला त्याचा विचार करितां त्यांचा हा हट्ट न्याय्य होता. अर्थात् उपरोक्त दोन्ही मुद्यांसंबंधानें लोकही आपणांस जाचक अशी तडजोड करून घेण्यास तयार नव्हते. शिवाय वुइल्यमनें आपल्या करामतीनें घेंटचा तहनामा घडवून आणून, सर्वत्र समाधान व शांतता उत्पन्न केल्यानें तर लोकपक्षाचें एक पाऊल पुढेंच पडलें होतें. तें मागें घेतल्यावांचून डॉन जॉनच्या व फिलिपच्या कल्पनेप्रमाणें उभयपक्षांत तडजोड होण्याचा संभव नव्हता. वुइल्यम, डॉन जॉन व फिलिप हे सर्व या गोष्टी जाणून होते; परंतु डॉन जॉन हा मुत्सद्दी नसल्यामुळें आणि त्याचा या वेळपर्यंतचा आयुष्यक्रम अरेबियन नाइट्समधल्या एखाद्या गोष्टींतील यशस्वी नायकाप्रमाणें गेलेला असल्यामुळें त्यांस प्रस्तुतच्या बिकट प्रसंगाची आणि वुइल्यमच्या राजकारणपटुत्वाची बरोबर कल्पना झाली नाहीं. अर्थात् आपल्या अंगच्या ज्या नैसर्गिक गुणांनीं (मधुर वाणी, गोड स्वभाव, मनोहर चेहरा, धैर्य, साहस, उत्साही व आनंदी वृत्ति, दिलदारपणा वगैरे) आज-

पर्यंत आपला आयुष्यक्रम यशस्वी होत गेला, त्याच गुणांच्या साह्यानें वुइल्यम व त्याचे अनुयायी यांस वश अथवा अंकित करून नेदर्लंडची भानगड मिटवून टाकूं, असें त्यास वाटल्यास त्यांत कांहीं नवल नाहीं. परंतु त्याचा हा डाव साधूं द्यावयाचा नाहीं असा वुइल्यमचा ठाम निश्चय झालेला होता. पराभव, आपत्ति व चिंता यांच्या ज्वालेंतून फिनिक्स पक्षाप्रमाणें वारंवार डोकें वर काढणारा खंदा मुत्सद्दी व रणभूमीवर कधींही पराजय न पावलेला उत्साही व महत्त्वाकांक्षी परंतु मनोराज्यांत गढून जाणारा शूर वीर, यांच्या दरम्यान राजनीतीच्या पटावर पुढील दोन वर्षांत झालेला सामना राजकारणी पुरुषांस अनेक दृष्टींनी बोधप्रद होण्यासारखा आहे. त्यांत वुइल्यमनें आपल्या प्रतिपक्षाचे दांत त्याच्याच घशांत घालून त्यास चीत केलें; इतकेंच नव्हे, तर अत्यंत शोचनीय स्थितींत त्यास मरावयास लावलें! तें कसें याचें थोडक्यांत वर्णन करून हें प्रकरण संपवूं.

डॉन जॉन नोव्हेंबरच्या प्रारंभीं ( १५७६ ) लक्झेंबर्ग शहरांत येऊन दाखल झाला. आल्व्हाप्रमाणें त्यानें बरोबर मोठें सैन्य आणलें नव्हतें व घेंट येथील तहनाम्यामुळें केवळ अधिकाराच्या जोरावर व वजनावर ब्रुसेल्स शहरांत प्रवेश करणें त्यास धोक्याचें वाटत होतें; म्हणून लक्झेंबर्ग येथूनच त्यानें वुइल्यम व नेदर्लंडांतील लोकसभा यांशीं सामोपचाराचें बोलणें सुरू केलें. "राजाविरुद्ध उठलेल्या लोकांनीं शस्त्रें खालीं ठेवून आपला अधिकार मान्य करावा व तसें करीपर्यंत आपले कांहीं ठळक प्रतिनिधि ओलीस पाठवावेत, म्हणजे माफीचें व सवलतीचें धोरण जाहीर करून सर्वत्र शांतता स्थापन करूं" अशा आशयाचें त्यानें बोलणें लाविलें. घेंटच्या तहनाम्याच्याद्वारें वुइल्यमनें सर्व नेदर्लंडचें एकीकरण केलें खरें; परंतु दक्षिणेकडील रोमन कॅथोलिक सरदार त्यांत नाइलाजास्तव अर्थात् नाखुषीनें सामील झाले होते. ह्या भागांतील सामान्य जनतेवर वुइल्यमचें मोठें वजन होतें व त्यालाच ते आपला त्राता समजत होते; पण वरील सरदारवर्गाची गोष्ट तशी नव्हती. रिक्वेसेन्सच्या मृत्यूनंतर राजपक्षास कोणी नेता नसल्यामुळें जो घोटाळा माजला होता त्यास भिऊन व फिलिपच्या राजकीय व आर्थिक जुलमास कंटाळून ते वुइल्यमच्या पक्षाशीं स्नेह करण्यास तयार झाले होते. त्यांना पुन्हा जर फिलिपनें अगर त्याच्या प्रतिनिधीनें मायेनें वागविण्याचें आश्वासन दिलें—त्यांचा व फिलिपचा धर्म एकच असल्यामुळें हें शक्य होतें—तर हे सरदारलोक घेंटच्या तहास बाजूस ठेवण्यास तयार होण्याचा बराच संभव होता. म्हणून डॉन जॉनशीं त्याचें

संगनमत न होऊं देण्याचा वुइल्यमनें प्रयत्न सुरू केला. डॉन जॉनचें सामोपचाराचें बोलणें ढोंगीपणाचें होतें; पण जरी तें खरें असलें, तरी डॉन जॉनचा शब्द फिलिप पाळील असा वुइल्यमला भरंवसा वाटत नव्हता. त्याच्या दरबारीं चालत असलेल्या सर्व कारस्थानांची गुप्त बातमी वुइल्यमला मिळत असे आणि त्यावरून प्रस्तुतचें सामोपचाराचें धोरण हें केवळ ढोंग आहे अशी त्याची खात्री झाली होती.* अर्थात् त्याच्या भुलथापांस अथवा शब्दजालास कोणीही बळी पडूं नये म्हणून त्यानें लोकसभांचे प्रतिनिधि, इतर महत्त्वाचे लोक आणि अधिकारी यांस अनेक खलिते, पत्रकें व खासगी पत्रें पाठवून डॉन जॉनशीं कांहींएक संबंध न ठेवतां घेंटच्या तहनाम्यास चिकटून राहण्याची विनंति केली. "हल्लींची संधी साधून आम्ही आपलें हित करून घेतलें तर बरें, नाहींतर तुमचा नाश झाल्यावांचून राहणार नाहीं. डॉन जॉनच्या बुद्धिभेदाच्या प्रयत्नास बळी पडूं नका. आपलें ऐक्य बिघडूं देऊं नका. आपलें स्वातंत्र्य व हक्क पदरांत पाडून घेण्याची ही सोन्यासारखी आलेली संधी वायां घालवूं नका. डॉन जॉनच्या मधुर व अघळपघळ बोलण्यास भुलूं नका. जबरदस्तीनें आपणांस जिंकणें शक्य नाहीं असें फिलिपला वाटूं लागल्यामुळें त्यानें आतां गोड बोलण्यास सुरुवात केली आहे. जी गोष्ट जबरदस्तीनें व धाकानें सिद्ध झाली नाहीं ती आतां मिठास भाषणाच्या लपंडावानें साधण्यास तो तयार झाला आहे; करितां डॉन जॉनवर बिलकुल विश्वास ठेवूं नका. गतगोष्टी तुम्ही आम्ही विसरूं शकूं, परंतु राजेलोक त्या विसरत नसतात. सध्यां जॉनची स्थिति चमत्कारिक झाली आहे, त्यास आपणा कोणाचें पाठबळ नाहीं म्हणून तो आज गोडगोड बोलत आहे. पण जर कां आपण त्याचा अधिकार मान्य केला, तर त्याचें खरें स्वरूप आल्व्हा व रिक्वेसेन्स यांच्याप्रमाणेंच असल्याचें आपल्या अनुभवास येईल अशी खात्री बाळगा. शक्य असल्यास त्याला एकदम पकडून कैद करा, म्हणजे पुष्कळ अनर्थ टळतील. पण तसें करण्याचें जर तुम्हांस धैर्य होत नसेल, तर निदान त्याच्या जाळ्यांत तरी सांपडूं नका. त्याच्याशीं बोलणें करणें, हा कांहीं पोरखेळ नव्हे हें लक्षांत ठेवा. त्यापासून सर्वनाश अथवा आत्मरक्षण हे दोन परस्परविरुद्ध परिणाम घडून येणार आहेत; व यांपैकीं कोणता पत्करण्यास

---

*फिलिपनें डॉन जॉनला कोणत्या बाबतींत तडजोड करण्याची मुभा दिली होती हें मागें सांगितलें आहे. त्यावरून वुइल्यमची विचारसरणी बरोबर होती असेंच ठरतें.

तुम्ही तयार आहां हें अगोदर आपल्या मनाशीं ठरवा आणि मग त्याच्याशीं बोलणें करा. स्पॅनिश सैन्याची तावडतोब रवानगी करणें, आमचे सर्व सनदशीर हक्क आम्हांस देऊन त्यांस अनुसरून वागण्याची शपथ घेणें, लोकसभेच्या तंत्रानें सर्व राज्यकारभार चालविणें, त्यांचें पूर्वीप्रमाणें वर्षांतून दोनतीनदां अधिवेशन भरविणें व सर्व किल्लेकोट पाडून टाकणें ह्या गोष्टींस जर डॉन जॉन कबूल असेल, तर त्याचा अधिकार मान्य करण्याबद्दल विचार करतां येईल. त्यावांचून नुसत्या शाब्दिक आश्वासनांची बिलकुल डाळ शिजूं देऊं नका." वगैरे प्रकारचा त्याचा उपदेश होता.

ह्या उपदेशाचा लोकसभेच्या सभासदांच्या व इतरांच्या मनावर इष्ट परिणाम होऊन त्यांनीं वरील शर्तींवर डॉन जॉनशीं बोलणें सुरू केलें. मध्यंतरीं वुइल्यमच्या पक्षास अनुकूल अशा आणखी कांहीं गोष्टी घडून आल्या. त्या अशा:—

"घेंटचा तहनामा जरी सर्व लोकांस पसंत होता, तरी त्यावर फक्त निरनिराळ्या प्रांतातर्फेंच्या वकिलांच्याच सह्या होत्या. अर्थात् त्याचें बाह्यस्वरूप सरकारी ( Diplomatic ) होतें, लौकिक ( Popular ) नव्हतें. सबब त्यास लौकिक स्वरूप देऊन पुष्टी आणण्याकरितां इ. स. १५७७ च्या जानेवारींत वुइल्यमच्या प्रेरणेवरून 'युनियन ऑफ ब्रुसेल्स' ( ब्रुसेल्सचा ऐक्यसंवर्धक संघ ) नांवाचा दुसरा एक तहनामा सर्व प्रांतांच्या प्रतिनिधींनीं तयार केला व लोकसभेंत तो पास केल्यावर त्यावर सर्व शहरांतील व गांवांतील बहुतेक प्रमुख लोकांच्या सह्या घेण्यांत आल्या. ह्या तहनाम्याचीं कलमेंही घेंटच्या तहनाम्यास अनुसरूनच होतीं. मात्र रोमन कॅथोलिक धर्माचें वर्चस्व मान्य करणारें एक कलम त्यांत जास्त होतें; परंतु घेंटचा तहनामा अंमलांत आणण्याचीही शर्त त्यांत असल्यामुळें धर्मसुधारकांना अडचण येण्याजोगी नव्हती. ह्या तहनाम्याचें काम पुरें होतें न होतें तोंच फ्रीजलँड व ग्रोनिन्गेन या प्रांतांत क्रांति होऊन ते प्रांत वुइल्यमच्या पक्षास येऊन मिळाले! ह्या घडामोडींचा डॉन जॉनच्या मनावर साहजिकच परिणाम होऊन त्यानें लोकसभेच्या मागण्या एकामागून एक—नाखुषीनें कां होईना—कबूल केल्या, तेव्हां त्या सभेनें मार्चेएन्फेमिन येथे ता. १२ फेब्रुवारी रोजीं त्याच्याशीं तह करून त्यास गव्हर्नर जनरल म्हणून मान्य करण्याचें कबूल केलें. हा तह 'पर्पेच्युअल इडिक्ट' या नांवानें इतिहासांत प्रसिद्ध आहे. या तहांत घेंटचा तह मान्य करून अंमलांत आणण्याची कबुली दिली होती, परंतु वुइल्यमच्या व हॉलंड-

झीलंडच्या प्रतिनिधींनीं त्यावर सही केली नाहीं. कारण त्यांत रोमन कॅथोलिक मताचें परिपालन करण्याची शर्त होती व या प्रांतांत बहुतेक कॅल्व्हानिस्ट लोकांचीच वस्ती असल्यामुळें तेथें सदर मताचें परिपालन करणें त्यांस शक्य नव्हतें. घेंटच्या तहांत त्यांच्यावर हा बोजा लादलेला नव्हता. त्या तहानें रोमन कॅथोलिक मताचें वर्चस्व जरी कबूल केलें असलें, तरी इतर मतांच्या प्रतिपादनास उघड व स्पष्ट बंदी केलेली नव्हती. हॉलंड–झीलंडच्या लोकांस तर त्यांच्या सुधारक मतानुसार वागण्याचीच घेंटच्या तहानें मोकळीक दिली होती. शिवाय तो तह अक्षरशः पाळणें डॉन जॉनला शक्य नाहीं, असेंही त्यांस वाटत होतें. डॉन जॉनचा सेक्रेटरी व फिलिप यांच्या दरम्यान नेदर्लंडच्या भानगडीसंबंधानें जो गुप्त पत्रव्यवहार चालू होता त्यापैकीं पंचवीस पत्रें ड्यूक ऑफ अर्शोटनें मध्येंच पकडून वुइल्यमच्या हवालीं केलीं होतीं. शिवाय इतर कांहीं महत्त्वाच्या गृहस्थांशीं फिलिपच्या सेक्रेटरीनें केलेला गुप्त पत्रव्यवहारही वुइल्यमच्या हातीं लागलेला होता. ह्या सर्व पत्रव्यवहारावरून डॉन जॉन व फिलिप यांची गोडीगुलाबीची वागणूक ही केवळ फसवणूक आहे, अशी वुइल्यमची खात्री झालेली होती. फिलिप नवीन सैन्य जमा करून डॉन जॉनच्या मदतीस पाठविण्याच्या तयारींत होता व तोंपर्यंत कालहरण करणें एवढाच या सामोपचाराच्या धोरणाचा अर्थ होता. परंतु दक्षिणेंतील कॅथोलिक-धर्मीय प्रांतांतील लोकांच्या, विशेषतः तेथील सरदारवर्गाच्या लक्षांत ही गोष्ट आली नाहीं. त्यांची मुख्य तक्रार धार्मिक नसून राजकीय होती. ती दूर करण्याचें आश्वासन डॉन जॉनकडून वरील तहाच्या रूपानें मिळालेलें पाहून त्यांच्या प्रतिनिधींनीं वुइल्यमच्या संमतीची वाट न पाहतां ब्रुसेल्स येथें ता. १२ फेब्रुवारी रोजीं त्यावर सह्या केल्या आणि नंतर तो वुइल्यमच्या संमतीकरितां त्यांनीं त्याच्याकडे पाठविला. वुइल्यमनें त्यांच्या ह्या घाईबद्दल त्यांस दोष दिला व घेंटचा तहनामा अंमलांत आणणें डॉन जॉनच्या हातून होणें कसें शक्य नाहीं, हें उपरोक्त गुप्त पत्रव्यवहाराच्या आधारानें त्यांच्या लक्षांत आणून दिलें. वुइल्यमचा विरोध दूर झाल्यावांचून आपली डाळ शिजणार नाहीं हें डॉन जॉन ओळखून होता; म्हणून त्यानें गुप्त रीतीनें आपला वकील लिओनियस यास त्याचेकडे पाठवून, त्यास त्याच्या जहागिरी, पदव्या व मुबलक पैसा देण्याचें आमिष दाखवून आणि स्पेनमध्यें कैदेंत असलेल्या त्याच्या वडील मुलाची सुटका करण्याचें आश्वासन देऊन वश

करून घेण्याची खटपट सुरू केली.* परंतु वुइल्यमनें त्यास दाद दिली नाहीं! "आपल्या देशाचें जें हित तेंच आपलें हित असल्यामुळें हॉलंड-झीलंडच्या लोक-सभेस बाजूस ठेवून, व्यक्तिशः कोणताही करार अथवा तडजोड करण्यास आपण तयार नाहीं" असें त्यानें डॉन जॉनच्या वकीलास व खुद्द त्यासही पत्रद्वारें कळविलें. याचें नांव खरी देशभक्ति!

'पर्पेच्युअल इडिक्ट' नामक तहावर ब्रुसेल्स येथें लोकसभेच्या प्रति-निधींच्या सह्या झाल्यावर, डॉन जॉननें ब्रुसेल्स येथें प्रवेश केला व स्पॅनिश सैन्याचीही स्पेनला रवानगी केली. परंतु तेवढ्यानें त्याचा कार्यभाग साधला नाहीं. कारण जोंपर्यंत वुइल्यमची अनुकूलता मिळाली नाहीं तोंपर्यंत देशांत शांतता स्थापन होऊन आपलें बूड स्थिरावणार नाहीं हें तो पक्कें जाणून होता. ब्रुसेल्समध्यें जरी त्याचें मोठ्या थाटानें स्वागत करण्यांत आलें असलें, तरी सामान्य जनतेचा त्याच्यावर विश्वास नव्हता. कांहीं कॅथोलिक सरदार व तोंडपुजे लोक एवढेच त्याचे गोडवे गात होते, पण इतर बहुतेक लोक त्याच्याकडे साशंक दृष्टीनेंच पहात होते. त्याचें लक्ष वुइल्यमच्या हालचालीकडे व धोरणाकडे लागून राहिलें होतें. कारण त्यासच ते आपला खरा त्राता व नेता मानीत होते; यामुळें डॉन जॉनच्या स्वागतसमारंभानंतर लवकरच त्यास कोणी मानीनासें व विचारीनासें झाल्यामुळें तो पुन्हा निरुत्साही व चिंताक्रांत झाला. त्याला ब्रुसेल्समध्यें राहणें धोक्याचें वाटूं लागलें. आपला जीव घेण्याविषयीं कट झाला असल्याचाही संशय

* यासंबंधीं फिलिपला लिहिलेल्या पत्रांत डॉन जॉननें पुढील आशयाचे उद्गार काढले आहेत:—"आपणांसंबंधानें नेदर्लंडच्या लोकांत जितका द्वेष व तिरस्कार उत्पन्न झाला आहे तितक्याच चढत्या प्रमाणांत वुइल्यमसंबंधीं त्यांचें प्रेम व आदर हीं वाढलीं आहेत. आपली सत्ता मान्य करणें अथवा न करणें व कॅथोलिक धर्माचें रक्षण करून शांतता स्थापन करणें ह्या गोष्टी आतां सर्वस्वीं त्याच्यावर अवलंबून असल्यामुळें मला त्याच्याशीं तडजोडीचें बोलणें सुरू करून त्याचें समाधान करण्याची हमी घेणें प्राप्त आहे. नाइलाज म्हणून असें करणें भाग आहे. तो जर मला अनुकूल झाला तर त्यास पुष्कळच सवलती द्याव्या लागतील. परंतु सर्व डाव गमावण्यापेक्षां असें करणें बरें, असें समजून मला त्या देणें भाग आहे."—मोटले.

त्यास येऊं लागला ! युद्ध सुरू करावें तर त्याच्यापाशीं पुरेसें सैन्य व पैसा नव्हता. त्यानें परत पाठविलेलें सैन्य त्यास पुन्हा आणतां येण्यासारखें होतें व गुप्त रीतीनें त्या सैन्याच्या अधिकाऱ्यांशीं त्यानें पत्रव्यवहारही सुरू केला होता. ( तो वुइल्यम-च्या हातीं लागला ) परंतु पैसा कोठून उभारावा याची त्याला पंचाईत पडली होती. नेदर्लंडांतील लोकसभांकडून असल्या कृत्यास पैसा मिळण्याचा आतां मुळींच संभव नव्हता; म्हणून त्यानें फिलिपला पैसा पाठविण्याबद्दल अनेक काकुळतीचीं पत्रें लिहिलीं, पण त्यांचा फारसा उपयोग झाला नाहीं. फिलिपजवळ तरी आतां पैसा कोठें होता ? त्याची तिजोरीही रिती झाली होती व नवीन कर्ज उभारणेंही त्यास कठीण झालें होतें. अशा स्थितींत वुइल्यमला अनुकूल करून घेण्याचा डॉन जॉननें आणखी एक प्रयत्न केला. यासंबंधानें त्यानें फिलिपला कळविलें कीं, " वुइल्यमनें येथील सर्व लोकांस इतकी भुरळ पाडली आहे कीं, त्याच्या सल्ल्यावांचून येथील पान देखील हालत नाहीं. ते त्यास पित्या-प्रमाणें पूज्य मानतात व त्याच्या शब्दास विलक्षण मान देतात. त्यांचा त्याच्यावर पूर्ण विश्वास असून आपलीं सर्व सुखदुःखें त्यास ते मोकळ्या मनानें सांगतात आणि त्याच्या संमतिवांचून व सल्ल्यावांचून ते कोणतीच गोष्ट करीत नाहींत." प्रतिपक्षाच्या पत्रांतील वरील अवतरणावरून वुइल्यमच्या योग्यतेची व महत्त्वाची खरी साक्ष वाचकांस सहज पटणारी आहे. अशा मनुष्याचा विरोध दूर करण्याचा प्रयत्न केल्यावांचून डॉन जॉनला स्वास्थ्य कोठून मिळणार ? त्याच्या मनांतून खरो-खरच हा लढा मिटवावयाचा होता; पण कॅथोलिक धर्माचें आणि राजाचें अबाधित वर्चस्व कायम ठेवून तो मिटविण्याचा त्याचा हेतु होता. खुद्द फिलिपनें त्यास त्या दोन गोष्टींस बाध न आणण्याची ताकीद दिलेली होती; पण त्या मान्य करणें हें वुइल्यम व हॉलंड–झीलंडची लोकसभा यांस शक्य नव्हतें. हॉलंड–झीलंडमध्यें कॅल्व्हानिस्ट पंथाचें प्राबल्य होतें, रोमन कॅथोलिक मताचे लोक तेथें फारच थोडे होते. अशा स्थितींत त्या त्या मताच्या परिपालनास संमति दिल्यास त्यास देशत्याग करण्यावांचून दुसरें गत्यंतर नव्हतें. गतकालांतील गोष्टी विसरण्यास जरी डॉन जॉन तयार होता, तरी भावी कालांत फक्त रोमन कॅथोलिक मताच्या प्रसारासच कबूल होता. अन्य मतां-च्या लोकांस नियमित काळांत आपल्या मालमत्तेसह सुखरूपणें देशत्याग करण्या-चीच काय ती सवलत मिळणार होती. पण आजपर्यंत प्रॉटेस्टंट व कॅल्व्हानिस्ट

लोकांनीं जे हाल सोसले व जो झगडा चालविला, तो ह्या भिकार सवलतींकरितांच चालविला काय ? त्यांच्या सात वर्षांच्या स्वार्थत्यागाचें, धैर्याचें व शौर्याचें पर्यवसान मुकाट्यानें देशत्याग करण्यांत व्हावें, हें त्यास कसें रुचणार ? अर्थात् डॉन जॉनचा वुइल्यमला वश करून घेण्याचा दुसराही प्रयत्न फसला. तेव्हां निराश व क्रुद्ध होऊन त्यानें आपली तरवार म्यानांतून बाहेर काढण्याचा निश्चय केला ! पण त्याच्याजवळ पुरेसें सैन्य व पैसा नसल्यामुळें फिलिपकडून हीं दोन्हीं साधनें येईपर्यंत स्वस्थ बसणें त्यास भाग होतें. तथापि त्यानें संधी साधून नामूर किल्ला युक्तीनें व अचानकपणें छापा घालून आपल्या स्वाधीन करून घेतला व तेथें तो जाऊन राहिला. तो निघून गेल्यावर ब्रुसेल्सच्या लोकांनीं वुइल्यमला तेथें नेऊन त्याची एक जंगी मिरवणूक काढली व तेथील सर्वप्रांतीय लोकसभेनें त्याम नेदर्लंडचीं राज्यसूत्रें देऊं केलीं; परंतु त्यानें तीं आपल्या हातांत न घेतां त्या लोकसभेच्या मार्फत एक कौन्सिल नेमून त्या कौन्सिलच्या हवालीं केलीं. वुइल्यमचें लोकांवरील वजन व वर्चस्व कित्येक कॅथोलिकपंथीय सरदारांस बघवत नव्हतें, हें मागें सांगितलेंच आहे. डॉन जॉन नामूरला निघून जातांच त्यांनीं जर्मन बादशहाचा भाऊ मॅथिस यास नेदर्लंडच्या गव्हर्नर जनरलच्या जागीं बोलाविलें व त्यास आणून वुइल्यमचें तेज फिकें पाडण्याचा घाट त्यांनीं घातला. पण वुइल्यमनें स्वतःच त्यांच्या ह्या चळवळींत पुढाकार घेऊन मॅथीसचें गौरवपूर्वक अभिनंदन व स्वागत करून ह्या सरदारांवर मात केली ! इतकेंच नव्हे, तर त्याच्या अनुयायांनीं त्यास मॅथीसचा रुवॉर्ड ऊर्फ लेफ्टनंट गव्हर्नर नेमून मॅथीसला केवळ त्याच्या हातांतलें बाहुलें बनवून टाकलें ! या सुमारास युत्रेक्ट शहर कांहीं शर्तीवर वुइल्यमच्या स्वाधीन झालें व इंग्लंडच्या राणीशीं तह करून त्यानें बरेंच सैन्य व पैसा मिळवून डॉन जॉनशीं लढण्याची तयारी केली. त्याला यावेळीं बरेंचसें स्वास्थ्य मिळाल्यामुळें त्यानें आपलीं सर्व मुलें आपल्या घरीं आणिलीं व आपला भाऊ जॉन यासही त्यानें आपल्या मदतीस बोलावून घेतलें त्याची नवी स्त्री चार्लोटी बुरबोन हिला आतां दोन मुली झालेल्या असून ती आपल्या पतीस सुख देण्याकरितां शक्य त्या रीतीनें त्याचे मन रिझवून, शिवाय त्याच्या सार्वजनिक कामाचाही भार हलका करण्यास मदत करीत होती. एकंदरींत गृहसौख्याच्या दृष्टीनें त्याचा हा काल बरा होता.

डॉन जॉननें नामूर किल्ला एकाएकीं—लोकसभेस न विचारतां—हस्तगत

केल्यापासून वुइल्यमनें त्याच्या कुटिल हेतूचें जोरानें आविष्करण–करण्यास प्रारंभ केला व परत गेलेल्या स्पॅनिश सैन्याच्या अधिकाऱ्यांशीं त्यानें केलेला जो गुप्त पत्रव्यवहार त्याच्या हातीं लागला होता तोही त्यानें प्रसिद्ध केला. तो पत्रव्यवहार व त्याची प्रत्यक्ष कृति यांचा मेळ बसलेला पाहून सर्व प्रांतांतर्फे ब्रुसेल्स येथें भरलेल्या इस्टेट्स जनरलनें–लोकसभेनें–त्यास पदभ्रष्ट करून तो आपला शत्रू असल्याचें जाहीर केलें! आणि नेदर्लंडचीं सर्व राज्यसूत्रें मागें सांगितल्याप्रमाणें मॅथिस व त्याचा ह्वॉर्ड ऊर्फ मुख्य सल्लागार वुइल्यम आणि एक कौन्सिल यांच्या स्वाधीन केलीं ह्वॉर्ड व कौन्सिल लोकसभेच्या अनुमतीनें अथवा स्वतःच्या जबाबदारीवर ज्या ज्या गोष्टी करतील त्यास निमुटपणें संमति देणें व ज्या सरकारी कागदावर वुइल्यमची सही असेल त्यावर गव्हर्नर जनरल म्हणून सही करणें, एवढीच काय ती सत्ता मॅथिस यास देण्यांत आली होती व तो माणूसही सामान्य दर्जाचा असल्यामुळें तेवढ्यावरच संतुष्ट होता–निदान त्यानें आपला असंतोष प्रगट तरी केला नाहीं. ब्रुसेल्स येथें ही घडामोड चालू असल्याच्या सुमारास तिकडे घेंट शहरांत वुइल्यमच्या पक्षपाती लोकांनीं बंड करून तेथील किल्ल्याचा विध्वंस केला व ड्यूक ऑफ अर्शाट, हेसेल्स वगैरे राजपक्षीय लोकांस पकडून प्रतिक्रियारूपानें त्यांनीं रोमन कॅथोलिक लोकांचा छळ सुरू केला! तेव्हां वुइल्यमनें तेथें जाऊन आपल्या अनुयायांची कानउघाडणी केली व अर्शाटची सुटका करून तेथें पूर्ववत् शांतता स्थापून आपली सत्ता चालू केली. ह्या सर्व घडामोडीची हकीकत डॉन जॉन वेळोवेळीं फिलिपला कळवीत असून त्यास पैसा व सैन्य पाठविण्याबद्दल सारखा विनवीत होता. अखेर फिलिपनें पैशाची कांहीं सोय करून त्याची बहीण व नेदर्लंडची पूर्वीची रीजंट मॉर्गरेट पार्मा हिचा मुलगा अलेक्झांडर ड्यूक ऑफ पार्मा याजबरोबर सुमारें वीस हजार उत्तम कसलेलें सैन्य देऊन त्यास डॉन जॉनच्या मदतीस पाठविलें. तो इ. स. १५७८ च्या जानेवारी महिन्यांत डॉन जॉनला येऊन मिळाला. तो येतांच डॉन जॉननें लढाई पुकारली. वुइल्यम व नेदर्लंडची मुख्य लोकसभा यांनींही आपल्या सैन्याची जुळवाजुळव केली. इलिझाबेथकडून ड्यूक ऑफ कॅसिमीर हा सेनापतिही (जर्मन राजपुत्र) दोनतीन हजार सैन्य घेऊन येऊन त्यास मिळाला. लढाईस प्रारंभ होतांच ड्यूक ऑफ पार्मा यानें एक धाडसी डावपेंच योजून अंमलांत आणला व तो साधल्यामुळें नामूरनजीक गेबलर्स गांवानजीक नेदर्लंडच्या सेनेचा सुमारें दीड

तासांत त्यानें धुव्वा उडवून दिला ! त्यानंतर डॉन जॉननें दुय्यम प्रतीचीं बरींच शहरें आपल्या हस्तगत करून घेतलीं. त्याची चढती कमान पाहून वुइल्यमला मॅथीससह ब्रसेल्स सोडून अँटवर्पला पळून जावें लागलें ! आणि अशा रीतीनें पुन्हा त्याची स्थिति धोक्याची होऊन बसली ! त्यांतून निभावून जाण्याकरितां त्यानें पुन्हा इलिझाबेथ, जर्मन संस्थानिक व फ्रेंच राजाचा भाऊ ड्यूक ऑफ अँजू यांच्याशीं कारस्थानें सुरू केलीं.

गेंबलर्स येथील पराभव ब्रुसेल्स येथील कॅथोलिक सरदारांच्या विश्वासघातकी वर्तनामुळें झाला अशी तेथील सामान्य जनतेची समजूत झाल्यामुळें ते ह्या सरदारांचा सूड घेण्याकरितां त्यांचे वाडे लुटण्याच्या बेतांत होते; परंतु वुइल्यमनें-त्यास हा बेत समजतांच-रातोरात लोकांच्या घरोघर हिंडून त्यांना ह्या कृत्यापासून परावृत्त केलें. पुढें थोड्या दिवसांनीं युत्रेक्ट येथील लोकसभेच्या कांहीं प्रतिनिधींच्या साह्यानें अमस्टरडॅम येथील अधिकारीवर्गास अनुकूल करून घेऊन वुइल्यमने तें शहर आपल्या हस्तगत करून घेतलें. इतक्यांत नॉयर कार्म्सचा ( हा नुकताच मेला होता ) भाऊ सायनर द सेलीस हा स्पेनमधून शिष्टाई करण्याकरितां ब्रुसेल्स येथें आला. त्याजबरोबर फिलिपनें इस्टेट्स जनरलला एक खलिता पाठवून त्याच्या शिष्टाईस मान देऊन शांतता प्रस्थापित करण्याचा उपदेश केला होता. त्यानें वुइल्यमशीं तडजोडीचें बोलणें सुरू केलें. " रोमन कॅथोलिक मताचें वर्चस्व कबूल करण्यास म्हणजे त्यास राजधर्म ( State Religion ) मानून चालण्यास आपण तयार आहों; मात्र इतर सुधारलेल्या धर्ममतांस योग्य ती सवलत राजानें घ्यावी व तसें झाल्यास शस्त्र खालीं ठेवण्यास आपण तयार होऊं " असें वुइल्यमनें ह्या शिष्टास कळविलें. पुढें डॉन जॉन, सेलीस व वुइल्यम आणि इस्टेट्स जनरल यांच्या दरम्यान ह्या शिष्टाईविषयीं बरीच वाटाघाट झाली. परंतु नवीन धर्ममतांस राजाकडून कांहीं एक सवलत मिळण्याचा संभव दिसून न आल्यामुळें तिचा कांहींएक उपयोग न होतां पुन्हा दोन्ही पक्ष युद्धास तयार झाले. ह्याच सुमारास ॲमस्टरडॅम, हार्लेम व अँटवर्प येथें धर्मसुधारकांनीं क्रांति करून सर्व सत्ता आपल्या पक्षाच्या हातांत घेतली व इतर प्रांतांतही त्यांचें प्राबल्य वाढत चाललें. बहुतेक सर्व मोठमोठ्या शहरांतून सुधारकांच्या मतानुसार जाहीर रीतीनें प्रार्थना सुरू झाल्या व त्यास हरकत करण्याची कोणास छाती होईना ! याप्रमाणें धार्मिक सहिष्णुत्वाचा जिकडे तिकडे प्रसार चालू असतांना इकडे डॉन

जॉन व इस्टेट्स जनरल यांच्यामध्यें पुन्हा युद्ध सुरू झालें. डॉन जॉनपाशीं आतां सुमारें तीस हजार सैन्य जमलें होतें व उलटपक्षाचें सैन्य फक्त अठरा हजार होतें. त्या सैन्याच्या मुख्य अधिपति काऊंट बासू हा होता. (हा पूर्वी राजपक्षाचा होता, पण ब्रुसेल्सच्या युनियनमुळें इस्टेट्स जनरलचा पक्षपाती बनला.) त्यास इलिझाबेथच्या मार्फत जर्मनींतून बारा हजार सैन्यासह ड्यूक ऑफ कॅसिमीर हा येऊन मिळणार होता. ह्या दोघांची गांठ पडण्यापूर्वीच बासूचा पराभव करून टाकण्याचा डॉन जॉनचा विचार होता. म्हणून त्यानें जुलैअखेर (१५७८) रिजेनमांट येथें त्याच्या सैन्याशीं लगट करून लढाई दिली; पण त्यांत डॉन जॉनच्या सैन्याचाच पराजय झाला; तेव्हां डॉन जॉन पिछेहाट करीत नामूरनजीक येऊन पोंचला. बासूजवळ सैन्य कमी असल्यामुळें त्यानें त्याचा पाठलाग केला नाहीं. पुढें ता. २६ ऑगस्टच्या सुमारास मेक्लीन शहराच्या आसपास त्याचा तळ पडला असतांना तेथें ड्यूक ऑफ कॅसिमीर त्यास येऊन मिळाला.

मध्यंतरीं वुइल्यमच्या वाढत्या सत्तेचा दर्प सहन न झाल्यामुळें त्याचा हेवा करणाऱ्या कॅथोलिक सरदारांच्या पक्षानें फ्रेंच राजाचा भाऊ ड्यूक ऑफ आँजू यास इस्टेट्स जनरलच्या मदतीस येण्याची गुप्तपणें विनंति केल्यावरून तो मॉन्स शहरानजीक सैन्यासह येऊन राहिला होता. वुइल्यम स्वतःच जरूर पडेल तेव्हां त्यास बोलावण्यास तयार असल्यामुळें त्या उभयतांचा यापूर्वीच स्नेह जडलेला होता. अर्थात् कॅथोलिक सरदारांचा हा डावही त्यांच्याच गळ्यांत घालण्यास त्यास बिलकूल श्रम पडले नाहींत. त्यांच्या गुप्त चळवळीकडे दुर्लक्ष करून त्यानें उघडपणें त्यास निमंत्रण करण्याची इस्टेट्स जनरला सल्ला दिली व बऱ्याच वादविवादाअंतीं सदर लोकसभेनें तसें करण्याचें कबूल करून त्याच्याशीं ता. २० ऑगस्टच्या सुमारास पुढील आशयाचा करार केलाः—

(१) स्पॅनिश जुलमापासून नेदर्लंडची सुटका करण्याकरितां व सध्यां डॉन जॉनच्या अन्यायाच्या स्वारीपासून ह्या देशाचें रक्षण करण्याकरितां सदर ड्यूकनें मदत करावी. (२) त्याकरितां त्यानें दहा हजार पायदळ व दोन हजार घोडेस्वार तीन महिनेपर्यंत पुरवावें. त्यानंतर ह्या सैन्याच्या एकतृतीयांश सैन्य त्यानें नेहमीं इस्टेट्स जनरलच्या मदतीस द्यावें. (३) नेदर्लंडनें त्यास “स्पॅनिश जुलमापासून नेदर्लंडची सुटका करून त्याचें स्वातंत्र्य रक्षण करणारा” असा किताब द्यावा व त्यानें

इलिझाबेथशीं वैर करूं नये. (४) त्याला जरूर पडेल तेव्हां इस्टेट्स जनरलनें त्यास वरील सैन्याइतकीच सैन्याची मदत करावी. (५) नेदर्लंडच्या मुलकी कारभारांत फेरफार करण्याचा त्यास अधिकार नसावा. (६) ह्या देशांतील कोणत्याही प्रांताशीं अथवा शहराशीं त्यानें स्वतंत्र तह करूं नये. (७) इस्टेट्स जनरलने फिलिपच्याऐवजीं दुसऱ्या कोणास नेदर्लंडचें राजपद देण्याचें मनांत आणल्यास प्रथम ह्या ड्यूकला या वेळीं योग्य दिसतील त्या शर्तींवर-तें द्यावें. (८) ड्यूकनें फ्रेंच सैन्याखेरीज इतर परकें सैन्य आणूं नये.

वरील कराराची बातमी इलिझाबेथ राणीला समजतांच तिला राग आला व ड्यूक ऑफ ऑंजूला नेदर्लंडच्या मदतीस येण्याचा प्रसंगच येऊं नये म्हणून फिलिप व डॉन डॉन यांजकडे वकील पाठवून हा तंटा मिटविण्याची तिनें त्यांस विनंति केली. जर्मन बादशहाचा भाऊ मॅथीस हा ऑंजूच्या आगमनानें पूर्ण निस्तेज होणारा असल्याकारणानें त्याच्या विनंतीवरून त्या बादशहानेंही इलिझाबेथच्या मध्यस्थीस दुजोरा दिला. तेव्हां पुन्हा डॉन जॉन व नेदर्लंडची इस्टेट्स जनरल आणि वुइल्यम यांच्यामध्यें तडजोडीचें बोलणें सुरू झालें. इलिझाबेथ व जर्मन बादशहा यांचे प्रतिनिधीही सदर वाटाघाटीच्या वेळीं हजर राहून डॉन जॉनची समजूत करीत होते; परंतु कॅथोलिक धर्माचें वर्चस्व आणि राजाची अबाधित सत्ता ह्या दोन बाबतींत बिलकुल सवलत देण्यास तो तयार नसल्यामुळें शांतता राखण्याचा हा शेवटचा प्रयत्नही फुकट गेला ! त्यानंतर पुन्हा युद्धास सुरवात व्हावयाची, पण दोन्ही पक्षांजवळ द्रव्याचा अभाव असल्यामुळें त्यांचे सैनिक असंतुष्ट होऊन बिथरण्याच्या मार्गांत असल्याकारणानें दोन्ही पक्षांकडून युद्धाविषयीं दिरंगाई चालू होती. डॉन जॉन तर ह्या विवंचनेमुळें त्रस्त व संतापग्रस्त होऊन नामूरजवळ आपल्या लष्करी तळांत तापानें आजारी पडला होता. तशांत त्याचा निरोप घेऊन स्पेनला गेलेल्या खाजगी कारभाऱ्याचा फिलिपनें गुप्तपणें खून करविल्याची बातमी पोंचली व त्याच्या राजनिष्ठेसंबंधानेंही फिलिपच्या मनांत किंतु उत्पन्न झाल्याचें वृत्त त्यास समजलें ! त्याच्या हातून वस्तुतः तसा किंतु येण्यासारखें वर्तन मुळींच घडलें नव्हतें; परंतु फिलिपच्या एका सेक्रेटरीनें-तो डॉन जॉनचा मत्सर करीत असल्यामुळें-त्याच्या गुप्त पत्रांतील कांहीं मजकुराचा विपर्यास करून फिलिपचें मन त्याच्याविषयीं व त्याच्या खाजगी कारभाऱ्याविषयीं कलुषित केलें व त्याचें पर्यवसान सदर कारभाऱ्याच्या खुनांत झालें ! फिलिपनें

आपल्या मनांत आलेल्या किंतूची डॉन जॉनला स्वतः ओळख दिली नव्हती, तथापि अन्य रीतीनें त्याला त्याची कुणकूण समजली होती. तशांत त्याच्या पैशाच्या मागणीकडे त्याचें दुर्लक्ष होत गेल्याकारणानें फिलिपनें आपणांस समुद्रांत अथवा आगींत लोटून दिलें असें वाटून त्याचें मन जास्तच उदास व खिन्न होत गेलें आणि त्याचा ताप वाढत जाऊन त्यास वायूची लहर येऊं लागली! अखेर हें दुखणें असाध्य होऊन त्यांतच ता. १ आक्टोबर रोजीं (१५७८) त्याचा अंत झाला! वुइल्यमला लांचाचें आमिष दाखवून, नेदर्लंडच्या लोकांस माफीच्या आणि सवलतीच्या भुलथापा देऊन व त्यांचा उपयोग न झाल्यास तरवारीच्या जोरावर तेथें शांतता स्थापून, इंग्लंडच्या दुर्दैवी मेरी राणीची कैदेंतून सुटका करून, तिच्याशीं विवाह करण्याच्या मनोराज्यांत गुंग होणाऱ्या ह्या शूर व तरुण वीराचा अखेर अशा शोचनीय रीतीनें अंत झालेला पाहून कोणासही त्याची कींव आल्यावांचून राहणार नाहीं!

# प्रकरण १२ वें.

# फिलिपच्या कौटिल्याचा कळस !

घेंटचा तह व ब्रुसेल्सचा संघ, ह्या दोन घटनांच्या द्वारें वुइल्यमनें नेदर्लंडांतील सर्व प्रांतांचें ऐक्य घडवून आणलें खरें, परंतु तें कसें कायम टिकेल याबद्दल त्याला मोठी चिंता वाटत होती. कारण उत्तर भागांतील डच व जर्मन्स आणि दक्षिणभागांतील वालून्स व फ्लेमिश लोक फिलिपच्या राजकीय जुलुमास सारखेच कंटाळल्यामुळें कांहीं काल एक झाले, तरी त्यांच्या दरम्यान तीव्र धार्मिक मत-भेद, भाषाभेद व परस्परमत्सर ह्या ऐक्यविघातक कारणांचा दुर्भेद्य तट असल्या-मुळें त्यांचें ऐक्य कायम टिकणें दुरापास्त होतें. तशांत फिलिपचा नवा व्हॉइस-राय अलेक्झांडर पार्मा हा पूर्वींच्या सर्व व्हॉइसरायांपेक्षां जास्त कर्ता पुरुष असून उत्तम मुत्सद्दी आणि शूर सेनानी असल्यामुळें सदर ऐक्य कायम राखण्याचा मार्ग जास्तच बिकट होऊन बसला. तरी देखील तें कायम राखण्याप्रीत्यर्थ वुइल्यमनें आपल्या प्रयत्नांची शिकस्त केली, पण दक्षिण भागांतील कॅथोलिक सरदार पार्माच्या लांचलुचपतीच्या धोरणास बळी पडून, सामान्य जनता त्याच्या लष्करी सामर्थ्यास भ्याल्यामुळें आणि विशेषतः ह्या दोन्ही वर्गांतील लोकांच्या देशाभिमानास त्यांच्या धार्मिक दुरभिमानाचें ग्रहण लागल्यामुळें, त्यांस यश आलें नाहीं. तशांत त्याचा पुढें लवकरच आकस्मिक रीतीनें अंत झाल्यामुळें त्याच्या मनांत घोळत असलेला सर्व नेदर्लंडाच्या एकीकरणाचा हेतु तसाच अपुरा राहिला. तथापि हॉलंडचें स्वतंत्र राष्ट्र निर्माण करून मानवजातीच्या इतिहासांत त्यानें महत्त्वाची कामगिरी बजाविली आहे यांत शंका नाहीं. हें कार्य अखेर कसें घडून आलें याचा त्रोटक वृत्तांत व वुइल्यमच्या आकस्मिक मृत्यूची हृदयद्रावक कहाणी प्रस्तुत प्रकरणांत सांगून आम्हीं हें चरित्र पुरें करणार आहों.

डॉन जॉन यानें मरणसमयीं अलेक्झांडर ड्यूक ऑफ पार्मा यास आपल्या जागीं गव्हर्नर–जनरल नेमिलें. थोड्या दिवसांनंतर फिलिपचीही ह्या नेमणुकीस अनुमति मिळाली व पार्मा नेदर्लंडच्या गव्हर्नर जनरलचें काम पाहूं लागला. हा पुरुष यावेळीं तेहेतीस वर्षांचा असल्यामुळें ऐन

उमेदींत होता. तो मोठा शूर, धूर्त व धाडसी होता. युद्धकला व मुत्सद्दी-पणा ह्या दोहोंतही तो सारखाच प्रवीण असून, युरोपांत त्यावेळीं प्रचलित असलेल्या मॅकेव्हिलीयन राजनीतींत तर तो अगदीं पटाईत होता. रोमन कॅथोलिक धर्माचाही तो कट्टा अभिमानी होता. तो पूर्वी लहानपणीं कांहीं काल नेदर्लंडांत राहिलेला असल्यामुळें तेथील लोकांची त्याला चांगली माहिती होती. वुइल्यमच्या लोकप्रियतेमुळें त्याचा मत्सर करणाऱ्या दक्षिण भागांतील कॅथोलिक सरदारांची मनोवृत्ति त्यानें चांगली ओळखून ठेविली होती. त्यांस अनुकूल करून घेऊन घेंटच्या तहाप्रमाणें ब्रुसेल्सच्या युनियननें नेदर्लंडच्या ऐक्याची उभारलेली इमारत पाडून टाकण्याचा त्यानें संकल्प केला. परिस्थितीही त्याला अनुकूल होत गेली. उपरोक्त सरदारांनीं वुइल्यमचें तेज फिकें पाडण्याकारितां जर्मन बादशहाचा बंधु मॅथीस व ड्यूक ऑफ ऑंजू यास नेदर्लंडांत आणून त्यांच्या हातीं सर्व राज्य-सूत्रें देण्याचा प्रयत्न केला होता; पण त्यांत वुइल्यमनेंच त्यांच्यावर मात करून त्यांस फजीत केल्यामुळें ते त्याच्यावर मनांतल्या मनांत जळफळत होते. परंतु बहुजन-समाजाचें- मध्यम व कनिष्ठ वर्गांतील लोकांचें-त्याच्यावर प्रेम असल्यामुळें उघड-पणें त्याला विरोध करण्याचें धैर्य त्यांस होत नव्हतें. अशा वेळीं फिलिपच्या वतीनें त्यांची समजूत करून त्यांस वश करून घेण्याचा प्रयत्न जर कोणी एखाद्या सामर्थ्य-वान् पुरुषानें केला असता, तर तो सफळ होणें अगदीं सुलभ होतें. ही गोष्ट पार्माच्या लक्षांत येऊन त्यानें त्यांस लांच व बहुमानाच्या पदव्या देऊन वश करण्याचा प्रयत्न आरंभिला. त्यासरशीं हेनॉल्ट व त्याच्या नजीकच्या प्रांतांतिले मॉंतीग्नेज, मोटस, मेलून्स, एगमॉंटस्, अर्शोटस, हाव्हरेज, यांच्यासारखे अनेक सरदार आपला स्वार्थ साधण्याकरितां मातृभूमीशीं हरामखोरी करण्यास तयार झाले ! सरदारलोकांस ह्याप्रमाणें वश करून घेतल्यावर इतर जनतेस लष्करी दंडुक्याचें भय दाखविण्यास पार्मानें सुरुवात केली. तशांत घेंट येथें प्रॉटेस्टंट लोकांनीं दंगा करून रोमन कॅथोलिक लोकांचा छळ सुरू केला व त्याचें अनुकरण इतर ठिकाणींही थोडेंबहुत झालें ! ह्या अतिरेकाचा वुइल्यमनें वेळोवेळीं बंदोबस्त केला. घेंट येथें दुसऱ्या खेपेस झालेल्या दंग्याचा उपशम तर त्यानें कडक उपाय योजूनही केला; परंतु हे प्रकार सर्वस्वीं एकदम बंद करणें त्या कालीं त्यास शक्य नव्हतें. धार्मिक बाबतींत सर्वत्र पूर्ण मतस्वातंत्र्य असावें अशा विचाराचा पुरुष त्यावेळीं

वुइल्यम एकटाच होता.. त्याचा भाऊ जॉन व परम मित्र सेंट अल्डेगाँड हे सुद्धां अनुक्रमें प्रॉटेस्टंट व कॅल्व्हानिस्ट मताचे पक्षपाती व अभिमानी होते. इतर बहुतेक धर्मसुधारकांस रोमन कॅथोलिकांच्या हद्दींत, आपणांस धर्मस्वातंत्र्य असावें असें वाटत होतें, परंतु आपल्या हद्दींत रोमन कॅथोलिक लोकांस तितकेंच धर्मस्वातंत्र्य देण्याइतकें औदार्य त्यांच्या ठायीं नव्हतें! सुधारक, रोमन कॅथोलिक मत अग्राह्य समजून त्यास बहिष्कार घालण्यास तयार होते व रोमन कॅथोलिक, सुधारकांच्या मतांची पाखंडांत गणना करून त्यांस नास्तिक समजून त्यांचा छळ करण्यास तयार होते. अशा विचित्र समजुतींच्या लोकांत पूर्ण धार्मिक स्वातंत्र्याचा उदय एकाएकीं होणें अशक्य होतें. म्हणून त्यांस वेळोवेळीं परमतसहिष्णुत्वाचे धडे वुइल्यम शिकवीत होता व त्या कामीं त्यास बरेंच यशही आलेलें होतें. तथापि अशा संक्रमणावस्थेंत घेंटच्या दंग्यासारखे कांहीं अनिष्ट प्रकार मधून मधून व्हावयाचेच. त्याचा उपशम करून लोकांची समजूत व समाधान करणें हेंच त्यांच्या खऱ्या हितचिंतकांचें यावेळीं कर्तव्य असतें. तें कर्तव्य त्यांस निर्वेधपणें बजावितां आलें तर अखेर इष्ट कार्य साधतें; परंतु अशा वेळीं जर का कोणा हितशत्रूनें वरील अनिष्ट प्रकाराच्या मुळाशीं असणाऱ्या कारणांचा जाणूनबुजून विपर्यास करून जनतेचा गैरसमज केला तर इष्टकार्यांचा नाश झाल्यावांचून रहात नाहीं. पार्मा व त्याचे साथीदार यांनीं धर्मसुधारकांच्या प्रस्तुत अतिप्रसंगाचा असाच विपर्यास करून दक्षिण भागांतील सामान्य जनतेचीं मनें वुइल्यम व त्याचे अनुयायी यांच्याविषयीं कलुषित करण्याचा प्रयत्न सुरू केला. त्यामुळें सर्व नेदर्लंडांत जिकडे तिकडे साशंकवृत्ति व घोटाळा माजून राहिला व कोणी कोणास जुमानीनासें झालें!* यासंबंधानें सेंट अल्डेगाँड यानें ब्रुसेल्सहून वुइल्यमला लिहिलेल्या पत्रांत असे उद्गार काढले आहेत:—“ खऱ्या धर्माचा ( प्रॉटेस्टंट ) सर्वत्र द्वेष केला जात असून आमच्याविषयीं चहूंकडे संशय बोकाळत आहे. आमच्या अभावीं आपला नाश झाला

* ह्या स्थितीचें वर्णन मोटलेनें असें केलें आहे:—“There was nothing but dissensions, jealousies-heart-burnings, hatred; every one claimed to rule, no one would obey.” ( आजची महाराष्ट्राची स्थिति बहुतेक अशीच आहे.—संपादक.)

तरी हरकत नाहीं; परंतु आमचें साह्य नको अशी तेथील लोकांची वृत्ति बनत चालली आहे. त्यामुळें सर्वत्र घोंटाळा माजून राहिला आहे. आपण स्वत: येऊन कांहीं तरी तोड काढाल तर बरें, नाहीं तर सर्व कांहीं आटोपलें म्हणून समजा.” वुइल्यमचा भाऊ जॉन ( जो त्यावेळीं त्याच्या आग्रहावरून गेल्डरलँड प्रांताचा गव्हर्नर झाला होता ) यानेंही आपल्या जर्मन मित्रास लिहिलेल्या पत्रांत वरच्या-सारखेच उद्गार काढलेले आहेत. ही स्थिति दूर करून लोकांचें समाधान व ऐक्य राखण्याकरितां वुइल्यमनें विनंतिपत्रें, भाषणें, रदबदली वगैरे अनेक रीतीनें बहुत श्रम केले व त्यास मधून मधून यशही येत गेलें. परंतु दक्षिणेंतील सरदार व पार्मा यांनीं त्यांत सारखा विघ्न घालण्याचा उद्योग चालू ठेविल्यामुळें वुइल्यमच्या प्रयत्नांस कायमचें यश आलें नाहीं. थोड्याच दिवसांत घेंटच्या तहांतील धार्मिक बाबतींतली तडजोड धाब्यावर बसविणारा व त्यास उद्धटपणें विरोध करणारा रोमन कॅथोलिक मताभिमान्यांचा एक पक्ष निर्माण झाला. त्यांत दक्षिणभागांतील सरदार लोकांचाच विशेष भरणा होता. तेथील इतर वर्गांतल्या लोकांवर अद्याप वुइल्यमचें वर्चस्व होतें व त्याच्या धार्मिक बाबतींतील तडजोडी मान्य करून ते बऱ्याच अंशीं त्याच्या तंत्रानें चालत होते.

वरील घोंटाळ्याची स्थिति उद्भवल्यामुळें आणि दक्षिण व उत्तर भागांतील लोकांत दिवसानुदिवस जास्तच फूट पडण्याचा संभव दिसूं लागल्यामुळें वुइल्यमचा भाऊ जॉन ह्यानें उत्तरेकडील ज्या प्रांतांचें ऐक्य कायम टिकण्याजोगें होतें त्या प्रांतांचा एक संघ बनविण्याचा विचार करून तो अंमलांत आणला. ह्या संघाच्या घटनेस ‘युनियन ऑफ युत्रेक्ट’ अशी संज्ञा आहे. त्यांत प्रथम गेल्डरलँड, झुटफेन, हॉलंड, झीलंड, युत्रेक्ट ह्या पांच प्रांतांचा समावेश केलेला होता व मागून कांहीं दिवसांनीं ग्रेनिन्गेन व ओव्हरयेसेल हे दोन प्रांतही त्यांत सामिल झाले.* ( इ. स. १५७९ चा आरंभ ) याखेरीज ब्रेडा, व्हेनलू, ॲंटवर्प, लीअर, ब्रुजेस, घेंट, इप्रेस वगैरे दक्षिण भागांतील शहरेंही ह्या संघांत सामिल झालीं होतीं. हा संघ बनवितांना जॉननें वुइल्यमची संमति घेतली होती, किंबहुना त्याच्या सल्ल्या-

* विस्तारभयास्तव ह्या संघाची शासनपद्धति येथें दिली नाहीं. ती जर्मन संस्थानांच्या संघाच्या शासनपद्धतीप्रमाणें होती. जर्मनसंघाची ऊर्फ साम्राज्याची शासनपद्धति सध्यां लोकांच्या डोळ्यासमोर आहेच. ज्याच्या नसेल त्यानें आमच्या बिस्मार्कच्या चरित्रांतील ‘उत्तर जर्मनसंघाची स्थापना’ हें प्रकरण वाचावें.

वरूनच तो त्यानें बनविला होता; परंतु अद्याप नेदर्लंडांतील सर्व प्रांतांचा एकच संघ बनविण्याची वुइल्यमची आशा नष्ट झालेली नसल्यामुळें त्यानें जाहिर रीतीनें व सरकारी रीतीनें ( Officially ) ह्या संघास मान्यता देण्याचें काम लांबणीवर टाकलें.

पार्मानें भेदनीतीबरोबर दंडनीतीचाही प्रयोग सुरू केला होता. दक्षिणेंतील वालून्स लोकांच्या वस्तीनें भरलेल्या प्रांतांत वुइल्यमशी उघडपणें विरोध करणारा जो पक्ष निर्माण झाला होता त्याच्याशीं गोडीगुलाबीचें धोरण ठेवून इतर प्रांतांतील लोकांस दंडुक्याच्या जोरावर पादाक्रांत करण्याचा डाव पार्मा खेळूं लागला होता. इ. स. १५७९ च्या मार्च महिन्यांत त्यानें अँटवर्पवर हल्ला करण्याचा बहाणा केला व तेथील नगररक्षकांशीं एक चकमक उडाल्यानंतर तो अकस्मात् मेस्ट्रिक्ट शहराकडे वळला. हें शहर जर्मन सरहद्दीनजीक म्यूजनदीच्या कांठीं होतें. त्याच्या वरच्या व खालच्या बाजूस म्यूजनदीवर पूल बांधून पार्मानें त्यास वीस हजार सैन्यानिशीं वेढा दिला. ह्या वेढयाची हकीकत हार्लेमच्या वेढयासारखीच असून त्याचा परिणामही हार्लेमच्या वेढयाप्रमाणेंच दुःखकारक झालेला आहे! हार्लेमला मदत पोंचविण्याकरितां वुइल्यमनें जशी आपली पराकाष्ठा केली तशीच ह्या शहरासंबंधानेंही केली; परंतु द्रव्याभावामुळें त्यास हार्लेमप्रमाणेंच ह्या शहराचीही सुटका करतां आली नाहीं!

ह्या वेढयाचें काम व वालून्स लोकांचे प्रांत ब्रुसेल्सच्या संघांतून फोडण्याचें काम बरोबरच चालू होतें. हे प्रांत सदर संघांतून फुटूं नयेत म्हणून ब्रुसेल्सच्या इस्टेट्सजनरल मार्फत वुइल्यमनें त्या प्रांतांतील लोकसभांच्या पुढाऱ्यांशीं पुष्कळ प्रकारें बुद्धिवाद केला. त्यानें त्यांच्या धार्मिक मनोवृत्ति न दुखविण्याची हमी घेऊन त्याबद्दल आपलीं मुलें सुद्धां ओलीस म्हणून त्यांच्या हवालीं करण्यास तो तयार झाला पण त्याचा कांहीं एक उपयोग न होतां आर्तोय व हेनॉल्ट हे वालून्स लोकांचे प्रांत ब्रुसेल्सच्या संघांतून फुटलेच! त्यांनी पार्माशीं स्वतंत्र तह केला. ( इ. स. १५७९ चा आरंभ ) 'आरासचा तह' या नांवानें तो प्रसिद्ध असून त्यांत पुढील कलमें होतीं:—( १ ) सदर प्रांतास पूर्वीच्या सनदानुसार प्राप्त झालेले स्थानिक कारभारासंबंधाचे हक्क व सवलती फिलिपनें मान्य करून त्यांचा त्यांस उपभोग घेऊं द्यावा. ( २ ) फिलिपच्या घराण्यांतील, कायदेशीर विवाहसंबंधापासून उत्पन्न झालेला राजपुत्र सदर प्रांतांचा नेहमीं गव्हर्नर जनरल असावा ( ३ ) तेथें असलेलं परराष्ट्रीय, स्पॅनिश सैन्य ताबडतोब परत पाठविण्यांत यावें.

ह्या प्रांतांतील वाल्न्स लोक हे रोमन कॅथोलिक मताचे अभिमानी असल्यामुळें धार्मिक बाबतींत त्यांच्या व फिलिपच्या दरम्यान लढा उत्पन्न होण्याचा संभव नव्हता. अर्थात् त्यासंबंधानें ह्या तहांत कोणतेंच कलम घालण्यांत आलें नाहीं. वाल्न्स लोकांचा हा हट्ट पाहून ब्रॅबंट व फ्लँडर्स ह्या दक्षिण भागांतील प्रांतांतल्या प्रॉटेस्टंट लोकांना चीड आली! त्यामुळें घेंट व अँटवर्प येथें मोठे दंगे होऊन कॅथोलिकांचीं देवळें लुटण्यांत आलीं! हे दंगे वुइल्यमनें मोडले व तेथील लोकांस धार्मिक सहिष्णुत्व बाळगण्याचा उपदेश करून त्यानें पुन्हा तेथें शांतता स्थापन केली. नेदर्लंडांत उत्पन्न झालेली वरील घोटाळ्याची स्थिति पाहून तेथील लोकांच्या मदतीस आलेला ड्यूक ऑफ कॅसिमीर हा कंटाळून जर्मनीस परत गेला. तसेंच फ्रेंच राजाचा भाऊ ड्यूक ऑफ ऑंजू हाहि इलिझाबेथशीं आपलें लग्न जुळविण्याकरितां इंग्लंडला निघून गेला. पुढें जर्मन सम्राटाचा भाऊ मॅथीस हाहि वुइल्यमच्या सूचनेवरून व्हिएन्ना शहरास परत गेला.

वाल्न्स लोकांचे प्रांत जरी पार्मास अनुकूल झाले तरी इतर प्रांतांनीं त्याच्याशीं युद्ध चालू ठेवलें होतें व त्याकामीं फ्रान्स, इंग्लंड व जर्मनी येथून मदत मिळविण्याचे वुइल्यमचे प्रयत्न सारखे चालू होते. या सुमारास वुइल्यमशीं व त्याच्या हुकमतीखालीं असणाऱ्या प्रांतांशीं तडजोड करून शांतता स्थापण्याचा फिलिपनें आणखी एक प्रयत्न केला. इंग्लंडची राणी, जर्मन सम्राट् यांच्या आग्रहावरून व मध्यस्तीनें हा प्रयत्न करण्यांत आला. त्याकरितां कोलोन येथें (इ. स. १५७९) एक मोठी परिषद भरली होती. आरासच्या तहास इतर प्रांतांनी मान्यता देऊन शस्त्र खालीं ठेवावें व वुइल्यमनें नेदर्लंड सोडून जर्मनींत जावें म्हणजे त्यास त्याच्या जप्त झालेल्या सर्व जहागिरी व कर्जाची फेड करण्याकरितां चार लक्ष क्रौन देऊन त्याच्या वडिल मुलाची सुटका करण्यांत येईल असें फिलिपच्या वकिलांनीं बोलणें लावलें. परंतु घेंटच्या तहनाम्याबरहुकूम धार्मिक स्वातंत्र्य देण्याची व नेदर्लंडांतील जुन्या शासनपद्धतीचें पुनरुज्जीवन करण्याची फिलिपची तयारी असेल तर आपण आनंदानें नेदर्लंड सोडून जाऊं; एरवीं तसें करणें शक्य नाहीं असें वुइल्यमनें स्वतःच्या वतीनें व हालंड झीलंडच्या वतीनें फिलिपच्या वकिलास कळविलें. ब्रुसेल्स येथील इस्टेट्स् जनरलच्या प्रतिनिधींनींही त्याच्याच म्हणण्याचा अनुवाद केला. फिलिपला ह्या मागण्या मान्य करावयाच्या नसल्यामुळें ४।५ महिने ह्या परिषदेचें काम चालून अखेर ती भरली तशीच विसर्जन पावली. त्यानंतर

थोड्या दिवसांनीं वुइल्यमचा भाऊ जॉन हा आपल्या जहागिरीची अव्यवस्थित स्थिति सुधारण्याकरितां म्हणून जर्मनींत परत गेला.

दक्षिण भागांतील दोन प्रांत पार्माच्या कपटनीतीस बळी पडले परंतु बाकीचें सर्व नेदर्लंड अद्याप वुइल्यमच्या तंत्रानें चालण्यास तयार होतें. फ्लँडर्स व ब्रॅबंट ह्या दक्षिणेंतील दोन मुख्य प्रांतांच्या लोकसभेच्या प्रतिनिधींनीं तर त्यास त्या प्रांतांच्या गव्हर्नरची जागा पत्करण्याची विनंति केली होती! त्यानें ती मान्य केली नाहीं ही गोष्ट निराळी. पण सदर विनंतीवरून तेथील लोकांचा अद्याप त्याजवर किती विश्वास होता हें स्पष्ट होण्यासारखें आहे. ब्रुसेल्स येथील सर्व प्रांतांच्या प्रतिनिधींची इस्टेटस् जनरल ऊर्फ नेदर्लंडची मुख्य लोकसभा हिचाही अद्याप त्याच्यावर पूर्ण विश्वास होता. आणि त्याच्या सल्ल्यावांचून कोणतीहि महत्त्वाची गोष्ट करण्यास ही लोकसभा तयार नव्हती. त्याला सामोपचारानें व लांचलुचपतीनें वश करण्याचे फिलिपनें कसे प्रयत्न केले व त्यांचा अखेर काय परिणाम झाला, हें मागें सांगितलेंच आहे! दंडनीतीनेंही तो फिलिपला अनुकूल होण्याचा संभव नव्हता. त्यास अनुकूल करून घेतल्यावांचून अथवा त्याचा कांटा कोणत्याना कोणत्या तरी रीतीनें काढून टाकल्यावांचून नेदर्लंडचा प्रश्न समाधानकारक रीतीनें सुटणें शक्य नाहीं अशी आजपर्यंतच्या अनुभवावरून फिलिपची खात्री झाली होती. गोडीगुलाबीनें, युद्धानें व गुप्त मारेकऱ्यांच्या धाकानें आपल्या मार्गांतला हा कांटा काढून टाकण्याचे फिलिपचे सर्व प्रयत्न जेव्हां फुकट गेले, तेव्हां अखेर त्यानें सर्व लाजलज्जा बाजूस ठेवून त्याजवर उघडपणें मारेकरी सोडण्याचा अत्यंत अश्लाघ्य असा प्रयोग सुरू केला! त्यास त्यानें जाहीर रीतीनें आपला शत्रू व गुन्हेगार ठरविण्याकरितां एक निषेधपत्र ( Ban ) काढून ( १५ मार्च १५८० ) त्यास ठार मारणारास इनाम देण्याचें जाहीर केलें! ह्या निषेधपत्राचा सारांश असा होताः—

"सर्व लोकांस कळविण्यांत येतें कीं, वुइल्यम ऑफ नासू ह्या परकीय पुरुषाला आमचे वडिलांनीं व आम्ही मोठमोठ्या जहागिरी व मानाच्या पदव्या देऊन थोर योग्यतेस चढविलें. परंतु गेल्या कित्येक वर्षांपासून नेदर्लंडांत तो ख्रिस्तीधर्मांत पाखंडें माजविण्याचा व तेथील आमची सत्ता उलथून पाडण्याचा उद्योग करून आमच्याशीं बेइमानानें वागत आला आहे. आमच्या सत्तेविरुद्ध बंड पुकारून त्यानें युत्रेक्टचा संघ या नांवानें बंडखोर लोकांचा एक दुष्ट कट करून

आमच्या कायदेशीर अधिकाऱ्यांशीं युद्ध चालविलें आहे. त्याची कानउघाडणी व समजूत करण्याचे आम्हीं पुष्कळ यत्न केले परंतु ते फुकट गेले. यास्तव आम्ही त्यास आतां आमच्या देशाचा व आमचा शत्रू म्हणून जाहीर करण्याचें ठरविलें आहे; आणि ह्या लेखाच्या द्वारें आम्हीं आमच्या सर्व प्रजाजनांस असें फर्मावितों कीं, आमच्या ह्या शत्रूशीं कोणीं कसलाही संबंध ठेवूं नये व त्यास आसरा, अन्न पाणी, विस्तव वगैरे कांहीं एक देऊं नये. आणि आम्ही आणखी असेंही जाहिर करितों कीं, जो कोणी ह्या मानवजातीच्या शत्रूस धरून आमचे स्वाधीन करील अथवा ठार मारील त्यास आम्ही राजा व धर्मप्रतिपालक ह्या नात्यानें पंचवीस हजार क्राऊन्स रोख अथवा स्थावर इस्टेटीच्या रूपानें (वंशपरंपरा) बक्षिस देण्याचें व त्यानें पूर्वी कांहीं गुन्हे केले असल्यास ते माफ करून त्यास सरदारीचा किताब देण्याचें अभिवचन देतों. त्याच्या साथिदारांस व मुखत्यारांसही अशाच प्रकारच्या सवलती मिळतील. तसेंच जो कोणी आमची अवज्ञा करून ह्या दुष्ट माणसास मदत करील त्यास कडक शासन करण्यांत येईल असें फर्मावून नेदर्लंडांतील सर्व प्रांतांतील लोकांस आमचा हा हुकूम जाहीर करण्याची तेथील आमच्या गव्हर्नरांस आम्ही आज्ञा करितों " वगैरे.

वुइल्यमच्या मनांत फिलिपविषयीं कितीही तिटकारा अथवा त्वेष उत्पन्न झालेला असला, तरी अद्यापपर्यंत उघडपणें त्यानें त्याची राजसत्ता अमान्य केलेली नव्हती. व व्यक्तिशःही त्याचा उपमर्द केला नव्हता. परंतु फिलिपचें उपरोक्त निषेधपत्र प्रसिद्ध झाल्यानंतर त्याला इतःपर हीच वृत्ति कायम ठेवणें अशक्य झालें. सबब त्यास उत्तर देण्याकरितां अपॉलजी ऊर्फ 'आत्मनिवेदन' या नांवाचें एक सुमारें शंभर पृष्ठांचें पत्रक तयार करून त्यानें तें इस्टेट्स जनरलला सादर केलें. हें पत्रक अत्यंत महत्त्वाचें असून त्यांत वुइल्यमनें नेदर्लंडांत आजपर्यंत झालेल्या जुलमांचें व त्याचा प्रतिकार करण्याबद्दल त्यानें केलेल्या प्रयत्नांचें ऐतिहासिकदृष्ट्या समालोचन केलेलें असून आपल्या खासगी व सार्वजनिक वागणुकीचें धैर्यप्रचुर आणि वक्तृत्वपूर्ण-ओजस्वी-भाषेंत उत्कृष्टपणें समर्थन केलेले आहे. तसेंच त्यांत फिलिपच्या सार्वजनिक व खासगी वर्तनांतील अक्षम्य चुकांचें आविष्करणही अत्यंत स्पष्ट व जोमदार भाषेंत केलेलें आहे. त्यांतून विस्तृत उतारे देणें शक्य नाहीं. तथापि वाचकांची जिज्ञासा अंशतः तृप्त करण्याकरितां त्यांतील कांहीं ठळक मुद्यांचा गोषवारा पुढें देतों:—

"फिलिपसारख्या राजाकडून माझी नालस्ती करणारें व माझ्या प्राणाची आहुति घेण्यास सदर परवानगी देणारें दुष्ट व रानटीपणाचें निषेधपत्र ( Ban ) प्रसिद्ध झालेलें पाहून मला बिलकुल वाईट वाटत नाहीं. उलट, तुमचें धार्मिक व राजकीय स्वातंत्र्य रक्षण करण्यास्तव मीं केलेल्या परिश्रमांचा इतका तीव्र परिणाम झालेला पाहून मला एक प्रकारचा अभिमान व संतोष वाटतो. त्याच्या ह्या दुष्टपणाचा कटाक्ष केवळ माझ्या व्यक्तीवरच असता तर मीं त्याकडे दुर्लक्ष केलें असतें; परंतु मजबरोबरच माझ्या देशास इजा करण्याचाही त्यानें प्रयत्न केलेला असल्यामुळें त्यास उत्तर देणें प्राप्त झालें आहे.

" ह्या देशांतील लोकांचें धार्मिक स्वातंत्र्य व राजकीय हक्क पायाखालीं तुडविणारा हा स्पॅनियर्ड राजा, त्यांचें रक्षण करण्यास्तव झटणाऱ्या तद्देशीय संस्थानिक व सरदार असणाऱ्या मला परका, पाखंडी, ढोंगी, देशबुडव्या, बंडखोर, मनुष्यजातीचा शत्रू हीं विशेषणें देऊन एखाद्या रानटी जनावराप्रमाणें माझी शिकार करण्यास्तव बक्षिसाची लालूच दाखवून मारेकऱ्यांस उत्तेजन देत आहे. परंतु त्यानें मला दिलेलीं वरील विशेषणें हीं माझ्यापेक्षां त्यालाच अधिक सार्थपणें लावतां येण्यासारखीं आहेत. ( तीं कशीं हें पुढें फिलिपच्या व आपल्या घराण्यांची व हक्कांची कुळकथा देऊन सिद्ध केलें आहे.)

" हा प्रसंग, ह्या स्पॅनियर्ड राजाच्या दुष्टपणामुळें व औद्धत्यामुळेंच प्राप्त झाला आहे ज्या आम्हां लोकांस अद्यापपर्यंत कधींही कोणी सर्वस्वीं पादाक्रांत केलेलें नाहीं, त्यांना इटॅलियन्स अथवा इंडियन्स लोकांप्रमाणें सहज गुलाम करून टाकतां येईल अशी यानें आपली समजूत करून घेतल्यामुळेंच त्याचें व आमचें इतकें वितुष्ट वाढलें आहे. पण त्यांत त्याचीच चूक आहे. आम्ही आजपर्यंत राजाची सत्ता विवक्षित शर्तींवर मान्य करीत आलों आहों. ह्या गोष्टीकडे लक्ष न देतां त्यानें वरील प्रकारच्या भावनेस आपल्या मनांत थारा दिला असल्यानें तिचें समूळ उच्चाटण करण्याचा आम्ही प्रयत्न करीत आलों आहों. कॅथोलिक मताचेच संस्कार माझ्या पूर्ववयांत मजवर झाले होते व मी इतर माणसांप्रमाणेंच जगांतला एक प्रापंचिक मनुष्य होतों; परंतु अग्नि, तरवार व पाणी यांच्या साह्यानें जो भयंकर धर्मच्छल ह्या देशांत सुरू झाला तो पाहून व विशेषतः धर्मसुधारकांचा नायनाट करण्याकरितां फिलिप व फ्रान्सचा माजी राजा हेनरी यांनीं केलेल्या गुप्त कटाची हकीकत हेनरीच्याच तोंडून कळल्या

पासून येथील स्पॅनिश टोळ्यांचा पिच्छा पुरवून त्यांना ह्या देशांतून हांकून देण्याचा मीं निश्चय केला. ह्या भयंकर जुलमाचा प्रतिकार करण्यास्तव मीं आपले मित्र व सरदार यांची मदत मिळविण्याचा यत्न केला, हें मी प्रांजलपणें कबूल करतों. तसें करण्यांत मला भूषणच वाटतें. ह्या जुलमाचा प्रतिकार करण्यासाठीं वेळोवेळीं ह्या देशांतील लोकांकडून जे उपाय योजण्यांत आले त्यांची सर्व जबाबदारी मी मोठ्या आनंदानें आपल्या शिरावर घेतों. कारण जगांतील कोणत्याही जुलमी राजानें आजपर्यंत केलेल्या जुलमी कृत्यांपेक्षां फिलिपनें ह्या देशांतील लोकांवर केलेला जुलूम अत्यंत भयंकर असल्यामुळे त्याबद्दल माझ्या मनांत संताप व खेद उत्पन्न होणें अपरिहार्य आहे. × × × × अग्नि व तरवार यांच्या साह्यानें प्रजेचीं मनें कधींही अनुकूल करून घेतां येणार नाहींत. परंतु फिलिपनें आल्व्हासारख्या दुष्ट गव्हर्नरामार्फत ह्याच मार्गाचें अवलंबन केलें नाहीं काय? आपण अठरा हजार पाखंडी लोकांना ठार मारलें म्हणून आल्व्हानें प्रौढी मिरविली नाहीं काय? ह्या लोकांचा अपराध तरी कोणता, तर आल्व्हाच्या धर्ममताहून भिन्न धर्ममताचा अभिमान बाळगणें हा! अशा निरपराधी लोकांस केवळ धार्मिक मतभेदामुळें मारण्यांत यावें हा जुलमाचा कळस नव्हे काय? याशिवाय जाळपोळ करून आल्व्हानें देशाची जी खराबी केली तिला प्राचीन अथवा अर्वाचीन इतिहासांत तोड सांपडेल काय?

"मजवर बोलघेवडेपणाचा व लोकांची खुशामत करण्याचा आरोप करण्यात आला आहे. त्याबद्दल मला एवढेंच सांगावयाचें आहे कीं, तुमचे हक्क व स्वातंत्र्य यांचें रक्षण करण्यास आवश्यक तेवढें लौकिक पुढारीपण मीं पत्करलें असून मरेपर्यंत ते चालविण्याचा माझा संकल्प आहे. हें पुढारीपण मीं सोडावें म्हणून मला माझ्या पुत्राची सुटका करून माझ्या सर्व जहागिरी, पदव्या व मानमरातब परत देऊन शिवाय कर्जाच्या फेडीकरितां रोख रक्कम देण्याचें आमिष अनेकदां दाखविण्यांत आलें, परंतु मीं तिरस्कारपूर्वक त्याचा धिक्कार केला. कारण तुमचें व माझें कार्य यांत भेद मानण्यास मी केव्हांही तयार होणें शक्य नाहीं. माझा खून करण्याबद्दल फिलिपनें देऊं केलेल्या बक्षिसाबद्दलही मी असाच तिरस्कार व्यक्त करितों. ह्या कृत्यानें मी भिऊन जाईन असें त्यास वाटतें काय? आजपर्यंत त्यानें मजवर थोडेथोडके गुप्त मारेकरी सोडले आहेत काय? त्यांची जर मीं फिकीर बाळगिली नाहीं तर ह्या अभिनव प्रकाराची तरी कोठून बाळगणार?

ह्या मारेकऱ्यांस जरी फिलिपनें सरदारकी दिली, तरी कोणता जातिवंत सरदार त्याला आपल्या बरोबरीनें वागवील व त्याच्याशीं संबंध ठेवील ?

आतां माझ्या व्यक्तीविषयीं म्हणाल तर माझ्या मृत्यूनें अथवा हद्दपारीनें जर स्पॅनिश जुलुमापासून तुमची मुक्तता होत असेल, तर ह्या दोहोंपैकीं वाटेल त्या गोष्टीस संमति देण्यास मी कितीतरी आनंदानें तयार होईन ! आजपर्यंत मीं आपलें सर्व वित्त, माझ्या प्राणाहूनही प्रिय असलेले माझे भ्राते, यांचा जो नाश करून घेतला; तसेंच माझ्या वडील पुत्राचा वियोग जो मी सहन करीत आहें तो कशाकरितां म्हणून तुम्ही समजतां ? ह्या कार्याकरितांच नाहीं काय ? तुमच्या स्वातंत्र्याचें रक्षण करण्याशिवाय दुसऱ्या कोणत्या कामाप्रीत्यर्थ मी मुठींत जीव धरून अहोरात्र झटत आहें असें तुम्हांस वाटतें ? माझा मृत्यु अथवा माझी गैरहजिरी जर तुमचें कार्य करूं शकत असेल, तर माझी त्यास कबुली आहे. माझें मस्तक तुमच्यापुढें आहे. कोणताही राजा त्याची विल्हेवाट लावूं शकणार नाहीं. तें तुमच्या सेवेस वाहिलेलें आहे ! माझा अल्प अनुभव व उद्योग यांचा जर तुमच्या कार्यास अद्याप कांहीं उपयोग आहे असें तुम्हांस वाटत असेल, तर आपण सर्वजण एकदिल होऊन एकविचारानें परमेश्वरावर—ज्यानें आजपर्यंत नाना प्रकारच्या आपत्तींतून मला वर काढलें—भरंवसा ठेवून ह्या गरीब लोकांचे संरक्षणाची तयारी पूर्ण करूं या आणि आपल्या बायकामुलांचें व जें जें कांहीं तुम्हांस प्रिय व पवित्र वाटत असेल त्याचें रक्षण करूं या."

हें आत्मसमर्थन ऊर्फ आत्मनिवेदन डेल्फ्ट येथें भरलेल्या संयुक्त* प्रांतांच्या इस्टेट्स जनरल पुढें मांडण्यांत आल्यावर त्या सभेनें तें एकमतानें पसंत करून वुइल्यमवर आपला पूर्ण विश्वास असल्याचें जाहीर केलें.† इतकेंच नव्हे, तर ज्या दुष्ट फिलिप राजानें त्यास देशद्रोही ठरवून त्याचें शीर उडविणारास बक्षीस देण्याच

* इ. स. १५७९ च्या युत्रेक्टच्या संघांत सामील झालेल्या प्रांतांच्या लोकसभेपुढें.

† पुढें लवकरच वुइल्यमनें सदर पत्रकाचें युरोपांतील सर्व प्रमुख भाषांत भाषांतर करवून त्याच्या प्रती तेथील राजे, मुत्सद्दी, सरदार व प्रसिद्ध गृहस्थ यांच्याकडे पाठविल्या. खुद्द फिलिपकडेही त्यानें त्याची एक प्रत पाठविली. ह्या पत्रकाच्या प्रसिद्धीमुळें युरोपांत फिलिपची नाचक्की होऊन त्याच्या इभ्रतीस मोठाच धक्का बसला !

जाहीरनामा काढला, त्याच्या त्या कृत्याचा निषेध करण्यास्तव तिनें आजतागायत वाळगिलेली नामधारी राजनिष्ठा झुगारून देऊन त्याचा संबंध अजिबात तोडून टाकण्याचा विचार केला. आपल्या संयुक्त प्रांतांचें स्वातंत्र्य जाहीर करून त्यांचें राज्यपद स्वीकारण्याविषयीं त्यांनीं वुइल्यमला विनंति केली; परंतु वुइल्यम हा अतिशय निःस्पृह असल्यामुळें त्यानें ती मान्य करण्याचें नाकारलें व फ्रेंच राजाचा भाऊ ड्यूक ऑफ आँजू यास तें राज्यपद देण्याविषयीं त्यानें ह्या सभेचें मन वळविलें. नेदर्लंडच्या हिताच्या दृष्टीनें त्यानें ही चूक केली, असें कित्येक इतिहासकारांचें म्हणणें आहे. वुइल्यमनें यावेळीं जर हें राज्यपद स्वीकारलें असतें तर नेदर्लंडांतील बहुतेक सर्व प्रांत त्याच्या राज्यांत सामील होण्यास तयार होते. परंतु त्याचें वजन व योग्यता हीं आँजूच्या ठिकाणीं नसल्यामुळें व बदफैली आणि अविश्वासूक असा त्याचा लौकिक असल्यामुळें त्याच्या ताब्यांत जाण्यास ते तयार होणें शक्य नव्हतें, असें या इतिहासकारांचें मत आहे. वुइल्यमच्या वतीनें ह्या बाबीविषयीं त्याच्या भावाच्या पत्रांत असा खुलासा करण्यांत आला आहे कीं, जर हें राज्यपद स्वीकारण्याचें तो कबूल करता, तर धर्मस्वातंत्र्याचें ढोंग करून आपली राज्यतृष्णा तृप्त करून घेण्याचा आरोप त्याजवर येण्याचा दृढ संभव होता. शिवाय त्याचें उतारवय झालेलें असून त्याची सांपत्तिक स्थितीही खालावलेली असल्यामुळें, स्वतःपेक्षां बलिष्ठ व संपत्तिमान् अशा कोणा तरी राजपुरुषास तें देणें त्यास अधिक इष्ट वाटत होतें. फिलिपबरोबर सुरू असलेलें रणकंदन संपण्यास अद्याप पुष्कळ काळ जाणें जरूर होतें आणि तोंपर्यंत केवळ स्वतःच्या सामर्थ्यावर टिकाव धरणें नेदर्लंडांतील कोणत्याही प्रांतास शक्य नव्हतें. अशा स्थितींत आँजूसारख्या बलिष्ठ राजाच्या भावास तेथील राज्यपद दिल्यास फ्रान्सची संपत्ति व दरारा यांचा तेथील लोकांचे कार्यास उपयोग होऊन ते फिलिपची खोड मोडेपर्यंत टिकाव धरूं शकतील असा त्याचा समज होता. आँजूचें चारित्र्य व शील त्यास ठाऊक नव्हतें असें नाहीं, परंतु आपल्या कार्याकडे–तत्संबंधीं त्याच्या उपयोगित्वाकडे–नजर देऊन तो त्याकडे जाणूनबुजून दुर्लक्ष करण्यास तयार झाला होता. आँजूला आपल्या कार्यसिद्धीचें एक साधन (tool) म्हणून हातीं धरण्यास तो प्रवृत्त झाला होता. नेदर्लंडांतील बहुतेक सर्व सत्ता तेथील लोकसभेच्या हातीं असल्यामुळें त्याच्या मनांत जरी कांहीं काळेंबेरें आलें तरी लोक सावध राहिल्यास, त्यापासून राष्ट्रास फारसा अपाय

होण्याचा संभव नव्हता. या सर्व गोष्टी प्रत्येक प्रांताच्या लोकप्रतिनिधीस त्यानें समजावून दिल्यावर केवळ त्याच्या मर्जीखातर हॉलंड व झीलंड खेरीज करून इतर संयुक्त प्रांतांनीं आँजूस आपला राजा करून घेण्याचें कबूल केलें. हालंड-झीलंडनें त्या प्रांतांशीं तुल्यारिमित्रत्वाचा तह करून संबंध ठेवण्याचें कबूल केलें; परंतु आपल्या प्रांतांचें राज्यपद वुइल्यमखेरीज इतरांस देण्यास ते बिलकूल तयार नव्हते. तेव्हां अखेर नाइलाजास्तव त्यानें युद्ध चालू असेपर्यंत त्या प्रांतांचें राज्यपद स्वीकारण्याचें कबूल केलें ( २४ जुलई १५८१ ). त्यानंतर दोन दिवसांनीं ह्या व इतर संयुक्त प्रांतांच्या लोकप्रतिनिधींची ( इस्टेट्स जनरल ) सभा हेग येथें भरली व तिनें पद्धतशीर रीतीनें फिलिपची आजवर चालत आलेली आपणावरील राजसत्ता झुगारून देऊन आपलें स्वातंत्र्य जाहीर केलें. पुढें कांहीं दिवसांनीं आँजूशीं योग्य ते करारमदार केल्यावर त्यास हॉलंड व झीलंडखेरीज इतर प्रांतांनीं आपलें संयुक्त राज्यपद देण्याचा ठरावहा रीतसर पास केला व नंतर ता. १७ फेब्रुवारी इ. स. १५८२ रोजीं अँटवर्प शहराबाहेरच्या मैदानांत त्यास मोठ्या समारंभानें सदर राज्यपद अर्पण करण्यांत आलें. त्याचे अधिकार एखाद्या लोकसत्ताक राज्याच्या अध्यक्षाप्रमाणें ठरविण्यांत आले होते व त्यास अनुरूप असाच हा समारंभ झाला.

वरील समारंभ झाल्यावर सुमारें एक महिन्यानें ड्यूक ऑफ आँजूचा वाढदिवस साजरा करण्याकरितां अँटवर्प व इतर शहरांत मोठा उत्सव चालू होता. अँटवर्प येथील सेंट मायकेल नामक राजवाड्यांत आँजूच्या सन्मानार्थ ता. १८ मार्च १५८२ रोजीं संध्याकाळीं एक थाटाची मेजवानी व्हावयाची असून, त्या प्रसंगीं वुइल्यम व इतर फ्रेंच आणि नेदर्लंडांतील सरदार हजर राहावयाचे होते. वुइल्यमचा मुक्काम तेथील किल्ल्यानजीकच्या एका वाड्यांत होता. तेथें दोन प्रहरीं काऊंट होहेन्लो लव्हल व आणखी दोन फ्रेंच सरदार यांच्यासह त्यानें नित्याप्रमाणें भोजन केलें. त्याचा वडील मुलगा मॉरिस व पुतणे ( जॉनचे पुत्र ) हेही त्याच्याबरोबर जेवले. जेवण आटोपल्यावर वरील सरदारांशीं बोलत बोलत तो आपल्या दिवाणखान्यांत येऊन दाखल झाला; तोंच एका तरुणानें पुढें येऊन एक अर्ज त्याच्या हातीं दिला. तो तो घेऊन पहात आहे इतक्यांत त्या तरुणानें त्याच्या डोक्यावर नेम धरून पिस्तुल झाडलें ! त्यांतून निसटलेली गोळी त्याच्या उजव्या कानाखालील गळ्याच्या बाजूंत शिरली व डाव्या आंगच्या दाढवणांतून

बाहेर पडली ! तें पिस्तुल त्याच्या डोक्याच्या अगदीं लगत धरलेलें असल्यामुळें त्यांतून निघणाऱ्या अग्निकणानें त्याच्या दाढीमिशांना आग लागली ! पिस्तुलाचा आवाज होण्याबरोबर त्याला एखादें घर कोसळून पडल्यासारखा भास होऊन तो निश्चेष्ट उभा राहिला व “ त्याला ठार मारूं नका, मीं त्याला क्षमा केली आहे.” असे उद्गार ( मारेकऱ्यासंबंधानें ) त्याच्या तोंडून निघाले ! पुढें तो बेशुद्ध झाला व त्याच्या मित्रांनीं त्यास धरून बिछान्यावर नेऊन ठेविलें. तोंपर्यंत त्याच्या दोघां मित्रांनीं खुनी मनुष्याला तरवारींनीं भोसकून ठार केलें ! त्याचा वडील मुलगा मॉरिस यानें या खुनी मनुष्याच्या प्रेताची तपासणी केली तेव्हां त्याच्या अंगरख्याच्या खिशांत स्पॅनिश भाषेंत लिहिलेले कांहीं महत्त्वाचे कागद सांपडले. त्यावरून खुनी मनुष्याचा व त्याच्या साथीदारांचा पत्ता लागला.

वुइल्यमला बिछान्यावर आणून ठेविल्यानंतर त्याच्या डॉक्टरांनीं त्याची जखम बांधली. सुदैवानें पिस्तुलांतून निघालेल्या ज्वालेच्या भपकाऱ्यानें त्या जखमेचें तोंड डागल्यासारखें झाल्यानें रक्तस्राव आपोआप बंद झाला त्यामुळें जखम बांधून त्यावर उपचार करणें सुकर झालें. जखम बांधून झाल्यावर कांहीं वेळानें तो शुद्धीवर आला, परंतु आपण जगूं असें त्यास न वाटल्यामुळें वारंवार ऑंजूस अनुलक्षून, “ हाय ! हाय ! गरीब विचारा राजपुत्र ! आतां तुझ्या मार्गांत किती तरी अडचणी येतील ! त्यांतून निभावून ह्या देशाचें रक्षण तुझ्या हातून कसें काय होईल कोण जाणे !” अशा आशयाचे उद्गार त्याच्या तोंडून निघत होते. परंतु असें सारखें बोलत राहिल्यास गळ्यांतील दुखावलेल्या शिरांस धक्का बसून पुन्हा रक्तस्राव सुरू होण्याची भीति असल्यामुळें डॉक्टरांनीं त्यास बोलण्याची पूर्ण मनाई केली. त्यांच्या इच्छेस्तव त्यानें बोलणें बंद केलें पण जोंपर्यंत त्याच्या जिवांत जीव आहे तोंपर्यंत देशासंबंधीं विचार त्याच्या मनांत घोळल्यावांचून राहणें अशक्य होतें. तें दुसऱ्यास कळविण्याची जरूर भासेल तेव्हां ते लिहून कळविण्याचा परिपाठ त्यानें सुरू ठेवला.

वुइल्यमला झालेली जखम अत्यंत भयंकर असून त्यांतून तो जगणार कीं नाहीं, अशी बातमी शहरांत पसरल्यामुळें, त्यास प्रत्यक्ष पाहून येऊन खरी बातमी लोकांस देण्याच्या हेतूनें लॅायन पेटीट या नांवाचा एक देशभक्त व शहररक्षकांच्या तुकडीचा कप्तान ताबडतोब त्याच्याकडे आला. त्यास वुइल्यमनें “आपण अद्याप जिवंत आहों, पण जर कदाचित् मेलों तर भांबावून न जातां ऑंजूच्या हुकमती-

खालीं देशोद्धाराचें काम चालवून यश मिळवा" अशा अर्थाचा निरोप लोकांस सांगण्याची लेखी विनंति केली. त्यानें तो निरोप लोकांस कळवित्यावर त्यांचीं मनें अमळ स्वस्थ झालीं.

मध्यंतरीं इकडे मॉरिस व सेंट अल्डेगॉंड यांनीं गुन्हेगाराच्या अंगावर सांपडलेल्या कागदपत्रांची तपासणी केली. त्यावरून ह्या गुन्ह्याची पुढीलप्रमाणें उपपत्ति लागली:—अनास्ट्रो या नांवाचा एक अँटवर्पचा बडा व्यापारी दिवाळखोर बनला होता. त्यानें आपली सांपत्तिक स्थिति सुधारण्याकरितां बुइल्यमला ठार मारण्याचा लेखी करार गुप्तपणें फिलिपशीं केला. हें त्यानें केल्यास त्यास ८० हजार डयूकेट्स रोख व एक दोन बहुमानाच्या पदव्या देण्याचें फिलिपनें कबूल केलें होतें. त्यानें आपला गुमास्ता व्हेनेरो यास या कटांत सामील करून घेतलें व या दोघांनीं जॉन जोर्गे या नांवाच्या एका धाडसी इसमास पैशाची लालूच देऊन ह्या कामास प्रवृत्त केलें याप्रमाणें उपपत्ति लागतांच वरील व्यापारी व त्याचा गुमास्ता यांस पकडण्याचें हुकूम सुटले. परंतु अनास्ट्रो हा पूर्वीच कांहीं महत्त्वाच्या कामाच्या निमित्तानें परहद्दींत कॅलेस येथें निघून गेला असल्याकारणानें त्यास पकडतां आलें नाहीं. त्यास ह्या हुकमाची बातमी समजतांच तो पार्माच्या गोटांत जाऊन राहिला. त्याचा गुमास्ता व्हेनेरो व आणखी एक साथीदार झिमरमन ह्यांस आँजूच्या हुकमावरून पकडण्यांत आलें व रीतीप्रमाणें त्यांच्यावर काम चालून पुढें त्यांस देहांतशासन झालें. त्यांचें हालहाल करून त्यास ठार मारण्याचा अधिकाऱ्यांचा विचार होता परंतु बुइल्यमनें तसें न करण्याबद्दल त्यांना आग्रहपूर्वक विनंति केल्यामुळें त्यांस तो विचार सोडून द्यावा लागला.

इकडे बुइल्यमची स्थिति चढउतार होत होती. सुमारें अठरा दिवसांनीं त्याला थोडें बरें वाटूं लागलें. हे दिवस त्याला व त्याच्या आप्तेष्टांना फार कष्टाचे गेले. त्याची प्रिय पत्नी चार्लोटी ही यावेळीं नुकतीच बाळंतपणांतून उठली असल्याकारणानें अशक्त झाली होती, तरी देखील ती रात्रंदिवस एकसारखी त्याची शुश्रूषा करीत होती. त्याची एक बहीणही अशीच त्याच्यासाठीं झटत होती. अठरा दिवसांनीं त्याला बरें वाटूं लागल्यामुळें शहरांतील सार्वजनिक देवालयांतून ईश्वराचे आभार मानण्यास्तव प्रार्थना होऊं लागल्या होत्या व लोकांचे कोमेजलेले चेहेरे पुन्हा प्रफुल्लित होऊं लागले होते. इतक्यांत एके दिवशीं त्याच्या जखमेवरील भाजलेल्या चामडयाची खपली आपोआप उडाली व त्यामुळें पुन्हा रक्तस्राव सुरू झाला! आतां

मात्र ह्या दुखण्यांतून निभावणें कठीण होतें. जखम गळ्यावर असल्यामुळें ती घट्ट बांधल्यास श्वासोच्छ्वासास अडथळा होऊन रोगी तत्काळ गच्छ होण्याचा संभव होता. रक्तस्राव बंद न केला तर भयंकर ज्वर येऊन अखेर अपाय होण्याचा संभव होता. ही विपरीत परिस्थिति पाहून आपण आतां खास मरणार असें वाटून त्यानें आपल्या मुलांबाळांना जवळ बोलाविलें आणि "आतां माझा अवतार संपला," संभाळून असा," असें बोलून त्यांना शेवटचा निरोप दिला ! इतकें झालें तरी त्याच्या खास डॉक्टरानें आशा सोडली नव्हती. त्यानें आंगठ्याच्या साह्यानें जखमेवर सतत दाब ठेवून रक्तस्राव बंद करण्याकरतां एक साधें यंत्र तयार केलें व तें आळीपाळीनें जखमेवर दाबून धरण्याकरितां अनेक मनुष्यांची योजना केली. याप्रमाणें चोवीस तासपर्यंत एकसारखा दाब बसल्यानंतर त्या जखमेचें तोंड बंद होऊन रक्तस्राव थांबला. हें अरिष्ट टळल्यावर पुढें कांहीं दिवसांनीं ती जखम भरून येऊं लागली व वुइल्यम हिंडूं फिरूं लागण्याइतका बरा झाला. मे महिन्याच्या दुसऱ्या तारखेस पुन्हा शहरांतील देवळांत त्याच्याबद्दल सार्वजनिक प्रार्थनाविधि झाला व त्यास तो स्वतः हजर राहूं शकला. याप्रमाणें तो ह्या घोर प्रसंगांतून निभावला खरा; परंतु त्याची प्रिय पत्नी मात्र वर सांगितल्याप्रमाणें नवीन रक्तस्राव सुरू होतांच बेहोष होऊन आजारी पडली व त्यांतच ता. ५ मे रोजीं तिचा अंत झाला ! वुइल्यमचें ह्या स्त्रीवर अत्यंत प्रेम होतें व नुकतीच तिनें वरील दुखण्यांत त्याची जी एकनिष्ठपणें सेवा केली तिची स्मृति त्याच्या डोळ्यांपुढें असल्यामुळें तिच्या मृत्यूनें त्याच्या मनास मोठा धक्का बसला. त्याचा त्याच्या अशक्त प्रकृतीवर परिणाम होऊन त्याचें दुखणें उलटतें कीं काय, अशी त्याच्या मित्रांस भीति वाटूं लागली होती. परंतु सुदैवानें तसें कांहीं न होतां त्याची प्रकृति लवकरच सुधारली.

ह्या खुनाचा प्रयत्न होतांच तो खास यशस्वी होणार अशी अनास्ट्रोनें पार्माची खात्री करून दिल्यावरून त्यानें अँटवर्प, ब्रुसेल्स, ब्रजेस व इतर संयुक्त प्रांतांतील शहरांच्या अधिकाऱ्यांस पत्रें पाठवून, यापुढें वृथा कालहरण न करितां पूर्ववत् फिलिपची सत्ता मान्य करून राहण्याचा उपदेश केला. परंतु त्याचा कांहीं उपयोग झाला नाहीं. हॉलंड व झीलंड प्रांतांच्या लोकसभेनें तर वुइल्यम आजारी असेपर्यंत आपल्या सभेचें अधिवेशन सारखें चालू ठेवून पार्माचें तोंड बंद केलें होतें ! ह्या प्रांतांतील लोकांचें वुइल्यमवर निश्चल प्रेम होतें, त्यामुळें त्याच्या ह्या

दुखण्यांत ते फार चिंताग्रस्त झालेले होते. तो बरा होतांच त्यांचा आनंद गगनांत मावेनासा होऊन त्यांचें त्याजवरील प्रेम जास्तच दृढ झालें व त्यांनीं त्यास आतां आपल्या प्रांताचें राज्यपद-जें त्यानें पूर्वीं युद्धकालापुरतें स्वीकारलें होतें-कायमचें स्वीकारण्याबद्दल गळ घातली, किंबहुना हट्ट धरला म्हटलें तरी चालेल. आतां त्यांच्या सदर भावनेकडे दुर्लक्ष करणें वुइल्यमला शक्य नसल्यामुळें त्यानें इ. स. १५८२ च्या आगस्ट महिन्यांत 'काऊंट ऑफ हॉलंड' ह्या पदवीच्या द्वारें हॉलंड व झीलंड ह्या दोन संयुक्त प्रांतांचें राज्यपद वंशपरंपरेनें स्वीकारल्याची शपथ घेतली ! त्याचें हें छोटें राज्य हाच भावी डच लोकसत्ताक राज्याच्या इमारतीचा पाया अथवा मूळारंभ होय. ह्या राज्याची शासनपद्धति लोकसत्ताक शासनपद्धतीच्या धर्तीवर ठरविली गेली होती. अर्थात् वुइल्यमचे राज्याधिकार लोकसत्ताक राज्याच्या अध्यक्षाच्या तोडीचे, परंतु वंशपरंपरेनें चालणारे असे होते. आणि वंशपरंपरेच्या तत्त्वास अनुसरून त्यास शास्त्रोक्त राज्याभिषेक करण्याचें ठरलें होतें. पण त्याच्या आकस्मिक मृत्यूमुळें तो विधि होण्याचें तसेंच राहून गेलें. हॉलंड व झीलंड प्रांतांप्रमाणेंच इतर संयुक्त प्रांतांच्या लोकप्रतिनिधींनींही त्यास सदर प्रांतांचें राज्यपद स्वीकारण्याबद्दल पुन्हा विनंति केली आणि पुढें कांहीं दिवसांनीं ऑंजूच्या पदरीं असलेल्या सैन्यानें अँटवर्प, डंकीर्क वगैरे शहरें दगा करून आपल्या ताब्यांत घेतल्यावरून ऑंजूविषयीं त्याचें मन कलुषित झाल्यानें तर त्यास पदच्युत करून त्याचे जागीं वुइल्यमची योजना करण्याचा त्यांनीं आग्रहच धरला. परंतु आपल्या देशाच्या राजकीय हिताच्या दृष्टीनें तसें करणें वुइल्यमला इष्ट न वाटल्यामुळें त्यानें त्यांच्या म्हणण्यास रुकार देण्याचें नाकारलें व ऑंजूनें घडलेल्या वरील अनिष्ट प्रकाराबद्दल खेद प्रदर्शित करून पुढें नीट वागण्याचें कबूल केल्यामुळें, त्याच्याशीं तडजोड करून त्याचा जडलेला संबंध कायम राखण्याविषयीं त्यानें त्यांचीं मनें वळविलीं. स्पेनशीं सदर संयुक्त प्रांतांच चालू असलेलें युद्ध आणखी बराच काळ चालू राहणार असल्यामुळें कोणातरी बलिष्ठ परराष्ट्राच्या मदतीची त्यास आवश्यकता होती. इंग्लंड व जर्मनी येथून इतःपर मदत मिळण्याचा संभव नव्हता. पूर्वींपासूनच ह्या राष्ट्रांचें वर्तन धरसोडीचें होतें व अलीकडे तर तीं बहुतांशीं उदासीन बनलेलीं होतीं. फ्रेंच दरबार व ऑंजू यांचें वर्तन जरी सर्वस्वीं समाधानकारक नसलें तरी, लुईच्या प्रयत्नामुळें प्रथमपासून फ्रान्सची नेदर्लंडच्या कार्यास बरीच मोठी मदत झाली होती

व पुढेंही होण्याचा संभव होता. फ्रान्सशिवाय दुसरें कोणतेंही प्रमुख युरोपियन राष्ट्र यावेळीं नेदर्लंडास मदत करण्यास उत्सुक नव्हतें. अशा स्थितींत ऑंजूशीं वितुष्ट वाढवून फ्रान्सची सहानुभूति नष्ट करणें वुइल्यमला इष्ट वाटत नव्हतें. ऑंजूस पदच्युत केल्यास फ्रान्स संयुक्त प्रांतांशीं शत्रुत्व करण्यास देखील तयार होण्याचा संभव होता आणि तसें झाल्यास एकाच वेळीं फ्रान्स व स्पेन यांच्याशीं टक्कर देण्याचें काम संयुक्त प्रांतांच्या हातून होणें केवळ अशक्य होतें. या सर्व परिस्थितीचा नीट विचार करूनच वुइल्यमनें ऑंजूशीं तडजोड करण्याविषयीं संयुक्त प्रांतांच्या प्रतिनिधींची मनधरणी केली. त्यासंबंधानें पुष्कळ चर्चा व भवति-न भवति केल्यानंतर मोठ्या कष्टानें त्यांनीं त्याचें म्हणणें मान्य केलें. ही वाटा-घाट चालू असतां ऑंजू कांहीं कामानिमित्त पॅरिसला गेला व तेथें आजारी पडून इ. स. १५८४ च्या जून महिन्यांत वारला! त्यामुळें वरील तडजोडीचा बेत जागच्या जागींच राहिला.

इ. स. १५८२ मध्यें संयुक्त प्रांत व पार्मा यांच्या दरम्यानचें युद्ध पार्माजवळ पैशाचा व सैन्याचा भरपूर पुरवठा नसल्यामुळें रेंगाळत चाललें होतें. नवीन स्पॅनिश व इटॅलियन सैन्य आणण्याचा त्याचा विचार होता, परंतु वाल्न्स लोकांच्या संमती-शिवाय त्याला तसें करण्यास त्यांच्याशीं झालेल्या तहामुळें—अधिकार नव्हता. तथापि युक्तिप्रयुक्तीनें ही संमति मिळवून त्यानें नवें सैन्य आणण्याची खटपट चालविली. मध्यंतरीं भेदनीतीचा आश्रय करून त्यानें कॅथोलिकांचें वर्चस्व असलेले प्रांत व शहरें आपणांस वश करून घेण्याचा प्रयत्न चालू ठेवला होता. ऑंजूच्या उपरोक्त दगेखोरपणामुळें त्याचा तो प्रयत्न यशस्वी होत चालला. ऑंजूच्य संशयास्पद वागणुकीमुळें त्या प्रांतांतील लोकांचा त्याच्यावरील विश्वास उडाला होता व वुइल्यमनें पुन्हा त्यासच हातीं धरलेलें पाहून—त्याचें धोरण लक्षांत न आल्यामुळें-ह्या प्रांतां-तील कांहीं शहरें पार्मास वश झालीं. वुइल्यमचे एकदोन जिव्हाळ्याचे स्नेहीही यावेळीं फितुर होऊन पार्माच्या गोटांत गेले! फ्लँडर्स आणि ब्रॅबंट हे प्रांत अद्याप त्याच्या ताब्यांत गेले नव्हते, पण त्यांचीही द्विधा वृत्ति झाली होती. अँटवर्प, ब्रुसेल्स व घेंट हीं दक्षिणेंतील प्रमुख शहरें मात्र पार्माशीं संबंध ठेवण्यास अद्याप तयार झालेलीं नव्हतीं.

इ. स. १५८३ च्या एप्रिल महिन्यांत वुइल्यमनें लुसी द कोलिग्नि नामक विधवा फ्रेंच स्त्रीशीं पुन्हा लग्न केलें. हें त्याचें चवथें लग्न होय. ही स्त्री प्रख्यात माजी फ्रेंच

अॅडमिरल कोलिग्नि (लुईचा दोस्त) यांची मुलगी असून तिचा पहिला नवरा सेंट बार्थोलोमोच्या कत्तलींत मारला गेला होता. तिचें वय यावेळीं अठ्ठावीस वर्षांचें असून वुइल्यमचें पन्नास वर्षांचें होतें. ही स्त्री चतुर, सद्गुणी, सुस्वभावी, कर्तबगार आणि धैर्यशील होती. तिची वागणूक समंजसपणाची व प्रेमळ असल्यामुळें तिनें लवकरच आपल्या सर्व सावत्र मुलांचा लोभ संपादन केला. तिला वुइल्यमपासून इ. स. १५८४ मध्यें फ्रेडरिक हेनरी या नांवाचा एकुलता एक पुत्र झाला व वुइल्यमच्या इतर दोन मुलांस पुत्रसंतति नसल्यामुळें या पुत्राच्या द्वारेंच त्याचें नांव व पदवी हीं पुढें शेंकडों वर्षे परंपरागत चालू राहिलीं. इंग्लंडांतील ऑरेंज घराण्यांतील राजांचा पूर्वजही हाच होय.

वुइल्यम ह्यावेळीं डेल्फट शहरांतील एका प्राचीन व भव्य वाड्यांत रहात होता. त्याच्या नांवावरून त्या वाड्यास 'प्रिन्सेस् हॉफ्' असें नांव पडलें होतें. ब्रेडा अथवा ब्रुसेल्स येथील त्याच्या राजवाड्यांशीं तुलना करितां त्याचा हा वाडा अगदीं साधा व सामान्य प्रतीचा होता. त्याच्या राहणींतही आतां फेरफार झालेला होता. त्याची पूर्ववयांतील राजविलासी व वैभवाची राहणी आतां अगदीं साधी बनली होती. त्याचा नेहमींचा पोषाखही साधाच असे. त्याचें मन व शरीर हीं दोन्ही आतां थकल्यासारखीं दिसत असून, त्याच्या चेहऱ्यावर वार्धक्याचीं सर्व चिन्हें दिसूं लागलीं होतीं. त्याचें वय यावेळीं फक्त एकावन वर्षांचें होतें; परंतु दगदग, काळजी व दीर्घकालपर्यंत केलेले श्रम आणि सोसलेले कष्ट यांमुळें तो साठी उलटून गेलेल्या म्हाताऱ्याप्रमाणें दिसूं लागला होता. तथापि त्याची शरीरयष्टि चांगली खंबीर असल्यामुळें ह्या गोष्टीची त्याला परवा वाटत नव्हती. त्याची सांपत्तिक स्थितीही अत्यंत असमाधानकारक होती. त्यामुळें त्याला नित्याच्या प्रापंचिक वस्तूंचीही कधीं कधीं उणीव पडून अडचण सोसावी लागत असे. तथापि आपल्या राष्ट्रीय व सार्वजनिक कर्तव्यांपासून तो कधींही पराङ्मुख होत नसे. हीं कर्तव्यें करून उरलेल्या वेळांत तो आपल्या कुटुंबांतील मंडळींशीं गप्पा गोष्टी करून आपल्या व त्यांच्या मनाचें रंजन करीत असे.

अँटवर्प येथें त्याच्या खुनाचा प्रयत्न झाला त्यास आतां दोन वर्षे होऊन गेलीं होतीं. या अवधींत आणखी पांच वेळां त्यास ठार मारण्याचे प्रयत्न करण्यांत आले! पण ते वेळींच उघडकीस आल्यामुळें फसले. ह्या परिस्थितीमुळें त्याच्या सुरक्षिततेविषयीं विशेष बंदोबस्त ठेवण्यांत येऊं लागला होता. त्याच्या वाड्यांत

परवानगीशिवाय कोणासही येऊं दिलें जात नसे व डेल्फट शहरांतही पहारेकऱ्यांची खात्री करून दिल्यावांचून कोणास प्रवेश करतां येत नसे. परंतु अशा स्थितींतही बालझार जेरर्ड नांवाच्या एका बर्गंडे प्रांतांतील तरुण व उलट्या काळजाच्या मनुष्याचा तेथें प्रवेश झाला. हा मनुष्य कॅथोलिक पंथाचा असून धर्मवेडा होता. वयाच्या विसाव्या वर्षापासून तो धर्मसुधारकांचा व त्यांचा पुढारी म्हणून वुइ-ल्यमचा कट्टा द्वेष्टा बनलेला होता व त्याचा खून करून आपल्या प्रभूस प्रसन्न कर-ण्याचा त्यानें आपल्या मनाशीं निश्चय केला होता. फिलिपचें प्रख्यात निषेधपत्र ( Ban ) प्रसिद्ध झाल्यापासून तर हें कृत्य करून मोठी पदवी व संपत्ति मिळ-विण्यास तो हपापला होता. परंतु त्याप्रीत्यर्थ तो लक्झेंबर्ग येथें येऊन खटपट करीत असतां जॉन जोर्गी यानें हें कार्य केल्याचें वृत्त त्यास समजलें; तेव्हां तो परत गेला. पण पुढें वुइल्यम त्या प्रसंगांतून वांचला हें कळतांच त्यानें फिरून आपला दुष्ट बेत सिद्धीस नेण्याची खटपट सुरू केली. फ्रॅंकॉइस गॉयन हें खोटें नांव धारण करून, आपण एका प्रॉटेस्टंटाचा मुलगा असून स्पॅनिश अधिकाऱ्यांनीं आपल्या आईबापांस छळून ठार मारल्यामुळें निराश्रित होऊन भटकत आहों, अशी करुणाास्पद हकी-कत सांगून त्यानें डेल्फट शहरांत प्रवेश केला व वुइल्यमच्या कांहीं नोकरांचा विश्वास आणि सहानुभूति संपादन करून त्याच्या परिवारांत आश्रित म्हणून तो राहिला. पुढें बूट व कपडे घेण्याकरितां म्हणून—त्यानें याचना केल्यावरून—वुइल्यमनें त्यास बारा क्राऊन दिले ते खर्चून त्यानें एका शिपायापासून एक पिस्तुल विकत घेतलें.§ पुढें सुमारें एक आठवड्यानें (ता. १० जुलई १५८४) वुइल्यम रात्रीचें जेवण आटोपून माडीवर जात असतां ह्या दुष्टानें जिन्याशेजारच्या एका कमानीं-तून गुप्तपणें त्याच्यावर पिस्तुल झाडलें. त्यासरशीं त्यांतून तीन गोळ्या निघून त्या वुइल्यमच्या छातींत घुसल्या! त्याबरोबर "हे देवा, माझ्या आत्म्यावर करुणा कर! ह्या गरीब लोकांची परमेश्वराला दया येवो!" असे उद्गार त्याच्या तोंडून निघाले व त्यास घेरी आली! इतक्यांत त्याच्या एका नोकरानें जवळ येऊन त्यास सावरून धरलें. तोंपर्यंत त्याच्या कुटुंबांतली इतर मंडळीही त्याच्या-जवळ आली व त्यांनीं त्यास उचलून जेवणाच्या खोलींतील एका कोचावर नेऊन ठेवलें. तेथें त्याच्या बहिणीनें त्याची स्थिति पाहिली तों बहुतेक सर्व आटोपत

§ आपल्या पिस्तुलाचा पुढें वुइल्यमचा जीव घेण्याच्या कामीं उपयोग झाला हें कळतांच ह्या शिपायानें जीव दिला!

झालें असल्याचें तिला आढळून आलें. तेव्हां ख्रिस्तीधर्मीयांच्या रिवाजास अनुसरून तिनें 'तुमचा आत्मा येशूच्या आत्म्याशीं तादात्म्य होऊं इच्छितो काय?' असा त्यास प्रश्न केला व त्यानें हलक्या व अस्पष्ट आवाजांत 'होय' म्हणून उत्तर दिलें व प्राण सोडला ! याप्रमाणें या थोर पुरुषाचा अशा आकस्मिक रीतीनें अंत होऊन फिलिपचा दुष्ट हेतु सिद्धीस गेला !

पिस्तुल झाडल्यानंतर झालेल्या गडबडीचा फायदा घेऊन बालझारनें पळून जाण्याचा प्रयत्न केला, पण वुइल्यमच्या नोकरांनीं त्याचा पाठलाग करून त्यास पकडलें. त्याचे अत्यंत निष्ठुरपणानें भयंकर हाल करण्यांत आले, परंतु ते त्यानें धैर्यानें सोसले. केलेल्या कृत्याबद्दल त्यास बिलकुल पश्चात्ताप वाटला नाहीं. पुढें रीतीप्रमाणें त्याची चौकशी होऊन त्यास हालहाल करून ठार मारण्याची शिक्षा देण्यांत आली.

वुइल्यमच्या मृत्यूची बातमी समजतांच पार्मा व फिलिप यांस मोठा आनंद झाला; परंतु नेदर्लंडांतील सर्व लोकांस फार हळहळ वाटली ! हॉलंड व झीलंड प्रांतांतील लोकांस तर " आपला पिता " गेला असें वाटून परम दुःख झालें ! तथापि तें गिळून त्यांनीं त्याच्या वंशजाच्या नेतृत्वाखालीं आपलें स्वातंत्र्य कायम राखून वुइल्यमचें जिवंत स्मारक करण्याचा निश्चय केला ! व त्याच्या स्मशानयात्रेस हजर राहून त्यांनीं त्याच्याविषयींची आपली कृतज्ञता व्यक्त केली. त्याचा मुलगा मॉरीस याच्या प्रमुखत्वाखालीं त्याच्या स्मशानयात्रेनिमित्त फार जंगी मिरवणूक निघून डेल्फ्ट येथील नव्या देवालयांत मोठ्या गंभीरपणें त्याच्या शवाचा दफनविधि करण्यांत आला. त्याच्या थडग्यावर त्याचा एक संगमरवरी दगडाचा पुतळा उभारलेला असून त्याच्या बाह्य आवरणावर स्वातंत्र्य, न्याय, दूरदर्शित्व व धैर्य यांचीं द्योतक चित्रें काढलेलीं आहेत. ह्या चारी गुणांचा तो खराखुरा आदर्श होता, हें त्याच्या चरित्रावरून स्पष्ट कळून येणारें आहे.

बालझार जेरर्ड यानें डेल्फ्ट शहरांत प्रवेश करण्यापूर्वी वुइल्यमच्या खुनासंबंधानें पार्मा व त्याचा वकील असेन्लेव्हिले यांच्याशीं गुप्तपणें वाटाघाट केली होती. पार्मोला त्याच्या हातून तें कृत्य होईल असें त्यावेळीं वाटलें नाहीं; परंतु त्यानें त्यास उत्तेजन दिलें व कार्यसिद्धि झाल्यास फिलिपकडून बक्षीस मिळवून देण्याचें आश्वासन दिलें होतें. त्यास अनुसरून त्यानें सदर बक्षीस जेरार्डच्या आईबापांस देण्याची फिलिपला शिफारस केली; तेव्हां त्यानें फ्रेंच परगण्यां-

तील वुइल्यमच्या तीन जहागिरी त्यांजवरील सरकारी देणें माफ करून त्यास दिल्या व सरदारकीचा किताबही दिला! त्या त्या घराण्याकडे बरींच वर्षे चालू होत्या; पण फिलिपच्या मृत्यूनंतर एका फ्रेंच गव्हर्नरानें ह्या जहागिरीच्या सनदा फाडून टाकून पायाखालीं तुडविल्या व जहागिरी पुन्हा वुइल्यमच्या वंशजाच्या स्वाधीन केल्या.

वुइल्यमच्या मृत्यूनें सर्व नेदर्लंडाचें एक राष्ट्र होण्याची कल्पना ठार झाली। सुमारें एक वर्षाच्या आंतच दक्षिणेकडील कॅथोलिक लोकांचें वर्चस्व असलेले दाही प्रांत पार्माच्या मध्यस्तीनें पुन्हा फिलिपच्या ताब्यांत आले. मात्र यावेळीं फिलिपला त्यांचे पूर्वापार चालत आलेले अंतस्थ कारभाराचे हक्क देऊन त्यांना संतुष्ट करणें भाग पडलें. अर्थात् जरी ते उत्तर भागापासून वेगळे झाले, तरी ज्या राजकीय दास्याची शृंखला तोडण्याकरितां ते वुइल्यमच्या नेतृत्वाखालीं एक झाले होते ती तुटल्यानें त्यांनाही त्याच्या परिश्रमाचा अप्रत्यक्षपणें फायदा झाला. वुइल्यम जर आणखी वीस वर्षे जगता तर त्यांच्यांतील मतभेदांचें व फूट पाडण्याच्या प्रवृत्तीचें निर्मूलन करून त्यानें त्यांस वेगळे होऊं दिलेंच नसतें आणि या भीतीमुळेंच फिलिपनें ग्रॅनव्हिलेच्या सल्लयावरून त्याचा खून करण्यास उत्तेजन देणारा जाहीरनामा काढला असा अमेरिकन इतिहासकार मोटले याचा अभिप्राय आहे.

दक्षिणेकडील दहा प्रांत जरी फिलिपच्या अंमलाखालीं गेले, तरी उत्तरेकडील सात प्रांतांनीं धैर्य सोडलें नाहीं. ते हॉलंडच्या राज्यसंस्थेंत सामील झाले व मॉरीस आणि त्याच्यानंतर लुसी कोलिग्निचा पुत्र फ्रेडरिक हेनरी यांच्या नेतृत्वाखालीं त्यांनीं फिलिपशीं चालू असलेला झगडा शेवटास नेऊन अखेर त्याच्याकडून आपलें स्वातंत्र्य कबूल करून घेतलें! नंतर थोड्या कालांत हॉलंडचें हें राष्ट्र भरभराटीस येऊन युरोपांतील प्रमुख राष्ट्रांच्या मालिकेंत जाऊन बसलें! आपण लाविलेल्या वृक्षाचा एवढा मोठा विस्तार झालेला पाहून वुइल्यमच्या स्वर्गस्थ आत्म्याला व मृत्युलोकच्या त्याच्या वंशजांना किती आनंद व धन्यता वाटली असेल याची कल्पना करण्याचें काम आम्ही वाचकांवरच सोंपवितों!

वुइल्यमच्या आकस्मिक मृत्यूमुळें त्याच्या तरुण पत्नीवर मोठाच प्रसंग गुदरला, परंतु तिनें धैर्यानें व शहाणपणानें त्याच्या बारा मुलांचें परिपालन करून त्यांस योग्य मार्गास लावलें व त्याची कीर्ति कायम राखली. त्याच्या पश्चात् ती छत्तीस वर्षें

जगली व आपला सावत्र मुलगा मॉरिस आणि त्याच्या मागून सख्खा मुलगा फ्रेडरिक हेनरी यांनीं वुइल्यमचें कार्य ( हॉलंडच्या स्वातंत्र्याचें ) शेवटास नेण्याकरितां स्पेनशीं चालू ठेवलेल्या झगड्यांत त्यांना योग्य सल्लामसलत देऊन तिनें महत्त्वाची कामगिरी बजावली. मरणसमयीं वुइल्यमची सांपत्तिक स्थिति फार खालावलेली होती व त्याला पुष्कळ कर्ज होतें. तें फेडून त्याच्या आठ मुलींचीं मोठमोठ्या राजघराण्यांतील पुरुषांशीं लग्नें करून देऊन तिनें आपली कौटुंबिक जबाबदारीही उत्कृष्टपणें संभाळली. ह्या आठ मुलींच्या द्वारें वुइल्यम हा युरोपांतील बहुतेक प्रख्यात राजघराण्यांचा पूर्वज होऊन राहिला आहे.

समाप्त.

# पुरवणी—परिशिष्ट.

या ग्रंथांत जागोजागीं कॅल्व्हानिस्ट, अनाबाप्टिस्ट, प्रॉटेस्टंट, रोमन कॅथोलिक वगैरे शब्द आले आहेत. त्यांसंबंधानें थोडी खुलासेवार माहिती देणें जरूर वाटल्यावरून ती पुढें देण्यांत येत आहे:—

वरील सर्व नांवें ख्रिस्तीधर्मांतल्या निरनिराळ्या पंथांचीं आहेत. पैकीं **रोमन कॅथोलिक** हें ख्रिस्तीधर्माचें बायबलप्रणित मूळस्वरूप. यांत देवळांतील प्रतिमांचें उपासना, पूजाअर्चा यास पुष्कळ महत्त्व असून धर्मगुरूचें महात्म्य फार आहे. या पंथाचें स्वरूप गोमांतकांत चांगलें ठळकपणें नजरेस पडण्यासारखें आहे. यांतील धर्मगुरूंच्या प्राबल्यामुळें ख्रिस्ती समाजांत धर्मभोळेपणा वाढला व धर्मास विकृत रूप येऊन धर्मगुरूंचा जुलूम व अनाचार वाढूं लागला. तेव्हां लूथर नामक प्रख्यात जर्मन धर्मसुधारकानें धर्मगुरूंचें महत्त्व नष्ट करण्याप्रीत्यर्थ बंड उभारलें व त्यांतून प्रॉटेस्टंट नामक नवीन पंथ निर्माण झाला. परमेश्वराच्या प्राप्तीस गुरूच्या मध्यस्तीची आवश्यकता नसून प्रत्येकास स्वतंत्र रीतीनें त्याची उपासना करतां येते व त्या रीतीनें आपली धार्मिक उन्नति करून स्वर्गप्राप्ति करून घेतां येते अशी या पंथाची आरंभीं शिकवण होती. पण पुढें यांतही धर्मगुरूला थोडेंबहुत महत्त्व प्राप्त झालेंच. बायबलांतील अशक्य व अद्भुत गोष्टी सोडून त्यांतील शुद्ध तत्त्वज्ञानावरच या पंथाचा विशेष भर असे व आहे. सध्यां युरोपांत व अमेरिकेंत याच पंथाचें विशेष प्राबल्य आहे. मनुष्यांतील उच्चनीच भाव काढून टाकून समतेचें तत्त्व प्रस्थापित करण्याचा लूथरचा उद्देश होता. पण तो पूर्णांशानें सफल झाला नाहीं. प्रारंभीं गरीबांचा वाली म्हणून त्याची ख्याति झाली; पण पुढें ती टिकली नाहीं. तो श्रीमान्, सरदार व मध्यम वर्गांतील सधन लोक यांसच प्रिय होऊन बसला. पाद्रयांच्या जुलुमांतून व वर्चस्वापासून या वर्गांची मुक्तता त्यानें केली, पण खालच्या वर्गाकडे त्यानें दुर्लक्ष केलें.

**कॅल्व्हानिस्ट** पंथ हा जॉन कॅल्व्हिन नामक स्विस धर्मसुधारकानें निर्माण केला. हा इ. स. १५६४ च्या दरम्यान होऊन गेला. याचा जन्म वेलस परगण्यांत झाला व तेथेंच त्याच्या पंथाचें प्राबल्य प्रथम वाढलें. नंतर कॅथोलिक व प्रॉटेस्टंट यांनीं या पंथाच्या लोकांचा छळ मांडल्यामुळें ते मध्ययुरोपांत गेले. प्रॉटेस्टंट पंथापेक्षां हा पंथ अधिक प्रागतिक आहे. धर्माप्रमाणेंच सामाजिक व राजकीय उन्नतीकडेही याचें विशेष लक्ष असे. तो राजनिष्ठ परंतु प्रतिनिधिक रूत्तेचा अभिमानी होता. बायबल हा महत्त्वाचा धार्मिक ग्रंथ असून त्याच्या अभ्यासानें परमे-

-भराची प्राप्ति होते अशी या पंथाची समजूत आहे. येशू ख्रिस्ताला परमेश्वरी अवतार समजून त्यानें मानवी प्राण्याला पापापासून मुक्त करण्यास्तव अवतार घेतला, असें या पंथाचें मत आहे. मनुष्य मृत झाला म्हणजे त्याचा आत्माही अचेतन अशा सुप्तावस्थेत विलीन होतो ( निद्रितावस्थेत जातो ) असें तत्कालीन अनाबाप्टिस्टांनीं जें एक मत प्रचलित केलें होतें तें कॅल्व्हिन यानें खोडून काढलें व मरणानंतरही मनुष्याचा आत्मा सचेतन स्थितींत असतो हें प्रमेय सिद्ध केलें. त्याचें वेदान्तांतील तत्त्वज्ञानाशीं बरेंच साम्य आहे.

**अनाबाप्टिस्ट** हा पंथ ख्रिस्तीधर्मांतील जहाल सुधारकांचा होता. बाल्यावस्थेत मनुष्यप्राण्याला बाप्तिस्मा देण्याची मूळ पद्धति यांना पसंत नव्हती. ते प्रौढपणीं पुन्हा हा विधि करीत असत. हे येशूला देवाचा मानवी अवतार समजत नसत. तो एक दैवी साधुपुरुष होता एवढेंच मानीत असत. शपथा घेणें व न्यायकोर्टांत दावे चालविणें हें त्यांच्या दृष्टीनें पातक असे. शस्त्रधारण व सशस्त्र प्रतिकार हीं त्यांनीं त्याज्य मानलीं आहेत. राजसत्ता ही एक ऐहिक बाब आहे. परमेश्वराच्या राज्याशीं त्याचा कांहींएक संबंध नाहीं, अर्थात् जो खरा धार्मिक असेल त्यानें इहलोकींच्या राज्यांत कोणतीही अधिकाराची जागा किंवा सन्मानदर्शक पदव्या यांचा स्वीकार करतां कामा नये, असा त्यांचा दंडक होता. जे धर्मशील नसतील किंवा नास्तिक असतील त्यांना पश्चात्ताप होईपर्यंत सामाजिक बहिष्कार घालण्याचाही त्यांचा शिरस्ता होता; परंतु या बाबतींत कोणावर जुलूम-जबरदस्ती करण्याची त्यांची इच्छा नसे. धर्मविधीच्या साह्यानें ज्याचा एकदां उद्धार झाला तो पुनरपि केव्हांही पतित होत नाहीं, अशी यांची समजूत असे. अशा माणसाच्या हातून पातक घडल्यास तें त्याच्या बाह्य शरीराकडून घडलें, शरीरांतर्गत आत्म्याकडून घडलें नाहीं असें ते मानीत असत! या पंथाचा एक विशेष असा होता कीं, धार्मिक सुधारणेंत सामाजिक उन्नतीचा अंश असला पाहिजे; याविषयीं यांचा कटाक्ष असे. यामुळें समाजांतील खालच्या वर्गाची उन्नति यांचेकडून बरीच झाली व लूथरचें प्रॉटेस्टंट मत जसें वरिष्ठ व मध्यम वर्गांत प्रिय होऊन वसलें तसेंच या पंथाचें माहात्म्य कनिष्ठ वर्गांत विशेष वाढलें. सोळाव्या शतकांतील समाजसत्तावादाचा उगम या ख्रिस्ती धर्मपंथांतूनच झाला व त्यामुळें या पंथाच्या लोकांचा राजे व सरदार यांजकडून छळही पुष्कळ झाला; पण त्याची परवा न करितां त्यांनीं धार्मिक व तदंतर्गत सामाजिक सुधारणेचें कार्य नेटानें केलें.

---